लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या महसुली
जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४),
गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४, ६.४),
महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३, ५.४, ५.५),
महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.२),
सहकार व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग) विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र. ६.३) यावरील

पंधरावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक डिसेंबर, २०१३ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
डिसेंबर, २०१३

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४, ६.४), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३, ५.४, ५.५), महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.२), सहकार व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.३) यावरील

पंधरावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

* (७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीपासून)

(८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

** (९) श्री.संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

*** (१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

(११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

**** (११अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)

(१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

(२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)

***** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)

(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधामंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्री.दिलीप येवाला, अवर सचिव (समिती).
(६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.
(७) श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

*** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.**

**** श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

****** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली.**

******* श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

( )

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३, ५.४, ५.५), महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.२), सहकार व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.३), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.४)यावर विचार करून लोकलेखा समितीचा पंधरावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २०१२, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२, दिनांक १४ व १५ डिसेंबर, २०१२ रोजी अप्पर मुख्य सचिव, महसुल व वन (महसूल) विभाग, प्रधान सचिव, वित्त, सहकार व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग), गृह (परिवहन) व महसूल व वन (वन) विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक डिसेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
नागपूर.
दिनांक : डिसेंबर, २०१३

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

( )

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	**महसूल व वन (महसूल) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.३, ३.४, ५.५)	
(२)	**गृह (परिवहन) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.४, ६.४)	
(३)	**वित्त विभाग**	
	(परिच्छेद क्र. ५.३, ५.४,)	
(४)	**महसूल व वन (महसूल) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ५.५)	
(५)	**महसूल व वन (वन) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ६.२)	
(६)	**सहकार व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ६.३)	

महसूल व वन (महसूल) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००६-०७ च्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील **परिच्छेद क्र. ३.३ "मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी" व परिच्छेद क्र. ३.४ "बाजारमूल्याचे चुकीचे संगणन करण्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी"** या संदर्भात खालील अभिप्राय दिले आहेत.

"मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी"

मुंबई मुद्रांक अधिनियमाप्रमाणे, अभिहस्तांतरण विलेखांवर मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी ही मालमत्तेच्या खऱ्या बाजारमूल्यावर, ती मालमत्ता स्थित असलेल्या क्षेत्राला लागू असलेल्या दरांनी आकारणीय आहे. हे दर सिध्द गणकात विहित केलेले आहेत.

मुद्रांक अधिक्षक मुंबई आणि दुय्यम निबंधक II नागपूर यांच्या कार्यालयात ऑक्टोबर २००५ ते २००६ दरम्यान असे दिसून आले की मे २००३ आणि एप्रिल २००४ या दरम्यान १४ अभिहस्तांतरण विलेख अभिनिर्णित (मुंबई १) / नोंदणीकृत (नागपूर १३) केले गेले आणि रु. ५२ कोटीच्या मोबदल्यापोटी रु. ५.०५ कोटींचे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वसूल केली गेली. तथापि, असे आढळून आले की, मालमत्तेचे खरे बाजारमूल्य रु. ६८.८६ कोटी होते. ज्यावर रु. ६.५९ कोटींचे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारणीय होती. याप्रमाणे मालमत्तांच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची रु. १.५४ कोटी कमी आकारणी झाली.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांनी नोव्हेंबर २००६ मध्ये अकृती स्वीकारली आणि मुद्रांक जिल्हाधिकारी यांना १३ विलेखांच्याबाबतीत मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी यातील तूट वसूल करण्याचे आदेश दिले. मुद्रांक अधिक्षक, मुंबई यांनी मे २००६ मध्ये त्यांनी अभिनिर्णित केलेल्या विलेखाच्या बाबतीतील अकृती स्वीकारली. वसुलीचा अहवाल मिळालेला नाही. (ऑक्टोबर २००७)

ही बाब शासनाला मार्च आणि एप्रिल २००७ या दरम्यान कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही. (ऑक्टोबर २००७)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने पूरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

या अहवालामध्ये दुय्यम निबंधक, नागपूर क्र. २ या कार्यालयाचे १३ व मुद्रांक अधिक्षक मुंबई कार्यालयातील १ अशा एकूण १४ प्रकरणांचा समावेश आहे. आक्षेपित रक्कम रु. १.५४ कोटी इतक्या रकमेचा समावेश आहे. यामध्ये दुय्यम निबंधक, नागपूर क्र. २ या कार्यालयातील परिच्छेद क्र. १ मधील दस्त क्र. २८६१ ते २८६७/०३ व ३२००, ३२०१ व ३२०३/०३ परिच्छेद क्र. १ (अ) मधील दस्त क्र. ३६३०/०३ व परिच्छेद क्र. १ (ब) मधील दस्त क्र. २४९३/०४ व परिच्छेद क्र. ६ मधील दस्त क्र. ३८९६/०३ या दस्तऐवजांचा समावेश आहे. सदर परिच्छेदावरील आक्षेप मान्य करण्यात आले असून सदर प्रकरणामध्ये आर.आर.सी ची कार्यवाही पूर्ण होऊन दस्तांकित मिळकतीवर बोजा नोंद होऊन मिळकतीचे उतारे प्राप्त झालेले आहेत.

तसेच मुद्रांक अधिक्षक मुंबई या कार्यालयातील परिच्छेद क्र. २ मधील अभि.प्र.क्र.अेडीजे/३६२९/०३ यावरील आक्षेप मुद्रांक अधिक्षक मुंबई यांनी मान्य केला असून यावर कमी पडलेले मुद्रांक शुल्क रु. ८,००,०००/- पावती क्र. ८९३९१ द्वारे वसूल करण्यात आले आहेत.

"बाजारमूल्याचे चुकीचे संगणन करण्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी"

मुंबई मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीनुसार, मुद्रांक शुल्क हे विहित दराने, अभिहस्तांतरित केलेल्या किंवा अभिहस्तांतरणाच्या विलेखाद्वारे किंवा विकास कराराद्वारे ताबा दिलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्यावर आकारणीय आहे.

दुय्यम निबंधक हवेली VII पुणे यांच्या कार्यालयात ऑक्टोबर २००५ मध्ये असे दिसून आले की, अनुक्रमे मार्च २००४ आणि जून २००४ मध्ये निष्पादित केलेल्या दोन अभिहस्तांतरण विलेख आणि विकास करारांवर, विलेखांमध्ये दर्शविलेल्या रु. ११.२० कोटी एवढ्या मोबदल्यापोटी रु. २२ लाखांचे मुद्रांक शुल्क आकारले गेले. तथापि विलेखाच्या छाननीत असे उघडकीस आले की, अभिहस्तांतरण केलेल्या / विकासाकरीता ताबा दिलेल्या मालमत्तांचे खरे बाजारमूल्य रु. २२.१८ कोटी होते ज्यावर रु. ५३.७३ लाख मुद्रांक शुल्क आकारणीय होते.

याप्रमाणे बाजारमूल्याचे चुकीच्या संगणन करण्यामुळे मुद्रांक शुल्काची रु. ३१.७३ लाख कमी आकारणी झाली.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यावर, संयुक्त जिल्हा निबंधक पुणे यांनी मार्च २००७ मध्ये अकृती स्वीकार केली आणि उप निबंधकांना मुद्रांक शुल्काच्या वसुलीतील तूट वसुल करण्याचे आदेश दिले. तुटीच्या मुद्रांक शुल्काच्या वसुलींचा अहवाल प्राप्त झाला नाही (ऑक्टोबर २००७).

ही बाब शासनाला एप्रिल २००७ मध्ये कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (ऑक्टोबर २००७).

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

या अहवालामध्ये सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. ७ पुणे या कार्यालयातील एकूण दोन दस्तऐवजांचा समावेश आक्षेपित रक्कम रु. ३१.७३ लाख इतक्या रकमेचा समावेश आहे.

अ) परिच्छेद क्र. १ दस्त क्र. १२३७/२००४ हा विकसन करारनाम्याचा दस्त असून दस्तऐवजाचे चुकीच्या वर्गीकरणामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केल्याचा महालेखापाल यांनी आक्षेप घेतला आहे. सदरचा दस्त विक्री कराराचा होत नसून विकसन कराराचा असल्याने सजिनि, पुणे शहर यांनी दिनांक १६/०३/२००७ चे पत्रान्वये या परिच्छेदातील आक्षेप अंशत: मान्य केला आहे. वसुलीची कार्यवाही चालू आहे.

ब) परिच्छेद क्र. ३ दस्त क्र. २३४९/२००४ या दस्तावर बाजारमूल्याचे चुकीच्या मूल्यांकनामुळे मुद्रांकाची कमी आकारणी केल्याचा महालेखापाल यांनी आक्षेप घेतला आहे. सदरच्या परिच्छेदावरील आक्षेप सजिनि, पुणे शहर यांनी मान्य केला असून मिळकतीच्या ७/१२ वर बोजा निर्माण केला आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासंदर्भात समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग व विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. सदर परिच्छेद हा मुंबईच्या संबंधातील असून या ठिकाणी मालमत्तेचे मूल्यांकन कमी केल्यामुळे मुद्रांक शुल्काची आकारणी कमी करण्यात आली आहे. मात्र मालमत्तेचे खरे

बाजारमूल्य रु. ६८.८६ कोटी इतके होते. ज्यावर रु. ६.५९ कोटीचे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारणीय होती. यानुसार मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची रु. १.५४ कोटी कमी आकारणी करण्यात आली. विभागाने सदरहू बाब मान्य केली आहे. त्यामुळे सदर परिच्छेदातील आक्षेपासंदर्भात समितीने महालेखापालांना विचारणा केली की, मुद्रांक शुल्कापोटी वसुली कमी झालेली आहे, तर मग सदर वसुली का कमी झालेली आहे ? बाजार मूल्य व रेडी रेकनरप्रमाणे सदनिकांची विक्री व त्यावरील मुद्रांक शुल्क आकारण्याचा जो व्यवहार असतो. त्यामध्ये सदनिकेच्या किंमतीवर मुद्रांक शुल्क आकारले जाते. परंतु सदनिकांच्या किंमती रेडी रेकनरप्रमाणे निश्चित न केल्या गेल्यास त्यावरील मुद्रांक शुल्क कमी वसूल होते. बाजार मूल्याप्रमाणे सदनिकांच्या किंमती ठरविल्यानंतर त्याप्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल केल्यास काही भागातील मुद्रांक शुल्कांच्या किंमतीमध्ये तफावत दिसून येते. परंतु सन २००५ मध्ये सभागृहामध्ये असा कायदा पारित करण्यात आला की, मुंबई व उर्वरित महाराष्ट्रामध्ये सदनिकांचे मुल्य कार्पेट एरियाप्रमाणे ठरविण्यात येईल. याबाबत खुलासा करताना उपमहालेखाकार, नागपूर यांनी समितीस सांगितले की, परिच्छेदांमध्ये दिलेले आक्षेप हे रेडी रेकनरप्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल न केल्यामुळे घेण्यात आलेले आहेत. रेडी रेकनर हे देखील कायद्याप्रमाणे दरवर्षी जाहीर केले जातात. या संदर्भात ऑडिट केल्यानंतर असे आढळून आले की, काही ठिकाणी सदनिकांच्या विक्रीचे व्यवहार बाजार मूल्य आणि रेडी रेकनर यांच्या तफावत असलेल्या दरांच्या आधारे झालेले आहेत. त्यामुळे मुद्रांक शुल्काच्या वसुलीमध्ये अनियमितता झालेली आढळून आलेली आहे.

परंतु सन २००५ मध्ये सुपर बिल्ट अप एरियांच्या माध्यमातून ग्राहकांची होत असलेली लूट थांबविण्याकरिता शासनाने कार्पेट एरियाप्रमाणे सदनिकेची किंमत आणि त्यावरील मुद्रांक शुल्क आकारण्याबाबतचा कायदा सभागृहामध्ये कायदा पारित केलेला आहे. प्रशासन कायद्याप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारते, की रेडी रेकनरच्या दराप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारते ? अशी विचारणा समितीने केली असता उपमहालेखाकार, नागपूर यांनी सांगितले की, प्रशासन हे कायद्याप्रमाणे प्रतीवर्षी जाहीर केलेल्या रेडी रेकनरप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारते. प्रती वर्ष जे रेडी रेकनर प्रसिध्द केले जाते ते मार्केट रेट व कायद्यातील तरतुदीप्रमाणे तयार केले जाते.

रेडी रेकनर हे मुद्रांक शुल्क व सदनिकेचे मुल्य ठरविण्याकरिता अयोग्य आहेत, असे शासनाने जाहीर केले पाहिजे. कारण रेडी रेकनर व कार्पेट एरियाप्रमाणे सदनिकेचे मुल्य व त्यावरील मुद्रांक शुल्काच्या रकमांमध्ये तफावत आढळून येते. प्रती वर्षी रेडी रेकनर हे एकदाच छापून सर्वत्र प्रकाशित केले जातात. परंतु संदर्भित वर्षांच्या भावामध्ये व एरियातील सुविधांमध्ये तफावत झालेली दिसून येते. सदनिकांचे मुल्य व त्यावरील मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासंबंधीचे जे प्रचलित कायदे व नियम आहेत. त्याप्रमाणे मुंबई व इतर महाराष्ट्रामध्ये व्यवहार होत नाहीत. या संदर्भात विभागाने कठोर कारवाई प्रस्तावित करणे जरुरीचे होते असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत माहिती देताना उपमहालेखाकार, नागपूर यांनी सांगितले की, मुद्रांक शुल्क व त्याची नियमानुसार विहित मुदतीमध्ये वसुली हे प्रशासकीय काम आहे. प्रशासकीय कामामध्ये ढिसाळपणा व विलंब होत असेल तर त्या संदर्भात महालेखापाल आक्षेप परिच्छेदांच्या माध्यमातून आक्षेप नोंदवित असतात. तसेच, वसूल केलेल्या रकमांमध्ये अनियमितपणा असेल तर त्या संदर्भातही आक्षेप नोंदविलेले असतात.

बिल्डर्स व इतर ठेकेदार सामान्य ग्राहकांची सुपर बिल्ट अप एरियाच्या नावाखाली लूट करीत असतात. सामान्य ग्राहकाची होत असलेली ही लूट थांबविण्याकरिता शासनाने सन २००५ मध्ये कार्पेट एरियाप्रमाणे सदनिका मुल्य व त्यावरील मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे, असा कायदा पास केला. परंतु आज काल सर्व ठिकाणी सुपर बिल्ट अप व कार्पेट एरिया या संकल्पनांच्या आधारे गोलमाल करुन सदनिका मुल्य निर्धारित करण्यात येते. त्याप्रमाणेच त्यावर मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात येते. या संदर्भात कायद्याप्रमाणे सदनिकेचे मुल्यांकन होत आहे का ? याची तपासणी महालेखाकार कार्यालय व विभाग यांनी कटाक्षाने केली पाहिजे. भिंत ते भिंत ५०० चौ.फु.चे घर असेल तर त्या सदनिकेचे मुल्य हे ५०० चौ.फु.च्या दराप्रमाणेच ग्राहय धरण्यात येईल, असा सन २००५ चा कायदा आहे. परंतु या कायद्यातील नियमाप्रमाणे सर्वत्र जागांचे व सदनिकांचे व्यवहार होत आहेत का ? याची पाहणी करण्याचे हे संबंधीत विभागाचे काम आहे. असे मत समितीने प्रदर्शित केले.

समितीच्या सूचनेसंदर्भात माहिती देताना उपमहालेखाकार, नागपूर यांनी सांगितले की, रेडी रेकनरची बेस व्हॅल्यू जी आहे, तीही प्रत्यक्षात व्यवहारामध्ये लागू करण्यात येते की नाही, असेही प्रश्न काही केसेसच्या संदर्भात सामान्यांच्या व आमच्यासारख्या अधिका-यांच्या मनामध्ये

उत्पन्न होतात. सदनिकेचे मुल्य निर्धारित करीत असतांना बेस व्हॅल्यू ही कार्पेट एरियाप्रमाणेच निर्धारित करण्यात यावी. हे या कायद्याच्या माध्यमातून सर्व सामान्यांना सांगावयाचे आहे.

सुपर बिल्ट अप, बिल्ट अप, कार्पेट एरिया तसेच, रेडी रेकनरचा दर या माध्यमातून सदनिकेच्या मुल्यामध्ये व त्यावरील मुद्रांक शुल्काच्या रकमेमध्ये मोठी तफावत **(Discrepancy)** निर्माण होत आहे. या तफावतीची उकल प्रशासनाने विभागाच्या माध्यमातून करणे ही आता काळाची गरज झालेली आहे. तसेच शासनाने एखादा महत्वाचा कायदा पास केल्यानंतर तो लागू केला जातो. तो कायदा लागू झाल्यानंतर सर्वसामान्यांना अशी अपेक्षा असते की, आता शासनाने पारित केलेल्या कायद्यानुसार अंमलबजावणी होईल. परंतु असे असतांनाही जर रेडी रेकनरचाच आधार घेऊन व्यवहार होत असतील तर लोकप्रतिनिधींनी सर्वानुमते एकत्रितरित्या पास केलेल्या कायद्याला काहीही अर्थ राहत नाही. राज्य उत्पादन शुल्क विभागाची यंत्रणा तसेच, मुद्रांक शुल्क विभागाची यंत्रणा यांनी सर्वत्र होत असलेल्या जंगम मालमत्तेच्या व्यवहारांचा तपशील तपासून त्यामध्ये संबंधित कायद्याचे पालन केले गेलेले आहे का ? याची पाहणी करणे गरजेचे आहे. सामान्य ग्राहक बिल्डरने निर्धारित केलेल्या सदनिका मुल्याप्रमाणे मुद्रांक शुल्काचा भरणा करतो. परंतु, एखाद्या ग्राहकाला जर कळले की, हे सदनिका मुल्य कार्पेट एरियाप्रमाणे निर्धारित केलेल नाही. तरी देखील तो याविरुध्द कोर्टात जाऊन पैसे व वेळ वाया घालवू इच्छित नाही. शासनाच्या व मुद्रांक शुल्क यंत्रणेच्या विरोधात जाण्याची त्यांच्यामध्ये हिम्मत नसते. कारण सर्वसामान्य ग्राहक हा संघटित नसतो. मुद्रांक शुल्काची रक्कम पूर्ण भरुन तो जंगम मालमत्ता आपल्या स्वतःच्या नावावर करुन घेतो. अशी माहिती देऊन याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली तसेच महालेखापालांनी देखील कायद्याप्रमाणे व प्रचलित कायद्यातील नियमांप्रमाणे सर्व व्यवहार होत आहेत की नाही हे पहावे तसे नसल्यास त्यासंदर्भात विवरणात्मक आक्षेप परिच्छेद नोंदविणे आवश्यक असल्याचे मत समितीने प्रदर्शित केले.

परिच्छेद क्रमांक ३.३ "मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी" व ३.४ "बाजारमूल्याचे चुकीचे संगणन करण्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी" यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस माहिती देताना सांगितले की, या दोन्ही परिच्छेदातध्ये मुद्रांक शुल्क कॅल्क्यूलेशनचा मूळ मुद्दा आहे. मुंबई मुद्रांक अधिनियमाप्रमाणे, अभिहस्तांतरण विलेखांवर मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी ही मालमत्तेच्या ख-या

बाजारमूल्यांवर ती मालमत्ता स्थित असलेल्या क्षेत्राला लागू असलेल्या दरांनी आकारणीय आहे व हे दर सिध्द गणकात विहित केलेले आहेत.

नागपूर येथे एक कंपनी अवसायनात निघाली होती. कोर्टाने नेमलेल्या लिक्विडेटरने या प्रॉपर्टीचे मुल्य १३ कोटी रुपये इतके निर्धारित केलेले होते. या व्यवहारामध्ये सह निबंधकांने मुद्रांक शुल्क आकारले होते. महालेखापालांची टीम ज्यावेळी प्रत्यक्षात तेथे गेली, त्यावेळी रेडी रेकनरनुसार त्याची किंमत काढली त्या संदर्भात महालेखाकारांनी सांगितले की, या मालमत्तेवरील मुद्रांक शुल्क कमी आकारले गेलेले आहे. कायदा व नियमाप्रमाणे मालमत्ता स्थित असलेल्या क्षेत्राला लागू असलेले "खरे बाजार मूल्य " याप्रमाणे कार्पेट एरियावरच मुद्रांक शुल्क आकारले जाणे आवश्यक आहे.

अवसायनात निघालेल्या कंपनीमध्ये कोर्ट लिक्विडेटर नेमते, परंतु हा लिक्विडेटर कशाच्या आधारावर मालमत्तेचे मुल्य व त्यावरील मुद्रांक शुल्काची रक्कम निर्धारित करतो. कंपनीच्या अवसायनाची किंमत कॅल्क्यूलेट करीत असतांना कोणत्या नियमांचा आधार घेतलेला आहे ? अशी समितीने पृच्छा केली असता, याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कंपनीच्या अवसायनाची किंमत कॅल्क्यूलेट करीत असतांना कंपनी ज्या भागामध्ये स्थित आहे, त्या क्षेत्राला लागू असलेले दर तसेच, रेडी रेकनरनुसार जे दर आहेत, त्या दराप्रमाणे कंपनीच्या अवसायनाची किंमत निश्चित केली जाते.

रेडी रेकनर प्रमाणे असेसमेंट टॅक्स मूल्यनिर्धारीत करणे यासंदर्भात उदाहरण देताना समितीने सांगितले की, वर्सोवा येथे म्हाडाची सदनिका आहे. या म्हाडाच्या सदनिकेची किंमत ४२ लाख रुपये इतकी आहे. परंतु या सदनिकेवर महापालिकेच्या मार्फत जो असेसमेट टॅक्स लावला जातो, तो पाच हजार रुपये मासिक इतका आहे. रेडी रेकनरप्रमाणे या सदनिकेची किंमत निश्चित केलेली असतांना त्याचा असेसमेंट टॅक्स मलबार हिल येथील सदनिकेइतका आहे. परंतु प्रत्यक्षात या सदनिकेवर असेसमेंट टॅक्स कॅल्क्यूलेट करण्याची कार्यपध्दती तपासली असता असे निदर्शनास आली की, रेडी रेकनरप्रमाणे सदनिका व असेसमेंट टॅक्स मूल्य निर्धारित केलेले नाही. महापालिकेने वर्सोवा येथील म्हाडाच्या सदनिकेकरिता मासिक सव्वा तीन हजार रुपये असेसमेंट टॅक्स आकारणे आवश्यक आहे.

बऱ्याच वेळेला असे होते की, एखाद्या एरियामध्ये जे प्रचलित दर लागू असतात. त्या दराप्रमाणे त्याच भागातील एका रस्त्याच्या डाव्या बाजूला सदनिकेंचे मुल्य निर्धारित केले जाते.

पंरंतु रस्त्याच्या दुस-या बाजूला जर उच्चभ्रु टॉवर्स उभारले जात असतील तर त्यामधील सदनिकांकरिता अन्य मुल्यप्रणालीचा वापर केला जातो. एकाच एरियामधील सदनिकांचे दर निश्चित करीत असतांना त्यांच्या किंमतीमध्ये अशा प्रकारे इतकी मोठी तफावत का निर्माण होते ? बीडीडी चाळीमधील सदनिका एका किंमतीला आणि चाळीसमोरील रस्त्याच्या पलीकडील टॉवरमधील सदनिकेचे मुल्य चाळीमधील सदनिकेपेक्षा जास्त निश्चित केलेले असते.

याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कोणत्याही क्षेत्रामध्ये कमी मजल्याची इमारत असो किंवा उच्चभ्रु जास्त मजल्यांची सुविधायुक्त टॉवर इमारत असो. या सर्व इमारतींच्या बांधकामांकरिता नगरपालिकेकडून परवानगी ही घ्यावीच लागते. परंतु एखाद्या उच्चभ्रु एरियामधील टॉवर इमारतीची परवानगी घेत असतांना संबंधितांस जास्त शुल्क किंवा जास्त आकारणीचा भरणा करावा लागतो. इमारत बांधकाम व त्याच्या परवानगीस लागणाऱ्या एकूण मुल्यांवर आधारित त्या इमारतीतील सदनिकेचे मुल्य निर्धारित केले जाते.

महालेखाकारांनी काढलेला सदरहू आक्षेप नागपूर येथील कंपनीबाबतचा असून सदर कंपनीच्या अवसायनाची किंमत व लिक्विडेटर हा कोर्टाने नेमलेला आहे. परंतु अशा प्रकारची केस मुंबईमध्येही घडलेली असेलच. त्यावेळी शासनाने कोणती भूमिका घेतली होती याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अशा प्रकारची केस मुंबईमध्येही घडलेली आहे. ज्यावेळी मुंबईमध्ये अशा प्रकारे एखादी कंपनी लिक्विडेशनमध्ये जाते, त्यावेळी कंपनी स्थित असलेल्या क्षेत्राला लागू असलेल्या दराप्रमाणे कंपनीची इमारत व परिसराचे मुल्य निर्धारित केले जातात. तसेच, कंपनीच्या उत्पादनाच्या रेशिओमध्ये झालेले नुकसान या सर्वांचे सम्यक गणांकन करुन त्याप्रमाणे कंपनीच्या अंतिम व संपूर्ण अवसायनाचे मुल्य निश्चित केले जाते.

तसेच, कंपनीच्या अवसायन मुल्यावर रेडी रेकनरप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारले जाते. कोर्टाने नेमलेला लिक्विडेटर एक सर्टन अमाऊंट निश्चित करीत असतो. त्या रकमेचे व कंपनीच्या इतर व्यवहाराचे लेखापरीक्षण करण्याकरिता महालेखाकार टीम तेथे जाते. कंपनींच्या व्यवहारांचे लेखापरीक्षण केल्यानंतर सर्व डयुज मायनस करुन अवसायनाचे मुल्य पुर्ननिर्धारित केले जाते.

कंपनी अवसायनात निघाल्यानंतर त्याचे अवसायन मुल्य ठरवित असतांना करोडो रुपयांचा शासनाचा महसूल बुडविला जातो. संबंधित माननीय मंत्री महोदयांच्या अपरोक्ष संबंधित बडे अधिकारी सर्व व्यवहारांवर नियंत्रण ठेवीत असतांना शासनाचा महसूल बुडविला जात आहे की नाही, याकडेही लक्ष दिले जाणे आवश्यक आहे. तसेच महसूल बुडाल्याची कारणे लक्षात घेऊन जबाबदारी फिक्स करुन दोषी असलेल्यांविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी अशी सूचना समितीने विभागास केली.

नागपूर स्थित संबधित कंपनीच्या अवसायनामुळे शासनाचा तब्बल पाच हजार कोटी रुपयांचा महसूल बुडित निघत होता. विभागाने कंपनीच्या अवसायनाबाबत लेखी आदेश काढून त्याची श्वेत पत्रिका काढणे आवश्यक आहे. हा प्रश्न केवळ याच कंपनीपुरता मर्यादित नाही. हा प्रश्न एकूण पाच हजार रुपयांच्या महसूलासंदर्भातील आहे असे मत समितीने व्यक्त केले.

मुद्रांक शुल्क आकारण्याच्या कार्यपध्दतीबाबत माहिती व मुद्रांक शुल्क आकारण्याचे दर दर्शविणारा तक्ता / कोष्टक सर्व महसूल कार्यालयात उपलब्ध करण्यात येत नाही काय याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रत्येक वर्षी १ जानेवारीला रेडिरेकनरची कॉपी सब रजिस्ट्रारला उपलब्ध करुन दिली जाते. रेडिरेकनरची कॉपी ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन दिली जाते. तसेच, सन २०१०, सन २०११ व सन २०१२ या ३ वर्षांच्या रेडिरेकनरची कॉपी विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी मुद्रांक शुल्काची कमी वसुली करण्याची कारणे काय आहेत ? तसेच मुद्रांक शुल्काची कमी वसुलीची बाब महालेखाकार कार्यालयाने निदर्शनास आणून दिल्यानंतर वसुली करण्यात आल्यामुळे या संदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय व कमी वसुलीसाठी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई सारख्या शहरामध्ये वेगवेगळया भागामध्ये वेगवेगळे दर असतात. त्याचप्रमाणे एकाच इमारतीतील वेगवेगळया मजल्यावरील सदनिकांच्या मुद्रांक शुल्काच्या दरामध्ये देखील फरक असतो. इंटरप्रिटेशनमध्ये फरक झाल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली. त्यामुळे सदरहू आक्षेप उद्‌भवलेले आहेत. सदरहू आक्षेप मान्य करण्यात आले असून त्याप्रमाणे रिकव्हरीची प्रक्रिया सुरु आहे.

मुंबई सारख्या शहरामध्ये मोठमोठे टॉवर्स असतात. यापैकी काही टॉवर्समध्ये फक्त तळमजल्यावर पार्किंगची व्यवस्था असते व त्यानंतरच्या मजल्यापासून निवासी सदनिका असतात. तर काही टॉवर्समध्ये १८ मजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था असते व त्यानंतरच्या मजल्यापासून निवासी सदनिका असतात. केवळ तळमजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था असणाऱ्या टॉवरमध्ये पहिल्या मजल्यावरील सदनिकेवर ज्या दराने मुद्रांक शुल्क आकारले जाते, त्याच दराने १८ मजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था असणाऱ्या इमारतीतील १९ व्या मजल्यावरील सदनिकेवर देखील तो पहिला मजला समजून आकारले जाते. ही अतिशय विसंगत गोष्ट आहे. या सदनिकांच्या मुद्रांक शुल्कामध्ये तफावत असली पाहिजे. नवीन रेडिरेकनर तयार करताना या बाबत देखील विचार करणे आवश्यक आहे अशी सूचना समितीने विभागास केली.

"अ" वर्ग व "ब" वर्ग नगरपालिकांमध्ये अकृषिक नोंदणी झालेल्या जमिनीवर वेगळया दराने मुद्रांक शुल्क आकारला जातो व ज्या जमिनीची अकृषिक नोंदणी झालेली नाही त्या जमिनीवर वेगळया दराने मुद्रांक शुल्क आकारला जातो. परंतु उपरोल्लेखित नगरपालिका क्षेत्रामध्ये कृषिक व अकृषिक अशी नोंदणी झालेल्या अथवा न झालेल्या जमिनींवरही सारख्याच दराने मुद्रांक शुल्क आकारले जाते. या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, रेसिडेन्शिअल झोनसाठी डिक्लेअर झालेल्या जमिनीवर स्क्वेअरमीटरप्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते. रेसिडेन्शिअल झोनमधील एखाद्या जमिनीची जरी अकृषिक नोंदणी झालेली नसली तरी, ती जमीन भविष्यामध्ये रेसिडेन्शिअल कारणासाठी वापरली जाईल असे गृहित धरुन त्या जमिनीवर देखील स्क्वेअरमीटरप्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते. परंतु, एखादी जमीन ग्रीन झोन म्हणून किंवा शेतीसाठी डिक्लेअर करण्यात आली असेल तर, अशा जमिनीची अकृषिक नोंदणी केल्याशिवाय मुद्रांक शुल्काची स्क्वेअरमीटर प्रमाणे आकारणी केली जात नाही.

डिम्ड कन्व्हेअन्सचा कायदा आता सर्वत्र लागू करण्यात आलेला आहे. सन १९८५ पूर्वीच्या सदनिकांबाबत सदनिकांधारकांना आता स्टँम्प डयुटी द्यावी लागणार आहे काय याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तत्कालीन कायद्याप्रमाणे असलेली स्टँम्प डयुटी ज्यांनी भरली असेल त्यांच्याकडून आता वेगळी स्टँम्प ड्युटी आकारावी असे शासनाचे म्हणणे नाही. विभाग याबाबत ॲग्रिमेट झाले आहे का याची खात्री करते.

२५ सदनिका असलेल्या इमारतीतील २५ लोकांच्या सदनिकांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी एखादा फ्लॅट रिसेल करावयाचा असेल तर, त्या करिता पुन्हा रजिस्ट्रेशन चार्जेस आकारले जाणार आहेत काय याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या २५ लोकांनी त्यावेळी प्रचलित असलेल्या कायद्याप्रमाणे स्टँम्प डयुटी भरली असेल तर आता लागू करण्यात आलेल्या डिम्ड कन्व्हेअन्सच्या कायद्यातील तरतुदीनुसार सोसायटीच्या नावावर प्रॉपर्टी ट्रान्सफर करताना वेगळी स्टँम्प डयुटी भरावी लागणार नाही व त्या इमारतीतील कॉमन लँड देखील सोसायटीच्या नावावर ट्रान्सफर होईल.

मुंबईतील मुद्रांक शुल्क कार्यालयामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याचे दिसून येते. तेथे असणाऱ्या दलालांना कागदपत्रे हाताळण्याचा कोणताही अधिकार नसतानाही ते स्वतंत्र टेबल्स मांडून आपली कागदपत्रे हाताळताना दिसतात. मुंबईतील मुद्रांक शुल्क कार्यालयामधील कर्मचारी बँकेचा डी.डी., पे ऑर्डर स्वीकारत नाहीत. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायद्यान्वये बँकेचा डीडी नाकारणे हा गुन्हा आहे. लोक या कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रारी करीत नाहीत. कारण त्यांच्याकडे तक्रारी करण्याकरिता व त्याचा पाठपुरावा करण्याकरिता वेळ नसतो. मुंबईतील १७ मुद्रांक शुल्क कार्यालयातील २७५ कर्मचाऱ्यांपैकी जवळपास ७५ कर्मचारी अनधिकृत असल्याचे दिसून येईल. याबाबत काय केले जाणार आहे व याबाबत विभाग कोणती भूमिका स्वीकारणार आहे ? लोकलेखा समितीच्या सन २०१०-२०११ च्या पाचव्या अहवालामध्ये पृष्ठ क्रमांक १८० वर परिच्छेद क्रमांक २.५३ मध्ये "मुद्रांक शुल्क कार्यालयात मोठ्या प्रमाणात दलालांचा वावर असून त्यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी संगनमत असते याबाबत विभागाने योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच, दलाल व त्यांच्याशी संगनमत असलेल्या कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी" अशी समितीने शिफारस केली आहे.

उपरोक्त शिफारशीवर आतापर्यंत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसत नाही. पुण्यामध्ये देखील असेच प्रकार होत असल्याचे दिसून येतात. या कार्यालयामध्ये बसणाऱ्या या लोकांची टेबल्स संध्याकाळी ५.०० वाजता तपासली तर मोजता येणार नाही एवढे पैसे मिळतील. समितीच्या शिफारशीनंतरही कार्यालयावर धाड टाकणे वगैरे काहीच कार्यवाही केल्याचे दिसत नाही. यावरुन या कार्यालयातील सगळा कारभार हळूहळू दलालांच्या हातामध्ये तर जाणार नाही ना अशी शंका समितीने व्यक्त केली व मनुष्याचा त्याच्या आयुष्यात केवळ एकदाच या कार्यालयाशी संबंध येतो. आपले काम वेळेमध्ये पूर्ण व्हावे या करिता तो,

१-२ दिवसांची सुट्टी घेतो, स्वत:चे हजार रुपयांचे नुकसान करतो. एवढे करुनही त्याचे काम होत नसेल तर मग दलालाकडून जाऊन २-३ हजारांमध्ये काम करण्यावाचून त्याच्याकडे पर्याय उरत नाही. तो अगतिक असतो, त्याच्याकडे वेळ नसतो त्यामुळे तो तक्रारही करत नाही. त्यामुळे त्या लोकांवर कार्यवाही होत नाही. लोकप्रतिनिधीं कारवाई करण्याची शिफारस करतात त्याचीही अंमलबजावणी होत नाही अशी एकंदर परिस्थिती आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

जी नविन कार्यालये सुरु होणार आहे तेथे पुरेसा कार्यक्षम कर्मचारी वर्ग उपलब्ध असेल तर महसूल वसुलीतून शासनाला अधिकाधिक उत्पन्न मिळू शकेल. परंतु, शासकीय कार्यालयामध्ये आवश्यक असलेल्या सुविधा तसेच कर्मचारी वर्ग शासन उपलब्ध करुन देत नाही. कार्यालयाला लागणारे साहित्य अनेकवेळा बिल्डर स्पॉन्सर करतात याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जी नवीन कार्यालये सुरु होत आहेत त्याठिकाणी पुरविण्यात येणारे साहित्य विभागाचे असणार आहे परंतु या संदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, विभागाने खरेदी केलेले साहित्य दोन वर्षे मुद्रांक शुल्क कार्यालयांमध्ये पडून होते. हा मुद्दा काही लोकप्रतिनिधींनी सभागृहात सुध्दा मांडला होता. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या अशा त्रुटीबाबत समितीपुढे साक्ष झाल्यानंतर तरी सुधारणा होणे अपेक्षित आहे असे मत समितीने व्यक्त केले.

कमी आकारणीची प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर नोंदणी महानिरीक्षक पुणे यांनी अकृती स्वीकारल्यानंतर मुद्रांक जिल्हाधिकारी यांना १३ विलेखांच्या बाबतीत मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी यातील तूट वसूल करण्याचे आदेश दिले, त्याबाबत पुढे काय झाले ? याबाबत विभागास उत्तर प्राप्त झाले नाही.

विभागाने पुढे समितीस अशी माहिती दिली की, मुंबईमध्ये ॲडज्युडिकेशन करताना ग्रास लेव्हलवर व्हावे असा प्रयत्न असतो. कॉम्प्युटरमार्फत फ्रँकिंग करणाऱ्या मोठमोठ्या संस्थांना व्हेंडर म्हणून नेमलेले आहे. सर्वच ठिकाणी इंटरनेट बँकिंगची सुविधा उपलब्ध असतेच असे नाही. म्हणून बँकांना देखील काऊंटर पेमेंट सुविधा निर्माण करण्यास सांगण्यात आले आहे. तरी देखील कोणी वैयक्तिकरित्या डॉक्यूमेंट फ्रँकिंग करुन आणले म्हणून ते नाकारले जात नाही. परंतु समितीने निदर्शनास आणले की, ॲडज्युडिकेशनचे काम पूर्ण होत नाही त्यामुळे रजिस्ट्रेशनचे काम प्रलंबित राहते. त्यासाठी दोन-दोन दिवस वाया घालवावे

लागतात याबाबत ॲडज्युडिकेशन करण्यासाठी सरासरी किती वेळ लागतो याची माहिती समितीस उपलब्ध करुन देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले.

मालमत्तेचे न्यूनतम मुल्यांकन केले जाणे हा एक मुद्दा आहे. एका मालमत्तेचे मुल्यांकन एक्स असून त्याच्या शेजारच्या मालमत्तेचे मुल्यांकन वाय आहे. हे मुल्यांकन निम्म्यापर्यंत कमी करण्याचा अधिकार कोणाला आहे? संबंधित वर्षात मालमत्तेचे न्यूनतम मुल्यांकन करण्यात आली अशी किती प्रकरणे उघडकीस आली आहेत? संबंधितांवर काय कारवाई केली? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुद्रांक शुल्काची वसुली कमी आकारण्यात आली असा मुद्दा आहे. रेडी रेकनरनुसार मुद्रांक शुल्काची आकारणी करावी असा महालेखापालांचा आग्रह असतो. रेडी रेकनरमध्ये ३० वेगवेगळ्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत, ज्या कारणांमुळे मालमत्तेची किंमत कमी होऊ शकते.

वसई शहरामध्ये शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे हे विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून देताना समितीने सांगितले की, एका जमिनीचे मुल्यांकन १०० रुपये झालेले असताना त्याच्या शेजारच्या जमिनीचे मुल्यांकन १०० रुपये असेल तर ती जमीन घेणाऱ्या मुंबईतील बिल्डरला आठ दिवस थांबण्यास सुचविले जाते. कालांतराने त्या जमिनीचे मुल्यांकन २५ रुपये करुन आणले जाते आणि त्या कमी केलेल्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क भरले जाते व शासनाचा महसूल बुडविला जातो. जिल्हयाच्या ठिकाणचे अधिकारी न्यूनतम मूल्य निश्चित करतात. यासंदर्भात जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन मूल्यांकन कमी करुन आणणे कसे शक्य आहे असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, रेडी रेकनरमधील कोष्टकामध्ये रक्कमा दिलेल्या असून त्यानुसार किंमत दर्शविण्यात येते. सब रजिस्ट्रारच्या पातळीवर रजिस्ट्रेशन होते. त्या रक्कमेवर आधारित मुद्रांक शुल्क भरावे लागते. मुद्रांक शुल्क कायद्याच्या सेक्शन ३१ प्रमाणे अभिनिर्णयाचे अधिकार दिलेले आहेत. ॲडज्युडिकेशन करताना संबंधितांनी दावा केला तर ठरवून दिलेल्या कारणामुळे जमिनीचे मुल्यांकन कमी करता येते. त्यासाठी १०० वेगवेगळी कारणे असू शकतात. सगळ्यात कळीचा मुद्दा म्हणजे बाजारमूल्य हा आहे. बाजारमूल्याच्या ५, ४ किंवा ३ टक्के मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते.

गेल्या पाच वर्षात वसई शहरात जमीनीचे मूल्यांकन १०० रु. असताना ते ठाणे जिल्हा कार्यालयातून २५ रु. एवढे करुन कसे आणले जाते व त्या वर्षात वसईमध्ये झालेल्या

व्यवहाराची १०-१५ मोठी प्रकरणे तपासून त्याचा अहवाल तसेच सर्व्हेप्रमाणे शेड्युल तयार करुन त्याचा अहवाल व एका ठराविक विभागातील गेल्या पाच वर्षातील प्रकरणे तपासून त्याचाही अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु विभागाकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. तसेच यासंदर्भात महालेखापालांनी सुध्दा वसई नव्हे तर नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या मोठ्या शहरात बिल्डर लॉबी दबाव तंत्राचा वापर करुन मुल्यांकन कमी करुन आणतात याबाबत लक्ष घालून समितीला अभिप्राय द्यावेत असे निदेश समितीने महालेखाकार यांना दिले.

यासंदर्भात उपमहालेखाकार नागपूर, यांनी समितीस सांगितले की, ऑडिट पार्टी ऑडिट करते तेव्हा उपलब्ध कागदपत्रानुसार त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांनी निर्धारण योग्यप्रकारे केले आहे की नाही याची शहानिशा केली जाते. फिजिबल तपासणी करणे शक्य होत नाही.

याप्रकरणी विभागीय सचिवांनी सांगितले की, एखाद्याने १०० रुपये किंमत निश्चित केली तर ती २५ रुपयांपर्यंत कमी होऊ शकत नाही. १० टक्क्यापर्यंत मुल्यांकन कमी करण्याचे अधिकार अभिनिर्णयामध्ये दिलेले आहेत. कोणत्याही निर्णायक पध्दतीमध्ये अपील करण्याचा पर्याय असणे आवश्यक ठरते. सब रजिस्ट्रारचे म्हणणे चुकीचे असेल तर त्या विरोधात दाद कोणाकडे मागावी हा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून ॲडज्युडिकेशन करावे लागते. समितीच्या आदेशानुसार कोणत्या आधारे मुल्यांकन कमी झाले याची माहिती घेतली जाईल. ॲडज्युडिकेशन प्रोसेसमध्ये कोणत्या आधारे मुल्यांकन कमी करता येते याचा सेक्शन ३१ मध्ये उल्लेख केलेला आहे.

१० टक्क्यापर्यंत मूल्यांकन कमी करण्याचा अधिकाराचा वापर विशिष्ट लोक सातत्याने करीत आहेत. मालमत्तेची किंमत प्रचंड असल्याने १० टक्के रक्कम गृहित धरली तरी ती खूप होते असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, अभिनिर्णयामध्ये कोणकोणत्या कारणामुळे मुल्यांकन कमी करता येईल याचे सविस्तर नॉर्म्स दिलेले आहेत. मागील तीन वर्षाच्या काळात अधिक मूल्य असणारी प्रत्येक वर्षाची १५ ते २० प्रकरणे निवडून त्यांची छाननी करण्यात येईल. आता रेडी रेकनर प्रिन्सीपलवर सुरु आहे. हायकोर्टाने पुन्हा पुन्हा मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. वाद असतील तर ॲडज्युडिकेशनचे अधिकार असावयास पाहिजेत. त्या आधारे रेडी रेकनर पध्दत

सुरु आहे. ॲडज्युडिकेशनची पध्दत आपण अद्याप सुरु ठेवली आहे. डिस्क्रिएशन काढण्यात यावे असे आमचे म्हणणे होते. परंतु आपले रेडी रेकनर झोन किंवा सब झोनसाठी असते. म्हणून ॲडज्युडिकेशन ठेवणे क्रमप्राप्त आहे. अपील केल्यानंतर मुल्यांकन कमी का होते हा मुद्दा आहे. जो दर लागू आहे तो भरावयाचा असेल तर ते तो दर भरुन मोकळे होतात. ज्यांना हा दर भरु नये असे वाटते ते अपील करतात. अपिलामध्ये दोनच निर्णय होतात. ठरविलेली १०० रुपये रक्कम योग्य आहे किंवा ९५ रुपये भरावेत. १०० रुपये ही किंमत ११० एवढी होत नाही. यासंदर्भातील मागील तीन वर्षांची माहिती संकलित करुन समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

५०० कोटी रुपये किंमतीची जमीन असेल तर १० टक्के मुल्यांकन कमी होणे म्हणजे ५० कोटी रुपये होतात असे मत समितीने व्यक्त केले असता उपमहालेखाकार नागपूर यांनी समितीस सांगितले की, परिच्छेद क्र. ३.३ "मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी " हा परिच्छेद शॉर्ट लेव्ही ऑफ स्टॅम्प डयुटीचा, त्यासारखे जेव्हा जेव्हा परिच्छेद घेतले जातात त्यावेळी विभागातर्फे बोजा चढवला आहे. म्हणजे आर.आर.सी. म्हटले जाते, आर.आर.सी.म्हटले की, मालमत्तेवर अधिभार लावला जातो. तो अधिभार जेव्हा त्या प्रॉपर्टीची खरेदी-विक्री होईल तेव्हाच सरकारला मिळू शकतो. अशी १.५४ कोटी रुपये रक्कम सरकारला मिळावयाची आहे हे ३.३ परिच्छेदामध्ये म्हटले आहे. विभागाने ही वसुली व्हावयाची आहे हे मान्य केले आहे. यासाठी कायद्यामध्ये छोटासा बदल होणे गरजेचे आहे. अशी प्रॉपर्टी वर्षानुवर्षे तशीच पडून रहात असल्यामुळे अधिभाराची रक्कम वसूल करणे शक्य होत नाही. यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवून दिली किंवा प्रॉपर्टी अटॅच करण्याचा निर्णय झाला तर शासनाचा महसूल वसूल करता येईल.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, ज्या प्रकरणामध्ये वसुली असते त्या प्रकरणामध्ये संबंधितांना शासनाकडून नोटीस पाठविली जाते. त्यांच्या प्रॉपर्टीवर बोजा चढविला जातो. त्यानंतर मूळ प्रॉपर्टी अटॅच करुन वसुलीसाठी प्रयत्न केला जातो तसेच जेव्हा प्रॉपर्टीची खरेदी-विक्री होते त्यावेळी आपोआप महसूल वसूल केला जातो. आर.आर.सी.च्या प्रक्रियेमध्ये व्याज लावता येत नाही. परंतु मुद्रांक शुल्काच्या पध्दतीमध्ये स्पष्टपणे तरतूद केली आहे. ज्यावेळी महसुलाची वसुली केली जाते त्यावेळी प्रत्येक

महिन्याला २ टक्के याप्रमाणे वार्षिक २४ टक्क्याप्रमाणे दंडनीय व्याज आकारण्यात येते. याला २०० टक्क्याची मर्यादा निश्चित केलेली आहे.

महालेखापालांच्या म्हणण्यानुसार आर.आर.सी.च्या १३ ते १४ प्रकरणांमध्ये १.५ कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल प्राप्त होणे अपेक्षित आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, रेडी रेकनरप्रमाणे निश्चित केलेले मुल्यांकन चुकीचे आहे असा संबंधितांकडून दावा केला जातो. लिक्वीडेशनमार्फत मुल्यांकन अंतिम केलेले असते. तो दर कमी आहे. दर कोणता निश्चित धरायचा, हे त्यांनी सिध्द केले तर लिंक्वीडेटरने ठरविलेला दर योग्य आहे. म्हणजे वसुली लागू होणार नाही.

परिच्छेद क्र. ३.४ "बाजारमूल्याचे चुकीचे संगणन करण्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी" विलेख्यांचे छाननीत असे उघडकीस आले की, अभिहस्तांतरण केलेल्या/विकासाकरीता ताबा दिलेल्या मालमत्तेचे खरे बाजारमूल्य रु. २२.१८ कोटी होते ज्यावर ५३.७३ लाख मुद्रांक शुल्क आकारणीय होते. याप्रमाणे बाजारमूल्याचे चुकीचे संगणन केल्यामुळे साधारणत: रु. ३१.७३ लाख रुपयांची कमी वसुली झाली आहे असे महालेखाकारांनी कळविले आहे व ते मान्य केले आहे.

जिल्हा निबंधक, पुणे यांनी मुद्रांक शुल्क वसुलीतील तूट मान्य केली असून त्यानंतर वसुलीचे आदेश दिल्याने शासनाचे नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे? पुणे कार्यालयातील आक्षेपित मुद्रांक शुल्क रुपये ३१.७३ लाख रक्कमेपैकी किती रक्कम वसूल करण्यात आली आहे व उर्वरित मुद्रांक शुल्काच्या वसुलीची कार्यवाही किती कालावधीत करण्यात येणार आहे? अशी विचारणा सचिवांनी केली असता, विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा करताना सांगितले की, या परिच्छेदामध्ये दोन डॉक्यूमेंट आवश्यक आहेत. अगोदर चर्चा केल्याप्रमाणे मालमत्तेवर बोजा चढविला आहे, आर.आर.सी.ची केस म्हणून प्रयत्न केला असून वसुली व्हावयाची आहे. दुसऱ्या केसमध्ये एका फॅक्टरीचा एरिया खाजगी माणसाला विकण्यात आला, त्यावेळची जमिनीची किंमत गृहित धरण्यात आली. त्या करारामध्ये इमारत पूर्णपणे पाडून नव्याने बांधली जाणार असे नमूद केलेले आहे म्हणजे तो डेव्हलपमेंटचा करार होतो. कारण करारामध्ये तसा उल्लेख केलेला आहे. ऑडिट पॅरा असा उपस्थित केला आहे की, इमारत पाडणार असल्यामुळे डॉक्यूमेंटमध्ये किती क्षेत्रफळावर इमारत उभी आहे याचा उल्लेख केलेला नाही. इंडस्ट्रीमधील जमिनीवर बांधकाम करण्यासाठी

०.५ टक्के एफ.एस.आय. असतो. इतर जागेवर बगिचा किंवा ओपन स्पेस ठेवण्यात येत असतो. समजा २ लाख ३० हजार स्क्वेअर फूटाचे बांधकाम करण्यात आले असेल तर मोकळा परिसर २ लाख ३० हजार स्क्वेअर फूट आहे असे गृहीत धरण्यात येते. हे शंभर टक्के बरोबर नाही. इंडस्ट्रीमधील प्लॉटचा संपूर्ण एफ.एस.आय. वापरण्यात आलेला नसतो. कंपनीचे बांधकाम शक्यतोवर वन प्लस वन करण्यात येते.

अशा प्रकारचे परिच्छेद महालेखाकार कार्यालयाकडून अनेक वेळा उपस्थित करण्यात येतात. असा परिच्छेद उपस्थित झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी या संदर्भातील स्पष्टीकरण वेळच्यावेळी केले पाहिजे. ०.५ टक्के एफ.एस.आय. प्रमाणे २ लाख ३० हजार स्क्वेअर फूट बांधकाम करण्यास परवानगी असली तरी संपूर्ण एफ.एस.आय. अनेक वेळा वापरण्यात येत नाही. इतर मोकळ्या जागेवर बगिचा, पार्किंग किंवा वाहतुकीची सोय केलेली असते. असा परिच्छेद जेव्हा उपस्थित होतो त्यावेळी त्याचे निराकरण केल. पाहिजे. कोणतीच कंपनी १०० टक्के एफ.एस.आय.चा वापर करुन बांधकाम करीत नाही. कारण त्यांना तेवढ्या इमारतीची गरज भासत नाही विभागाने महालेखाकार कार्यालयातील अधिकाऱ्यांना लेखापरिक्षण करते वेळी डी.सी. रुल संदर्भात समजावून सांगितले तर असे लेखा परिच्छेद येणार नाहीत. असे मत समितीने प्रदर्शित केले. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, अशा ज्या अडचणी येतात त्याबाबत मार्च व जून महिन्यात महालेखाकार कार्यालयातील अधिकारी व मुद्रांक शुल्क विभागाचे अधिकाऱ्यांची पुणे व नागपूर येथे तीन दिवस बैठक आयोजित केली होती. त्यावेळी जवळपास ६०० परिच्छेदांच्या संदर्भात चर्चा करुन ते परत घेण्यात (Withdraw) आले आहेत.

Schedule of the property says land along wiith the building. महालेखाकार सांगतात ती माहिती चुकीची नाही. त्या जागेवर जे बांधकाम करण्यात आले त्या संदर्भातील हा प्रश्न आहे. ते बांधकाम पाडल्यानंतर तेथे काय करण्यात येणार हा विषय महत्वाचा नाही. त्यामुळे त्या जागेवर जे बांधकाम करण्यात आले आहे त्या संदर्भातील हा विषय आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जमिनीवर इमारत बांधकाम करतांना जे सूत्र वापरण्यात आले त्यामुळे हा प्रकार झालेला आहे. जमीन व त्यावरील इमारतीचे बांधकाम X१.२X संपुर्ण क्षेत्रफळ असे कॅल्क्युलेशन केल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

परंतु मंजूर नकाशाप्रमाणे इमारतीचे बांधकाम होणे अपेक्षित असते. असे समितीने निदर्शनास आणून दिले व उपमहालेखाकार नागपूर यांनी देखील विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, कायद्यामध्ये देखील असे नमूद केले आहे की, "on the date of execution of instrument". त्यामुळे ती जागा बरोबर आहे, त्या जागेवर इमारत होती. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्या जागेचे कन्व्हेंयन्स डीड झाले नाही, त्या जागेचे डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट करण्यात आले आहे.

अभिप्राय शिफारशी :-

समितीस प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे अभिप्राय व शिफारशी करण्यात येत आहेत.

परिच्छेदांमध्ये दिलेले आक्षेप हे रेडी रेकनरप्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल न केल्यामुळे घेण्यात आलेले आहेत. रेडी रेकनर हे देखील कायद्याप्रमाणे दरवर्षी जाहीर केले जातात. या संदर्भात लेखापरिक्षण केल्यानंतर महालेखापाल यांना असे आढळून आले की, काही ठिकाणी सदनिकांच्या विक्रीच्या व्यवहारातील बाजार मूल्य आणि रेडी रेकनरचे मूल्य यांच्यात तफावत आहे. तफावतीच्या दरांच्या आधारे विक्री व्यवहार झालेले आहेत. त्यामुळे मुद्रांक शुल्काच्या वसुलीमध्ये अनियमितता झालेली आढळून आलेली आहे.

सदनिकांचे मुल्य व त्यावरील मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासंबंधीचे जे प्रचलित कायदे व नियम आहेत त्याप्रमाणे मुंबई व इतर महाराष्ट्रामध्ये व्यवहार होत नाहीत. या संदर्भात विभागाने कठोर कारवाई प्रस्तावित करणे जरुरीचे होते असे मत समितीने व्यक्त केले. कारण मुद्रांक शुल्क व त्याची नियमानुसार विहित मुदतीमध्ये वसुली हे प्रशासकीय काम आहे. प्रशासकीय कामामध्ये ढिसाळपणा व विलंब होत असेल तर लेखापरीक्षण करताना त्या संदर्भात महालेखापाल परिच्छेदांच्या माध्यमातून आक्षेप नोंदवित असतात. तसेच, वसूल केलेल्या रकमांमध्ये अनियमितपणा असेल तर त्या संदर्भातही आक्षेप नोंदविलेले असतात. त्याप्रमाणे हा "मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी" आक्षेप नोंदविलेला आहे. विभागाने वेळीच संबंधितावर कारवाई केली असती तर मुद्रांक शुल्क वसुलीचा आक्षेप नोंदविण्याचा प्रश्न निर्माण झाला नसता. याप्रकरणी समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. **मुद्रांक शुल्काची कमी वसुली करण्यास जे जबाबदार अधिकारी व कर्मचारी आहे त्यांच्यावर**

तातडीने कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सुपर बिल्ट अप, बिल्ट अप, कार्पेट एरिया तसेच, रेडी रेकनरचा दर या माध्यमातून सदनिकेच्या मुल्यामध्ये व त्यावरील मुद्रांक शुल्काच्या रकमेमध्ये मोठी तफावत (Discrepancy) निर्माण होत आहे. या तफावतीची उकल प्रशासनाने विभागाच्या माध्यमातून करणे ही आता काळाची गरज झालेली आहे. तसेच शासनाने एखादा महत्वाचा कायदा संमत केल्यानंतर तो लागू केला जातो. कायदा लागू झाल्यानंतर सर्वसामान्यांना अशी अपेक्षा असते की, आता शासनाने पारित केलेल्या कायद्यानुसार अंमलबजावणी होईल. परंतु असे असतांनाही जर रेडी रेकनरचाच आधार घेऊन व्यवहार होत असतील तर लोकप्रतिनिधींनी सर्वानुमते एकत्रितरित्या संमत केलेल्या कायद्याला काहीही अर्थ राहत नाही. कायद्याप्रमाणे व प्रचलित कायद्यातील नियमांप्रमाणे सर्व व्यवहार होत नाही यास केवळ ग्राहक जबाबदार नसून मुद्रांक शुल्क कार्यालयातील अधिकारी जबाबदार आहेत. **मुद्रांक शुल्क चुकीचे आकारुन शासनाचे नुकसान केल्याचे आढळून आले. अशा संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची तरतूद मुंबई मुद्रांक अधिनियमात करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

नागपूर स्थित संबधित कंपनीच्या अवसायनामुळे शासनाचा तब्बल पाच हजार कोटी रुपयांचा महसूल बुडाला आहे. विभागाने कंपनीच्या अवसायनाबाबत लेखी आदेश काढून त्याची श्वेत पत्रिका काढणे आवश्यक आहे. हा प्रश्न केवळ याच कंपनीपुरता मर्यादित नाही. हा प्रश्न एकूण पाच हजार कोटी रुपयांच्या महसूलासंदर्भातील आहे असे मत समितीने व्यक्त केले. कंपनी अवसायनात निघाल्यानंतर त्याचे अवसायन मुल्य ठरवित असतांना करोडो रुपयांच्या शासनाच्या महसूलाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. याप्रकरणामध्ये मा.मंत्री महोदयांच्या अपरोक्ष संबंधित अधिकारी सर्व व्यवहारांवर नियंत्रण ठेवीत असतांना शासनाचा महसूल बुडविला जातो याचा अर्थ सदर अधिकारी दोषी आहेत. **महसूल बुडाल्याची कारणे लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करुन दोषी असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

मुंबई शहरामध्ये मोठमोठे टॉवर्स आहे. यापैकी काही टॉवर्समध्ये फक्त तळमजल्यावर पार्किंगची व्यवस्था असते व त्यानंतरच्या मजल्यापासून निवासी सदनिका असतात. तर काही

टॉवर्समध्ये १८ मजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था असते व त्यानंतरच्या मजल्यापासून निवासी सदनिका असतात. **केवळ तळमजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था असणाऱ्या टॉवरमध्ये पहिल्या मजल्यावरील सदनिकेवर ज्या दराने मुद्रांक शुल्क आकारले जाते, त्याच दराने १८ मजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था असणाऱ्या इमारतीतील १९ व्या मजल्यावरील सदनिकेवर देखील तो पहिला मजला समजून आकारले जाते. ही अतिशय विसंगत बाब आहे. या सदनिकांच्या मुद्रांक शुल्कामध्ये तफावत असली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. शासनाने नवीन रेडिरेकनर तयार करताना याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

मुंबईतील मुद्रांक शुल्क कार्यालयामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याचे दिसून येते. तेथे असणाऱ्या दलालांना कागदपत्रे हाताळण्याचा कोणताही अधिकार नसतानाही ते स्वतंत्र टेबल्स मांडून आपली कागदपत्रे हाताळताना दिसतात. मुंबईतील मुद्रांक शुल्क कार्यालयामधील कर्मचारी बँकेचा डी.डी., पे ऑर्डर स्वीकारत नाहीत. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कायद्यान्वये बँकेचा डीडी नाकारणे हा गुन्हा आहे. लोक या कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रारी करीत नाहीत. कारण त्यांच्याकडे तक्रारी करण्याकरिता व त्याचा पाठपुरावा करण्याकरिता वेळ नसतो. मुंबईतील १७ मुद्रांक शुल्क कार्यालयातील २७५ कर्मचाऱ्यांपैकी जवळपास ७५ कर्मचारी अनधिकृत असल्याचे दिसून येते. याबाबत लोकलेखा समितीच्या सन २०१०-२०११ च्या पाचव्या अहवालातील पृष्ठ क्रमांक १८० परिच्छेद क्रमांक २.५३ मध्ये **"मुद्रांक शुल्क कार्यालयात मोठ्या प्रमाणात दलालांचा वावर असून त्यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी संगनमत असते याबाबत विभागाने योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच, दलाल व त्यांच्याशी संगनमत असलेल्या कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी" अशी समितीने शिफारस केली आहे."** या शिफारशीवर आतापर्यंत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसत नाही. समितीच्या शिफारशीनंतरही कार्यालयावर धाड टाकणे वगैरे काहीच कार्यवाही केल्याचे दिसत नाही. तसेच आतापर्यंत कोणत्याही अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई केल्याचे निदर्शनास आले नाही. यावरुन या कार्यालयातील सगळा कारभार हळूहळू दलालांच्या हातामध्ये जात असल्याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली.

मुद्रांक शुल्क विभागाची जी नविन कार्यालये सुरु होणार आहेत तेथे पुरेसा कार्यक्षम कर्मचारी वर्ग उपलब्ध असेल तर मुद्रांक शुल्कामधून शासनाला अधिकाधिक उत्पन्न मिळू

शकेल. परंतु, शासकीय कार्यालयामध्ये आवश्यक असलेल्या सुविधा तसेच कर्मचारी वर्ग शासन उपलब्ध करुन देत नाही. कार्यालयाला लागणारे साहित्य अनेकवेळा बिल्डर पुरवितात. काही मुद्रांक शुल्काची नवीन कार्यालये सुरु होत आहेत त्याठिकाणी विभागाने खरेदी केलेले साहित्य दोन वर्षे कार्यालयांमध्ये पडून होते. हा मुद्दा काही लोकप्रतिनिधींनी सभागृहात सुध्दा मांडला होता. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या अशा त्रुटीबाबत समितीपुढे साक्ष झाल्यानंतर तरी सुधारणा होणे अपेक्षित आहे असे मत समितीने व्यक्त केले असून याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. **महसूल विभागाचे मुद्रांक शुल्क विभाग हे शासनास महसूल प्राप्त करुन देणारे कार्यालय आहे. ह्या मध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे दलालाचा सुळसुळाट झाला आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्क कार्यालयातील कर्मचारी वाढविण्यात यावे व रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत अशी समितीची शिफारस आहे.**

रेडी रेकनरनुसार मुद्रांक शुल्काची आकारणी करावी असा महालेखापालांचा आग्रह असतो. रेडी रेकनरमध्ये ३० वेगवेगळया गोष्टी नमूद केलेल्या आहेत, ज्या कारणांमुळे मालमत्तेची किंमत कमी होऊ शकते. यासंदर्भात समितीने उदाहरणादाखल वसई शहरामधील शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून देताना सांगितले की, एका जमिनीचे मुल्यांकन १०० रुपये झालेले असताना त्याच्या शेजारच्या जमिनीचे मुल्यांकन १०० रुपये असेल तर ती जमीन घेणाऱ्या मुंबईतील बिल्डरला आठ दिवस थांबण्यास सुचविले जाते. कालांतराने त्या जमिनीचे मुल्यांकन २५ रुपये करुन आणले जाते आणि त्या कमी केलेल्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क भरले जाते व शासनाचा महसूल बुडविला जातो. गेल्या पाच वर्षात वसई शहरात जमीनीचे मूल्यांकन १०० रु. असताना ते ठाणे जिल्हा कार्यालयातून २५ रु. एवढे करुन कसे आणले जाते व त्या वर्षात वसईमध्ये झालेल्या व्यवहाराची १०-१५ मोठी प्रकरणे तपासून त्याचा अहवाल तसेच सर्व्हेप्रमाणे शेड्युल तयार करुन त्याचा अहवाल व मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक या शहरातील गेल्या पाच वर्षातील प्रकरणे तपासून त्याचाही अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु **विभागाकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. यासंदर्भात तातडीने कार्यवाही करुन समितीला माहिती सादर करण्यात यावी व याप्रकरणी ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिरंगाई केली आहे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

गृह (परिवहन) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-०७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालामधील **परिच्छेद क्र. ४.४ "कराची वसूली न करणे/ कमी करणे" व परिच्छेद क्र. ६.४ "व्याज प्रदान न करणे"** या संदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

"कराची वसुली न करणे/ कमी करणे"

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ आणि त्याअन्वये केलेल्या नियमांनुसार राज्यात वापरल्या जाणाऱ्या किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेल्या सर्व वाहनांवर विहीत दराने कर आकारणीय आहे. या अधिनियमात वाहनांच्या मालकांनी हा कर आगाऊ भरण्याचीही तरतूद आहे. देय कराचा भरणा करण्यात कसूर केल्यास प्रत्येक प्रकरणात प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या २ टक्के दराने व्याज देय आहे.

१ मे २००० किंवा त्यानंतर नोंदणी झालेला माल वाहून नेणाऱ्या हलक्या मोटार वाहनांकरीता एक रकमी कर भरणे सक्तीचे केले होते. वार्षिक दराने कर भरणाऱ्या सर्व हलक्या मोटार वाहनांसाठी ही मुदत १ जून २००१ पर्यंत वाढविण्यात आली होती.

ऑगस्ट २००३ ते जून २००६ दरम्यान, चौदा कार्यालयांच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, ४०६ मालवाहू वाहनांच्या वाहन मालकांनी फेब्रुवारी २००२ ते मे २००६ मधील विविध कालावधीकरीता रु. ५२.४७ लाख मोटार वाहन कर भरला नव्हता. विभागाने देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही केली नाही. यामुळे रु. ५२.४७ लाख मोटार वाहन कर वसूल झाला नाही. शिवाय १०३ हलक्या मोटार वाहनांच्या प्रकरणांत एक रकमी कर वसूल न केल्याने/कमी वसूल केल्याने रु. ७.८९ लाख एक रकमी कर वसूल झाला नाही/ कमी वसूल झाला. या प्रकरणांत उशीरा प्रदान केलेल्या एक रकमी कर आणि मोटार वाहन कर यावर प्रत्येक महिन्यासाठी २२ टक्के दराने व्याजसुध्दा आकारणीय होते.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर जानेवारी, २००५ ते ऑक्टोबर, २००७ मध्ये विभागाने १९४ वाहनांची रु. २.०९ लाख व्याजासहीत रु. १४.९९ लाखाची वसूली केल्याचे कळविले. उर्वरित वाहनांच्या वसूलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (ऑक्टोबर २००७)

ही बाब एप्रिल २००७ मध्ये शासनास कळविण्यात आली याचे उत्तर प्राप्त झाले नाही. (ऑक्टोबर २००७)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

प्रारुप परिच्छेद क्र. ५६ मधील एकूण १३ कार्यालयांतील संबंधित मालवाहू वाहनांच्या वाहन मालकांनी मोटार वाहन कर भरला नव्हता. या प्रकरणात कार्यालयीन अभिलेख्यानुसार माहे डिसेंबर, २००८ पर्यंतची कार्यालयनिहाय वसूलीची अद्यावत स्थिती विवरणपत्र अ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

विवरणपत्र 'अ'

मालवाहू वाहनांच्या मालकांनी मोटार वाहन कर न भरलेल्या प्रकरणांची कार्यलयनिहाय माहे डिसेंबर २००८ ची अद्यावत स्थिती

अ.क्र.	स्थालेप क्र.	पॅरा	प्रा.प.क्र.	कार्यालय	आक्षेपित		निकालात काढलेली		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१.	१५५६४	१	५६	औरंगाबाद	६९	१०३८८५८	१४	११७८४६	५५	९२१०१२
२.	१५४४५	१	५६	बीड	१५	१६२२९८	७	४३३८६	८	११८९१२
३.	१५७४६	१	५६	जळगांव	४९	४९२६५३	४५	४२९५२८	४	६३१२५
४.	१५२५६	१	५६	मालेगाव	३८	२५१९७६	६	३०७०२	३२	२२१२७४
५.	१५३९०	१	५६	मुंबई (म)	८	२८०५८९	३	१४९९१	५	२६५५९८
६.	१५५४३	१ (अ)	५६	मुंबई (प)	३०	४८४७४०	११	९९३४४	१९	३८५३९६
७.	१५३९८	१ (अ)	५६	मुंबई (पूर्व)	१०	३७४६०५	३	३९३७०	७	३३५२३५
८.	१५४७३	४	५६	नाशिक	८	१६४३६४	३	२३६५४	५	१४०७१०
९.	१५४९५	२	५६	नंदूरबार	२१	२८२८८९	६	२४४७४	१५	२५८४१५
१०.	१५३९१	१ (अ)	५६	पि.चिंचवड	२६	३९०४८२	१७	३०४१०९	९	८६३७३
		१ (ब)	५६		१३	६९४८२	१२	६४३३४	१	५१४८
११.	१५७२६	१	५६	सातारा	४५	३४०३०७	३१	१९३९७२	१४	१४६३३५
१२.	१५३६४	१ (अ)	५६	सोलापूर	२८	२५६९०३	१५	१२५८१९	१३	१३१०८४
		१ (ब)	५६		४	२०८३२५	१	१३४७५	३	१९४८५०
१३.	१५४०१	३ (ब)	५६	ठाणे	२४	१२४१०८	१३	४४७६९	११	७९३३९
		२			३५	४२१९२३	२३	२९०११२	१२	१३१८११
				एकूण	**४२३**	५३४४५०२	**२१०**	**१८५९८८५**	**२१३**	**३४८४६१७**

परिच्छेद क्र. १२ मधील एकूण ४ कार्यालयांतील हलक्या मोटार वाहनांचा एक रकमी कर वसुल न करणे / कमी करणे या प्रकरणात माहे डिसेंबर, २००८ पर्यंतची कार्यालयनिहाय वसूलीची अद्यावत स्थिती जोडलेल्या विवरणपत्र -ब मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

विवरणपत्र -ब

हलक्या मोटर वाहनांचा एक रकमी कर वसूली न करणे / कमी करणे प्रकरणी कार्यालयनिहाय माहे डिसेंबर, २००८ ची अद्यावत स्थिती

अ.क्र.	स्थालेप क्र.	पॅरा	प्रा.प.क.	कार्यालय	आक्षेपित		निकालात काढलेली		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१.	१४४५६	३ (अ)	१२	औरंगाबाद	२७	२५६१७२	७	८२३६४	२०	१७३८०८
२.	१४३७८	१ (ब)	१२	जालना	१५	२०३३२६	४	४५९८३	११	१५७३४३
३.	१४३४१	२ (ब)	१२	मुंबई (म)	८	९६७८६	१	९५३४	७	८७२५२
४.	१५४९५	३	१२	नंदूरबार	११	१११५०३	१	९००६	१०	१०२४९७
५.	१४३४१	२ (क)	१२	मुंबई (म)	२८	१११९३६	६	२६२५३	२२	८५६८३
६.	१५४९५	१	१२	नंदूरबार	१४	४८६९१	४	८५६७	१०	४०१२४
				एकूण	**१०३**	**८२८४१४**	**२३**	**१८१७०७**	**८०**	**६४६७०७**

उर्वरित प्रकरणातील संपूर्ण वसूली करुन परिच्छेद बंद करुन घेण्याच्या दृष्टीने संबंधित अधिनस्त कार्यालयांना वेळोवेळी सूचित करण्यात आले आहे.

"व्याज प्रदान न करणे"

महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाने ऑक्टोबर २००१ ते मार्च २००६ मधील शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने जमा केलेल्या व शासनास देय असलेल्या प्रवासी कराच्या ५.५ टक्के इतकी रक्कम शासनाचे भांडवली अंशदान म्हणून महामंडळाला वापरण्यास परवानगी दिली होती. या भांडवली अंशदानावर महामंडळाने प्रतिवर्षी सहा टक्के दराने व्याज द्यावयाचे होते.

लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई यांच्या जुलै २००६ मध्ये केलेल्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, महामंडळाने रु. ७२३.६४ कोटीच्या भांडवली अंशदानावर २००४-०५ आणि २००५-०६ या वर्षाचे देय असलेले रु. ७४.५८ कोटीचे व्याज शासनाला प्रदान केले नाही किंवा शासनाने त्याची मागणी केली नाही.

ही बाब शासनाला एप्रिल २००७ मध्ये कळविण्यात आली होती. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही. (ऑक्टोबर २००७)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात परिवहन विभागाने कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

वरिष्ठ लेखा परिक्षण अधिकारी, महालेखापाल यांनी एप्रिल २००४ ते सप्टेंबर २००४ या सहा महिन्यात जमा भांडवली अंशदान रु. ६३.२२ कोटी व २००३-०४ अखेरचे भांडवली अंशदान रु. ४५७.२७ कोटी यावर ६ टक्के दराने सहा महिन्याच्या कालावधीसाठी एप्रिल २००४

पासून व्याज आकारणी केलेली आहे व याचप्रमाणे ऑक्टोबर २००४ ते मार्च २००५, एप्रिल २००५ ते सप्टेंबर २००५ व ऑक्टोबर २००५ ते मार्च २००६ या कालावधीसाठी व्याज आकारणी केलेली आहे. त्याबाबत महामंडळाने दिलेल्या स्पष्टीकरणाशी शासन सहमत असून वरीष्ठ लेखा अधिकारी, महालेखापाल यांची भांडवली अंशदानावरील व्याजाची आकारणी करण्याच्या प्रक्रियेची पध्दत सर्वत: चुकीची अहे. महामंडळाकडे प्रवासी कराची रक्कम सहा महिन्यांची एकदम जमा होत नसून ती प्रत्येक महिन्यात जमा होते. त्यामुळे सहा महिन्याच्या कालावधीतील प्रत्येक महिनानिहाय जमा झालेल्या संपूर्ण रकमेवर पूर्ण सहा महिन्यांची व्याज आकारणी करणे चुकीचे असून ती आकारणी जमा झालेल्या रकमेवर देय तारखेपासून करणे आवश्यक आहे.

याबाबतीत निदर्शनास आणून देण्यात येते की, महामंडळाला मोटार वाहन प्रवासी कर कायदा १९५८ नुसार महिन्यातील प्रवासी कराची रक्कम शासनाकडे पुढील महिन्याच्या शेवटच्या दिवशी जमा करावयाची आहे व त्याप्रमाणे महामंडळ प्रत्येक महिन्याच्या प्रवासी कराची रक्कम पुढील महिन्याच्या शेवटच्या दिवशी शासनाच्या तिजोरीत जमा करुन शासनास कळविते. दिनांक २०.६.२००० च्या शासन निर्णयानुसार शासनाने ग्रामीण सेवेवरील प्रवासी कराचा दर १७.५ टक्के तसाच ठेवून महामंडळाने १२ टक्के प्रमाणे प्रवासी कराची रक्कम शासनास अदा करावी व उर्वरित ५.५ टक्के प्रवासी कराची रक्कम शासनाचे भांडवली अंशदान म्हणून प्रत्येक महिन्यात समायोजित करावी व याबाबत समायोजनाचा शासन निर्णय शासनाने दर सहा महिन्याने काढावा, तसेच सदर भांडवली अंशदानावर प्रतिवर्षी ६ टक्के दराने महामंडळाने शासनास व्याज द्यावे असे निदेश दिले आहेत. सदर शासन निर्णयानुसार ५.५ टक्के दराने प्रवासी कराची रक्कम शासनाचे भांडवली अंशदान म्हणून प्रत्येक महिन्याच्या देय तारखेस समायोजित केली जाते. त्याप्रमाणेच जमा तारखेपासून दैनिक प्रॉडक्ट पध्दतीने व्याज आकारणी केली जाते. ही व्याज आकारणीची पध्दत बरोबर असून महामंडळाने शासनास अदा केलेले व्याज अचूक आहे व त्यामध्ये कोणतीही तफावत नाही. महामंडळाने भांडवली अंशदानावर काढलेले व्याज बरोबर आहे. याबाबत शासनाने शासन पत्र क्र. एसटीसी/१९०७/१०५९/प्र.क्र.५२५/परि-१, दिनांक ३१.१२.२००७ च्या पत्रान्वये महालेखापाल एसआरयु (आर) मुंबई यांना कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकंडील सन २००४-०५, २००५-०६ व सन २००६-०७ या वर्षातील ५.५ टक्के दराने येणाऱ्या भांडवली अंशदानावरील व्याजाची रक्कम सवलतींच्या मूल्याच्या रकमेतून पुस्तकी समायोजन करण्यास मंजूरी देण्याबाबतचा दिनांक २७ फेब्रुवारी, २००८रोजीचा शासन निर्णय व प्रारुप परिच्छेद क्र.४७/२००६/०७ "महसूल जमा अहवाल - व्याजाचा भरणा न केल्याबाबत" या विषयावरील गृह विभागाने वरिष्ठ लेखा अधिकारी / एसआरए (आर) महालेखापाल (लेखापरिक्षा)- महाराष्ट्र-१, मुंबई यांना दिलेले पत्र सोबत जोडले आहे. **(विवरणपत्र क्र.१)**

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात समितीने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ रोजी परिवहन विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मोटार वाहन कर वसुलीची २१३ प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे, १९४ वाहन धारकांकडून मोटर वाहन कर वसूल न करणे आणि या करांची थकबाकी राहण्याची प्रमुख कारणे याविषयी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सन २००८ मध्ये ५२६ वाहन धारकांकडून मोटर वाहन कर वसूल करावयाचा होता. त्यापैकी आता फक्त २१३ वाहन धारकांकडून मोटर वाहन कर वसूल करावयाचा बाकी आहे. यामध्ये १२८ प्रकरणांना जास्त विलंब झालेला असून संपूर्ण कर वसूल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच प्रलंबित असलेला मोटर वाहन कर तीन महिन्यात म्हणजे डिसेंबर, २०१२ अखेरपर्यंत वसूल करण्यात येईल.

समितीने मोटर वाहन कर वसुलीचा अहवाल प्रलंबित राहण्याची कारणमिमांसा विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मोटर वाहन कर वसुलीचा अहवाल प्रलंबित राहिलेला नाही. महाराष्ट्रात परिवहन विभागाची ३४ कार्यालये आहेत. काही कार्यालयाकडून वेळोवेळी अहवाल प्राप्त झाला नाही. आता आरटीओ कार्यालयनिहाय वर्गवारी करण्यात आली आहे.

समितीने आरटीओ कार्यालयातील ज्या अधिकाऱ्यांनी अहवाल उशिरा पाठविला त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी फक्त चार आरटीओ कार्यालयांचा अहवाल प्रलंबित असून याबाबत बैठक घेऊन संबधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असल्याचे सांगून मोटार वाहन कर वसुलीबाबत काही अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्याची बाब मान्य केली.

मोटार वाहन कर वसूल करण्यामध्ये झालेल्या विलंबासाठी कोण-कोण अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर किती महिन्यात कारवाई करण्यात येईल असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी मोटार वाहन कर वसूल करण्यास विलंब झालेला आहे, त्या कालावधीत कोण-कोण अधिकारी होते, याची तपासणी करावी लागेल. कारण अधिकाऱ्यांच्या सतत बदल्या होत असतात असे नमूद केले. तसेच माननीय समिती प्रमुखांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शवून जाणूनबुजून केलेली अनियमितता व चोरी असा त्याचा अर्थ होत नाही असे स्पष्टीकरण दिले.

यावर समितीने ज्या अधिकाऱ्यांनी कर वसूल करावयास पाहिजे होता त्यांनी तो वेळीच वसूल केला नाही. त्यामुळे त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावयास पाहिजे. अशा प्रकारे कारवाई करण्याची तरतूद कायद्यात आहे किंवा नाही अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी आता संपूर्ण मोटार वाहन कर वसूल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी केलेल्या चांगल्या कामाचा समितीने विचार करावा अशी विनंती केली. तसेच अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्यामुळे लाखो-कोटी रुपयांचे शासनाने नुकसान झाले आहे. शासनाचे नुकसान झाले असल्यामुळे कारवाई करणे अपेक्षित आहे. प्रलंबित मोटार वाहन कराची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात येत आहे असे नमूद केले.

दोन वर्षात फक्त २ लाख रुपये एवढा कमी कर वसूल करण्याची काय कारणे आहेत तसेच असा हलगर्जीपणा कोणत्या अधिकाऱ्यांनी केला, त्यांची नावे व पदनामांची यादी समितीला सादर करण्यात यावी. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला अशा अधिकाऱ्यांची यादी समितीला एक ते दोन महिन्यात सादर करावी. तसेच अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली त्या संदर्भातील अहवाल देखील समितीला सादर करण्यात यावा असे समितीने विभागीय सचिवांना निदेश दिले असता कोणत्या कालावधीत कोण अधिकारी होते, त्यांची नावे व पदनाम असलेली यादी समितीला सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे डिसेंबर अखेरपर्यंत उर्वरित मोटार वाहन कराची रक्कम वसूल करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. तथापि यासंदर्भातील माहिती समितीला अद्याप अप्राप्त आहे.

अभिप्राय व शिफारशी

समितीसमोर दिलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८ व सदरहू अधिनियमांतर्गत नियमानुसार राज्यात चौदा कार्यालयात

वापरल्या जाणाऱ्या किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेल्या ४०६ मालवाहू वाहनांवरील फेब्रुवारी २००२ ते मे २००६ मधील विविध कालावधीतील ५२.४७ लाख कर वसूल करण्यात आला नाही. शिवाय १०३ हलक्या मोटार वाहनांच्या प्रकरणात एक रकमी कर वसूल न केल्याने वाहनांवरील ७.८९ लाख इतका कर कमी वसूल करण्यात आला.

ही बाब महालेखापालांनी विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने जानेवारी, २००५ ते ऑक्टोबर, २००७ च्या दरम्यान १९४ वाहनांच्या संदर्भात ५.०९ लाख व्याजासह रु. १४.९९ लाख इतका कर वसूल केल्याचे नमूद केले आहे.

विभागाने सादर केलेल्या लेखी ज्ञापनानुसार माहे डिसेंबर, २००१ पर्यंतच्या आकडेवारीप्रमाणे १३ कार्यालयांतील मालवाहू वाहनांच्या संदर्भात एकूण ४२३ प्रकरणांमध्ये येणे असणाऱ्या रु. ५३,४४,५०२ इतक्या रकमेपैकी केवळ २१० प्रकरणे निकालात काढण्यात येऊन रु.१८,५९,८८५ इतक्या रक्कमेचा कर वसूल केल्याचे व उर्वरीत २१३ प्रकरणामधील रु. ३४,८४,६१७ इतका कर प्रलंबित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच हलक्या मोटार वाहनांच्या संदर्भात एकूण १०३ प्रकरणांमध्ये येणे असणाऱ्या रु. ८,२८,४१४ इतक्या रकमेपैकी केवळ २३ प्रकरणे निकालात काढण्यात येऊन रु. १,८१,७०७ इतक्या रक्कमेचा कर वसूल केल्याचे व उर्वरीत ८० प्रकरणामधील रु. ६,४६,७०७ इतका कर प्रलंबित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

यावरुन मोटार वाहनांच्या मालकांकडून वसूल केलेल्या कराची टक्केवारी विचारात घेता फक्त ३३ टक्के एवढीच वसुली झाल्याचे वास्तव समितीच्या निदर्शनास आले. **मोटार वाहनांकरीता कर हे शासनाचे महसूल जमा करण्याच्या प्रमुख साधनापैकी एक आहे. विभागाकडून मोटार वाहन कर जमा करण्यात हलगर्जीपणा झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच प्रलंबित असलेली वसुली ५-७ वर्षे उलटून देखिल होत नाही याबाबत समितीने खेद व्यक्त केला. महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपामुळे ही बाब निदर्शनास आली आहे. अन्यथा वर्षानुवर्षे वाहनांच्या कराची वसुलीच झाली नसती. विभागाने आपले महसूलाचे स्त्रोत वाढविण्यास कोणत्याच उपाययोजना केलेली नाही. यापुढील काळात मोटार वाहनांवरील कराची वसुली विहीत कालमर्यादेत होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरुन योग्य त्या ठोस उपाययोजना करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

समितीपुढील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी मोटार वाहनावरील कर वसुल करण्यात काही अधिकाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाल्याचे कबुल केले. यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द त्वरीत कारवाई करण्यात येऊन केलेल्या कारवाईची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात येईल असे समितीला आश्वासित केले असतांना सदरहू माहिती **अद्यापही समितीस देण्यात आली नसल्याने यासंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करते. यावरुन असे दिसते की, शासनच या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करीत नाही. उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द त्वरीत कारवाई करण्यात येऊन त्यासंदर्भातील माहिती समितीला ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने रुपये ७२३.६४ कोटीच्या भांडवली अंशदानावर २००४-२००५ व २००५-२००६ या वर्षाचे देय असलेले ७४.५८ कोटी रुपयांचे व्याज शासनाला प्रदान केले नाही किंवा शासनाने त्याची मागणी केली नाही, यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी, महामंडळाकडून शासनाला व्याज प्रदान करण्यासंदर्भात महामंडळाची व्याज परिगणना करण्याची पध्दत व शासनाची व्याज परिगणना करण्याची पध्दत वेगळी असल्यामुळे तफावत आढळून येत आहे. व्याज प्रदानाबाबत महामंडळ व शासन यांच्यामध्ये आता समन्वय साधण्यात आला असून कोणतीही रक्कम महामंडळाकडे शिल्लक राहिलेली नाही. शासनाला पूर्ण रक्कम मिळालेली आहे असा खुलासा केला.

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने रु. ७२३.६४ कोटीच्या भांडवली अंशदानावर २००४-०५ या वर्षाचे देय असलेले ७४.५८ कोटीचे व्याज शासनास प्रदान केले नसल्याचे महालेखापालांनी त्यांच्या अभिप्रायात नमूद केले आहे.

समिती समोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी महामंडळाकडून शासनाला व्याज प्रदान करण्यासंदर्भात महामंडळाची व्याज परिगणना करण्याची पध्दत व शासनाची व्याज परिगणना करण्याच्या पध्दतीमध्ये तफावत असल्याची बाब उघडकीस आणली तसेच महामंडळाकडे आता कोणतीही रक्कम शिल्लक नसल्याचा खुलासा केला.

यानुषंगाने समितीचे असे मत आहे की, यासंदर्भात महालेखापालांनी नोंदविलेल्या अभिप्रायाची शासनाने त्वरीत दखल न घेतल्याने व महालेखापालांच्या कार्यालयाशी विभागाने समन्वय न साधल्याने सदरहू परिच्छेद आलेला आहे. यासर्व बाबींमुळे समितीचा बहुमूल्य वेळ

अनावश्यकरित्या वाया जातो. **यापुढे शासनाच्या सर्व विभागांनी विहित केलेल्या कालमर्यादेत महालेखापाल कार्यालयाशी योग्य समन्वय साधावा तसेच महालेखापाल कार्यालयाने घेतलेल्या आक्षेपाची पूर्तता होण्यासाठी महालेखापाल कार्यालयास सर्व तपशीलासह माहिती विहीत वेळेत पुरविण्याची विभागांनी व्यवस्था करावी जेणेकरुन आक्षेपाच्यावेळीच सर्व बाबींची पूर्तता केल्याने महालेखापाल त्यांच्या अहवालामध्ये आक्षेप घेणार नाहीत व त्याचवेळेस त्याचे निराकरण होऊ शकेल. अशा बाबी यापूढील काळात समितीच्या निदर्शनास आल्यास, अशाप्रकारच्या प्रकरणामध्ये समिती गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यासंदर्भात शिफारस करील याची सर्व विभागप्रभुखांनी नोंद घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

वित्त विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००६-०७ या वर्षाच्या महसूली जमा रकमांवरील अहवालातील परिच्छेद क्र. ५.३ "व्यवसाय कराची वसूली न होणे" व परिच्छेद क्रमांक ५.४ "शास्तीची आकारणी न करणे" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

५.३ "व्यवसाय कराची वसुली न होणे"

व्यवसाय कर अधिनियमातील तरतुदींनुसार करपात्र व्यक्तीने नोंदणी प्रमाणपत्र मिळविणे आणि अधिनियमाच्या अनुसूची १ मध्ये निर्देशीत केलेल्या दराने वार्षिक कर भरणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ५ (५) मध्ये अशी तरतूद आहे की, नोंदणीपात्र व्यक्तीने अशा प्रमाणपत्रासाठी अर्ज केला नसल्यास प्रति दिन रु. दोन प्रमाणे शास्ती आकारणीय आहे.

अधिनियमाच्या अनुसूची १ मध्ये निर्देशीत केलेल्या विशिष्ट प्रवर्गातील सर्व पात्र व्यक्तींना अधिनियमाच्या कक्षेत आणले गेले की नाही याची खातरजमा करण्याकरिता मालवाहू वाहनांच्या परवानाधारकांविषयी परिवहन आयुक्तांचे कार्यालय, चलत चित्र उद्योगातील स्वयंरोजगारीत व्यक्तींच्या बाबतीत आयकर विभागाकडून, मुंबई दुकाने आणि आस्थापना अधिनियम, १९४८ च्या कक्षेत येणारी दुकाने आणि आस्थापना यांच्या बाबतीत कामगार आयुक्तांचे कार्यालय आणि रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब मर्यादीत यांच्याकडून त्यांनी अनुज्ञप्ती दिलेल्या बुकमेकर्स, प्रशिक्षक आणि जॉकी यांच्या बाबतीत तपशील गोळा करण्यात आला. व्यवसाय कर विभागातील नोंदणीच्या संख्येशी हा तपशील पडताळून पाहिला असता ३०,७६,०५९ व्यक्तींची नोंदणी न झाल्याचे आढळून आले. या प्रकरणांत खाली दर्शविल्याप्रमाणे रु. ३४५.८० कोटी महसुलाचा अंतर्भाव होता.

अ. क्र	अधिनियमातील अनुसूची १ मधील नोंद क्रमांक	व्यवसायिकांचा प्रवर्ग	कालावधी	विभाग/संख्ये नुसार व्यक्तींची संख्या	व्यवसायकर विभागानुसार नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या	नोंदणी न झालेल्या व्यक्तींची संख्या	व्यवसाय कराचा प्रतिवर्षी दर (रुपये)	संभाव्य महसुलाची रक्कम (रुपये कोटीत)
१	१३	भाड्याने देण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या वाहनांना मोटार वाहन अधिनियमानुसार परवाने दिलेल्या व्यक्ती	२००१-०२ ते २००५-०६	२७,८८,१५९	९,२३,६३९	१८,६४,५२०	७५०	१३९.८४
२	७	चलतचित्र उद्योगातील	२००२-०३ ते	२३,७८७	८,०५१	१५,७३६	१,७००	२.६८

		स्वयंरोजगारीत व्यक्ती	२००५-०६					
३	६	रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब मर्यादीतद्वारा अनुज्ञप्ती देण्यात आलेले बुकमेकर्स, प्रशिक्षक आणि जॉकी	२००१-०२ ते २००५-०६	१,१९७	८१६	३८१	१,७००	०.०६
४	८,९,१०, ११,१२,१४, १६ आणि १८	मुंबई, दुकाने आणि आस्थापना अधिनियम १९४८ च्या कक्षेत येणारी दुकाने आणि आस्थापना	२००५	१९,२३,८७१	७,२८,४४९	११,९५,४२२	१,७००	२०३.२२
						३०,७६,०५९		**३४५.८०**

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यावर, प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी अनुक्रमांक २,३ आणि ४ मध्ये दर्शविलेल्या नोंदणी न झालेल्या व्यक्तींच्या संख्येचा तपशील मान्य केला. मालवाहू वाहनांच्या परवाना धारकांच्या बाबतीत त्यांनी नमूद केले की, काही परवानाधारकांकडे एकापेक्षा जास्त परवाने असू शकतील आणि त्यामुळे अशा नोंदीत प्रकरणांची संख्या कमी असू शकेल. प्रधान सचिवांनी जुलै २००७ मध्ये सहआयुक्त विक्रीकर (व्यवसायकर) यांना परिवहन आयुक्तांकडील आकडेवारीशी ताळमेळ घालण्याच्या सूचना दिल्या. पुढील अहवाल प्राप्त झाला नाही. (ऑक्टोबर २००७)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

दोष निवारण कृती व वसुली :-

१) महालेखाकार यांनी २७,८८,१५९ इतकी परवाना धारकांची संख्या खालीलप्रमाणे ठरविली आहे.

दिनांक / वर्ष	**वाहतुक विभागाप्रमाणे परवाना धारकांची संख्या**		**एकूण**	**व्यवसायकर विभागाप्रमाणे व्यवसायकर भरणाऱ्या धारकांची संख्या**
	टॅक्सी	**इतर वाहतुक वाहने**		
३१.३.२००२	९५,३१५	४,३४,६७०	५,२९,९८५	१,७४,३७९
३१.३.२००३	९४,४६२	४,४४,३८९	५,३८,८५१	१,८०,२६४
३१.३.२००४	१,०२,७५३	४,६१,७७०	५,६४,५२३	१,८६,०६३
३१.३.२००५	१,०३,४१४	४,६१,२०९	५,६४,६२३	१,९१,९२४
३१.३.२००६ अंदाजे	१,०९,१२२	४,८१,०५५	५,९०,१७७	१,९१,००९
एकूण	**५,०५,०६६**	**२२,८३,०९३**	**२७,८८,१५९**	**९,२३,६३९**

वाहतुक विभागाप्रमाणे ५ वर्षाची परवाना धारकांची सरासरी संख्या ती ५.५७ लाख असून व्यवसायकराखाली नोंदीत व्यवसायकर भरणाऱ्यांची ५ वर्षाची सरासरी संख्या १.८४ लाख इतकी आहे. म्हणजेच सरसरी वार्षिक फरक हा ३.७३ लाख इतका आहे. हा फरक असण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

परवाना धारण करणारी खाजगी सर्विस वाहने जी भाडे किंवा मोबदला न आकारता चालविली जातात. त्यांना व्यवसायकर भरावा लागत नाही. मुंबई वाहन कायद्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीने किती परवाने धारण करावेत याच्यावर बंधन नाही. परंतु त्यांना प्रतिव्यक्ती प्रतिवर्ष जास्तीत जास्त व्यवसायकर रु. २५००/- इतकाच भरावा लागतो. वाहनांचा ताफा बाळगणाऱ्या कंपन्या जसे मे. महाराष्ट्र राज्य वाहतूक कार्पोरेशन यांच्याकडे अंदाजे १७००० बसेस आहेत. मे. मुंबई विद्युत पुरवठा व वाहतूक कार्पोरेशन यांच्याकडे अंदाजे ५००० बसेस आहेत. सर्व नगरपालिका ज्यांच्याकडे वाहतूक विभाग आहे त्यांच्याकडे अनेक बसेस आहेत. त्याचप्रमाणे अनेक खाजगी कंपन्या आहेत ज्यांच्याकडे बऱ्याच बसेस किंवा ट्रक्स आहेत परंतु त्यांना प्रतिवर्ष फक्त रु. २५००/- इतका व्यवसायकर भरावा लागतो. त्यामुळे इतका फरक येतो. वाहतूक विभागाकडे परवाना धारकांची संगणकीकृत माहिती नाही. त्यामुळे परवाना धारक व नांव नोंदणी धारकांची मेळजुळणी करणे अवघड आहे.

२) चलतचित्र उद्योगातील स्वयंरोजगारीत व्यक्तींच्या संदर्भात वर्ष २००२-०३ ते २००५-०६ म्हणजेच ४ वर्षाच्या कालावधीत १५७३६ इतक्या कसुर व्यक्ती अनोंदीत राहिल्याने शासनाच्या व्यवसायकराची वसुली न झाल्याने संभाव्य महसूल हानी रु. २.६८ कोटी इतकी झाली असे निदर्शनास आणून दिले आहे. या विभागाने २००६-०७ मध्ये सर्वेक्षण सुरु केल्याने व माहे सप्टेंबर २००७ ते माहे नोव्हेंबर २००७ मध्ये अभय योजना जाहीर केल्याने ८१२ व्यक्तींनी नाव नोंदणी दाखला घेतला व त्यामुळे रु. १.०२ कोटी महसूल जमा झाला. त्यामुळे १५७३६ पैकी ३२४८ कसूरदाराची संख्या कमी झाली. आता एक वेगळा सर्वेक्षण विभाग स्थापन करण्यात आला असून शिल्लक प्रकरणात ते अनोंदीत व्यक्तीचा पाठपुरावा करीत आहेत.

३) रॉयल वेस्टर्न इंडीया टर्फ क्लबच्या संदर्भात असे निदर्शनास आणण्यात आले की, ०१-०२ ते ०५-०६ या कालावधीमध्ये एकूण ३८१ वार्षिक कसूर जणांनी नांव नोंदणी केली नसल्याने त्या संदर्भात वसुली न झाल्याच्या कारणास्तव ०.०६ कोटीची संभाव्य महसूल हानी झाली. या

विभागाने ०७-०८ या वर्षामध्ये आरडब्ल्युआयटीसी यांच्याकडून माहिती जमा करुन अतिरिक्त ९७ पात्र व्यक्तींना नोंदीत करुन घेतले असून, खालीलप्रमाणे कराची रक्कम वसूल केली आहे.

वर्ष	जॉकीज		बुकमेकर्स		प्रशिक्षक	
	व्यक्ती	रक्कम	व्यक्ती	रक्कम	व्यक्ती	रक्कम
०१-०२	३६	६७५००	३५	६८७००	२६	५३००८
०२-०३	३८	७२५००	३४	६८८००	२६	५२१००
०३-०४	३८	७२५००	३७	८२२००	२३	४५६००
०४-०५	३८	७३०००	३६	७५८००	२५	५११००
०५-०६	३९	७६०००	३९	८४१००	२९	५९०५०
एकूण	**१८९**	**३६१५००**	**१८१**	**३७९६००**	**१२९**	**२६०८५८**

४) मुंबई दुकाने व आस्थापना जे व्यवसायकराच्या नोंद क्र.८,९,१०,११,१२,१४,१६,१८ या नोंदीमध्ये मोडतात त्यांची संख्या ११,९५,४२२ अशी दर्शविण्यात आलेली असून ते अनोंदीत असल्याचे दर्शविले आहे. आता आकडेवारीची मेळजुळणी करुन घेण्यात येत आहे आणि सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

दिनांक २०.०७.२०१० चा वित्त विभाग यांना सादर करण्यात आलेला अहवाल पहावा. त्याच संबंधात खालीलप्रमाणे पुढील स्पष्टीकरणात्मक व प्रगतीशील अहवाल सादर करण्यात येत आहे.

अ) महालेखापालांनी सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत एकूण २७,८८,१५९ परवानाधारक व्यक्ती नमूद केलेल्या आहेत. तसेच त्यांनी वाहतुक विभागातील सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीतील परवाना धारकांची संख्या ही व्यवसाय कर कायद्याखालील नावनोंदीत व्यक्तींची संख्या म्हणून दाखविली आहे. परंतु ही वस्तुस्थिती बरोबर नाही. वाहतुक विभागाकडून प्राप्त झालेली परवाना धारकांच्या संदर्भातील आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	टॅक्सीज	इतर	एकूण	निव्वळ
१	२००१-०२	९५३१५	४३४६१०	५२९९२५	०
२	२००२-०३	९४४६२	४४४३८९	५३८१५१	८२२६
३	२००३-०४	१०२७५३	४६१७७०	५६४५२३	२६३७२
४	२००४-०५	१०३४१४	४६१२०९	५६४६२३	१००
५	२००५-०६	१०९१२२	४८१०५५	५९०१७७	२५५५४
	एकूण	**५०५०६६**	**२२८३०३३**	**२७८८०९९**	**६०२५२**

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, कॉलम क्र. ६ नुसार प्रत्येक वर्षी नवीन परवाने प्रस्तुत होतात. वर्ष २००१-०२ च्या अखेरीस प्रस्तुत परवान्यांची एकूण संख्या ५२९९२५ इतकी होती. त्यानंतर वर्ष २००२-०३ ते २००५-०६ या कालावधीत नवीन परवाने एकूण ६०२५२ एवढे दिले गेले. म्हणजेच सन २००५-०६ या वर्षाअखेरीस परवान्यांची संख्या फक्त ५९०१७७ इतकी आहे व उलटपक्षी सन १९७५ पासून नावनोंदणी झालेल्या परवाना धारकांची संख्या ९२३६३९ इतकी आहे. त्याअर्थी महालेखापालांनी दर्शविलेले एकूण १८६४५२० परवानाधारक हे अनोंदीत नावनोंदणी व्यक्ती आहेत किंवा परवानाधारक आहेत हे स्पष्ट होत नाही. दिनांक ३१.०३.२००६ रोजीची परवानाधारकांची ५९०१७७ ही संख्या विचारात घेता त्यापैकी काही परवानाधारक व्यवसायकर कायद्यांतर्गत नावनोंदणी दाखला घेण्यास पात्र नाहीत त्याची तपशीलवार कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रत्येक परवानाधारक वाहनांस व्यवसाय कर लावणे बंधनकारक नाही व त्यांना प्रतिवर्षी जास्तीत जास्त व्यवसायकराचा रु. २५०० इतका भरणा करावा लागतो.

२. मुद्दा क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे परवानाधारकांकडे १०० च्यावर परवाने असलेला तपशील उदाहरणार्थ खालीलप्रमाणे आहे. सदरील यादी उदाहरणादाखल आहे.

अ.क्र.	परवानाधारक	परवाने वाहन
१.	कोल्हापूर महानगरपालिका	१४८
२.	भाभा अणुशक्ती संशोधन केंद्र	१६४
३.	घाटगे पाटील ट्रान्सपोर्ट	२६१
४.	पोस्ट ॲण्ड टेलेग्राफ	१५६
५.	ठाणे पालिका परिवहन	३८२
६.	मुंबई वीजपुरवठा व परिवहन	४४७२
७.	पुणे महानगर परिवहन महामंडळ	१२०८
८.	कल्याण डोंबिवली परिवहन	११६
९.	नवी मुंबई परिवहन	२६१
१०.	महाराष्ट्र राज्य परिवहन	१७५०१
		२३६६९

वरील तपशीलावरुन असे स्पष्ट होते की, फक्त १० परवानाधारकांकडे २३६६९ परवाने आहेत. जरी २३६६९ परवाने असतील तरी प्रत्यक्षात फक्त १० व्यक्तीच व्यवसायकर कायद्याअंतर्गत नांव नोंदणी दाखला घेण्यास पात्र आहेत. म्हणेच वाहतुक विभागाने जितके

परवाने प्रसूत केले ते सर्व परवाने व्यवसायकर कायद्यांतर्गत नांव नोंदणी दाखला घेण्यास पात्र आहेत. असा तर्क (अंदाज) करणे चुकीचे आहे.

त्याचप्रमाणे उदा. रिलायन्स.एल अँड टी. इ. कंपन्या / संस्था / प्रशासन / ज्यांच्याकडे एकापेक्षा अनेक वाहने आहेत. जे त्यांचे कामगार व कर्मचारी यांची वाहतूक करण्यासाठी वापरतात. ज्यांनी व्यवसायकर कायद्यांतर्गत अन्य अनुसुची नोंदी अन्वये नांव नोंदणी दाखला घेतला आहे. ते परत व्यवसायकर कायद्यांतर्गत अनुसूची नोंद क्र. १३ अन्वये (व्यवसाय कर भरण्यासाठी) नाव नोंदणी दाखला घेण्यास पात्र नाहीत.

व्यवसायकर कायद्यांतर्गत नोंद क्र. १३ खाली वसूल करावयाच्या व्यवसायकराची प्रभावी वसुली व्हावी यासाठी वित्त विभागाने दि. ०३.११.२००६ अन्वये नोंद क्र. १३ वाहतुक विभागास हस्तांतरित केलेली आहे. वाहतुक विभाग परवाने देताना अथवा परवान्याचे नूतनीकरण करताना परवाना धारकाने व्यवसायकर कायद्यांतर्गत नाव नोंदणी दाखला घेतल्याची योग्य पडताळणी करतात. जर परवाना धारकाने नाव नोंदणी दाखला घेतला नसल्यास अथवा व्यवसायकराचा भरणा केला नसल्यास त्या व्यक्तीस परवाना किंवा परवान्याचे नूतनीकरण देत नाहीत. १.०४.२००७ ते ३१.०३.२०१० या कालावधीत वसूल केलेल्या व्यवसायकराचा तपशील खालीलप्रमाणे आहे. या आकडेवारीत कालावधी २००७-०८ ते २००९-१० मध्ये राबविण्यात आलेल्या अभय योजना व प्रोत्साहन योजनाअंतर्गत व्यवसायकराच्या वसुलीची आकडेवारीचाही समावेश आहे.

अ.क्र.	वर्ष	व्यवसायकराची वसुली (रु. कोटी)	अभययोजनेअंतर्गत व्यवसायकराचा भरणा (रु.कोटी)
१.	२००७-०८	५१.००	२१.०७
२.	२००८-०९	४०.९९	----
३.	२००९-१०	४९.१२	११.२५

वरील दर्शविल्याप्रमाणे वाहतुक विभाग / विक्रीकर खाते यांनी शक्य असेल तसे जास्तीत जास्त वाहतुक परवाना धारकांना व्यवसायकर कायद्यांतर्गत नाव नोंदणी दाखला देण्याचे प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे परवाना धारकांची व्यवसायकर कायद्यांतर्गत नांव नोंदणी दाखला न देण्याची प्रक्रिया अतिशय कमी प्रमाणात शिल्लक राहण्याची शक्यता आहे. कृपया सदर मुद्दा बंद करण्यात यावा.

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक ०६.१०.२०१० रोजी रिट पिटीशन निकाली काढले असून त्याप्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी परवानाधारकांना नोंदीत करण्यासाठी विशेष मोहिम राबवून त्यांना नोंदीत करुन त्यांचेकडून सहा महिन्यांचे आत कराची वसुली करावी असे निर्देश दिलेले आहेत. या आदेशाप्रमाणे जे परवानाधारक नोंदीत नाहीत त्यांना प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून नोंदीत करण्यात येईल व त्यांचेकडून व्यवसायकराची थकबाकी वसुल करण्यात येईल. त्यामुळे हा परिच्छेद बंद करण्यात यावा.

ब) या संदर्भात असा खुलासा करण्यात येत आहे की, प्रथम २३७८७ ही आकडेवारीची खात्री करुन घ्यावी. याबाबत विक्रीकर खात्याने आयकर खात्यास दि. ०५.०९.०८, ०९.०२.०९ व १.१२.०९ च्या पत्राने अशा व्यक्ती की, ज्या लेखक, गीतकार, दिग्दर्शक, नट, गायक, कॅमेरामन इ. ची यादी देण्याविषयी कळविले होते. परंतु अद्याप आयकर खात्याकडून संबंधित माहितीची यादी उपलब्ध झालेली नाही. याव्यतिरिक्त विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) मुंबई या कार्यालयाने दि. ०८/०९/२०१० च्या पत्रानुसार महालेखापाल कार्यालयास सिनेक्षेत्राशी संबंधीत व्यक्तींची यादी मागविण्यात आली होती. सिनेक्षेत्राशी संबंधीत व्यक्तींची यादी उपलब्ध होताच व अशा व्यक्तींची आकडेवारी २३७८७ याची खात्री होऊन या कार्यालयाच्या अभिलेखाशी मेळजुळणी झाल्यास अशा अनोंदीत नाव नोंदणी व्यक्तींनी नोंदीत करण्याबाबत पुढील कृती करता येईल. तसेच सिनेक्षेत्राशी निगडीत असलेल्या व्यक्तींना नांव नोंदणी दाखला देवून रु. १.२ कोटीचा व्यवसायकर वसुल करण्यात आलेला आहे.

क) एकूण ४९९ व्यक्ती म्हणजे जॉकी, ट्रेनी आणि बुकमेकर्स यांनी सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत नव्याने नांव नोंदणी दाखला देवून व्यवसायकर कायद्यांतर्गत नोंदीत करुन घेण्यात आले व यांच्याकडून रु. १०.०१ लाख व्यवसायकर वसुल करण्यात आला. तसेच सन २००७-०८ या वर्षापर्यंत नांव नोंदीत व्यक्ती म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. कृपया सदर मुद्दा बंद करण्यात यावा.

ड) व्यवसायकर कायद्यांतर्गत नोंद क्र. १० चे हस्तांतरण मा.कामगार आयुक्त कार्यालय व बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय यांचेकडे सोपविण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याचे शासन स्तरावर विचाराधीन आहे.

५.४ शास्तीची आकारणी न करणे

व्यवसायकर अधिनियमानुसार, प्रत्येक नोकरदार व्यक्तीने किंवा कोणताही व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीने, अशी व्यक्ती कर भरण्यास पात्र असल्यापासून ३० दिवसांच्या आत विहीत नोंदणीकरीता किंवा नाव नोंदणीकरीता अर्ज केला पाहिजे. ठराविक काळात अर्ज करण्यात कसूर केल्यास, विहीत प्राधिकारी, त्यांची बाजू ऐकण्याची योग्य संधी देऊन नोकरदाराला प्रतिदिनी रु. पाच प्रमाणे आणि नोंदणीपात्र व्यक्तीला प्रतिदिनी रुपये दोन दराने दंड आकारु शकतात.

२३ व्यवसाय कर कार्यालयाच्या (अहमदनगर, अकोला, अमरावती, धुळे, जालना, मुंबई, (८) नाशिक, पालघर, पुणे, (५) रायगड, सातारा आणि सोलापूर) २००१-०२ ते २००५-०६ या काळातील नोंदणी / नाव नोंदणी याविषयीच्या अभिलेख्यांची छाननी केली असता, ५१५ प्रकरणांत नोंदणीसाठी / नाव नोंदणीसाठी अर्ज करण्यास ६६ ते ९,४८७ दिवसांचा विलंब झाल्याचे आढळून आले. तथापि, एकतर शास्ती आकारली गेली नव्हती किंवा कमी दराने आकारण्यात आली होती. रु. २०.३० लाख आकारणीयोग्य शास्तीपैकी फक्त रु. ९१,००० शास्ती आकारली होती. याचा परीणाम रु. १९.३९ लाख शास्ती न आकारण्यात किंवा कमी आकारण्यात झाला. ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने व्यवसाय कर अधिकाऱ्यांना शास्तीच्या वसुलीसाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आल्याचे नमूद केले. वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (ऑक्टोबर २००७)

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने कळविलेल्या लेखी ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की

व्यवसायकर कायदा कलम ५ (५) ची शास्ती ऐच्छिक आहे. प्रकरणनिहाय अहवाल नंतर सादर करण्यात येईल.

महालेखापाल कार्यालय सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीचे नोंदणी/ नाव नोंदणीचे लेखा परिक्षण करताना त्यांच्या असे लक्षात आले की, ५१५ प्रकरणात रु. २० लाख (अंदाजे) इतकी दंडाची रक्कम नोंदणी/नाव नोंदणी दाखला घेण्यासाठी उशीरा अर्ज केल्यामुळे दंड न लावणे अथवा दंड कमी लावणे या कारणामुळे कमी आकारण्यात आली. तसेच अशा प्रकरणात व्यवसायकर अधिकारी यांनी दंड का नाही आकारला ? किंवा कमी आकारणी का करण्यात आली ? याची नोंद कार्यवाही पत्रकावर घेतली नाही या संदर्भात असे स्पष्ट

करण्यात येत आहे की, माहे सप्टेंबर २००२ ते माहे मार्च २००३ या कालावधीत ५१५ प्रकरणांमधील काही प्रकरणे नोंदीत / नांव नोंदीत झालेली होती. या कालावधीत अभय योजना जाहीर झाली होती. या योजनेप्रमाणे पहिल्या टप्प्यामध्ये दंड माफी होती व दुसऱ्या टप्प्यामध्ये १० टक्के आकारणी करायची होती. नोंदणी दाखला / नांव नोंदणी दाखल्यासाठी अर्ज करतेवेळी अभय योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात कोणतीही शास्ती लागू होत नव्हती व दुसऱ्या टप्प्यात केवळ १० टक्के इतकीच शास्ती लागू होते.

ज्या प्रकरणात अभय योजनेखाली अर्ज दाखल झाले त्यात एकतर शास्ती लागू नव्हती किंवा १० टक्के इतकीच लागू होते. यावेळी ती कमी लावण्याबाबतची कारणे नमूद करण्याबाबतचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

उर्वरित प्रकरणामध्ये लेखा आक्षेपास अनुसरुन कार्यवाही सुरु करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात दुसरी अभय योजना सप्टेंबर, ऑक्टोबर २००७ मध्ये जाहीर करण्यात आली व त्याअंतर्गत फक्त १० टक्के इतके व्याज व शास्ती आकारणी करुन उर्वरित ९० टक्के ची माफी देण्यात आली होती ज्यांनी अभय योजनेचा फायदा घेतला नाही त्यांच्याकडून विभागाने पूर्ण दंड वसूल केला. सदर प्रकरणात रु. १०.०१ लाख इतकी रक्कम वसूल केलेली आहे.

साक्ष :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक १७ ऑक्टोबर,२०१२ रोजी वित्त विभागाचे प्रधान सचिव व अन्य विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली त्या साक्षीच्या वेळी व्यवसायकराच्या संदर्भात सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, व्यवसाय कर नोकरदार व्यक्तीकडून किंवा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीकडून शासन २५०० रु. प्रती वर्षी याप्रमाणे रक्कम आकारली जाते. एखाद्या कंपनीमध्ये काम करणाऱ्या लोकांकडून ती कंपनी व्यवसाय कर गोळा करते व ही रक्कम शासनाकडे जमा केली जाते. अशा व्यक्तींना नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते व स्वयं रोजगार करणाऱ्यांना एन्रोलमेंट सर्टीफिकेट दिले जाते. मागील वर्षी व्यवसायकराच्या रुपाने १८११ कोटी रुपये गोळा करण्यात आले. आर.सी होल्डर्सच्या माध्यमातून साधारणपणे ८० टक्के व्यवसायकर गोळा होतो.

व्यवसाय करात प्रामुख्याने दोन भाग आहेत. पीटीआरसी म्हणजे रजिस्टर्ड असणाऱ्या संस्था त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून कर गोळा करुन विभागाकडे ही रक्कम जमा

करतात. पीटीईसी म्हणजे स्वयंरोजगार करणारे डॉक्टर,वकील इ. व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडून व्यवसाय कर गोळा केला जातो. सन २००६ मध्ये परवाना धारक मोटार चालकांकडून व्यवसाय कर का वसूल केला नाही, असा मुद्दा महालेखाकारांनी उपस्थित केला होता. या संदर्भात विभागाने असा खुलासा केला की, एकूण परवाना धारकांची संख्या २७ लाख असून त्यापैकी ९ लाख परवाना धारकांकडून कर गोळा केलेला आहे. प्रत्येक परवाना धारकाकडे साधारणपणे २ ते ४ गाडया असतात. एकदा परवाना धारकांनी नोंदणी केल्यानंतर ते पीटीआरसी म्हणून कर भरतात. शासनाला पीटीईएसच्या माध्यमातून २५०० रुपये प्रती वर्षी प्राप्त होतात. सन २००६ पासून हा कर गोळा करण्याचे काम वाहतूक विभागाकडे सोपवण्यात आलेले आहे. यामुळे आता अशा प्रकारची अडचण उद्‌भवणार नाही. आता या संदर्भात थेट विक्री कर विभागाकडून मॉनीटरींग केले जात नाही.

विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार ३० लाख ७६ हजार व्यक्तींची अद्याप नोंद न झाल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणात ३४५ कोटी ८० लाख रुपयांचा अंतर्भाव आहे. ही रक्कम वेळेत न भरल्यामुळे प्रती २ रुपये या प्रमाणे शास्ती आकारण्यात आली आहे याबाबत समितीने पृच्छा केली असता, यावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, सन २००६ पासून कर गोळा करण्याचे काम वाहतूक विभागाकडे देण्यात आलेले आहे. त्यांच्याकडून १ कोटी रुपयांपर्यंत कर गोळा झालेला आहे. सध्या विभागाकडे पीटीईसीचा डेटा उपलब्ध नाही. हा डेटा गोळा केल्यानंतर नोटीस काढता येईल. यापूर्वी व्हॅटची रक्कम अधिक असल्यामुळे त्याकरिता संगणकीकरणाचे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात आले. आता व्यवसायकराकरिता संगणकीकरणाचे काम केले जात आहे. यलो पेजेस किंवा जस्ट डायल यांच्याकडून व्यावसायिकांची माहिती घेण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. एका व्यक्तीची माहिती देण्याकरिता त्यांच्याकडून १० रुपये आकारले जाणार आहेत. त्यामुळे ही माहिती घेण्याकरिता विभागाकडून प्रथम इतर स्त्रोतांचा विचार केला जाईल.

हा रु. १० खर्च विभागाला एकदाच करावयाचा आहे. एकदा विभागाला माहिती मिळाली तर संबंधिताकडून कर वसुल करता येऊ शकेल असे समितीने विभागाला सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत सहमती दर्शवून इतर स्त्रोतांकडून माहिती न मिळाल्यास

जस्ट डायल किंवा यलो पेजेस यांच्याकडून माहिती घेण्याचा विचार केला जाईल असे समितीस विदित केले.

सन २०११-१२ करिता व्यवसाय कराच्या माध्यमातून १८०० कोटी रुपये गोळा झाले आहेत. या कराची विभागणी कशा प्रकारे आहे ?याबाबत समितीला माहिती देण्यास विभागास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, साधारणपणे ८० टक्के कर पीटीआरसी आहे व २० टक्के कर पीटीईसी आहे. विभागाला प्रत्येक व्यक्तिची माहिती मिळाल्यानंतर ही रक्कम बऱ्याच प्रमाणात वाढणार आहे. यामुळे आता विभागामार्फत ही माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबची वसुली महालेखाकार यांनी लक्षात आणून दिल्यानंतर रक्कम वसूल करण्यात आली आहे. हा मुद्दा गांभीर्याने घ्यावा. सदर बाब महालेखाकार यांनी लक्षात आणून देईपर्यंत विभागाच्या लक्षात आली नव्हती काय, याबाबतची विचारणा समितीने केली असता मार्केटचा डेटाबेस खूप मोठा आहे. आजमितीस विभागाकडे मनुष्यबळ फार कमी आहे. महालेखाकार कार्यालय जागेवर जाऊन तपासणी करीत असल्यामुळे अनियमितता झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. प्रत्यक्ष जागेवर जाऊन विभागाकडून ऑडिट केले जात नाही असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

राज्यातील अनेक व्यावसायिकांकडून व्यवसायकर गोळा करीत नाही त्यांच्याकडून पूर्वलक्षी प्रभावासह कर वसूल करणार आहात काय ?याबाबत समितीने विचारणा केली असता वसुली भूतपूर्व प्रभावासह घेण्याची तरतूद कायद्यामध्ये करणार असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीस केला.

विभागाकडे कर्मचारीवर्ग कमी आहे हे समितीला मान्य आहे. पण आता संगणकीकरण झालेले आहे. खाजगी कंपन्या वेगवेगळ्या प्रकारचे सर्वेक्षण करीत असतात. त्यांच्याकडून विभाग डाटा गोळा करून घेत नाहीत ? असे केले तर त्यात निश्चितच फायदा होईल. सुरूवातीला एकदाच पैसे द्यावे लागतील पण त्यानंतर मात्र, कायमस्वरुपी निधी मिळत जाईल. रिक्षा चालकांवर लावलेला कर विधीमंडळाने रद्द केला आहे. रिक्षा चालकाचा, रिक्षावरील खर्च जमेपेक्षा जास्त व्हायचा. त्यामुळे तो कर रद्द करण्याची सदस्यांनी मागणी केली होती. जेथे रोज लाखो रूपये जमा होत आहेत, तेथे अजून ॲप्रोच झालेलो नाही. विभागाला ५०० कोटी रूपये मिळणार असतील तर एखाद्या खाजगी कंपनीकडून डाटा

घेण्यासाठी ५-५० कोटी रूपये खर्च केले तरी चालतील. खाजगी कंपनींकडून विभागाने सर्व माहिती गोळा करून घेतली पाहिजे. सरकारचे उत्पन्न वाढविण्यासाठी ही शिफारस केली पाहिजे. अनेक खाजगी कंपन्या वेगवेगळ्या प्रकारचा सर्व्हे करीत असतात. त्यांना विभागाने सहभागी करून घेतले पाहिजे. यासाठी एक-दोन वर्षामध्ये निविदा काढून विभागाने कार्यवाही केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आता परवाना धारकाचा इश्यू संपला आहे. दुकाने आणि आस्थापने संबंधातील परवाने मुंबई महानगरपालिका देते. त्यांनी व्यवसाय कर लावून गोळा करण्यास सुरूवात केली आहे. महानगरपालिकेचे म्हणणे आहे की, टॅक्स गोळा करून देऊ पण त्यातील ५० टक्के रक्कम मुंबई महानगरपालिकेला द्यावी याबाबत विभागाची चर्चा सुरू आहे.

शासकीय आस्थापनामध्ये काम करणारे कर्मचारी आहेत त्यांच्याकडून थेट व्यवसायकर गोळा केला जातो. मात्र, जे मोठे उद्योग आहेत त्यांच्याकडून व्यवसायकर वसूल केला जात नाही. गारमेंट व्यवसाय करणारे आहे त्यांच्याकडून किती प्रमाणात व्यवसायकर गोळा केला जातो व त्यांची एकूण किती संख्या आहे याची नोंद खात्याकडे आहे काय ? महानगरपालिका, नगरपालिका यांच्याकडून शहरी भागामध्ये दुकाने आणि आस्थापना परवाने दिले जातात. त्यांच्याकडून विभागाला काही प्रमाणात माहिती मिळू शकते. त्यामुळे याबाबतची शिफारस समितीच्या अहवालात केली जाईल असे समितीने स्पष्ट केले.

"शास्तीची आकारणी न करणे "

२३ व्यवसाय कर कार्यालयांच्या सन २००१-२००२ते २००५-२००६ या काळातील नोंदणी/ नाव नोंदणी या विषयीच्या अभिलेख्यांची छाननी केली असता, ५१५ प्रकरणात नोंदणीसाठी / नाव नोंदणीसाठी अर्ज करण्यास ६६ ते ९४८७ दिवसांचा विलंब झाल्याचे आढळून आले. तथापि, एकतर शास्ती आकारली गेली नव्हती किंवा कमी दराने आकारण्यात आली होती. रूपये २०.३० लाख आकारणी योग्य शास्ती पैकी फक्त रूपये ९१,०००/- शास्ती आकारली होती. याचा परिणाम रूपये १९.३९ लाख, शास्ती न आकारण्यात किंवा कमी आकारण्यात झाला. ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने व्यवसाय कर अधिकाऱ्यांना शास्तीच्या वसुलीसाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आल्याचे नमूद केले आहे. वित्त विभागाला प्रत्येक आस्थापनेकडे पोहचने शक्य नाही. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्याकडे स्वतंत्र असा

कर्मचारीवर्ग असतो. त्यामुळे अशा यंत्रणांकडून व्यवसाय कर गोळा करण्याचा मोठा विचार वित्त विभागाने केला आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, आर.सी.आणि इ.सी.मध्ये ओव्हरलॅपिंग आहे. आयकर विभागाकडे सगळी माहिती असते. कोणताही डेटाबेस जोडण्यासाठी एक नंबर असणे आवश्यक असते. मागच्या वेळी व्हॅटमध्ये काय केले हे मी सांगितले आहे. कस्टम टॅक्स, सर्व्हीस टॅक्स गोळा केले जातात. त्याची माहिती आयकर विभागाकडे असते. आयकर विभागाने स्थायी लेखा संख्या (PAN) दिलेला आहे. त्यामुळे त्यांच्याकडे सगळी माहिती उपलब्ध होते. PAN च्या धर्तीवर आपल्या राज्यात की नंबर देता येईल काय याची विक्रीकर विभागामार्फत पडताळणी करण्यात येत आहे.

याच अनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढे अशी माहिती दिली की,डेटाबेससाठी कॉमन की द्यावी लागेल. त्यासाठी एक विशिष्ट नंबर प्रत्येकाला द्यावा लागेल. त्याद्वारे आपल्याला सर्व माहिती गोळा करता येईल. सदर नंबर एवढ्यासाठी द्यावा लागेल की, प्रत्येकाचे नाव लिहिण्याची पद्धत वेगळी असते. उदाहरण द्यावयाचे झाले तर काही जण **SHRIVASTAV** असे स्पेलिंग लिहितात, तर काही जण **SRIVASTAV** असे लिहितात. काही जण **SUDHIR** असे स्पेलिंग लिहितात तर काही जण **SUDHEER** असे स्पेलिंग लिहितात. आज लाखोंच्या वर व्यावसायिक डेटाबेसच्या बाहेर आहेत. त्यांना डेटाबेसमध्ये आणणे महत्त्वाचे आहे. तसे केले तर राज्याचे उत्पन्न देखील वाढू शकेल.

यात अतिव्याप्ती (ओव्हरलॅपिंग) कधीपासून आहे, ते बदलण्याकरिता विभागाने काय प्रयत्न केले आहेत ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की,विक्रीकर आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे विक्रीकर विभाग वेगवेगळ्या प्रकारचे कर संकलित करीत असतो.हा प्रत्यक्ष कराचा (इन डायरेक्टटॅक्सचा) विषय आहे. अलीकडच्या काळात बऱ्याच घडामोडी झालेल्या आहेत पूर्वी विक्रीकर गोळा करण्यात येत होता. पण सन २००५ पासून व्हॅटची संकल्पना आली. त्यामुळे कार्य पद्धती देखील बदलली आहे तेव्हाची कार्यपद्धती आणि आताची कार्यपद्धती यात फरक झालेला आहे. त्यावेळी रजिस्टरमध्ये सगळी नोंद होत होती म्हणून संगणकीकरणाची संकल्पना पुढे आली होती. परंतु, त्यावेळचे तंत्रज्ञान आतापेक्षा खूप महाग होते म्हणून ती संकल्पना प्रत्यक्षात आणता आली नाही. तसेच त्यावेळी नेटवर्कची

सुविधा देखील उपलब्ध नव्हती म्हणून संगणकीकरणाचे काम बंद करण्यात आले. पण सन २००६-२००७ पासून कार्यपद्धती पूर्णपणे बदलली आहे. आता विभागाने ई-रिटर्न्स पद्धती सुरू केली आहे. व्यापाऱ्यांसाठी आपण एक चांगली सिस्टीम सुरू केली आहे. सुदैवाने आज आपल्याकडे नेटवर्क देखील उपलब्ध झालेले आहे. असेसमेंटची कल्पना बाजूला ठेवली आहे.पूर्वी विभाग असेसमेंट करत होता आता व्यापारी सनदी लेखाकारां (C.A.) कडून ऑडिट करून घेतात. व्यापाऱ्यांना त्यांचे अकौंटस सनदी लेखाकारांक (C.A.) कडून प्रमाणित करून आणावे असे सांगितले जाईल.

गेल्या ३ वर्षापासून व्यापाऱ्यांना कर परतावा दिला गेला नसल्याची माहिती समितीला प्राप्त झाली आहे याबाबत खुलासा करण्यास समितीने सांगितले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ही वस्तुस्थिती नाही. सन २००७-०८ पर्यंत मॅन्युअली रिटर्न्स भरले जात होते. त्यापैकी ९५ टक्के रक्कम आता पूर्ण केलेली आहे. सन २००७-०८ पासून ई-रिटर्न्स केलेले आहे. यामुळे ९० टक्के रिटर्न्स देण्यात आलेले आहेत. प्रत्येक वर्षी साधारणपणे ३ ते ४ हजार कोटी रुपये पेंडींग असतात. मात्र आता पध्दतीमध्ये बरीच सुधारणा झालेली असल्यामुळे रिटर्न्स पेंडींगचे प्रमाण खूप कमी झालेले आहे. याच अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, पालघर तालुक्यामध्ये परताव्या संदर्भात मोठा गैरव्यवहार झाला होता. येथील काही व्यापाऱ्यांनी विवरण (रिटर्न्स) न भरता विभागाकडून परतावा घेतला. असे गैरव्यवहार भविष्यात होऊ नये, याकरिता विक्री कर विभागाने अधिसूचना काढली. त्यानुसार पुनर्पडताळणी केल्याशिवाय कोणालाही रिटर्न्स देऊ नये, असे सांगण्यात आले. पुनर्पडताळणी करताना विक्रेत्याकडून माहिती घेतली जाते या प्रक्रियेमध्ये पूर्वी जास्त अवधी लागत होता. मात्र आता त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे सध्या काही प्रमाणात बँक गॅरंटी घेतली जाते. तसेच सनदी लेखाकारांक (C.A) कडून ऑडीट क्लिअर करुन घेतले जाते व रक्कम मॅच करुन परतावा दिला जातो.

सध्या विभागाकडे ४ हजार कोटी रुपये प्रलंबित असल्याची माहिती या ठिकाणी देण्यात आली आहे. याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता, विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले की, रिटर्न्स फाईल केल्यानंतर ही रक्कम ईसीएसच्या माध्यमातून परत दिली जाते. या रकमेमध्ये काही तफावत असेल तर त्याकरिता सुनावणी घेतली जाते. ताळमेळ झाल्यानंतर ९० टक्के रक्कम बँक अकाऊंटमध्ये जमा केली जाते.

विक्री कराच्या माध्यमातून राज्याला ४० ते ५० हजार कोटी रुपये महसूल प्राप्त होतो. अनेकदा विक्रेते ग्राहकांना सांगतात की, वस्तुची खरेदी केल्यानंतर पावती हवी असल्यास ११५ रुपये द्यावे लागतील व पावती न घेतल्यास ११० रुपये द्यावे लागतील. पावती न घेतल्यास रक्कम कमी द्यावी लागत असल्यामुळे ग्राहक पावती घेण्याचा विचार करीत नाहीत. मात्र यामुळे राज्य शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत आहे. या गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून विक्रेत्यांवर लक्ष ठेवणे, कॅश टॅली करणे, पावत्यांचे क्रमांक तपासणे इ. गोष्टी विक्री कर विभागाच्या माध्यमातून करण्याची आवश्यकता आहे. मात्र या करिता सध्या आवश्यक त्या प्रमाणात विभागाचे नियंत्रण नाही, लक्ष नाही. याकरिता विभागाकडून कोणतेही प्रपोजल तयार केले जात नाही किंवा सर्व्हे केला जात नाही. खरे तर या संदर्भात विभागाने योग्य कारवाई केल्यास राज्य शासनाचा आणखी १० ते २० हजार कोटी रुपयांचा महसूल सहजपणे वाढू शकतो. शासनाला कर न भरणाऱ्या एखाद्या विक्रेत्यावर १०-२० हजार रुपयांचा दंड आकारल्यास इतर व्यावसायिकांवर वचक निर्माण होईल. मधील कालखंडामध्ये सर्वोच्च न्यायालयाने व्हॅटच्या संदर्भात एक निर्णय दिला होता. या दोन्ही मुद्यांच्या संदर्भात विभागाने समितीला लेखी उत्तर सादर करण्याचे निदेश समितीने दिले असता विभागीय प्रतिनिधींनी माहिती देण्याचे समितीस आश्वासित करुन सर्वोच्च न्यायालयाने अशी सूचना केलेली आहे की, दि.३१ ऑक्टोबरपर्यंत कर न भरल्यास येणाऱ्या व्याज व शास्तीच्या रकमेकरिता स्थगिती दिलेली आहे. यापूर्वी उच्च न्यायालयाने असे आदेश दिले होते की, विक्रेत्यांनी रिटर्न्स भरण्याची आवश्यकता नव्हती याबाबतचा तपशिल विभाग समितीला नंतर देईल.

अनेकदा दुकानदार थर्मल पेपरवर बिले छापून देतात. ३ ते ४ महिन्यानंतर त्यावरील छापलेली रक्कम पुसून जाते. यामुळे ऑडीट करताना अडचण येते. याबाबत कोणती कारवाई केली जाणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, यावर सध्या व्हॅटमुळे अशा प्रकारच्या लहान -लहान गोष्टींमध्ये फसवणूक करण्याचे प्रमाण कमी झालेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

उपरोक्त साक्षीच्या वेळी समितीने विभागाकडे अशी विचारणा केली की, महाराष्ट्र राज्य वाहतूक कॉर्पोरेशन यांच्याकडे अंदाजे १७००० बसेस आहेत, मे. मुंबई विद्युत पुरवठा व वाहतूक कॉर्पोरेशन यांच्याकडे अंदाजे ५००० बसेस आहेत. सर्व नगरपालिका ज्यांच्याकडे

वाहतूक विभाग आहे त्यांच्याकडे अनेक बसेस आहेत. त्याचप्रमाणे अनेक खाजगी कंपन्या आहेत ज्यांच्याकडे बऱ्याच बसेस किंवा ट्रक्स आहेत परंतु त्यांना प्रतिवर्ष फक्त रु.२५००/- इतका व्यवसायकर भरावा लागतो. त्यामुळे अनेक वर्षापासून शासनाचे महसुलाचे नुकसान होते. ही बाब विक्रीकर विभागाने वेळीच शासनाच्या निदर्शनास का आणून दिली नाही ? यावर खुलासा करताना विभागाकडून असे सांगण्यात आले की, महाराष्ट्र राज्य वाहतूक कॉर्पोरेशन तसेच मुंबई विद्युत पुरवठा व वाहतूक कॉर्पोरेशन या आस्थापना म्हणून व्यवसायकर कायद्याअंतर्गत नोंदणी दाखला धारण करतात. नोंदणी दाखला धारक (PTRC holder) म्हणून या व तत्सम संस्था त्यांचेकडील कर्मचाऱ्यांकडून व्यवसायकराची कपात करतात व त्याचा भरणा शासकीय तिजोरीत करतात. अशा काही मोठया संस्थांनी व्यवसायकराचा केलेला भरणा खालीलप्रमाणे आहे.

सन २०११-१२

अ.क्र.	आस्थापनेचे नाव	रुपये (कोटी)
१	बी.ई.एस.टी.	२५.१६
२	एस.टी.महामंडळ	२६.२५
३	कोल्हापूर महानगरपालिका	०.६३
४	भाभा ऑटोमिक रिसर्च केंद्र	३.३६
५	ठाणे महानगरपालिका	१.१८
६	कल्याण- डोंबिवली महानगरपालिका	०.१२
७	नवी मुंबई महानगरपालिका	०.६३
८	पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रम	४

बसेस व ट्रक्स असणाऱ्या संस्था (सरकारी अथवा गैरसरकारी) संस्थेच्या नावाने परमिट धारण करतात.भारतीय राज्यघटनेच्या कलम २७६ (२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक व्यक्तीकडून गोळा केली जाणारी रक्कम रुपये २५००/- प्रतिवर्ष यापेक्षा जास्त असू शकत नाही. त्यामुळे परमिटधारकांकडे कितीही वाहने असली तरीही प्रत्येक परमिटधारकास रुपये २५००/- प्रतिवर्ष यापेक्षा जास्त व्यवसायकराचे दायित्व नाही.

सन २००१ -२००२ ते २००५-२००६ या कालावधीत चलतचित्र उद्योगातील स्वयंरोजगारीत व्यक्तीच्या संदर्भात १५७३६ इतक्या कसूर व्यक्ती, रॉयल वेस्टर्न टर्फ क्लबच्या

संदर्भात ३८१ कसूर व्यक्ती आणि मुंबई दुकाने व आस्थापना यातील ११,९५,४२२ इतक्या कसूर व्यक्तींची नोंदणी अनोंदीत राहिल्याची बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर विक्रीकर विभागाने सर्वेक्षण व वसुली केली आहे. त्यामुळे याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी असे निदेश समितीने दिले असता, यासंदर्भात माहिती देतांना विभागाकडून सांगितले गेले की, विभागाने राबविलेल्या विविध अभय योजना/प्रोत्साहन योजनांमध्ये अनेक आनोंदीत व्यक्ती नोंदीत झालेल्या आहेत. सिनेक्षेत्रातील स्वयंरोजगारीतील व्यक्तींबाबत सन २००२-०३ ते २००५-०६ या चार वर्षात आक्षेप काढल्याप्रमाणे् अशा व्यक्तींनी नाव नोंदणी दाखला न घेतल्याने एकूण १५,७३६ डिफॉल्टर्स आढळले असून २.६८ कोटी एवढी वसुली होऊ शकली नाही. त्याअनुषंगाने वर्ष २००६-०७ का कालावधीत व्यवसायकर कायद्याअंतर्गत सर्वेक्षण करुन व त्यानंतर आलेल्या सप्टेंबर २००७ ते नोव्हेंबर २००७ च्या अभय योजनेअंतर्गत एकूण ८१२ व्यक्तींना नावनोंदणी दाखला घेण्यात आला व त्याव्दारे १.०२ कोटी एवढे करदेयता वसूल केलेली आहे. अशाप्रकारे एकूण १५,७३६ डिफॉल्ट्र्सपैकी ३,२४८ डिफॉल्ट्र्स कमी केले आहेत.

विक्रीकर विभागाने दिनांक ०५/०९/२००८, ०९/०२/२००९ आणि ०१/१२/२००९ च्या पत्रानुसार आयकर विभागाकडून लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, गायक, कॅमेरामन इत्यादिची यादी मागविली होती परंतु आजतागायत अशी यादी मिळालेली नाही. तसेच व्यवसायकर सहआयुक्त, मुंबई यांनीही महालेखाकार कार्यालयाकडून सदर मागणी दिनांक ०८/०९/२०१० रोजीच्या पत्रानुसार केली होती. परंतु, अशी माहिती मिळालेली नाही. सदर माहिती मिळताच विभागातील सिनेक्षेत्रातील व्यक्तींची माहिती २३,७८७ डिफॉल्ट्र्स असलेल्या माहितीशी पडताळून पुढील नांवनोंदणी करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

असे असतांनाही विभागाने शक्य तेवढे प्रयत्न करुन उपरोक्त वर्षासाठी १.२ कोटी एवढा कर सिनेक्षेत्रातील व्यक्तींकडून वसूल केला आहे.

वर्ष २००१-०२ ते २००५-०६ या पाच वर्षाच्या कालावधीत महालेखाकार कार्यालयाने असे नमूद केले आहे की वार्षिक ३८१ डिफॉल्ट्र्स हे नावनोंदीत न केल्याने असून त्यामुळे ०.०६ कोटी कर वसुल करता आला नाही. RWITC कडून मिळविलेल्या माहितीनुसार २००७-०८ मध्ये एकूण ४९९ व्यक्ती नोंदीत केल्या ज्यामध्ये जॉकी, ट्रेनर्स,आणि बुकमेकर्स

आहेत. वर्ष २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीचा एकूण रुपये १०.०१ लक्ष एवढा कर वसूल झाला आहे.

महालेखापालांनी सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत एकूण २७,८८,१५९ परवानाधारक व्यक्ती कोणत्या आधारावर नमूद केलेल्या आहेत.याबाबत महालेखाकारांनी व विक्रीकर विभागाने समितीला माहिती द्यावी असे निदेश समितीने दिले असता, विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, महालेखापालांनी आक्षेपात नमूद केलेली २७,८८,१५९ परवानाधारकांची माहिती परिवहन आयुक्तांचे कार्यालयातून मिळविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे नमूद केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे :-

वर्ष	**परवान्यांची संख्या**		
	रिक्षा	**टॅक्सी**	**इतर वाहने**
३१/३/२००९ रोजी	४१२३७८	९३५६७	४०८९५३
२००१-०२	४२९६६३	९५३१५	४३४६७०
२००२-०३	४२०५७५	९४४६२	४४४३८९
२००३-०४	४६३५५१	१०२७५३	४६१७७०
२००४-०५	४८११७८	१०३४१४	४६१२०९
२००५-०६	४८६२१४	१०९१२२	४८१०५५
		५०५०६६	**२२८३०९३**

ऑटो रिक्षाला परवाना लागू नाही व ज्या वाहनांना परवाना लागू नाही त्यांच्याकडून व्यवसायकर देय होत नाही.

त्यामुळे वर्ष २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीमधील टॅक्सी व इतर वाहने यांच्या परवान्यांची संख्या एकत्रित केल्यास ती २७८८१५९ (५०५०६६+२२८३०९३) होते.

व्यवसायकर कायद्यांतर्गत नोंद क्र. १३ खाली वसूल करावयाच्या व्यवसायकराची प्रभावी वसूली व्हावी यासाठी वित्त विभागाने दिनांक ३.११.२००६ अन्वये नोंद क्र. १३ वाहतूक विभागास हस्तांतरीत केलेली आहे. वाहतूक विभाग परवाने देताना अथवा परवान्याचे नूतनीकरण करताना परवाना धारकाने व्यवसायकर कायद्याअंतर्गत नांव नोंदणी दाखला घेतल्याची योग्य पडताळणी करतात. या अंतर्गत आतापर्यंत शासनास किती महसूल प्राप्त झाला आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, उपपरिवहन

आयुक्त (अंमल २)यांच्या दिनांक २०.९.२०१२ च्या पत्रानुसार परिवहन खात्याकडून नोंद क्र.१३ अंतर्गत वसूल करण्यात आलेला व्यवसायकर खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	जमा झालेला व्यवसाय कर (रुपये कोटीत)
२००७-०८	५६.५६
२००८-०९	४८.७३
२००९-१०	३८.७९
२०१०-११	५८.५८
२०११-१२	८४.४१
एकूण ..	**२८७.०७**

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (RTO) परवानाधारकांना नोंदी करण्यासाठी विशेष मोहिम केंव्हापासून सुरु केली आहे. आतापर्यंत किती वाहन परवानाधारकांची नोंदणी करण्यात आली आहे त्यांच्याकडून एका वाहनासाठी व्यवसायकर आकारण्यात येतो की अनेक वाहने असल्यास सर्वांना मिळून रुपये २५००/- एवढाच व्यवसायकर आकारण्यात येत आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ६.१०.२०१० च्या निर्णयानुसार परिवहन विभागाकडून विशेष मोहिम वसुली (Special drive) माहे ऑक्टोबर, २०१० ते मार्च, २०११ या कालावधीत राबविण्यात आली. सदर मोहिमेत परिवहन विभागात एकूण ८५,५४२ परवानाधारकांची व्यवसायकर कायद्याअंतर्गत नांवनोंदणी केली असून त्यांच्याकडून व्यवसायकर रुपये ३३.०२ (कोटी), व्याज रु.६.६१ कोटी व शास्ती रुपये ४.४४ कोटी असे एकूण रुपये ४४.३२ कोटी वसूल करण्यात आले. व्यवसायकर अनुसूचीमधील नोंद क्र. १३ नुसार परवानाधारकास व्यवसायकर भरावा लागतो. सदर नोंदीमध्येच असे नमूद करण्यात आले आहे की, एका परवानाधारकाला देय होणारा कर रुपये २५००/- पेक्षा जास्त असता कामा नये.

भारतीय राज्यघटनेच्या कलम २७६(२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक व्यक्तीकडून गोळा केली जाणारी रक्कम रुपये २५००/- प्रतिवर्ष यापेक्षा जास्त असू शकत नाही.त्यामुळे परमिटधारकांकडे कितीही वाहने असली तरीही प्रत्येक परमिटधारकास रुपये २५००/- प्रतिवर्ष यापेक्षा जास्त व्यवसायकराचे दायित्व नाही.

व्यवसायकर कायद्याच्या परिशिष्ट १ च्या नोंद क्र. १३ खालील वाहन परवाना धारकांकडून व्यवसायकर वसूलीची जबाबदारी २००६ पासून परिवहन विभागाकडे देण्यात आलेली आहे. प्रत्येक परवाना धारकाने व्यवसायकर भरला किंवा नाही याची खातरजमा कशी करण्यात येते. यासाठी विभागाने संगणकावर आज्ञावली विकसित केली आहे काय याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, परिवहन आयुक्तांचे परिपत्रक/आदेश दि. १४/३/२००७ व दिनांक २२/५/२००७ नुसार परवानाधारक ज्यावेळी परिवहन कार्यालयात कामकाजासाठी/नूतनीकरणासाठी येतात त्यावेळी व्यवसायकर भरला आहे का याची खातरजमा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. वाहनांची नोंदणी/नवीन योग्यता प्रमाणपत्र देताना, योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करताना, नविन परवाना देताना व परवाना नूतनीकरण करताना व्यवसायकर भरल्याचा पुरावा तपासण्याच्या सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत व संबंधित व्यवसायकराची वसूली करण्यात येत आहे. परिवहन विभागास संगणकीकरण करण्याचे दिनांक २३/०८/२०१२ रोजी मा. मुख्यमंत्र्यांसमवेत ठरले आहे.

महालेखाकारांनी व्यवसायकराची नोंद कोणत्या आधारावर केलेली आहे. विक्रीकर विभागाने यासाठी विशेष यंत्रणा राबविणे आवश्यक आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, व्यवसायकराची वसुली प्रभावीपणे व सोयिस्कर व्हावी यादृष्टीने वाहन परवाना धारकांकडून व्यवसायकराचे वसुलीचे काम परिवहन विभागाकडे नोव्हेंबर, २००६ पासून देण्यात आलेले आहे. त्याच धर्तीवर मुंबई दुकाने व आस्थापना कायद्यान्वये परवानाधारकांकडून वसुलीचे काम मुंबई विभागात मुंबई महापालिकेकडे व इतर ठिकाणी कामगार आयुक्तांकडे देण्याचे विभागाने शासनास प्रस्तावित केले होते. परंतु सदर काम करण्यास मनुष्यबळाची उपलब्धता नसल्यामुळे ते काम करण्यास महानगरपालिकेने असमर्थता नुकतीच दर्शविली आहे. त्यानुसार या कामासाठी विक्रीकर विभागातर्फे विशेष मोहीम हाती घेण्यात येईल. करदात्यांची प्रचंड संख्या पाहता प्रत्येक करदात्यास भेट देणे सद्य:परिस्थितीत शक्य नाही. त्यामुळे ज्यांचे ईमेल आयडी, मोबाईल उपलब्ध होऊ शकतात त्यांना इमेलद्वारे / एस.एम.एस द्वारे नांव नोंदणी घेण्यास आवाहन करण्यात येत आहे. जेथे ईमेल आयडी, मोबाईल उपलब्ध नाही त्यांना पत्रे पाठविण्यात येतील.

आतापर्यंत डॉक्टर्स (एम.बी.बी.एस) ४४३२०, डॉक्टर्स (बी.एच.एम.एस) ३९८१०, ॲडव्होकेट -९०००, क्रेडीट कार्ड धारक -१९५९७४. कारमालक सुमारे २००००० मुल्यवर्धित कायद्याखालील नोंदीत व्यापारी ५५००००. यांना ईमेल / एस.एम.एस. पाठविण्यात आलेले आहेत.

नुकतीच मुंबई महानगरपालिकेतील दुकाने आस्थापना परवानाधारकांची अद्ययावत प्रभागनिहाय यादी मागविण्यात आली. त्यांत एकूण ६२७३३० नोंदी आढळून आल्या. त्यापैकी ४८३४३९ इतक्या व्यक्ती असून सदर यादी विक्रीकर विभागाकडे असलेल्या यादीच्या नावांवरुन जुळविण्याचा प्रयत्न केला. परंतु पॅन सारखे सामायिक क्रमांक दोन्ही याद्यांमध्ये उपलब्ध नसल्याने फारच कमी व्यक्तींची जुळवणी झाली. उर्वरित सर्वांना या वित्तीय वर्षात पत्रे पाठवून व्यवसायकराच्या नोंदणीबाबत विचारणा करण्यात येईल. त्यांचेकडून वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या फॉर्मद्वारे माहिती मागविण्यात येईल व ज्यांचे व्यवसायकराचे नांव नोंदणी दाखले नाहीत त्यांचा पुढे पाठपुरावा केला जाईल व व्यवसायकराची वसूली केली जाईल.

व्यवसायकराद्वारे पहिल्या अभय योजनेपूर्वी शासनास किती येणे बाकी होते, अभय योजना सुरु केल्यानंतर शासनास किती महसूल प्राप्त झाला आहे. त्याचप्रमांणे दुसऱ्या अभय योजनेबाबतची माहिती देताना विभागाकडून अशी माहिती देण्यात आली की, व्यवसायकराद्वारे पहिल्या अभय योजनेपूर्वी शासनास रु. १०४९.०३ कोटी एवढे येणे बाकी होते. अभय योजना २००७ साली सुरु केल्यानंतर शासनास रु. २१.०७ कोटी महसूल प्राप्त झाला. अभय योजना २००९ फक्त मोटार वाहन परवानाधाराकांकडील थकीत व्यवसायकराच्या वसूलीसाठी होती. सदर योजना १ जुलै २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधीसाठी होती. अटी : १ एप्रिल २००२ ते २१ मार्च २००७ पर्यंतच्या कालावधीचा मूळ व्यवसायकर भरणे आवश्यक आहे. २) १-०४-२००२ ते १-०३-२००७ पर्यंतच्या कालावधीच्या देय करावरील व्याज, दंडाच्या १० टक्के रकमेचा भरणा करणे आवश्यक आहे. या कालावधीमधील जमा झालेला महसूल रु. ६.६८ आहे.

विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर), ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर यांचेकडून मागविलेली माहिती अद्याप प्राप्त न होण्याची करणमिमांसा समितीने विचारली असता, विक्रीकर विभागात सन २००७ व सन २०११ या वर्षात पुनर्रचना झाली असल्यामुळे माहिती वेळेत प्राप्त

झाली नव्हती. तसेच मोटर वाहन परवानाधारकांकडील वसूलीचे काम परिवहन विभागाकडे दिल्यामुळे शास्ती वसूलीबाबतची माहिती वेळेत उपलब्ध होऊ शकत नव्हती. परंतु आता नमूद केलेल्या ठाणे/पुणे/नाशिक/कोल्हापूर या विभागांकडून माहिती प्राप्त असल्याचा असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अभिप्राय व शिफारशी

व्यवसाय करात प्रामुख्याने दोन भाग आहेत. पीटीआरसी म्हणजे रजिस्टर्ड असणाऱ्या संस्था त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून कर गोळा करुन विभागाकडे ही रक्कम जमा करतात. पीटीईसी म्हणजे स्वयंरोजगार करणारे डॉक्टर, वकील इ. व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडून व्यवसाय कर गोळा केला जातो.

सन २०११-१२ करिता व्यवसाय कराच्या माध्यमातून १८०० कोटी रुपये गोळा झाले आहेत. या कराची विभागणी दोन प्रकारात करण्यात येते. साधारणपणे ८० टक्के कर पीटीआरसी आहे व २० टक्के कर पीटीईसी आहे. विभागाला प्रत्येक व्यक्तिची माहिती मिळाल्यानंतर ही रक्कम बऱ्याच प्रमाणात वाढणार आहे.

महालेखाकारांनी मुद्दा उपस्थित केल्यानंतर रक्कम वसूल करण्यात आली आहे. ही बाब गंभीर असून याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. विभागाकडे मनुष्यबळ कमी असले तरी आता संगणकीकरण झालेले आहे. बाजारामध्ये व्यावसायिक स्वरुपाच्या खाजगी कंपन्या वेगवेगळ्या प्रकारचे सर्वेक्षण करीत असतात. त्यांच्याकडून विभागाने डाटा गोळा करून घेतला तर निश्चितच फायदा होईल. सुरूवातीला एकदाच पैसे द्यावे लागतील पण त्यानंतर मात्र, कायम स्वरुपी निधी मिळत जाईल. जेथे रोज लाखो रूपये जमा होत आहेत, तेथे अजून ॲप्रोच झालेलो नाही. विभागाला ५०० कोटी रूपये मिळणार असतील तर एखाद्या व्यावसायिक खाजगी कंपनीकडून डाटा घेण्यासाठी ५-१० कोटी रूपये खर्च केले तरी चालतील. विभागाने यासाठी प्रथम इतर स्तोत्रांचा विचार करावा किंवा **खाजगी कंपन्या वेगवेगळ्या प्रकारचा सर्व्हे करीत असतात त्यांना सहभागी करून घेण्यात यावे. यासाठी एक-दोन वर्षामध्ये निविदा काढून विभागाने कार्यवाही करावी. खाजगी कंपनींकडून विभागाने सर्व माहिती गोळा करून शासनाचे व्यवसाय कराचे उत्पन्न वाढविण्यासाठी तातडीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

शासकीय आस्थापनांमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत त्यांच्याकडून थेट व्यवसाय कर गोळा केला जातो. मात्र, जे मोठे उद्योग आहेत त्यांच्याकडून व्यवसाय कर वसूल केला जात नाही. महानगरपालिका, नगरपालिका यांच्याकडून शहरी भागामध्ये शॉप्स अँड एस्टाब्लिशमेंटचे परवाने दिले जाते. त्यांच्याकडून माहिती गोळा करुन त्याआधारे लघु, मध्यम व मोठ्या उद्योग व्यवसायकाकडून व्यवसायकर वसूल करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

विक्री कराच्या माध्यमातून राज्याला ४० ते ५० हजार कोटी रुपये महसूल प्राप्त होतो. अनेकदा विक्रेते ग्राहकांना सांगतात की, वस्तुची खरेदी केल्यानंतर पावती हवी असल्यास ११५ रुपये द्यावे लागतील व पावती न घेतल्यास ११० रुपये द्यावे लागतील. पावती न घेतल्यास रक्कम कमी द्यावी लागत असल्यामुळे ग्राहक पावती घेण्याचा विचार करीत नाहीत. मात्र यामुळे राज्य शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत आहे. या गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून विक्रेत्यांवर लक्ष ठेवणे, कॅश टॅली करणे, पावत्यांचे क्रमांक तपासणे इत्यादी गोष्टी विक्री कर विभागाच्या माध्यमातून करण्याची आवश्यकता आहे. मात्र या करिता सध्या आवश्यक त्या प्रमाणात विभागाचे नियंत्रण नाही, लक्ष नाही याकरिता विभागाकडून कोणतेही प्रपोजल तयार केले जात नाही किंवा सर्व्हे केला जात नाही. खरे तर या संदर्भात विभागाने योग्य कारवाई केल्यास राज्य शासनाचा आणखी १० ते २० हजार कोटी रुपयांचा महसूल सहजपणे वाढू शकतो. शासनाला कर न भरणाऱ्या एखाद्या विक्रेत्यावर १०-२० हजार रुपयांचा दंड आकारल्यास इतर **व्यावसायिकांवर वचक निर्माण करुन राज्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी विक्रेत्यांनी वस्तु विक्री करताना कर निर्धारीत पावती न दिल्याचे निदर्शनास आल्यास त्यास दंड आकारण्याची तरतूद नियमात करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने व्हॅटच्या संदर्भात एक निर्णय दिला होता. तथापि अद्याप उत्तर प्राप्त झाले नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने अशी सूचना केलेली आहे की, दिनांक ३१ ऑक्टोबरपर्यंत कर न भरल्यास येणाऱ्या व्याज व शास्तीच्या रकमेकरिता स्थगिती दिलेली आहे. **यापूर्वी उच्च न्यायालयाने असे आदेश दिले होते की, विक्रेत्यांनी रिटर्न्स भरण्याची आवश्यकता नव्हती याबाबतचा तपशिल विभागाने समितीला आश्वासित केल्याप्रमाणे तीन महिन्याच्या आत देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

सन २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीत चलतचित्र उद्योगातील स्वयंरोजगारीत व्यक्तीच्या संदर्भात १५७३६ इतक्या कसूर व्यक्ती, रॉयल वेस्टर्न टर्फ क्लबच्या संदर्भात ३८१ कसूर व्यक्ती आणि मुंबई दुकाने व आस्थापना यातील ११,९५,४२२ इतक्या कसूर **व्यक्तींची नोंदणी अनोंदीत राहिल्याची बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर विक्रीकर विभागाने सर्वेक्षण व वसुली केली आहे. यावरुन असे दिसून येते की, विक्रीकर विभाग शासनाचा करोडो रुपयाचा महसूल त्यांच्या अकार्यक्षमपणामुळे वसुल करीत नव्हते. हा एक प्रकारे महसूल बुडविण्याचाच प्रकार झाला. त्यामुळे शासनाचा महसूल बुडविण्यास जे अधिकारी जबाबदार आहे त्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे.**

सन २००२-०३ ते २००५-०६ या चार वर्षात आक्षेप काढल्याप्रमाणे् अशा व्यक्तींनी नाव नोंदणी दाखला न घेतल्याने एकूण १५,७३६ डिफॉल्टर्स आढळले असून २.६८ कोटी एवढी वसुली होऊ शकली नाही. त्याअनुषंगाने वर्ष २००६-०७ का कालावधीत व्यवसायकर कायद्याअंतर्गत सर्वेक्षण करुन व त्यानंतर आलेल्या सप्टेंबर २००७ ते नोव्हेंबर २००७ च्या अभय योजनेअंतर्गत एकूण ८१२ व्यक्तींना नावनोंदणी दाखला घेण्यात आला व त्याव्दारे १.०२ कोटी एवढे करदेयता वसूल केलेली आहे. अशाप्रकारे एकूण १५,७३६ डिफॉल्ट्र्सपैकी ३,२४८ डिफॉल्ट्र्स कमी केले आहेत.

विक्रीकर विभागाने दिनांक ०५/०९/२००८, ०९/०२/२००९ आणि ०१/१२/२००९ च्या पत्रानुसार आयकर विभागास लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, गायक, कॅमेरामन इत्यादीची यादी मागविली होती परंतु आजतागायत अशी यादी मिळालेली नाही. तसेच व्यवसायकर सहआयुक्त, मुंबई यांनीही महालेखाकार कार्यालयाकडून सदर मागणी दिनांक ०८/०९/२०१०च्या पत्रानुसार केली होती परंतु अशी माहिती मिळालेली नाही. **सदर माहिती महालेखाकार कार्यालयाकडून तातडीने उपलब्ध करुन सिनेक्षेत्रातील व्यक्तींची माहिती २३,७८७ डिफॉल्ट्र्स असलेल्या माहितीशी पडताळून पुढील नांवनोंदणी करण्याची कार्यवाही करण्यात यावी व सिनेक्षेत्रातील व्यक्तींकडे प्रलंबित असलेल्या व्यवसायकराची वसूली लवकरात लवकर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७६(२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक व्यक्तीकडून व्यवसाय कर महसूल गोळा केली जाणारी रक्कम रुपये २५००/- प्रतिवर्ष यापेक्षा जास्त असू

शकत नाही.त्यामुळे परमिटधारकांकडे कितीही वाहने असली तरीही प्रत्येक परमिटधारकास रुपये २५००/- प्रतिवर्ष यापेक्षा जास्त व्यवसायकराचे दायित्व नाही.

व्यवसायकर कायद्याच्या परिशिष्ट १ च्या नोंद क्र. १३ खालील वाहन परवाना धारकांकडून व्यवसायकर वसूलीची जबाबदारी २००६ पासून परिवहन विभागाकडे देण्यात आलेली आहे. परिवहन आयुक्तांचे परिपत्रक/आदेश दि. १४/३/२००७ व दिनांक २२/५/२००७ नुसार परवानाधारक ज्यावेळी परिवहन कार्यालयात कामकाजासाठी/नूतनीकरणासाठी येतात त्यावेळी व्यवसायकर भरला आहे का याची खातरजमा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

वाहनांची नोंदणी/नवीन योग्यता प्रमाणपत्र देताना, योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करताना, नविन परवाना देताना व परवाना नूतनीकरण करताना व्यवसायकर भरल्याचा पुरावा तपासण्याच्या सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत व त्यानुसार संबंधित व्यवसायकराची वसूली किती टक्के झाली आहे व किती टक्के बाकी आहे. याची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

व्यवसाय कर वसूलीसाठी विक्रीकर विभागातर्फे विशेष मोहीम हाती घेण्यात येत असून करदात्यांची प्रचंड संख्या पाहता प्रत्येक करदात्यास भेट देणे शक्य नाही. **त्यामुळे ज्यांचे इमेल आयडी, मोबाईल उपलब्ध होऊ शकतात त्यांना ईमेलद्वारे / एस.एम.एस द्वारे नांव नोंदणी घेण्यास आवाहन करण्यात यावे. जेथे ईमेल आयडी, मोबाईल उपलब्ध नाही त्यांना पत्र पाठविण्यात यावे या मोहिमेनुसार शासनास किती महसूल प्राप्त झाला याची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

महसूल व वन (महसूल) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००६-०७ च्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ५.५ "केबल चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे" यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहे.

केबल चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम १९२३, मधील तरतूदींनुसार १ मे, २००० पासून महापालिका क्षेत्र, अ आणि ब वर्ग पालिका क्षेत्र किंवा इतर प्रभागात केबलधारकाने प्रत्येक दूरचित्रवाणी संचाकरिता प्रतिमाह सरसकट रु.३० किंवा रु.२० किंवा रु.१० या दराने करमणूक शुल्क प्रदान करावयाचे आहे. तसेच, देय असलेले करमणूक शुल्क पुढील महिन्याच्या १० तारखेला किंवा त्यापूर्वी प्रदान करावयाचे आहे. यात कसूर केल्यास पहिल्या ३० दिवसांकरिता प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर २४ टक्के दराने व्याज आकारणीय आहे.

सहा जिल्ह्यांतील १२ घटकांच्या डिसेंबर २००३ ते ऑगस्ट २००५ दरम्यान केलेल्या चाचणी तपासणीत २००२-०३ ते २००४-०५ मधील विविध कालावधीकरिता २५१ केबल धारकांनी करमणूक कराच्या रु. ४१.५१ लाख रकमेचे प्रदान केले नव्हते. निवासी उपजिल्हाधिकारी/तालुका दंडाधिकाऱ्यांनी केबलधारकांकडे त्याची मागणी केली नव्हती. परिणामी रु. ४१.५१ लाख करमणूक कर वसूल झाला नाही. याशिवाय, विहीत दराने व्याज आकारणीय होते.

ही प्रकरणे आणून दिल्यानंतर, विभागाने जानेवारी २००४ ते जुलै २००७ मध्ये १३१ केबलधारकांकडून रु. २६,००० व्याजासह रु. २१.१० लाख करमणूक कराची रक्कम वसूल केली. उर्वरित रकमेच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (ऑक्टोबर २००७)

ही बाब शासनास एप्रिल आणि मे २००७ मध्ये कळविण्यांत आली त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही. (ऑक्टोबर २००७)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

मुंबई शहर

मुंबई शहर मधील स्थानिक लेखा परीक्षा अहवाल क्र. १५०२७/२ व १५४२१/१ द्वारे रु. १२,५२,१८०/- इतक्या रक्कमेच्या वसूलीसंदर्भात आक्षेप प्राप्त झाला यापैकी रु. १०,९७,२७०/- इतकी रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असलेल्या केबल जोडण्यांच्या संख्येनुसार वसूल झाली आहे. उर्वरीत १,५४,८१०/- इतकी रक्कम देय नसल्याबाबत दिनांक १६ एप्रिल, २००८ च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास कळविण्यात आले आहे.

मुंबई उपनगर

मुंबई उपनगर जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १५१०८/२ व १५३८४/१ या द्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम रु. ३,१५,२४०/- वसूल करण्यात आली असून याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक ११ ऑगस्ट, २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. यासंदर्भात महालेखापाल कार्यालयाकडून त्यांच्या दिनांक ८ एप्रिल, २००९ च्या पत्रान्वये लेखापरीक्षा अहवाल क्र. १५३८४/१ वगळण्यात आल्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास सूचित करण्यात आले आहे.

ठाणे

ठाणे जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १५२९६/१ (अ) याद्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम रु. २,६९,६४०/- दर्शविण्यात आली होती. तथापि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध अभिलेखांनुसार केबल जोडण्यांचे परीक्षेत्र ग्रामीण ऐवजी शहरी असल्याने अधिनियमातील तरतूदीनुसार रु. २०/- प्रतीजोडणी या दराने करमणूक शुल्क आकारुन अनुज्ञेय २,८०,७२१/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे व याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक ०९ एप्रिल, २००७ व दिनांक २५ एप्रिल, २००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

जळगांव

जळगांव जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १५१६४/१ याद्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम रु. १५,७१,१७०/- दर्शविण्यात आली होती. सदर संपूर्ण रक्कम टप्या टप्याने दिनांक १८ सप्टेंबर, २०१२ पर्यंत वसूल करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद

औरंगाबाद जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १४४७०/१ याद्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम रु. ४,८५,१६०/- दर्शविण्यात आली होती. सदर संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आलेली

आहे व या संदर्भात महालेखापाल कार्यालयास दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अकोला

अकोला जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १५३४६/१ याद्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम रुस. १,८९,०४०/- दर्शविण्यात आली होती. यापैकी रु. ५४,८८०/- वसूल करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रु. १,३४,१६०/- पैकी रु. ५३,१६०/- बाबत केबल आयोजिक श्री.जिरापुरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवेदन दाखल केले असून सदर निवेदन रद्द करुन वसूलीची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु आहे. उर्वरित रक्कम रु. ६६,०००/- व रु. १५,०००/- देय असलेले श्री.निधाने व श्री.घुमरे हे केबल ऑपरेटर बेपत्ता असून त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता नसल्याने वसूली करणे जिल्हाधिकारी कार्यालयास शक्य झाले नाही. सदर रक्कम निर्लेखित करणेबाबत शासन मान्यतेने प्रस्ताव महालेखापाल यांचे कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

पुणे

पुणे जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १५२३७/१ (अे), १५२४०/१, १४७२१/१ (बी), १५२४८/१ याद्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम रु. ६,५३,४८०/- दर्शविण्यात आली होती. यापैकी ६,३१,८८०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित रक्कम रु. २१,६००/- श्री.ॲन्थोनी या केबल आयोजकाकडे दर्शविण्यात आली आहे. सदर केबल ऑपरेटरचा केबल व्यवसाय सन २००७ पासून बंद आहे. सदर व्यक्ती २००७ मध्ये मृत झाली असून त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता नसल्याने वसूली करणे जिल्हाधिकारी कार्यालयास शक्य झाले नाही. यासंदर्भात सदर रक्कम निर्लेखित करणेबाबत शासन मान्यतेने प्रस्ताव महालेखापाल यांचे कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

सन २००६-०७ च्या महसूली जमा लेखापरीक्षा अहवालामध्ये नमूद एकुण रु. ४१.५१ लाख आक्षेपित रकमेपैकी रु. २१.१० लाख यापूर्वीच वसुल झाले होते. उर्वरित अनुज्ञेय रु. २०,४१,०००/- इतक्या रकमेची वसुली करणे बाकी आहे. असे परिच्छेदामध्ये दर्शविले आहे. या अन्वये उपरोक्त स्पष्टीकरणात दर्शविल्यानुसार उर्वरित रकमेसह रु. ४४,३२,४८१/- इतकी संपूर्ण रक्कम वसूल झाली आहे.

साक्ष :-

समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ व १७ ऑक्टोबर २०१२ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव महसूल विभाग यांची परिच्छेद क्र. ५.५ "केबल चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे" यासंदर्भात साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, जळगाव, औरंगाबाद,अकोला व पुणे केबल ऑपरेटर कडून करमणूक कर व दंडनीय व्याजाबाबत वसूली करण्यात आलेली नाही.

सात जिल्ह्यातील १२ घटकांच्या डिसेंबर २००३ ते ऑगस्ट २००५ दरम्यान केलेल्या चाचणी तपासणीत २००२-२००३ ते २००४-२००५ मधील विविध कालावधीकरीता २५१ केबल चालकांकडून करमणूक करापोटी ४१.५१ लाखाची मागणी निवासी उप जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी केलेलीच नाही. करमणूक कराची मागणीच केली नाही याचा अर्थ कर चुकविणाऱ्या केबल ऑपरेटर्सना त्यांनी मदत केली आहे. अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली, तसेच स्पेसिफिक मुद्दा म्हणजे ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यात सन २००६-०७ मध्ये जो केबल चालकांचा सर्व्हे झाला त्यानुसार एकूण किती केबल ऑपरेटर्स रेकॉर्डवर होते, त्यांनी दिलेले केबल कनेक्शन्स किती होते, किती जोडण्या अनधिकृत आढळून आल्या व त्यांच्याकडून येणारी वसुली किती झाली ? सन २००६-०७ मध्ये जो सर्व्हे झाला त्याच्या उत्तरावरुन केबलची चोरी लक्षात येईल. अशी चोरी पकडण्यासाठी एखादा धडक कार्यक्रम राबविला आहे काय, पूर्वी मोठ्या प्रमाणावर केबलची चोरी होत होती व त्याची आकडेवारी किती आहे, अशा परिस्थितीत किती केबल चोरी करणाऱ्यांचे परवाने विभागाने रद्द केले किंवा तशी शिफारस तरी केली आहे काय तसेच केबल ऑपरेटरकडून वसूल न झालेल्या करमणूक कर व दंडनीय व्याजाची व्याप्ती किती आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू परिच्छेदामध्ये असा आक्षेप घेण्यात आला होता की, ७ जिल्ह्यांमध्ये २५१ केबल धारकांकडून ४१ लाख ५१ हजार रुपयांची रिकव्हरी झाली नव्हती. परंतु आता या सर्व केबल धारकांकडून ४४,३२,४८१ रुपयांची वसूली करण्यात आलेली आहे. त्यामध्ये मुद्दल आणि व्याजाची रक्कम देखील आहे. तसेच वसईमध्ये मिस-क्लासिफीकेशन झाले होते. कारण त्याठिकाणी ग्रामीण भागाचा दर लावण्यात आला होता. परंतु ही चूक लक्षात आल्यानंतर त्यामध्ये दुरुस्ती करुन तेथील वसूली करण्यात आली आहे. या विषयाची व्याप्ती देखील लक्षात घेतली पाहिजे. आपल्या राज्यामध्ये केबल ऑपरेटरची संख्या १३,२८३

इतकी असून सध्या सुमारे २५,७१,००० ठिकाणी केबल जोडणी करण्यात आलेली आहे. मात्र आता नवीन बदल दिसून येत आहे आणि तो म्हणजे सध्या राज्यातील लोकांचा डी.टी.एच.कडे जास्त कल आहे आणि त्यामुळे सदरहू पध्दत वापरणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. सध्या ३२,३४,६१० इतकी डी.टी.एच.कनेक्शन्स आहेत.

करमणूक कर अधिकारी ठाणे जिल्हा यांनी सन २००६-०७ मध्ये वसई तालुक्यात जो सर्व्हे झाला होता त्यासंबंधीची माहिती देताना समितीस सांगितले की, ठाणे जिल्ह्यातील वसईमध्ये सन २००६-०७ मध्ये सर्व्हे झाला तेव्हा एकूण ९७ केबल आयोजक होते व सर्व्हेक्षणापूर्वी ४४९४३ एवढ्या जोडण्या होत्या. प्रत्यक्ष सर्व्हेक्षण झाल्यानंतर यामध्ये वाढ होऊन जोडण्याची संख्या ११३४८ एवढी वाढून ५६२९१ एवढी झाली. या सर्वांना नोटीसेस देण्यात आल्या व त्यांच्याकडून ६७,७२,८०० रुपये दंडनीय आदेश पारित करुन वसुली करण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी फक्त ५,६२,८०० रुपये एवढी वसुली झाली व काही लोकांनी सदर आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडे मा.आयुक्तांकंडे अपिल दाखल केले होते. त्या काही अपिलांची सुनावणी चालू आहे. अशा प्रकारे एकूण जोडण्यांची संख्या जी आहे त्याच्या तुलनेत सुमारे २५ टक्के अनधिकृत जोडण्या आढळल्या. या लोकांकडून थकबाकीची वसुली करण्यासाठी त्यांना दंडाच्या नोटिसेस देण्यात आल्या आहेत.

सन २००६-०७ नंतरच्या वर्षातील करमणूक कराच्या थकबाकीची रक्कम किती आहे अशी विचारणा समितीने केली असता याबाबतची वर्षनिहाय माहिती विभागीय प्रतिनिधींकडे उपलब्ध नसल्यामुळे समितीस माहिती प्राप्त झाली नाही.

करमणूक कराच्या थकबाकी व वसुलीसंबंधीचा मुद्दा असतानाही विभागीय प्रतिनिधींनी माहिती आणली नाही याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता करमणूक अधिकारी ठाणे जिल्हा यांनी समितीस सांगितले की, सन २००६ ठाणे जिल्ह्यात जेव्हा घरोघरी जाऊन सर्व्हे करण्यात आला तेव्हा महसूल विभागाकडे पुरेसे लोक नसल्यामुळे नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवक दलातील सुशिक्षीत बेरोजगारांची मदत घेऊन हा सर्व्हे करण्यात आला. पण ज्या केबल ऑपरेटर्सनी अपिल दाखल केले त्यापैकी काहींनी मुद्दा उपस्थित केला की, "सर्व्हे करण्यासाठी जे मनुष्यबळ वापरण्यात आले ते शासनाचे कर्मचारी नसल्याने त्यांनी दिलेली माहिती अधिकृत धरता येणार नाही." त्यामुळे विभागाने समितीला विनंती केली की, अशा

प्रकारची दुरुस्ती देखील या कायद्यात करणे आवश्यक आहे, त्यामुळे भविष्यात अशी अडचण निर्माण होणार नाही.

२५१ केबल धारकांनी करमणूक कराच्या रु. ४१.५१ लाख रकमेचे प्रदान केले नव्हते. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी / तालुका दंडाधिकाऱ्याची केबल धारकांकडे त्याची मागणी का केली नव्हती. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

मुंबई शहर

"सन २००४ च्या एप्रिल महिन्यात लोकसभा निवडणूक तसेच ऑक्टोबर २००४ मध्ये विधानसभा निवडणूक असल्याने करमणूक शुल्क अधिकारी व इतर कर्मचाऱ्यास निवडणूक प्रक्रियाकरीता नियुक्त करण्यात आले होते. यानंतर दि. १६ जून २००५ ते ०७ जुलै २००५ या कालावधीत नायगांव विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्र केबल जोडण्यांचे सर्वेक्षणाकरीता अधिकारी व कर्मचारी वृंद उपलब्ध करुन देण्यात आला तसेच सर्वेक्षणानुसार मुंबई शहर जिल्ह्यातील १६ विधानसभा मतदार संघात जून २००६ ते डिसेंबर २००६ या कालावधीत केबल सर्वेक्षणाची विशेष मोहिम हाती घेण्यात आली. उपरोक्त नमुद विवेचनानुसार या जिल्ह्याचा बहुतांश कर्मचारी वर्ग एप्रिल २००४ ते डिसेंबर २००६ या कालावधीत व्यस्त असल्याने कार्यालयाचे दैनंदिन काम करण्यास कमी कालावधी मिळत होता. त्यामुळे लेखा अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयातील क्षेत्र क्र. ७ मधील १३० केबल चालकांपैकी ४५ केबल चालक व क्षेत्र क्र. ८ मधील १५२ केबल चालकांपैकी ८ केबल चालकांकडून करमणूक वसुल करणे शक्य झाले नाही.

मुंबई उपनगर

शासनाने दिनांक १२ मे १९९८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार राज्य शासनाने केबल संदर्भात सुचना निर्गमित केल्या आहेत. यानुसार प्रत्येक केबल आयोजकाने प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत अनुज्ञेय करमणूक शुल्क भरणा करणे गरजेचे आहे. सन २००३-०४ ते २००४-०५ या कालावधीत या परिक्षेत्रात अनुक्रमे १४९५ व १५५२ इतकी केबल आयोजकांची संख्या होती. यापैकी लेखा परिच्छेदात नमूद अनुक्रमे ५ व २२ आयोजकांशिवाय इतर केबल आयोजकांनी शासनास नियमित करमणूक शुल्काचा भरणा केला आहे. याशिवाय सन २००४ च्या एप्रिल महिन्यात लोकसभा निवडणूक तसेच ऑक्टोबर २००४ मध्ये विधानसभा निवडणूक असल्याने करमणूक शुल्क अधिकारी व इतर कर्मचाऱ्यास निवडणूक प्रक्रियांकरीता नियुक्त

करण्यात आले होते. त्यामुळे सर्व कर्मचारी व अधिकारी वर्गास करमणूक शुल्क वसुलीकरीता पुरेसा वेळ देणे शक्य झाले नाही. तथापि स्थानिक लेखा परिच्छेद क्र. १५१०८/२ मधील आक्षेपित रक्कम रु. ४३,८००/- वसुल करण्यात आली आहे. तसेच स्थानिक लेखा परिच्छेद क्र. १५३८४/१ मधील आक्षेपित रक्कम रु. १,०८,५५०/- या रकमेची संपूर्ण वसुली करण्यात आली आहे.

ठाणे

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम १९२३ चे कलम ३(४) नुसार प्रत्येक दुरदर्शन संचावर केबल दूरचित्रवाणी प्रसारणाकरीता विहित करमणूक शुल्काची रक्कम भरणे आवश्यक असून कलम ४ (२) (ब) नुसार दिलेल्या परवानगी अन्वये कॅलेन्डर महिन्यांच्या १० तारखेच्या आत करमणू शुल्क भरणा करणे आवश्यक आहे. उपस्थित लेखा परिच्छेद वसई तालुक्याशी संबंधित असून आक्षेपित रक्कम रु. २,६९,६४०/- इतकी आहे. सदर रक्कम संपूर्ण वसुल झाली असल्याने तहसिलदार वसई यांनी ०९/१०/२००६ च्या महालेखापाल, मुंबई कार्यालयास सूचित केले आहे.

पुणे

या जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत थकबाकीदारांना वेळोवेळी नोटीस देण्यात आली आहे.

जळगाव

जिल्हा स्तरावर करमणूक कर वसुलीबाबत मासिक आढावा घेण्यात येतो. केबल आयोजकांनी नियमित वेळेनुसार दरमहा १० तारखेपर्यंत करमणूक शुल्क भरणा न केल्यास थकबाकी वसुलीबाबत संबंधित निरीक्षकांना सक्त सूचना देण्यात येतात. या कार्यालयाकडे करमणूक शुल्क वसुली करीता पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. तथापि केबलबाबत वसुलीकरीता केबल चालकांकडे मागणी करुन वसुली करण्यात आली आहे.

अकोला

लेखा परिच्छेद क्र. १५३४६ मध्ये ६ केबल ऑपरेटर कडून १,८९,०४०/- इतक्या रकमेच्या वसुलीसाठी आक्षेप नोंदविण्यात आला होता. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी अकोला यांनी आपल्या दिनांक १७/११/२००५ च्या पत्रान्वये तहसिलदार, अकोला यांना सूचित केले तसेच संबंधित केबल ऑपरेटर यांना दि. २५/०२/२००८ च्या पत्रान्वये थकबाकीबाबत

सूचित केले. यामुळे या रकमेपैकी रु. ५४,८८०/- इतकी रक्कम जमा झाली. उर्वरित रक्कम रु. १,३४,१६०/- व्याजासह भरणेबाबत निवासी उपजिल्हाधिकारी व तालुका दंडाधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

औरंगाबाद

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केबल आयोजकांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारावर दरमहा अनुज्ञेय करमणूक शुल्काची वसुली केली जाते. तथापि या केबल आयोजकांना प्रत्येक महिन्यात याबाबत नोटिस देण्यात येत नाही. तथापि करमणूक निरीक्षकांद्वारे वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात येतो. केबल ऑपरेटर थकबाकीत गेल्यानंतर त्यांना मागणी नोटीस देणे यानंतरही रक्कम वसुल न झाल्यास अधिनियमातील कलम ९ प्रमाणे जमीन महसूलाची थकबाकी म्हणून रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात येते. अशा पध्दतीची कार्यवाही विचाराधीन केबल आयोजकांकडून करण्यात आली आहे.

समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, विभागीय सचिवांनी सांगितलेली आकडेवारी बोगस आहे. कारण केबल ऑपरेटर प्रचंड पैसे कमावतात, त्यांची लॉबी आहे आणि त्याबाबत शासन काहीही करीत नाही तसेच याबाबतीत सर्व्हे करण्यासाठी शासकीय यंत्रणा देखील आहे. परंतु कोणतीही कार्यवाही होत नाही. अशी स्थिती आहे.

सदरहू आकडेवारी कोणत्या माध्यमातून काढण्यात आली आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू माहिती ही मुख्य कंपनी ऑपरेटरकडून घेतलेली आहे. तसेच केंद्र शासनाच्या नोटीफीकेशन नुसार ४ टप्प्यांमध्ये याचे कॅस मध्ये रुपांतर करावयाचे आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये ३१ ऑक्टोबर २०१२ पर्यंत कॅस करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे संपूर्ण राज्यामध्ये ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत डी.टी.एच.पध्दत सुरु करण्याबाबत केंद्र शासनाने बंधनकारक केले आहे.तसेच हा जो बदल होत आहे, त्यामुळे सध्या एकंदर डी.टी.एच.धारकांची संख्या किती आहे आणि त्यांच्याकडून करमणूक कराची वेळच्यावेळी वसुली होत आहे की नाही याबाबत संनियंत्रण करणे जास्त सोयीचे होणार आहे. आजच्या घडीला सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये टी.व्ही.कनेक्शन द्यावयाचे असेल आणि अशा वेळी जर त्यांच्याकडे केबलची व्यवस्था असेल तर त्यांच्याकडून ४५ रुपये घेतले जातात, अगोदर ३० रुपये घेण्यात येत होते. "अ" व "ब" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये पूर्वी हा दर २० रुपये होता आणि आता तो ३० रुपये करण्यात

आला आहे. तसेच "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये आणि ग्रामीण भागामध्ये पूर्वी हा दर १० रुपये होता आणि आता तो १५ रुपये करण्यात आला आहे. जर एखाद्याकडे टी.व्ही.संच असेल परंतु त्याच्याकडे केबल नसेल तर संबंधितांकडून करमणूक शुल्काची आकारणी केली जात नाही. ज्या टी.व्ही.वरुन वेगवेगळ्या वाहिन्यांचे कार्यक्रम पाहिले जातात त्याठिकाणी मुंबई करमणूक कर शुल्क कायदा १९२३ नुसार करमणूक शुल्क घेण्यात येते. त्याचप्रमाणे केंद्र शासनाने देखील केबल टेलिव्हीजन नेटवर्क रेग्युलेटरी ॲक्ट १९९५ च्या अंतर्गत केबल टेलिव्हीजन रुल्स १९९५ केले असून या दोन्हीमुळे करमणूक शुल्काची वसुलीकरता सिस्टीम निर्माण करण्यात आली आहे. केंद्र शासनाने त्यांच्या कायद्याप्रमाणे रजिस्ट्रेशन ग्रँट करण्याची ॲथॉरिटी पोस्ट आणि टेलिग्राफ विभागाकडे दिलेली आहे. त्यानुसार ते रजिस्ट्रेशन ग्रँट करतात. राज्य शासनाने केंद्र शासनाला विनंती केली आहे की, रजिस्ट्रेशन ग्रँट करताना किंवा परवान्याचे नुतनीकरण करताना संबंधितांनी करमणूक शुल्क भरलेले आहे की नाही याबाबत राज्य शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. शासन या ठिकाणी फक्त करमणूक शुल्काची आकरणी करु शकतो. केबल ऑपरेटर यांचे लायसन्स नुतनीकरणासाठी पोस्ट आणि टेलिग्राफ विभागाकडे देतात. यामुळे राज्य शासनाकडून कारवाई करण्यामध्ये अडथळा निर्माण होतो.

सन १९२३ मधील करमणूक कर शुल्क कायदा केंद्र शासनाचा आहे काय तसेच त्यानंतर कायद्यामध्ये वारंवार सुधारणा झाली आहे काय ? जर सुधारणा झाली असल्यास ती सुधारणा केव्हा झाली याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन १९२३ चा करमणूक कर शुल्क कायदा महाराष्ट्र राज्याचा आहे. तसेच या कायद्यामध्ये सुधारणा झाली असून शासन जे शुल्क आकारते त्यामध्ये सुधारणा झाली आहे.

सन १९२३ चा राज्य शासनाचा करमणूक कर शुल्क कायदा असून तो कन्करन्स् लिस्टमधील आहे. त्यावेळी टी.व्ही.केबल अस्तित्वात नव्हते. त्यामुळे केबल बाबतीत सदरहू कायद्यात तरतूद असू शकणार नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा करताना सांगितले की, सन २००० मध्ये करमणुक शुल्क कायद्यात सुधारणा केली आहे. त्यावेळी महानगरपालिका क्षेत्रासाठी ३० रुपये, नगरपालिका क्षेत्रासाठी २० रुपये आणि ग्रामीण भागामध्ये १० रुपये शुल्क होते. परंतु नंतरच्या काळामध्ये टी.व्ही. वर

केबलच्या माध्यमातून कार्यक्रम दाखविले जात असतील त्यासाठी किती शुल्क आकारावयाचे हे सन २००२ मध्ये निश्चित करण्यात आले आहे.

जर फी मध्ये वाढ करावयाची असेल तर त्यासाठी कायद्यामध्ये बदल करावा लागत नाही. मात्र जर कायद्यामध्ये बदल करावयाचा असेल तर ॲमेंडमेंट करावी लागते.बाकीचे जे कर आहेत, त्याचा तक्ता देण्यात येतो आणि कोणते दर कमी केले आणि कोणते दर वाढविण्यात आले याचीही माहिती विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या वेळी दिली जाते. याबाबतीत सन २००० मध्ये कोणती ॲमेंडमेंट केली आहे असे समितीने विचारले असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००० मध्ये कायद्यात अशी सुधारणा करण्यात आली की, जर टेलिव्हीजनवर केबलमार्फत कार्यक्रम दाखविले जात असतील तर त्यावर करमणूक शुल्क आकारण्यात यावे. तोपर्यंत "अ" वर्ग नगरपालिकांसाठी ३० रुपये, "ब" वर्ग नगरपालिकांमध्ये २० रुपये, ग्रामीण भागासाठी १० रुपये आकारण्यात येत होती. त्यानंतर सन २००६ मध्ये या दरामध्ये पुन्हा सुधारणा करुन "अ"वर्ग महानगरपालिकांमध्ये ३० रुपयांच्या ऐवजी ४५ रुपये, "ब"वर्ग नगरपालिकांमध्ये २० रुपयांच्या ऐवजी ३० रुपये आणि ग्रामीण भागामध्ये १० रुपयांच्या ऐवजी १५ रुपये करण्यात आले आहे. अशा प्रकारे दोन वेळा सुधारणा केलेली आहे.

सन २००६ मध्ये केलेल्या सुधारणा बाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या टी.व्ही.वर केबल नेटवर्कव्दारे कार्यक्रम दाखविले जात आहेत त्याठिकाणी करमणूक शुल्क आकारले जातात. ज्यावेळी हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता तेव्हा ३० रुपये २० रुपये आणि १० रुपयाप्रमाणे रिकव्हरी करीत होतो. परंतु आता "अ"वर्ग महानगर पालिकांमध्ये ४५ रुपये, "ब"वर्ग नगरपालिकांमध्ये ३० रुपये आणि "क"वर्ग नगरपालिकांमध्ये २० रुपये इतकी शुल्क आकारणी करीत आहोत. यासंबंधातील ॲथॉरिटी पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ विभागाला दिलेली आहे. ते जर परवान्याचे नुतनीकरण करीत असतील तर त्याचे तक्ते देत असतात. विभाग फक्त शुल्क आकारतो. ॲथॉरिटीमार्फत रजिस्ट्रेशन ग्रँट करताना, तसेच त्याचे नुतनीकरण करताना राज्य शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतले तर त्यावर राज्य शासनाला करमणूक कराच्या वसुलीबाबत नियंत्रण ठेवता येईल अशा प्रकारची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाला केली आहे.

सध्या याबाबतीत तरी राज्यशासनाचे काही नियंत्रण नाही जर ॲमेंडमेंट केल्यानंतर त्यावर नियंत्रण ठेवण्यात आले तर राज्याच्या उत्पन्नामध्ये किती फरक पडणार आहे अशी

विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तसे झाले तर राज्याच्या उत्पन्नामध्ये मोठा फरक पडू शकतो. यावर्षी करमणूक शुल्काच्या रिकव्हरीबाबत शासनाचे उद्दिष्ट ५५० कोटी रुपयांचे आहे.

यासंदर्भात केंद्र शासनाला पत्र पाठविण्यापलिकडे विभागाकडून काही कार्यवाही केली आहे काय ? या अनुषंगाने संबंधितांबरोबर संयुक्त बैठक झाली आहे काय ? जर झाली असेल तर त्यामध्ये काही चर्चा झाली काय? मात्र याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

मुंबई पुणे येथील केबलची आकडेवारी सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पुणे जिल्ह्यामध्ये एकंदर १०५१ केबल ऑपरेटर असून त्याठिकाणी २,२५,७१३ इतकी केबल कनेक्शन्स् आहेत आणि ७,५४,७३८ इतकी डीटीएच आहेत. मुंबई शहरामध्ये १११९ केबल ऑपरेटर असून एकूण २,१०,१०९ केबल कनेक्शन आहेत आणि १,२७,१९७ डीटीएच आहेत. तसेच मुंबई उपनगरामध्ये १७७६ केबल ऑपरेटर असून ४,२९,६९८ केबल कनेक्शन आहेत आणि ३,४७,२३३ डीटीएच आहे.

उक्त या आकडेवारीबाबत तपासणी करण्यासाठी विभागाकडे कोणती यंत्रणा आहे याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हाधिकारी यांच्याकडे करमणूक कर विभाग आहे. प्रत्येक जिल्ह्यातील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणातंर्गत हा विषय असतो. त्यांच्याकडे तहसिलदार पदाच्या श्रेणीचे एन्टरटेन्मेंट ड्युटी अधिकारी आणि उप जिल्हाधिकारी असतात. तसेच २ करमणूक सहायक (एन्टरटेन्मेंट असिस्टंट) व डी.ई.ओ.असतात. तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उप करमणूक अधिकारी (एन्टरटेन्मेंट डेप्युटी अधिकारी), असिस्टंट डेप्युटी अधिकारी आणि ११ इन्स्पेक्टर इ. स्टाफ असतो. मोठमोठ्या शहरामध्ये याबाबत जवळजवळ १०/१२ एन्टरटेन्मेंट अधिकाऱ्यांना ड्युटी देण्यात आली असून ते याचा आढावा घेत असतात.

एकूण केबल धारक किती आहेत यासंबंधीचा आढावा घेण्यासाठी विभागाकडे काही यंत्रणा आहे काय कारण आता महाराष्ट्रामध्ये दहा टक्के घरांमध्ये केबल नसेल. आदिवासींकडे देखील आता टी.व्ही.आहेत. त्यामुळे शासनाने महानगरपालिका, नगरापालिका, ग्रामीण भाग यातील करामध्ये फरक का ठेवला आहे याबाबत माहिती विभागीय सचिवांनी सांगितले की, दर महिन्याला महसूलात किती वाढ झाली आहे. गेल्या वर्षी एकूण रूपये ४७३ कोटी करमणूक कर गोळा झालेला आहे. यात केबल द्वारे रूपये ९३ कोटी रूपये करापोटी

जमा झाले आहेत. शासनाच्या करमणूक कर शुल्क धोरणामध्ये फरक असल्यामुळे महानगरपालिका, "अ" व "ब" वर्ग नगरपालिका, "क" वर्ग नगरपालिका आणि ग्रामीण भाग यातील करमणूक कर शुल्कामध्ये फरक करण्यात आला आहे.

शहरातील महानगरपालिका व ग्रामीण भाग यामध्ये कर शुल्कात फरक केला आहे हे हे बरोबर आहे. याचे कारण शहरामध्ये जास्त सुविधा असतात. "क" वर्ग नगरपालिकेमध्ये तशा सुविधा नसतात. सिवेरेज प्लांट शहरात असते. ग्रामीण भागात नसते त्यामुळे करामध्ये फरक असतो. परंतु, शहरात आणि ग्रामीण भागामध्ये दिसणारा सिनेमा हा एकच असतो. तो चित्रपटगृहात संपूर्ण प्रदर्शित केला जातो. मुंबईत वेगळा आणि ग्रामीण भागामध्ये वेगळा सिनेमा दिसतो काय ? तेव्हा करमणूक शुल्क करामध्ये फरक करण्याचे कारण काय आहे कारण गरजू माणसाला शिक्षणात आणि अन्नधान्यामध्ये सवलत देण्यात येते पण केबल शुल्काच्या करामध्ये सवलत देण्यामध्ये असा कोणता सामाजिक मुद्दा आहे असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महानगरपालिका, लहान नगरपालिका, ग्रामीण क्षेत्र यासंबंधीचा फरक करमणूक शुल्क करामध्ये अनेक बाबतीत आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर क्रिकेट सामन्याचे देता येईल. मोठ्या महानगरपालिका व लहान महापालिका क्षेत्रात आयपीएलचा किक्रेट सामना असेल तर त्यासाठी वेगळे करमणूक शुल्क आकारण्यात येते. त्याच आधारावर केबल टी.व्ही.वर सुद्धा वेगवेगळे दर आकारण्यात आले आहेत.

विभागाने दिलेल्या उक्त खुलाशासंदर्भात महालेखाकारांनी सांगितले की, यहां पर एन्टरटेनमेंट ड्यूटी से संबंधित पैरा पर चर्चा चल रही है. यह रेवेन्यू का एक सोर्स है. अगर इसका कलेक्शन ठीक प्रकार से होगा तो सरकार का रेवेन्यू बढ़ेगा. आई.पी.एल. के संबंध में सरकार का क्या रोल है, उसका भी एक अलग मामला है.

नगरपालिकेचे दरडोई उत्पन्न किती असते त्यानुसारच शासनाने करासंबंधीचे दर ठरविलेले आहेत. करासंबंधातील दर ही बाब अनेक विषयांशी निगडित आहे. दर किती ठेवावा यासंबंधीचा निर्णय सरकारकडून घेतला जातो ही बाब समितीने मान्य केली.

मुंबई शहर, मुंबई उपनगरातील केबल जोडणीधारक तसेच DTH धारक यांची एकूण संख्या १० लाखाच्या आसपास आहे. आज मुंबई शहराची लोकसंख्या २ कोटीच्या आसपास आहे. मुंबई सारख्या मोठ्या शहरात एवढ्या कमी प्रमाणात केबल जोडण्या दाखविण्यात येतात

तरी देखील शासन काहीच करत नाही. केबल ऑपरेटर आणि प्रशासकीय अधिकारी व कंपनीचे मालक यांच्या संगनमताशिवाय एवढा कमी आकडा येऊच शकत नाही. विभागाने जी आकडेवारी दिली आहे ती चेक करण्याकरीता विभागीय अधिकाऱ्यांनी त्याचा आढावा घेतला आहे काय ? घेतला असल्यास त्यातुन काय निष्पन्न झाले आहे तसेच केबलधारकांची संख्या कमी असल्यामुळे याबाबत विभागाने आढावा बैठका घेतल्या आहेत काय त्यातून काय निष्पन्न झाले आहे, त्याद्वारे उत्पन्न वाढले आहे काय, तसेच जे कोणी यास जबाबदार असतील त्यांच्या विरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे. याबाबत यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दर महिन्याला जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी आढावा घेत असतात. तसेच वेळोवेळी जिल्हा स्तरावर, विभागीय स्तरावर आढावा घेतला जातो. परंतु प्रत्येक घरामध्ये जाऊन सर्व्हे करण्यासाठी फार मोठी मोहीम राबवावी लागेल पण याबाबतीत समितीने विभागास सूचना केली की, म्हाडाच्या सोसायट्या, हौसिंग असोसिएशन यांच्याकडून केबलधारक किती आहेत यासंबंधातील माहिती मिळू शकते.

मुंबई शहरात किती केबलधारक आहेत हे काम महसूल विभागातर्फे कोण पाहते अशी विचारणा समितीने केली असता तहसीलदार, मुंबई शहर जिल्हा यांनी समितीस सांगितले की, तहसिलदार मुंबई शहर जिल्ह्यातील प्रत्येक घरामध्ये भेट देऊ शकत नाही परंतु काही ठिकाणी भेट देऊन तपासणी करतात.

संपूर्ण मुंबई शहरात दहा लाख केबलधारक आहेत यावर कोणाचा विश्वास बसेल काय? असा मुद्दा समितीने उपस्थित केली असता तहसिलदार मुंबई शहर यांनी असे सांगितले की, केबल ऑपरेटर प्रतिज्ञापत्र सादर करतात. त्यानुसार विभागाकडून चौकशी करण्यात येते. यासंदर्भात विभागाने केबल ऑपरेटरची यंत्रणा नीट तपासावी अशी सूचना समितीने विभागास केली.

केबल धारकांची संख्या ५० लाखांपेक्षा अधिक कशी होईल हे पाहण्यासाठी विभागाने कोणती कारवाई केली आहे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात केबल धारकांची संख्या २५ लाख ७९ हजार एवढी आहे. मुंबई शहरातील केबलधारक व DTH धारकांची सादर केलेली आकडेवारी अचूक आहे असा दावा शासन करू शकणार नाही. सदर संख्या निश्चितपणे जास्त असणार.

मुंबई शहरात १११९ केबल ऑपरेटर व २ लाख २५ हजार केबल जोडण्या आहेत, तर मुंबई उपगनर जिल्ह्यात १७७६ केबल ऑपरेटर असून केबलधारक ४ लाख २९ हजार, तर DTH धारक ३ लाख ४७ हजार असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. या सर्वांची एकूण संख्या १० लाखाच्या आसपास जाते. आज मुंबईची लोकसंख्या सव्वा कोटीच्या आसपास आहे. त्यामुळे विभागाने सांगितलेली केबलधारकांची आकडेवारी ही न पटणारी आहे. आज मुंबईत २ BHK, ३ BHK चे फ्लॅट आहेत. त्यात २/३ केबल्सचे पॉईंट असतात. तिच संख्या साधारणत: २० लाखाच्या आसपास जाईल. त्यामुळे विभागाकडून जी संख्या सांगत आहात त्याचा काही ताळमेळ बसत नाही. केबल टी.व्ही.मुळे मुंबई पुण्यात केबल वॉर - गँगवॉर देखील झाले आहे. त्यामुळेच आपल्याला निश्चित आकडा मिळत नाही. केबल ऑपरेटर्सकडून दादागिरी करण्यात येते. प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्याला हा व्यवसाय करू दिला जात नाही. त्यामुळे जेवढे म्हणून केबल ऑपरटर्स आहेत त्यांचे परवाने रद्द करून नवीन प्रामाणिक व्यावसायिकांना व्यवसाय करण्यास शासन अनुमती देणार आहे काय ? कारण प्रामाणिक व्यावसायिक राज्य शासनाला महसूल देण्यास तयार आहेत. आज मुंबई शहरात मुख्य केबल ऑपरेटरच्या हाताखाली छोट केबल चालक असतात ते छोट्या छोट्या गल्लीत केबल चालवत असतात. त्यामुळे विभागाने याबाबतीत ठोस उपाय योजना करणे आवश्यक असल्याची सूचना समितीने विभागास केली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विद्यमान केबल ऑपरेटर्सचे परवाने रद्द करून टेंडर पद्धतीने चांगल्या व्यावसायिकांना यामध्ये आणून महसूल वाढविण्याचे काम शासन करणार आहे काय याबाबतीत विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई शहरातील व राज्यातील केबलधारकांची सादर केलेली आकडेवारी ही वस्तुस्थितीवर आधारित आहे असा दावा विभाग करीत नाही. केबलधारकांची नेमकी संख्या किती आहे यासाठी सर्व्हे करावा लागेल. सन २००६-२००७ मध्ये राज्यात काही ठिकाणी केबल धारक किती आहेत यासंबंधीचा सर्व्हे झाला होता. तसा सर्व्हे पुन्हा प्रत्येक घरामध्ये जाऊन करावा लागेल. म्हाडाच्या सोसायट्या, हौसिंग सोसायट्या, हौसिंग फेडरेशन यांच्या माध्यमातून माहिती घेता येईल. नुकतीच जनगणना झाली आहे. मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रत्येक घराघरामध्ये जाऊन जनगणना केली आहे. या जनगणनेमध्ये वीज जोडणी, पाणी पुरवठा जोडणी तसेच टी.व्ही.आहे काय, असा रकाना होता. यावरून विभागाला लगेच केबलधारकांसंबंधातील माहिती गोळा करता येऊ

शकेल. तसेच केंद्र सरकारने नुकत्याच केलेल्या कायद्यानुसार सर्वांनाच डिजीटल सेट टॉप बॉक्स सिस्टम अनिवार्य केली व त्याची मुदत मुंबई, कलकत्ता, चेन्नई व दिल्ली या चार महानगरांमध्ये ३१ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत ठरवून दिली आहे. त्याचप्रमाणे ही योजना आपल्या संपूर्ण राज्यात लागू होण्यासाठी चार टप्पे केले आहेत. त्यातला पहिला टप्पा मुंबई, दुसऱ्या टप्प्यात ठाणे, पिंपरी-चिंचवड, पुणे, नाशिक, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, सोलापूर व नागपूर महापालिकांच्या क्षेत्रात ३१ मार्च, २०१३ पर्यंत ही योजना लागू करणे बंधनकारक केले आहे. त्यानंतर दोन टप्प्यात संपूर्ण राज्यात ही सिस्टम सुरु करावयाची आहे. अशा प्रकारे संपूर्ण राज्यात ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत आजच्या केबल सिस्टमऐवजी डिजीटल प्रणाली सर्वांनाच घ्यावी लागणार आहे, अन्यथा त्यांना टी.व्ही. वरील कोणतेही कार्यक्रम दिसणार नाहीत. या केबल कनेक्शन्सची खरी माहिती मिळण्याच्या दृष्टीने नुकताच जो सेन्सस झालेला आहे त्याचा आधार घेण्यात येईल, त्यानंतर घरातील विजेचे कनेक्शन्स, टी.व्ही. ची संख्या अशा बाबींच्या माध्यमातून किंवा सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून देखील माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल आणि महानगरपालिकेकडे असलेल्या डेटाचा सुध्दा आधार घेतला जाईल. जेणेकरुन जास्तीत जास्त कनेक्शन्सची माहिती अधिकृतपणे मिळेल. अद्यापपर्यंत अशी सुरुवात केलेली नाही, पण या माध्यमातून माहिती गोळा करणार आहोत असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

यापूर्वी केबल कनेक्शन्स शोधण्यात फिल्डवरील अधिकाऱ्यांनी ज्या चुका केल्या त्यातील एखाद्याला तरी कारणे दाखवा नोटीस इश्यू केलेली आहे काय, याचे उत्तर कदाचित नाही असेच येणार आहे, कारण अशी मानसिकताच नाही. यात खरे तर संपूर्ण राज्याचे प्रमुख म्हणून अप्पर मुख्य सचिवांचीच पकड खालच्या अधिकाऱ्यांवर असली पाहिजे. ही माहिती गोळा करीत असताना सहकारी सोसायट्यांचे जे फेडरेशन असते त्यांच्याकडून आपणास निश्चित स्वरुपात व पटकन माहिती मिळू शकेल. तसेच महापालिकेच्या वार्डातून सुध्दा लवकर माहिती मिळू शकते. वास्तविक आपली यंत्रणा अशा प्रकारची आणि केबल ऑपरेटरच्या यंत्रणेचा विचार केला तर असे दिसून येईल की, एखाद्या महिन्याचे पैसे भरण्यासाठी चुकून विलंब झाला तरी तो त्याच्या बॉक्सवरुनच तातडीने आपले कनेक्शन कट करतो. तसेच प्रत्येक कनेक्शनमागे ३०० ते ३५० रुपये केबल ऑपरेटर घेतो आणि त्यातून फक्त लिगली कनेक्शन्सच्या पोटी सरकारला करमणूक करापोटी केवळ ४५ रुपयेच भरतो. असे मत

समितीने नाराजीने व्यक्त केले व शिक्षा निश्चित करताना जी दंडाची रक्कम ठरवलेली आहे, ती अधिक असली पाहिजे. तसेच जेल किंवा इतर कठोर स्वरुपाच्या शिक्षेची अंमलबजावणी केली गेली पाहिजे. कारण कराची रक्कम न भरल्यामुळे शासनाचा मोठया प्रमाणात महसूल बुडत आहे. त्याचा विचार करता सध्याच्या परिस्थितीमध्ये कडक अंमलबजावणी करायची असेल तर केबलसंदर्भातील कायद्यामध्ये बदल करावयास पाहिजे अशी सूचना समितीने विभागास केली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, केबल ऑपरेटर्सकडून थकबाकी वसूल होण्याची कोणतीच गॅरंटी नसल्याने त्यांच्याकडून बँक गॅरंटी का घेत नाहीत तसेच कोणत्याही कायद्यात उल्लंघन केले तर दंड किंवा शिक्षेची तरतूद असते. तशी तरतूद केबलसंबंधीच्या कायद्यात आहे काय, कारण मोठ्या प्रमाणावर शासनाचा कर यामध्ये बुडतो याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, NSC स्वरुपातील रक्कम रुपये २००० शासनाने विहित केल्यानुसार घेण्यात येते व लायसेन्स देण्यात येते. पहिल्या ३० दिवसांकरिता १८ टक्के व्याज व त्यानंतर २४ टक्के व्याज आकारले जाते. तसेच फौजदारी कारवाई देखील करता येते. व्याज वसुली व्यतिरिक्त कलम ५ अंतर्गत दंड आकारण्याची देखील तरतूद आहे. दंडाची रक्कम जास्तीत जास्त २ हजार रुपये आहे. कायद्यातील तरतुदींचे पालन न केल्यास संबंधितांना शिक्षा देखील होऊ शकते. साधारणपणे सहा महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा प्रस्तावित केलेली आहे. बँक गॅरंटीच्या संदर्भात समितीने जी सूचना केली आहे त्यासंदर्भातील नोंद विभागाकडून घेण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

आतापर्यंत किती गुन्हेगारांवर अशा प्रकारची शिक्षा केलेली आहे काय ? या संदर्भात विभागीय आयुक्तांकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, काही प्रकरणांमध्ये फौजदारी कारवाई झालेली आहे. परंतु या बाबतची माहिती घेऊन समितीला नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

अधिनियमातील सन २००० पासून तरतूद केली असतानाही विभागाने केबल ऑपरेटरकडून करमणूक शुल्काची नियमित वसुली जाणीवपूर्वक केली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

काही केबल ऑपरेटरकडून करमणूक शुल्क वसुली करणे जिल्हाधिकारी कार्यालयास शक्य झाले नाही. यामुळे कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांनी जाणीवपूर्वक वसुली टाळली असे म्हणणे योग्य होणार नाही.

मुंबई शहर : क्षेत्र क्र. ७ व ८ मधील सन २००३-०४ या कालावधीतील करमणूक शुल्क निरीक्षक सेवा निवृत्त अथवा मृत झाले आहेत.

मुंबई उपनगर : सन २००७ मध्ये केबल आयोजकांकडून देय करमणूक शुल्काची वसुली करण्यात आली आहे.

ठाणे : प्रश्न क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार संपूर्ण आक्षेपित रक्कम सन २००५ पूर्वीच भरणा केल्याचे दिसून येते.

पुणे : सन २००४ च्या एप्रिल महिन्यात लोकसभा निवडणूक तसेच ऑक्टोबर २००४ मध्ये विधानसभा निवडणूक असल्याने करमणूक शुल्क अधिकारी व इतर कर्मचाऱ्यास निवडणूक प्रक्रियाकरीता नियुक्त करण्यात आले होते. तसेच करमणूक शुल्क खात्यास विविध दाखले तपासणी, राजशिष्टाचार तसेच इतर कामे सोपविण्यात येतात. अपूरा कर्मचारी वर्ग, वाहनांची अनुपलब्धता यामुळे वसुलीचे कामकाजात काही प्रमाणात बाधित होते. तथापि यानंतरही सदर कार्यालयाने करमणूक शुल्क वसुली जबाबदारी केली आहे. तथापि, या कालावधीतील अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून या संबंधातील खुलासा प्राप्त करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

जळगांव : सन २००३-०४ या कालावधीतील करमणूक शुल्क निरीक्षक सेवा निवृत्ती झाले आहेत.

अकोला : या जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत थकबाकी वसुलीकरीता संबंधितांना नोटीस देण्यात येत असून स्थानिक वृत्तपत्रातुन दि. ०५/०१/२०११ रोजी प्रेस नोट द्वारे जिल्ह्यातील केबल चालकांना करमणूक कर भरणा करणेबाबत तसेच दंडात्मक कार्यवाही करणेबाबत सूचित करणेत आले आहे.

औरंगाबाद : या जिल्ह्यातील लेखा परिच्छेदात नमूद १८ केबल चालकांकडील थकीत रकमेची संपूर्ण वसुली करुन महालेखापाल, मुंबई कार्यालयास सदर आक्षेप वगळण्याबाबत दि. १६ ऑक्टोबर २००७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

विभागाने जानेवारी २००४ ते जुलै २००७ मध्ये १३१ केबल धारकांकडून रु. २६,०००/- व्याजासह रु. २१.१० लाख करमणूक कराची रक्कम वसुल केली. उर्वरीत रकमेच्या वसुलीच्या सद्य:स्थिती ची माहिती खालीलप्रमाणे आहे.

मुंबई शहर : झोन क्र. ७ मधील अंलेप लेखा परिक्षण क्र. १५४२१ मध्ये उल्लेख केल्यानुसार ४५ केबल चालकांकडून वसुल न करण्यात आलेल्या आक्षेपित रक्कम रु. १०,९९,४७०/- पैकी ३४ केबल चालकांकडून ८,७९,४५०/- इतकी रक्कम वसुल झाली होती. उर्वरीत रक्कम रु. २,२०,०२०/- पैकी ८६,३००/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली असून संबंधित केबल आयोजकांनी व्यवसाय बंद केला असल्याने उर्वरीत रक्कम १,५४,८१०/- इतकी रक्कम वसुल करणे शक्य झाले नाही. याबाबत दि. १६/०४/२००८ च्या पत्रान्वये महालेखाकार कार्यालयास माहिती देण्यात आली आहे.

२) झोन क्र. ८ मधील अंलेप लेखा परिक्षण क्र. १५०२७ मध्ये उल्लेख केल्यानुसार ०८ केबल चालकांकडून वसुल न करण्यात आलेली आक्षेपित रक्कम रु. १,५२,६१०/- या रकमेची संपूर्ण वसुली करण्यात आलेली असून वरिष्ठ लेखाधिकारी यांनी दि. ०४/०६/२००८ च्या पत्रान्वये लोकलेखा समितीचे चर्चा / शिफारशींचे अधिन राहून परिच्छेद बंद केला आहे.

मुंबई उपनगर : लेखा परिच्छेद आक्षेपित संपूर्ण रक्कम वसुल करण्यात आली आहे.

ठाणे : संपूर्ण रक्कम वसुल करण्यात आली आहे.

पुणे : लेखा परिच्छेदात नमुद केल्यानुसार पुणे जिल्ह्यातील ५९ केबल ऑपरेटर यांचेकडून वसुल करावयाची रक्कम रु. ६,५३,४८०/- पैकी रु. २१,६००/- इतकी थकबाकी आहे. सदर थकबाकी असणारे केबल आयोजक श्री.ॲन्थोनी यांनी सन २००७ पासून व्यवसाय बंद केला असल्याने व स्थावर जंगम मालमत्ता नसल्याने तसेच सदर व्यक्ती दि. १७ ऑक्टोबर २००९ रोजी मयत झाले असल्याने रक्कम वसुल करणे शक्य झाले नाही. यामुळे सदर परिच्छेद क्षमापित करणेबाबत दि. १८ सप्टेंबर २०१२ रोजी च्या पत्रान्वये महालेखापाल, मुंबई कार्यालयास सूचित करण्यात आले आहे.

जळगांव : प्रस्तुत परिच्छेदात उल्लेख केलेली रक्कम रु. १५,७१,१७०/- इतकी असून वर्ष निहाय वसूली खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	वसुल झालेली रक्कम
१.	२००४-०५	१,३४,२३०/-
२.	२००५-०६	८,४४,४९०/-
३.	२००६-०७	१,३२,५७०/-
४.	२००७-०८	३२,०३०/-
५.	२००८-०९	२,२८,४९०/-
६.	२०१०-११	३०,४००/-
७.	२०११-१२	१,०२,९४०/-
८.	२०१२-१३	६६,०२०/-
	एकूण	**१५,७१,१७०/-**

अकोला : जिल्ह्यात थकीत रक्कम रु. १,३४,१६०/- व्याजासह वसुली करणेकरीता निवासी उपजिल्हाधिकारी व तालुका दंडाधिकारी यांचे स्तरावरुन मागणी करण्यात आली. ज्या केबल ऑपरेटरकडे म्हणजेच श्री.संजय जिरापूरे (थकबाकी रु. ५३,१६०/-) श्री.निधाने (थकबाकी रु. ६६,०००/-) व श्री.घुमरे (थकबाकी रु. १५,०००/-) यांचेकडून थकबाकी वसुली करीता तलाठी व शिपाई यांचे मार्फत तहसिलदार स्तरावरुन नोटीस देण्यात आल्या. तथापि, सदर व्यक्ती त्या पत्त्यावर रहात नसल्याने नोटीस देणे शक्य झाले नाही. या व्यक्तींच्या नावावर स्थावर मालमत्ता असल्यास त्याबाबत माहिती देणेकरीता आयुक्त अकोला महानगरपालिका व अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडून माहिती मागविण्यात आली. प्राप्त माहितीनुसार श्री.निधाने व श्री.घुमरे यांचे नावावर मालमत्ता असल्याबाबत तसेच मिळकतीबाबत नोंद नाही. श्री.संजय जिरापुरे यांना थकीत रक्कम भरणा करणेबाबत दि. ०५ ऑक्टोबर २०१२ रोजी सूचना देण्यात आली असून भरणा न केल्यास स्थावर व जंगम मालमत्ता यांचा शोध घेऊन महसूली थकबाकीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

औरंगाबाद : लेखा परिच्छेद क्र. १४४७०/१ मध्ये नमूद आक्षेपित रक्कम रु. ४,८५,१६०/- संपूर्ण वसुल करण्यात आली आहे.

सन २००६-२००७ पासूनची विभागाकडून संपूर्ण रक्कम वसुल करण्यासाठी सप्टेंबर २०१२ म्हणजे ६ वर्षे विलंब का लागला याबाबतची प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मुंबई शहर : सदर कालावधीतील आक्षेपित संपूर्ण रक्कम वसुल झालेली आहे.

ठाणे : एकूण आक्षेपित रकमेपैकी रु. ७,२८०/- इतकी रक्कम केबल जोडण्या कमी असल्याचे केबल आयोजकांचे म्हणणे असल्याने भरणा करण्यात आली नव्हती. सदर विनंती अमान्य केल्याने संपूर्ण रकमेचा भरणा केला आहे.

पुणे : केबल आयोजक श्री. ॲन्थोनी यांनी सन २००७ पासून व्यवसाय बंद केला असल्याने व स्थावर जंगम मालमत्ता नसल्याने तसेच सदर व्यक्ती दि. १७ ऑक्टोबर २००९ रोजी मयत झाले असल्याने रक्कम वसुल करणे शक्य झाले नाही.

जळगाव : प्रश्न क्र. ३ मध्ये दिलेल्या स्पष्टीकरणानुसार सन २००६ पर्यंत ६२ टक्के रक्कम वसुल केलेली होती. उर्वरीत रक्कम केबल चालकांनी व्यवसाय बंद केला असल्याने, अन्यत्र स्थायिक झाले असल्याने पत्ता न मिळणे इत्यादी कारणाने वसुल झाली नव्हती.

अकोला : श्री.निधाने व श्री.घुमरे हे जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करुन दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने वसुलीसाठी विलंब झाला आहे.

औरंगाबाद : प्रस्तुत परिच्छेदात गुंतलेली रक्कम रु. ४,८५,१६०/- इतकी असून वर्ष निहाय वसुली पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	वसुल झालेली रक्कम
१.	२००२-०३	२,६४०/-
२.	२००३-०४	५८,३८०/-
३.	२००४-०५	५९,४४५/-
४.	२००५-०६	२,७४,८३०/-
५.	२००६-०७	५५,८००/-
६.	२००७-०८	३४,०६५/-
	एकूण	**४,८५,१६०/-**

दिवसेंदिवस केबल कनेक्शनच्या संदर्भात चोरीचे प्रमाण वाढत चालले आहे. बरेचदा जनगणना करण्यासाठी किंवा इतर कामासाठी विभागातील स्टाफचा वापर केला जातो. सध्या राज्यामध्ये केबल गुन्हेगारी मोठया प्रमाणात वाढत आहे. मात्र त्यांच्यावर सरकारकडून जरब बसविली जात नाही. सध्या अस्तित्वात असलेली शिक्षा व दंड अतिशय अपुरा आहे. कराची रक्कम न भरणाऱ्या केबल ऑपरेटरांवर कारवाई करण्यासाठी कायद्यात बदल केला पाहिजे. आता केवळ ९४ कोटी रुपयांची रक्कम दिसत आहे. मात्र प्रत्यक्षात ही आकडेवारी फार मोठया स्वरुपात आहे. यामुळे शासनाचा कमीत कमी २०० ते ३०० कोटी रुपयांचा महसूल बुडत आहे. एकाच घरामध्ये किंवा हॉटेलच्या रुम्समध्ये दोन-दोन केबल कनेक्शन्स असतात. त्याचा मात्र

विचार केला जात नाही. राज्यातील प्रशासन व्यवस्था कोणत्या दबावाखाली आहे ? राज्य शासनाने केबल ऑपरेटर्सना मोकळे सोडले आहे काय ? त्यांच्यावर कोणतीच कारवाई केली जाणार नाही काय ? गरीब व्यक्तीला एक न्याय व गुंडगिरी करणाऱ्यांना दुसरा न्याय दिला जाणार आहे काय ? असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले व या संदर्भात एकूण किती प्रकरणे प्रलंबित आहेत आणि किती प्रकरणांमध्ये दंड वसुली केली आहे याची यादी समितीला सादर करण्यात यावी. तसेच प्रत्येक केबल ऑपरेटरकडे डीटीएच कनेक्शनची यादी असते. सदर यादी ही समितीला सादर करावी. तसेच आतापर्यंत किती लोकांवर कारवाई करण्यात आली व आता ती कोणत्या टप्प्यात आहे, याची देखील माहिती समितीला सादर करण्याचे निदेश समितीने विभागाला दिले.

मुंबई सिटी में केबल कनेक्शन पर १२.५२ लाख रुपये एंटरटेनमेंट टैक्स वसूल न करने के संबंध में ऑडिट ऑब्जेक्शन था. विभाग ने एंटरटेनमेंट टैक्स के १०.९७ लाख रुपये वसूल किये हैं. विभाग ने अपने पत्र के माध्यम से बताया है कि केबल कनेक्शन कम होने के कारण १०.९७ लाख रुपये की वसूली की गई है इसलिए बाकी के १.५४ लाख रुपये वसूल करने का प्रश्न नहीं उठता है. महालेखाकार कार्यालयने इस ऑब्जेक्शन को रेक्टीफाई किया है. विभाग को इसका रिकंसिलिएशन करना पड़ेगा. असे महालेखाकारांनी समितीस सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभाग के संबंधित अधिकारी महालेखाकार कार्यालयके अधिकारी से संपर्क करके इसका रिकंसिलिएशन कर लेंगे.

अकोला जिल्ह्यामधील केबल ऑपरेटर श्री.निधाने व श्री.भुमरे हे बेपत्ता असल्याचे सांगितले जाते. मात्र त्यांना अनेकदा पाहिलेले आहे. त्यांच्यावर वसुलीची कारवाई अद्याप केली जात नाही. तसेच पुणे येथील केबल ऑपरेटर श्री.अँथनी यांनी सन २००७ पासून काही रक्कम थकवली आहे. यामुळे त्यांचा व्यवसाय बंद पडला आहे. त्यांची मालमत्ता शासनाने जप्त केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अकोला जिल्ह्यातील केबल ऑपरेटर श्री.भुमरे व श्री. निधाने यांची कसून चौकशी करण्याचे आदेश दंडाधिकारी व एसपी यांना दिले जातील. श्री.अँथनी सध्या हयात नाही, अशी माहिती आहे. याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

अकोला : श्री.निधाने व श्री. घुमरे जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करुन दिलेल्या पत्त्यावर रहात नसल्याने पोलिस निरिक्षक यांच्या मदतीने या व्यक्तींना ताब्यात घेऊन

कार्यालयात उपस्थित करण्यात आले. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार श्री. निधाने यांनी सन २००३ पासून केबल व्यवसाय बंद केला असून स्थावर व जंगम मालमत्ता नाही. तसेच श्री.घुमरे हे सन २००५ पासून येथे रहात नसून यांनी सन २००४ पासून केबल व्यवसाय बंद केला आहे. त्यांच्याकडे कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता नाही. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार तहसिलदार स्तरावरुन चे स्थळ निरीक्षण करण्यात आले आहे व याबाबत आयुक्त अकोला महानगरपालिका व अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडून माहिती प्राप्त करण्यात आली आहे. तथापि, या व्यक्तींकडे स्थावर व जंगम मालमत्ता नसल्याचे माहिती प्राप्त झाली आहे. यापुढील दंडनीय कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

पुणे : लेखा परिच्छेदात नमुद आक्षेपित रकमेपैकी श्री.ॲन्थोनी यांचेकडे रु. २१,६००/- इतकी थकबाकी आहे. श्री.ॲन्थोनी यांनी त्यांचा व्यवसाय सन २००७ पासून बंद केला आहे व स्थावर व जंगम मालमत्ता नसल्याने वसुली करणे शक्य झाले नाही. असा अहवाल करमणूक कर निरीक्षक यांनी सदर केला. केबल आयोजक दि.१७ ऑक्टोबर २००९ रोजी मयत झाले याबाबतचा अहवाल पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने आपल्या दि. ०९ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये महालेखापरिक्षक, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. तसेच सदर परिच्छेद क्षमापित करण्याचा अहवाल दि. १८ सप्टेंबर २०१२ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

राज्यात कार्यरत असलेल्या केबल ऑपरेटर्स यांच्याकडील ग्राहकांची संख्या निश्चित करण्यासाठी कोणती कार्यपध्दती वापरण्यात येते याबाबतची विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केबल आयोजक अधिनियमातील कलम ४(२)(ब) प्रमाणे परवानगीची मागणी करतांना शपथ पत्राद्वारे केबल धारकांची संख्या जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करुन देतात. या संख्येच्या आधारे करमणूक शुल्क परिगणित करुन अनुज्ञेय करमणुक शुल्क बाबत केबल आयोजकांना कळविण्यात येते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील केबल निरिक्षक वारंवार त्यांना दिलेल्या परिक्षेत्राचे वारंवार परिनिरीक्षण करतात. संख्या अयोग्य असावी अशी शंका आल्यास जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सर्वेक्षण करण्यात येते. तथापि, सदर कार्यपध्दती संपूर्ण केबल आयोजकांची संख्या निश्चितीकरीता निर्दोष नाही.

केबल ऑपरेटर्सकडून माहिती गोळा करण्यासाठी काही माणसे नियुक्त करा. माहिती गोळा केल्यानंतर योग्य ती कारवाई करता येईल. यामुळे माहिती गोळा करण्यासाठी काही निधी खर्च करा अशी सूचना समितीने विभागास केली.

महसूल विभागाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला आहे. तरी देखील यंत्रणा योग्य वेळेत काम पूर्ण का करीत नाही ? यामुळे शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडतो. विभागीय आयुक्त तसेच संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक कारवाई का केली जात नाही याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आतापर्यंत विभागाने कारवाई केलेली नसल्याचे मान्य केले. तथापि, आता संबंधितांवर विभागाकडून योग्य ती कारवाई केली जाईल. प्रोसीजरप्रमाणे प्रथम शो कॉज नोटीस द्यावी लागेल. सध्या ई-कर प्रणाली सुरु करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी सॉफ्टवेअर विकसित केले जात आहे. दर महिन्याला प्रत्येक केबल ऑपरेटरने कर भरला की नाही, हे या माध्यमातून आपल्याला दिसू शकेल. तसेच केबलचालकांना ऑनलाईन नोटीस दिली जाईल. ही यंत्रणा अंतिम टप्प्यात असून लवकरच कार्यान्वित केली जाईल. ही नोटीस दर महिन्याला पाठवावी की २ ते ३ महिन्यांनी पाठवावी, याबाबत विचार सुरु आहे.

वर्षातून एकदा नोटीस दिली तरी केबल चालक ती रक्कम भरतील. सध्या एमएसईबी देखील खाजगी लोकांकडून बिलाच्या रकमेची वसुली करते व त्यांना काही टक्के रक्कम दिली जाते. तशी पद्धत महसूल विभागाला देखील अवलंबता येईल अशी सूचना समितीने विभागास केली तसेच समितीने असे मत व्यक्त केले की, या ठिकाणी जी आकडेवारी समोर आलेली आहे, ती अतिशय हास्यास्पद आहे एखाद्या दुकानातून टी.व्हीची विक्री झाल्यानंतर विक्री कर विभागाकडे त्याची नोंद केली जाते. कोणताही टी.व्ही ग्राहकांनी खरेदी केल्यानंतर केबल कनेक्शन घेतल्याशिवाय त्याचा फारसा उपयोग होत नाही. यामुळे दुकानातून विक्री झालेल्या टी.व्हींच्या संख्येवरून आपल्याला केबल कनेक्शनची संख्या समजू शकते. यामुळे गेल्या ५ वर्षातील केबल जोडणीची आकडेवारी आपल्या लक्षात येऊ शकेल. दंडाची रक्कम भरण्याच्या संदर्भात फसवणूक झाल्यास कलम ४२० अंतर्गत केस दाखल करता येते. तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हे देखील दाखल करता येऊ शकतात. करमणुक कराचा भरणा न केल्यामुळे प्रशासनाने दंडाची रक्कम व शिक्षा याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, फौजदारी कारवाई करण्याची तरतूद करमणुक शुल्क

कायद्यामध्ये प्रस्तावित केलेली आहे. दंडाची रक्कम कमी असली तरी देखील व्याजाची रक्कम अधिक आहे. पहिल्या ३० दिवसांकरिता १८ टक्के व त्यानंतर २४ टक्के व्याजाचा दर निश्चित केलेला आहे. या गुन्ह्याकरिता ६ महिन्याची शिक्षा देखील होऊ शकते. कायद्यातील तरतुदीचा वापर कठोरपणे केल्यास गुन्ह्यांची संख्या कमी होईल. तसेच आतापर्यंत किती प्रकरणे समोर आली व त्यापैकी किती जणांवर गुन्हे दाखल केले ही माहिती समितीला देण्यात यावी. नंतर सादर केली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

महाराष्ट्र करमणुक अधिनियम १९२३ मधील कलम ४(ड) मध्ये असे नमूद केले आहे की, "एका वेळी ३ वर्षापेक्षा जास्त नाही अशा कोणत्याही कालावधीकरिता थेट घरपोच (डीटीएच) प्रसारण सेवेवरील आकारणी योग्य आकारणीशुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणुक शुल्क, जाहीर लिलावाद्वारे पट्टयाने देणे किंवा वसुलीकरिता एजंट नियुक्त करणे हे राज्य शासनासाठी फायदेशीर असेल." या संदर्भात कायद्यामध्ये अतिशय सुस्पष्ट अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. मात्र दोषी लोकांवर कारवाई करण्याबाबत विभागाकडून कोणतीही हालचाल केली जात नाही. परंतु आज लोकलेखा समितीने "केबल चालकांकडून कराची वसुली न करणे" या संदर्भात बैठक आयोजित केल्यामुळे काही दोषी लोकांना नोटीस काढली आहे. मात्र प्रशासनाने गेल्या ६ ते ७ वर्षापूर्वी त्यांच्याकडून कर वसुली केलेली नाही. ही वसुली करण्यासाठी त्यांना आता नोटीस पाठवली आहे. खरे तर ही कारवाई विभागाने या पूर्वीच तत्परतेने करणे आवश्यक होते. सध्या जी नवीन टेक्नॉलॉजी तयार करण्यात आलेली आहे, तिचा जास्तीत जास्त वापर करुन अधिकाधिक कराची रककम गोळा करण्यास कशी मदत होईल याचा प्राथम्याने विचार करावा. कनेक्शनची माहिती मिळवण्याकरिता एजंट नेमून सर्व्हे केला पाहिजे. सध्या केबल ऑपरेटर्स गब्बर झालेले आहेत. आता जी रक्कम विभागाने सांगितली आहे. प्रत्यक्षात त्याच्या चौपट आकडेवारी अस्तित्वात आहे. विभागाकडून मंत्री पातळीवर किंवा सचिव पातळीवर पाठपुरावा केला असेल तर त्याबाबत रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. राज्यातील केबल ऑपरेटरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. मात्र त्यासाठी विभागाकडून पुढाकार घेतला जात नाही. त्याकरिता कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव आणला जात नाही. खरे तर वस्तुस्थिती लक्षात घेता कायद्यामध्ये सुधारणा

करुन दंडाची रक्कम व शिक्षेचा कालावधी वाढवला पाहिजे. तसेच कायद्यामध्ये जे काही लूपहोल्स आहेत, त्या बाबत देखील बारकाईने विचार केला पाहिजे.

ज्या ज्या ठिकाणी ही केबल सुविधा खरोखर पुरविली जाते. त्या त्या ठिकाणाहून नियमानुसार प्रामाणिकपणे "करमणूक शुल्क" वसूल केला जातो का ? करमणूक शुल्क वसूली अधिकारी यांनी प्रत्येक एरियाची पाहणी करुन ऑथेंटिक डेटाबेस तयार करुन त्यांच्याकडून वसूली नियमितपणे होत आहे की नाही, याकडे लक्ष द्यावे. शासनाला करमणूक शुल्कापोटी प्राप्त होणारा महसूल बुडविण्यामध्ये खात्याला आनंद वाटत आहे का? विभागामार्फत कारवाईची उदासिनता होत असलेली पाहून समिती याचा तीव्र निषेध व्यक्त करीत आहे.

शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाची हानी होत असेल तर ते लोकलेखा समिती संबंधित खात्यातील अधिकाऱ्यांना व ठेकेदारांना कधीही माफ करणार नाही. विभागाने कायद्याचा बडगा उगारुन सर्व ऑपरेटर्स, ठेकेदार यांना समज देणे आवश्यक आहे. त्यानंतरही जर गैरव्यवहार चालू राहिले तर संबंधितांविरुध्द कठोर कारवाईचे सत्र सुरु केले पाहिजे. विभागाच्या कार्यवाहीमुळे समितीचे समाधान झालेले नाही. विभागातील अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना बोलावून करमणूक शुल्क वसूलीविषयक आवश्यक त्या सूचना दिल्या पाहिजेत. यामध्ये शासनाचे उत्पन्न वाढले पाहिजे, हाच शुध्द हेतू आहे. संबंधितांविरुध्द कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी यामागची समितीची भावना आहे असे मत समितीने व्यक्त केले.

विभागीय सचिवांनी दिलेल्या उपरोक्त माहितीवरुन समितीचे समाधान न झाल्यामूळे उक्त परिच्छेदासंदर्भात दि.१७/१०/२०१२ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर बैठकीत केबल ऑपरेटर्स यांच्याकडून वसुल करण्यात येणाऱ्या करमणूक कराची गत तीन वर्षाची जिल्हानिहाय माहिती द्यावी अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मार्च २०११ पर्यंत एकूण ५६० कोटी रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. सन २०१० मध्ये केबल ऑपरेटरांकडून साधारणपणे ४९३ कोटी रुपये वसूल केले गेले होते. तसेच याबाबत प्राप्त झालेली लेखी माहिती **(विवरणपत्र २)** मध्ये अंतर्भुत आहे.

मुंबई शहरामध्ये १११९ केबल ऑपरेटर असून ४ केबल कंपन्या आहेत. मुंबई उपनगरामध्ये १७७६ केबल ऑपरेटर असून १४ केबल कंपन्या आहेत. मुंबई शहरामध्ये

एमएसओ जोडणी धारकांची संख्या २ लाख १५ हजार १७४ असून १ लाख ३६ हजार २४१ डीटीएच धारकांची संख्या आहे. मुंबई उप नगरामध्ये केबल धारकांची संख्या ४ लाख २९ हजार ६९८ असून डीटीएच धारकांची संख्या ३ लाख ५८ हजार आहे. मुंबई उप नगरामध्ये एकूण ७ लाख ८७ हजार ७०० ग्राहक आहेत व मुंबईमध्ये ३ लाख ९१ हजार ४११ आहेत. मुंबई शहरामध्ये एकूण ११ लाख ४० हजार कनेक्शन्स आहेत. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई शहर व उपनगर येथे सुमारे १ कोटी २० लक्ष लोकसंख्या आहे. एका कुटुंबात सरासरी ५ व्यक्ती धरले तर त्या प्रमाणे राज्यात साधारणपणे किती टीव्ही संच आहेत व किती कनेक्शन्स आहेत याची आकडेवारी काढता येईल. मात्र प्रत्यक्षात यापेक्षा किती तरी पटीने अधिक संख्या असेल हे देखील खरे आहे. फ्री टू एअरच्या माध्यमातून ५९ चॅनेल करिता १००० रुपये व जोडणीकरिता १००० रुपये आकारले जातात. अल्प उत्पन्न गट किंवा ग्रामीण भागातील लोक फ्री टू एअर ही सेवा अधिक वापरतात.

डीटीएच व केबल चालक यांच्याकडून करमणूक कर वसूल केला जातो. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत मुंबई शहर व उपनगरामध्ये डीएएस होणार आहे. ही यंत्रणा अनिवार्य केल्यास करमणूक करावर नियंत्रण येणार आहे. सध्या केबल ऑपरेटरकडून कर वसूल केला जातो त्यामध्ये आमूलाग्र बदल करावा लागेल. बृहन्मुंबई क्षेत्रात ४ अधिक १४ अशा एकूण १८ कंपन्या आहेत. या एमएसओ कंपन्यांना कायद्याच्या कक्षेत आणले तर त्यावर फार चांगले नियंत्रण ठेवता येईल. या कंपन्यांनी केबल ऑपरेटरद्वारा प्रत्येक ग्राहकाच्या घरात फॉर्म दिलेला आहे. त्याद्वारे किती कनेक्शन्स घेण्यात आली आहेत याची माहिती त्यांच्याकडून उपलब्ध होऊ शकते. केबल ऑपरेटर यांच्याकडून कर वसूल करण्याऐवजी या कंपन्यांकडून कर वसूल करावा अशी सूचना करण्यात आली आहे. तसेच त्यासाठी कायद्यात लवकरात लवकर बदल कसा करता येईल याची तपासणी विभागाकडून करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

नियमानुसार डिजिटल सेट-ॲप बॉक्स बसविणे अनिवार्य केले असल्याने उक्त कंपन्याच्या कामकाजावर नियंत्रण बसले आहे काय ? याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी महिती खालीलप्रमाणे आहे.

केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय यांनी कंन्डीशनल ॲक्सेस सिस्टीम व ॲडरेसिबीलीटी पध्दती लागू केली असून यानुसार राज्यातील बृहन्मुंबई क्षेत्रात दि. ३१

ऑक्टोबर, २०१२ पर्यंत, १० लक्ष लोकसंख्येपर्यंतचे महानगर क्षेत्रात दि. ३१ मार्च, २०१३ पर्यंत, उर्वरीत सर्व शहरी क्षेत्रात दि. ३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत, उर्वरीत भारतात दि. ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत केबल सेवा सेटटॉप बॉक्सद्वारे डीटीएचच्या धरतीवर प्रक्षेपित केली जाणार आहे. यामुळे नजिकच्या कालावधीत केबल जोडण्यांची निश्चित संख्या राज्य शासनाकडे उपलब्ध होईल. केबल जोडण्यांची संख्या निश्चित झाल्याने केबल आयोजकांवर निश्चितच नियंत्रण होईल.

मुंबई शहरात ४ आणि मुंबई उपनगरात १४ कंपन्या अशा एकूण १८ कंपन्या आहेत. त्याद्वारे मुंबईत प्रसारण होत असते. मुंबई वगळता इतर शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये केबल ऑपरेटर्सनी आपले स्वतंत्र चॅनेल सुरू केले आहे. ज्यावेळी ते स्वत:चे चॅनेल सुरू करतात त्यावेळी इतर चॅनेल बंद करतात. स्वत:च्या चॅनेलवरून ते बातम्या, सिनेमा यांचे प्रसारण करतात. एवढेच नव्हे तर स्थानिक दुकानदारांच्या जाहिराती देखील देतात. बुलढाणा व बीड जिल्ह्यात केबल ऑपरेटरने स्वतंत्र चॅनेल सुरू करून स्वत:ची कंपनी देखील सुरू केली आहे. स्वत:चे चॅनल निर्माण करुन जाहिरातीच्या माध्यमातून केबल ऑपरेटर पैसे कमवितात त्याचा फायदा शासनास होत नाही. त्यामुळे शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान होत आहे. त्याकडे शासनाचे लक्ष नाही. बुलढाणा सारख्या ग्रामीण भागामध्ये UCN नावाचे चॅनेल केबल ऑपरेटरने सुरू केले आहे याची विभागाकडे नोंद आहे काय ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सागितले की, केबल ऑपरेटरने अशा प्रकारे अनधिकृतरित्या स्वत:चे चॅनेल सुरू करणे कायद्याला धरून नाही. त्यामुळे अशा केबल ऑपरेटरचे चॅनेल तातडीने बंद करुन त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी अशी सूचना समितीने केली.

विभागाने अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील केबलसंबंधातील माहिती समितीला द्यावी असे निदेश समितीने दिले असता याबाबतची माहिती घेऊन समितीला देण्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले. परंतु अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे. तसेच विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, स्वत:चे चॅनेल सुरू करणे ही गंभीर बाब आहे. आता शासन एमएसओला कायद्याच्या कक्षेत आणणार आहे. त्यावेळी जे केबल ऑपरेटर अनधिकृतपणे स्वत:चे चॅनेल सुरू करतात त्यांना देखील कायद्याच्या कार्यकक्षेत कसे आणता येईल हे पडताळून पाहिले जाईल. याबाबत कायद्यातील तरतूद समितीच्या माहितीसाठी विभागीय

सचिवांनी निदर्शनास आणली. "No Cable Operator shall carry out or include in his Cable Service any T.V. Broadcast which has not been registered by the Central Government and be viewed within the territory of India." परंतु येथे रजिस्ट्रेशनचा संबंधच येत नसल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, रजिस्ट्रेशनचा अधिकार राज्य शासनाकडे आला पाहिजे. याबाबत विभागीय सचिवांनी समितीमार्फत महालेखाकारांना विनंती केली की, रजिस्ट्रेशनचा अधिकार राज्य शासनाला द्यावा अशी महालेखाकारांनी केंद्र शासनाला विनंती करावी. पोस्ट अँड टेलिग्राफ या खात्यामार्फत रजिस्ट्रेशन केले जाते. तसेच, परवाना देण्याचे व नूतनीकरणाचे काम देखील त्यांच्यामार्फतच केले जाते. तो अधिकार विभागाला नसल्यामुळे काहीच करता येत नाही.

समितीने अशी विचारणा केली की, शासनाने डिश कंपन्यांकडून किती ग्राहक आहेत याची माहिती मागविली पाहिजे. त्यांच्याकडूनच सर्व प्राथमिक माहिती मिळू शकते. जर शासनास अधिक महसूल वसूल मिळवायचा असेल तर आपण DTH कंपन्यांकडे किती ग्राहक आहेत याची देखील माहिती घेण्यात यावी कारण या कंपन्या शासनाला कर देत नाही. त्यामुळे डिटीएच कंपन्याकडे किती ग्राहक आहे. त्यांच्याकडून शासनाला किती कर मिळतो. ग्राहकांची व कराची आकडेवारी बरोबर आहे काय याची माहिती समितीला देण्यात यावी. शासन केबल ऑपरेटरकडून मात्र कर वसूल करीत असते. सदर कर नियमित वसूल होतो काय ? याबाबत माहिती देतान विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याला संपूर्ण राज्यातील कर येतो व तो एकत्र करून शासनाकडे जमा केला जातो.

केबल ऑपरेटर ७० ते ७५ टक्के कर शासनाला भरत असतो. पण डिश कंपन्यांकडून शासन कर वसूल करीत नाही. आता केबल ग्राहकापेक्षा डीटीएच धारकांची संख्या जास्त आहे. केबल चालकांकडून शासनाने १०० टक्के कर वसुल करावा तसेच डिटीएच कंपन्यांकडून शासनास किती टक्के कर मिळतो याची माहिती देवून शासनास डिटीएच कंपन्याकडून कर कमी मिळत असल्यास किंवा काहीच मिळत नसल्यास सदर डिटीएच कंपन्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच काही केबली ऑपरेटर ग्राहकांकडून ३०० ते ५०० रु. घेतात त्याच्यावर काहीच बंधन नाही त्यांच्या शुल्काच्या मनमानी कारभारावर नियंत्रण आणता येणार नाही काय ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई व मुंबई उपनगर व पुणे यांची आकडेवारी फार कमी आहे.

सदर आकडेवारी लोकसंख्येच्या मानाने निश्चितच कमी आहे. डीटीएच कंपन्या, एमएसओ यांना कायद्याच्या कक्षेत आणणार असल्यामुळे त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर कर वसूल करता येईल.

शासनाला ५०० कोटी रूपये इतका महसूल मिळायला पाहिजे होता. तेथे फक्त ९४ कोटी इतकाच महसूल मिळत आहे. रजिस्ट्रेशन करणे, परवान्याचे नूतनीकरण करणे इत्यादीचे सर्व अधिकार केंद्र शासनाच्या अखत्यातरित असलेल्या पोस्ट अँड टेलिग्राफ या खात्याकडे आहे. ज्यावेळी दूरदर्शन संच आले त्यावेळी पोस्ट अँड टेलिग्राफ विभागाकडून लायसेन्स घ्यावे लागत असे. तीच पद्धत येथे लागू केली आहे. पूर्वीच्या तुलनेत आता केबलचा व्यवसाय एक हजार पटीने वाढला आहे. त्यामुळे रजिस्ट्रेशनचा अधिकार, परवाना देण्याचा अधिकार, परवाना नूतनीकरण करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे असणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे जाऊन या बाबीचा पाठपुरावा केला पाहिजे. जेएनएनयुआरएम साठी राज्य शासन केंद्र शासनाकडे जाऊन निधी आणू शकते तर मग यासाठी पाठपुरावा का करू शकत नाही ? राज्यात एकूण किती केबल ग्राहक आहेत, डीटीएच धारक आहेत याकडे शासनाचे पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे आपला करोडो रूपयांचा महसूल बुडत आहे. तसेच, काही केबल ऑपरेटर्सनी स्वत:ची चॅनेल्स सुरू केली आहेत. ते त्या त्या भागातील सांस्कृतिक कार्यक्रम दाखवितात, बातम्या दाखवतात. त्यामुळे सुध्दा शासनाचा महसूल बुडतो असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

विभागाने मार्च २०१२ पर्यंत किती कनेक्शन्स आहेत या संबंधातील माहिती परिशिष्ठ १ मध्ये दिलेली आहे. साधारणत: २५ लाखाच्या आसपास हा आकडा आहे सदर २५ लाख जोडण्याची संख्या ही संपूर्ण महाराष्ट्रातील आहे काय याबाबत राज्यामध्ये ३० ते ३२ लाख डीटीएच ऑपरेटर आहे असे सांगण्यात आले. परंतु ही संख्या प्रत्यक्षात बरीच जास्त आहे. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ग्रामीण भागामधील लोकांचा कल डीटीएच सेवेकडे अधिक आहे. राज्यामध्ये केबल जोडण्या २५ लाख ७१ हजार असून डीटीएच धारकांची संख्या ३२ लाख ३४ हजार ६१० आहे. या दोन्ही ग्राहकांकडून शासनाला करमणूक कर प्राप्त होतो.

पुण्यामध्ये अनेक ठिकाणी केबल चालक ग्राहकांकडून ३.५ हजार रुपये वर्षाची रक्कम घेतात मात्र ते शासनाकडे करमणूक कर भरत नाहीत. खाजगी कंपन्यांना या माध्यमातून

मोठया प्रमाणात नफा होत असतो. मात्र तरी देखील शासनाला कराच्या रुपाने काहीही मिळत नाही. केबल ऑपरेटर्स खूप मोठया प्रमाणात नफा मिळवतात. तसेच सध्या एअर टू एअर व डीटीएच सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना मोठया प्रमाणात नफा होत असूनही या कंपन्या करमणुक कराची रक्कम भरत नाहीत. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाने काढलेल्या सूचनेनुसार, ३१ ऑक्टोबर नंतर मुंबई व इतर मोठया महानगरांमध्ये केबल सेवा बंद होणार आहे. दि. ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भारतातील संपूर्ण ग्रामीण भागामध्ये व शहरी भागामध्ये ४ टप्प्यांमध्ये केबल कनेक्शन बंद होणार आहे. पुणे, नागपूर, औरंगाबाद या सारख्या मोठया शहरांमध्ये प्रथम केबल सेवा बंद केली जाणार आहे. या नंतर लहान शहरे व त्या नंतर ग्रामीण भाग असे टप्पे ठरवण्यात आलेले आहेत. यापुढे केबल कनेक्शन अधिक काळ सुरु राहणार नाही.

सध्या सेटटॉप बॉक्स लावून सेवा पुरवली जाते. डीटीएच सुरु झाल्यानंतर ॲनालॉग सिस्टीम बंद होईल. मात्र याबाबत शासनाला माहिती मिळू शकते काय ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दि.३१ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत मुंबई महानगरपालिका क्षेत्र व दि. ३१ मार्च २०१३ पर्यंत पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक इ. शहरांमध्ये केबल सेवा बंद होणार आहे. If Set-top Box is installed by all then it will be easier for us to know the exact number of subscribers. We can get this data electronically. केबल चालक सेटटॉप बॉक्सद्वारे सेवा पुरवतील त्यामुळे ही सर्व माहिती शासनाला उपलब्ध होईल. तसेच डिजीटल ॲड्रेस सिस्टीमद्वारे शासनाला सर्व माहिती मिळू शकते.

सध्या मुंबई शहरामध्ये असलेल्या सेट टॉप बॉक्सबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई शहरामध्ये वेस्टर्न रेल्वे व सेंट्रल रेल्वे असे भाग केले आहेत. मुंबई, दिल्ली, कलकत्ता या प्रमुख शहरांमधून सिस्टीम कंट्रोल केली जाणार आहे. एमएसओ यांच्याकडे सर्व कनेक्शन रेकॉर्ड होतात. या माध्यमातून त्यांच्याकडे किती ग्राहक आहेत, याची माहिती शासनाला मिळू शकेल. जे ग्राहक सेटटॉप बॉक्स बसवणार नाहीत, त्यांची नोंद होणार नाही व त्यांचा टीव्ही ब्लॅंक राहील. एमएसओंकडे नोंदवलेल्या ग्राहकांची संपूर्ण यादी शासनाला मिळू शकेल.

एका घरामध्ये ४ सेटटॉप बॉक्स असले तरी एकाचेच पैसे मिळतात. तसेच हॉटेलमध्ये देखील प्रत्येक रुममध्ये कनेक्शन असते. मात्र तेवढी रक्कम मिळत नाही. या बाबत काही निर्णय घेतला जाणार आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता याबाबत विभागीय सचिवांना कोणताही खुलासा केला नाही.

आता सेट टॉप बॉक्स अनिवार्य करण्यात येणार आहे. त्या संबंधातील माहिती विभाग स्थानिक केबल ऑपरेटरकडूनच घेण्यात येणार आहे. परंतु समितीचे असे मत आहे की, सिस्टीममध्ये बदल करून डीटीएच कंपन्यांकडून सर्व माहिती घ्यावी. याचे कारण असे की, त्यांच्याकडे सगळा सेट-अप असतो. तसेच एमओएस कडून माहिती मिळू शकते. आज मोठ्या कंपन्या देखील खोटी माहिती शासनाला सादर करीत आहेत. तेव्हा त्यांची चोरी उघडकीस आणण्यासाठी विभागाकडून कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत. या कंपन्यांना देखील कायद्याच्या कक्षेत आणावे असे समितीने सूचित केले असता, याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मोठ्या कंपन्यांवर कारवाई करण्यासाठी तांत्रिक समिती नेमावी लागेल. त्याद्वारे प्रत्येक घरात किती केबल जोडण्या आहेत, एका हॉटेलमध्ये किती जोडण्या आहेत इत्यादी माहिती संकलित कशी करायची याचे मार्गदर्शन घेता येईल. याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

जळगाव मधील सन २००६ पर्यंत ६२ टक्के रक्कम वसूल झालेली होती. उर्वरित रक्कम केबल चालकांनी व्यवसाय बंद केल्यामुळे व अन्यत्र स्थायिक झाल्यामुळे पत्ता न मिळाल्याने वसूल झाली नव्हती, विभागाकडून सदर रक्कम वसूल करण्यात आली आहे काय व त्या केबल चालकांची नावे काय आहेत ? याबाबत माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींन खुलासा केला की, जळगाव मधील रूपये १५,७१,१७०/- इतकी रक्कम गुंतली होती. सदरहू रकमेची वसुली झालेली आहे. विभागाने मुद्दल वसूल केलेली असून फक्त १ लाख ८६ हजार व्याजाची रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदर रक्कम २-३ महिन्यामध्ये वसूल करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले

अभिप्राय शिफारशी

समितीला प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीवरुन असे निदर्शनास आले की, राज्यात केबल कंपन्यावर व डीटीएच कंपन्यांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसून या कंपन्या शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांनी मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, जळगांव, औरंगाबाद, अकोला व पुणे या जिल्ह्यातील केबल चालकांकडून करमणूक कर दंडनीय व्याज वसूल केले नसल्याचा मुद्दा अहवालात निदर्शनास आला होता.

मुंबई शहरात क्षेत्र क्रमांक ७ मधिल १३० केबल चालकांपैकी ४५ केबल चालक व क्षेत्र क्रमांक ८ मधिल १५२ केबल चालकांपैकी ८ केबल चालकांकडून करमणूक कर वसूल करण्यात आला नाही.

मुंबई उपनगर व ठाणे जिल्ह्यातील संपूर्ण वसूली करण्यात आली आहे अशी माहिती समितीस प्राप्त झाली. परंतु पुणे, जळगांव, अकोला व औरंगाबाद जिल्ह्यातील करमणूक शुल्क कराची वसूली किती झाली आहे व केबल चालकांकडे किती करमणूक कर थकित आहे याची माहिती वारंवार विचारणा करुन समितीस उपलब्ध होऊ शकली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

राज्यातील सर्व जिल्ह्यातून केबल चालकांकडून व डीटीएच कंपन्यांकडून शासनास जिल्हा निहाय मिळणारे उत्पन्न व केबल जोडणीची व डी.टी.एच. जोडणीची प्रत्येक जिल्ह्यांची संख्या मागील तीन वर्षाची आकडेवारी समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

राज्यातील ज्या जिल्ह्यांकडून केबल जोडणीची व डी.टी.एच. जोडणीची खोटी आकडेवारी सादर करण्यात आली व जाणीवपूर्वक वसूली केली नाही. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी करमणूक कर शासनास न भरण्यास करदात्यांना प्रोत्साहन दिले अशा संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

राज्यातील बऱ्याच शहरात / गावांमध्ये ठराविक केबल चालकांकडे केबल व्यवसाय असून हे केबल चालक त्यांच्या एरियामध्ये इतर केबल व्यावसायिकास व्यवसाय करण्यास वा व्यवसायाच्या निमित्ताने प्रवेश करण्यास प्रतिबंध करतात. **केबल चालकाकडून दादागिरी करण्यात येते. प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्यास व्यवसाय करु दिला जात नाही. मोजक्याच व्यावसायिकांच्या हाती केबल व्यवसाय एकवटला असल्याने हे केबल व्यावसायिक केबल**

धारकांची अचूक संख्या जाहिर करीत नाहीत त्यामुळे शासनास देखिल करमणूक करास मुकावे लागते. त्यामुळे राज्यातील केबल चालकांच्या परवान्याची तपासणी करुन जे केबल चालक शासनाचा कर चुकवत असतील व फसवणूक करत असल्याचे आढळल्यास अशा केबल चालकांचे परवाने रद्द करण्याची कार्यवाही करावी व प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या केबल चालकांना परवाना देवून प्रोत्साहित करावे. या सर्व बाबींचा आढावा घेवून ठोस उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

केबल चालकांकडून शासन करमणूक कर घेत असते परंतु नव्याने अस्तित्वात आलेल्या DTH **याची सेवा पुरविण्यात मोठ-मोठ्या कंपन्यांकडून शासन कोणत्या आधारे करमणूक कर वसुल करते याबाबत निश्चित अशी माहिती प्राप्त झाली नाही. आता शहर व गावांतील बहुतांश घरांमध्ये** DTH **चे पेव फुटले आहे.**

शासनास अधिक महसूल मिळवायचा असेल तर DTH कंपन्यांकडे किती ग्राहक आहेत याची माहिती घेण्यात यावी. केबल ग्राहकापेक्षा डीटीएच धारकांची संख्या जास्त आहे. **केबल चालकांकडून शासनाने १०० टक्के कर वसूल करावा तसेच डि.टी.एच. कंपन्यांकडून शासनास किती व तो कशाच्या आधारे मिळतो याची माहिती घेवून शासनास डि.टी.एच. कंपन्याकडून कर कमी मिळत असल्यास किंवा काहीच मिळत नसल्यास सदर डि.टी.एच. कंपन्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अकोला जिल्ह्यातील दोन केबल चालक बेपत्ता व गरीब असल्यामुळे शासनास त्यांच्याकडे थकित असलेला करमणूक कर वसूल करता येत नसल्याची माहिती विभागाच्या सचिवांनी समितीस दिली. परंतु श्री.निधाने व श्री.घुमरे हे केबल चालक अकोला येथे वास्तव्यास असून ते नियमितपणे दिसत असल्याची माहिती समितीने दिली व विभागास या प्रकरणी अधिक चौकशी करुन समितीस अवगत करण्याचे आदेश दिले. याबाबत याप्रकरणी विभागाच्या सचिवांनी पुन्हा चौकशी केली असता श्री.निधाने व श्री.घुमरे सापडल्याची माहिती समितीला दिली. त्यामुळे समितीने माहिती देण्यापूर्वी संबंधित केबल चालक शासनाच्या कर्मचाऱ्यांना कसे सापडू शकले नाही व समितीने माहिती देताच ते सापडने यामुळे या कर्मचाऱ्यांच्या हेतू बद्दलच शंका उपस्थित होते. **याप्रकरणी जे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी समितीला असत्य माहिती दिली आहे त्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई**

करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

महसूल व वन (वन) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालामधील **परीच्छेद क्र. ६.२.७ "वन महसूलाचा कल"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

वन महसुलाचा कल

महसूलाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे ही प्रत्येक विभागीय उप वनसंरक्षकांची जबाबदारी आहे. हा अंदाज, कार्ययोजनांप्रमाणे, एका विशिष्ट वर्षात, समुपयोजनेकरीता नियत असलेल्या खंडापासून मिळणाऱ्या वन उपजांच्या अंदाजित उत्पन्नावर आधारलेला असतो आणि तो मान्यतेकरीता वन संरक्षकाच्यामार्फत प्रधान मुख्य वनसंरक्षकाकडे सादर करावयाचा असतो. लेखापरीक्षा छाननीत असे उघडकीस आले की, २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत प्रत्यक्ष महसूल अंदाजपत्रकातील अंदाजापेक्षा, दरवर्षी २३ ते ४५ टक्क्यांनी कमी पडला जे अंदाजपत्रकाचे अवास्तववादी तयार करणे दर्शविते. याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

			(रुपये कोटीत)
वर्ष	**अंदाजपत्रकातील अनुमान**	**प्रत्यक्ष**	**तफावतीची टक्केवारी (+) वाढ (-) घट**
२००१-०२	२००.००	१३४.१४	(-) ३२.९३
२००२-०३	१३६.५०	१०४.५८	(-) २३.३८
२००३-०४	१४३.३३	८६.३३	(-) ३९.७७
२००४-०५	१६०.९०	८८.६२	(-) ४४.९२
२००५-०६	१२६.४६	९२.०२	(-) २७.२३

पुढील छाननीत असे उघडकीस आले की, भंडारा आणि गडचिरोली विभागांच्या विभागीय वन संरक्षकांनी २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत, इमारती लाकडांच्या विक्रीपासून वसूल केलेले रु. ९.५७ कोटी, वन मजूर सहकारी संस्थांना समुपयोजनाकरीता नेमून दिलेल्या खंडांच्या हिशेबांना अंतिम रुप देणे न झाल्याने, महसूलात जमा न करता, वन ठेवींमध्ये ठेवून घेतले. हे निदर्शनाला आणून दिल्यावर, शासनाने वस्तुस्थिती स्विकारताना सप्टेंबर, २००७ मध्ये नमूद केले की, महसूलाच्या वसुलीतील तूट, पुननिर्मितीच्या कार्यासाठी निधीच्या कमतरतेमुळे खंडाचे समुपयोजन न झाल्याने आली.

ज्ञापन :-

सन २००१-०२ ते २००५-०६ या आर्थिक वर्षात शासनास अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकाद्वारे वन महसूलाचे प्रस्तावित उद्दिष्ट शासनाने ठरवून दिलेले उद्दिष्ट, सुधारीत उद्दिष्ट व प्राप्त वन महसूल याबाबतचे तुलनात्मक विवरण खालीलप्रमाणे आहे.

आर्थिक वर्ष	अंदाजपत्रकानुसार प्रस्तावित उद्दिष्ट	शासनाने ठरवून दिलेले उद्दिष्ट	शासनास सादर केलेल्या अर्थसंकल्पीय पत्रकानुसार सुधारीत उद्दिष्ट	प्राप्त महसूल	सुधारीत उद्दिष्टानुसार प्राप्त महसूलाची टक्केवारी कमी (-)/ जास्त (+)	शासनाकडून प्राप्त झालेल्या उद्दिष्टानुसार प्राप्त महसूलाची टक्केवारी कमी (-)/ जास्त (+)
१	२	३	४	५	६	७
२००१-०२	१२५.४२	२००.००	१३०.४५	१३४.१४	२.८२	(-) ३२.९३
२००२-०३	१२५.४५	१३६.५०	१२१.०१	१०४.५८	(-)१३.५७	(-) २३.३८
२००३-०४	१३२.४९	१४३.३३	८३.४९	८६.३३	३.४०	(-) ३९.७७
२००४-०५	१४२.८४	१६०.९०	८५.४४	८८.६२	३.७२	(-) ४४.९२
२००५-०६	१२६.४६	१२६.४६	१०७.८६	९२.०२	(-)१४.७०	(-) २७.२३

रकाना क्र.-४ मध्ये दर्शविण्यात आलेली सुधारीत उद्दिष्ट आकडेवारी पुढील वर्षासाठी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकामध्ये नमूद केलेल्या आकडेवारी वरुन आणि आठमाही संक्षिप्तीमध्ये केलेल्या सुधारीत अंदाजाप्रमाणे असल्याचे ग्राह्य धरुन घेण्यात आलेली आहे.

वन महसूलाचा सुधारीत अंदाज लक्षात घेता असे आढळून आले की, २००२-०३ ते २००५-०६ या दोन वर्षात सुधारीत अंदाजापेक्षा अनुक्रमे १३.५७ टक्के व १४.७० टक्के घट झालेली आहे. याचे प्रामुख्याने तेंदू पानापासून प्राप्त होणाऱ्या महसूलामध्ये नक्षलवाद्यांचे कारवायांमुळे तसेच पावसाच्या प्रमाणातील फरकामुळे तेंदू घटकापासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात फरक येत आहे. गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात इमारती लाकडाच्या वृक्षतोडीवर ही नक्षलवाद्यांच्या कारवाईचा प्रभाव पडून वन महसूलाच्या उत्पन्नात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे वन महसूलात घट निर्माण झाली आहे.

व्यवस्थापन यंत्रणेतील त्रुटी

कार्ययोजना

कार्ययोजना हा १० वर्षाच्या कालावधीकरीता तयार केलेला दस्तऐवज आहे. ज्यामध्ये वनसंवर्धन कार्याच्या व्यवस्थापनाकरीता सविस्तर योजना अंतर्भूत असते. कार्ययोजना कार्यान्वित करण्याच्या परिणामस्वरुप मिळणाऱ्या वनउपजापासून वन विभागाला महसूल मिळतो. कार्ययोजनेचे अनस्तित्वाचा, वनांची वाढ आणि पुनर्निम्रिती यावर मोठा आघात होतो. तसेच त्याचा परिणाम वनांपासून मिळणारी वनउपजे काढण्याच्या सर्व क्रिया थांबण्यात होतो, ज्यामुळे विभागाचा महसूल प्रभावित होतो आणि म्हणून कार्ययोजना तयार करणे आणि त्या वेळेत मान्य करुन घेणे हे पर्यावरण आणि विभागाच्या हिताचे आहे. लेखापरीक्षा छाननीत कार्ययोजना तयार करणे आणि त्यांचे कार्यान्वयन यांत बऱ्याच न्यूनता निदर्शनास आल्या ज्या खाली नमूद केल्या आहेत.

ज्ञापन :-

संपूर्ण वनांचे व्यवस्थापन हे कार्य आयोजनेत मूलभूत वनाचे गरजेनुसार तयार करण्यात आलेल्या तरतुदीप्रमाणे व पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांनी मंजूरी प्रदान केल्याप्रमाणे करण्यात येते. सदर लेखापरीक्षण पथकाने नोंदविलेले आक्षेप हे कार्य आयोजनाच्या उद्दिष्टावर आधारीत असल्याने याबाबत कोणताही खुलासा करण्याची गरज नाही. बांबूचे समुपयोजन न झाल्याने महसूलाची हानी

कार्ययोजना तयार करणे :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे मार्फत भारत सरकारची मंजूरी प्राप्त करण्याकरीता पुरेसा अवधी मिळण्याकरीता उप वन संरक्षक यांना कार्यआयोजना सुधारित करण्याचे काम विद्यमान योजनेचा काळ समाप्त होण्याआधी अडीच वर्षे हाती घ्यावे लागते. तीन विभागांनी २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत कार्ययोजना तयार केली नाही तर आठ विभागात २००१-०२ व २००५-०६ या दरम्यान एक ते तीन वर्षाकरीता अखंड कार्ययोजना नव्हत्या.

कार्ययोजना तयार करणे आणि वेळेवर भारत सरकारला सादर करणे याची निश्चिती करण्याकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे काहीही संनियंत्रण नव्हते. विद्यमान कार्य आयोजनेचा काळ समाप्त होण्याआधी, नवीन कार्ययोजना तयार न करणे याचा परिणाम या विभागांमधून इमारती लाकडांच्या विक्री पासून मिळणारा महसूल प्राप्त होणे लांबणीवर पडण्यात झाला.

ही प्रकरणे निदर्शनास आणल्यानंतर, शासनाने वस्तुस्थिती मान्य करताना सप्टेंबर २००७ मध्ये नमूद केले की, कर्मचाऱ्यांच्या टंचाईमुळे कार्यआयोजना तयार करण्यास उशिर झाला. पुढे असे नमूद केले की, भविष्यात इतर विभागांचा कर्मचारी वर्ग कामाला लावला जाईल व दोन वर्षाचे आत सर्व विभागात कार्ययोजना तयार केल्या जातील. कार्ययोजना तयार करण्यासाठी रिमोट सेन्सिंग आणि डिजिटल आधारसामग्रीही वापरली जाईल. हे उत्तर समर्थनीय नाही कारण विभागात वेगळे कार्ययोजना विभाग अस्तित्वात होते कार्ययोजना तयार करणे आणि त्यांना अंतिम रुप देणे या एकमेव हेतून निर्माण केले आहेत.

ज्ञापन :-

राज्यातील ११ वनवृत्तांमध्ये ५१ वनविभाग/उपवनविभाग समाविष्ट आहेत. प्रत्येक वनवृत्तांमध्ये ३ ते ५ विभाग आहेत. कार्य आयोजना तयार करण्याकरीता प्रत्येक वनवृत्तात एक कार्यआयोजना विभागाची स्थापना करण्यात आली असून त्यांचेमार्फत त्या त्या संबंधीत वनवृत्तांत प्रलंबित असलेले कार्य आयोजनेचे पुर्न:निरीक्षण करण्यात येत असते. लेखापरीक्षणाचे मत हे डहाणू/पश्चिम नाशिक/यावल या वनविभागाच्या सन २००१-२००२ ते २००५-२००६ पर्यंतचे असुधारीत कार्य आयोजनेवर व ८ विभाग (आलापल्ली/मध्ये चांदा/पूर्व मेळघाट/ गडचिरोली/नागपूर/पांढरकवडा/सोलापूर आणि वडसा) यांचे १ ते ३ वर्षाचे खंडीत कालावधीकरीता कार्य आयोजनेच्या वस्तुस्थितीवर आधारीत आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे नियंत्रण असुनसुध्दा वरील कार्य आयोजन या अधिकारी/कर्मचारी वृंदाच्या उपलब्धतेअभावी केंद्र सरकार यांना वेळीच सादर करणे व त्यावर मंजूरी घेणे शक्य झाले नाही. ही बाब शासनाने सप्टेंबर २००७ मध्ये स्वीकृत केलेली आहे. कार्य आयोजनेच्या अधिकारी/कर्मचारी वृंदाच्या उपलब्धते संदर्भात सुधारणा केल्यानंतरच कार्य आयोजनेचे कामास गती देण्यात आली आहे.

कार्य आयोजनेची सद्यस्थिती व त्याचा कालावधी खालीलप्रमाणे

अ.क्र.	विभाग	कार्य आयोजनेचा कालावधी	सद्यस्थिती
१.	डहाणू	२०१०-११ ते २०१९-२०	प्रगती पथावर
२.	पश्चिम नाशिक	२००७-०८ ते २०१६-१७	प्रगती पथावर
३.	यावल	२००७-०८ ते २०१६-१७	प्रगती पथावर
४.	आलापल्ली	२००४-०५ ते २०१३-१४	प्रगती पथावर
५.	मध्य चांदा	२००४-०५ ते २०१३-१४	प्रगती पथावर
६.	पूर्व मेळघाट	२००६-०७ ते २०१५-१६	प्रगती पथावर
७.	गडचिरोली	२००७-०८ ते २०१६-१७	प्रगती पथावर

८.	नागपूर	२००४-०५ ते २०१३-१४	प्रगती पथावर
९.	पांढरकवडा	२००२-०३ ते २०११-१२	कार्य आयोजना संपली
			प्राथमिक कार्य आयोजना अहवाल-२ वनसंरक्षक कार्य आयोजना यवतमाळ कडून प्राप्त.
१०.	सोलापूर	१९९५-९६ ते २००४-०५	कार्य आयोजना संपली. प्रारुप कार्य आयोजना अहवाल मुख्य वनसंरक्षक कार्य आयोजना पुणे कडून अपेक्षित.
११.	वडसा	२००२-०३ ते २०११-१२	कार्य आयोजना संपली. प्रारुप कार्य आयोजना अहवाल केंद्र शासनाकडे सादर.

वरील तक्त्यानुसार कार्य आयोजनेचे बळकटीकरण करणेसाठी शासनाने, योग्य पाऊल उचलल्याने व उचलत असल्याने नवीन कार्य आयोजना संपुष्टात येणे अगोदर तयार करणे शक्य झाले आहे.

सन २०१२-१३ दरम्यान वनसंपत्ती सर्वेक्षण (जे कार्य आयोजना तयार करण्याकरीता फारच गरजेची आहे.) करण्याकरीता शासनाने २ वनसंपत्ती सर्वेक्षण घटकांची नागपूर व पुणे येथे कंत्राटी पध्दतीने निर्मिती केलेली आहे.

कार्ययोजनांचे कार्यान्वयन :-

कार्ययोजनेमध्ये वनक्षेत्र हे विविध कार्य मंडळांमध्ये विभागलेले असते आणि मंडळे खंडामध्ये विभागलेली असतात. कार्ययोजनांमधील विहितकांप्रमाणे, एका विशिष्ट वर्षात समुपयोजनाकरीता योग्य असलेल्या खंडावर चिन्हांकन करण्याचे काम ज्या वर्षात तो खंड समुपयोजनाकरता योग्य आहे त्याच्या आधीच्या वर्षात करावयाचे असते. कार्ययोजनांमधील विहितकांप्रमाणे खंडाचे समुपयोजन न केल्याचा परिणाम, तोडलेल्या इमारती लाकूड आणि इतर उपजांपासून मिळू शकणारा महसूल लांबणीवर टाकण्यात होतो आणि शिवाय पुननिर्माण कार्यात अडथळा निर्माण होतो. ज्याचा भविष्यातील महसुलावही प्रतिकुल परिणाम होतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या सप्टेंबर २००० मध्ये निर्गमित केलेल्या निदेशांप्रमाणे, शासनाला कार्ययोजनांमधील विहितकांप्रमाणे वनांमधील समुपयोजन प्रारंभ करण्यापूर्वी वनांच्या पुननिर्मितीसाठी पुरेशा निधीची तरतूद करणे आवश्यक होते. शिखर न्यायालयाच्या, या निर्देशानुसार राज्य शासनाने पुननिर्माण कार्यासाठी पुरेशा निधीची तरतूद केली आहे हे निश्चित केल्यानंतर भारत सरकारने समुपयोजनाची परवानगी द्यावयाची होती.

मुंबई वने नियमपुस्तिका, कार्य योजनांमधील विहितके आणि वर्षातील प्रत्यक्ष समुपयोजन यांची तुलना करण्यासाठी नियंत्रण पुस्तके ठेवणे आणि इमारती लाकूड आणि इतर वनउपजे यांचे उत्पन्न आणि त्यापासून मिळालेला महसूल याची नोंद ठेवणे, निर्धारित करते. लेखापरीक्षा छाननीत असे उघडकीस आले की, राज्य शासनाने २००२-०३ मध्ये पुर्ननिर्माण कार्यासाठी रु. ५५.७५ कोटी आवश्यक असताना फक्त रु. २१.९८ कोटींची तरतूद केली होती. राज्य शासनाच्या अपयशामुळे भारत सरकारने समुपयोजनाकरीता परवानगी दिली नाही ज्याचा परिणाम इमारती लाकडाचे समुपयोजन न होण्यात आणि त्यामुळे महसुलाची वसुली न होण्यात झाला ज्याची चर्चा खाली केली आहे.

सहा विभागात असे आढळून आले की, जरी ६५१ खंडांचे समुपयोजन वर्ष २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत करावयाचे होते, तरी या खंडाचे समुपयोजन झाले नाही ज्याचा परिणाम रु. १४७.६३ कोटीचा महसूल न वसूल होण्यात झाला. ज्या खंडाचे समुपयोजन झाले नव्हते त्यांचा तपशिल समुपयोजन न करण्याच्या विभागाने दिलेल्या कारणासहित खाली दिला आहे.

विभाग	ज्या वर्षाचे समुपयोजन करावयाचे होते	समुपयोजनाकरीता खंड (संस्था)	अंदाजित उत्पन्न		वसूल न झालेला अंदाजे महसूल (रु. कोटीमध्ये)	समुपयोजन न झाल्याची कारणे
			इमारती लाकूड (घ.मी.)	जळावू लाकूड (बोट्सची संख्या)		
नागपूर	२००४-०५	१४	५२५.००	१८७.००	०.३८	निधीची अनुपलब्धता
भामरागड	२००१-०२ ते २००५-०६	४६९	१९३८०६.२५	८०६११.५०	१३२.१५	नक्षलवाद्यांचा प्रभाव
भंडारा	२००२-०३	३६	१०७७९.०६	२२२७९.०० आणि २१२२७ बंध्या	५.२३	भारत सरकारकडून परवानगी मिळाली नाही
गडचिरोली	२००१-०२	३३	४३७६.८८	२०४९३.००	१.०७	नक्षलवाद्याचा प्रभाव
	२००२-०३	३९	३३४८.५७	१७४०३.००	१.२८	भारत सरकारकडून परवानगी मिळाली नाही
पांढरकवडा	२००२-०३	३२	४६००.००	१४००.००	६.३३	भारत सरकारकडून परवानगी मिळाली नाही
वडसा	२००३-०४ ते २००५-०६	२८	२४३७.००	४९४३.००	१.१९	नक्षलवाद्यांचा प्रभाव
एकूण		६५१	२११८७२.७६	१४७३१६.५० व २१२२७ बंध्या	१४७.६३	

असेही दिसून आले की, चार विभागात नियंत्रण पुस्तके ठेवली नव्हती. याने असे दर्शविले की, कार्ययोजनेतील विहितकाप्रमाणे, खंडाचे समुपयोजनावर लक्ष ठेवण्यासाठी

महत्वाचे अंतर्गत नियंत्रणाचे कार्यान्वयन होत नव्हते, ज्यामुळे कार्ययोजनांतील उणीवा ठळकपणे निदर्शनास आणून दिल्या जात नव्हत्या.

ही प्रकरणे निदर्शनास आणल्यानंतर, शासनाने वस्तुस्थिती स्विकारताना, सप्टेंबर २००७ मध्ये असे नमूद केले की, गृह खात्याबरोबर विचारविनिमय केल्यानंतर नक्षलग्रस्त क्षेत्रातील खंडाच्या समुपयोजनाबद्दल निर्णय घेण्यात येईल. पुढे असे नमूद करण्यात आले की, भविष्यात खंडाचे समुपयोजन न करण्याची इतर कारणे कमीत कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

ज्ञापन :-

सह वनविभागामध्ये इमारती लाकडांच्या निष्कासनाबाबत परिच्छेदात नोंदविलेल्या मतानुसार अनुदानाची अनुपलब्धता, नक्षलग्रस्त भागातील उद्‌भवणाऱ्या समस्या आणि केंद्र शासनाकडील परवानगी न मिळणे इत्यादी मुख्य कारणांमुळे सन २००१-०२ ते २००५-०६ मध्ये रुपये १४७.६३ कोटीचे महसूल उपलब्ध होऊ शकले नाही. भामरागड/गडचिरोली/वडसा हा भाग अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त असल्यामुळे कुप निष्कासनाची कामे ही तेथील परिस्थितीवर अवलंबून असून प्रभावीत झालेली आहे.

सन २००२-०३ मध्ये कुप तोडीचे प्रस्ताव केंद्र शासनास पत्र क्रमांक FDM/2000/CR-/195/II/F-2, Dt. 03/09/2002. अन्वये सादर करण्यात आली असून त्यास केंद्र शासनाकडील पत्र क्रमांक F. No.9-11/2000/ROHQ, Dt. 27/01/2003. अन्वये विलंबाने मंजूरी प्राप्त झाली. विलंबाने प्राप्त झालेल्या मंजूरीमुळे भंडारा/गडचिरोली/पांढरकवडा वनविभागांमध्ये सन २००२-०३ मध्ये कामे करणे शक्य झाले नाही. त्याचप्रमाणे सन २००४-०५ मध्ये नागपूर विभागातील १४ कुपांची कामे निधी उपलब्धतेअभावी होवू शकली नाहीत. वरील सर्व प्रकरणांमध्ये अशाच कारणामुळे कुपांमध्ये कामे होऊ शकली नाहीत. वन महसूलात घट झालेली नसून ती झाडांच्या स्वरुपात आजही वनांमध्ये अस्तित्वात आहे. कुप कटाई झालेली नसल्याने शासन महसूलात घट झाली असे म्हणणे संयुक्तिक ठरत नाही.

तरीपण वेळेवर केंद्र शासनाकडून मंजूरी घेणे व नक्षलग्रस्त भागात जास्तीत जास्त क्षेत्रात काम करण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहे.

वर्षवार केंद्र शासनाकडे तोडीचे प्रस्ताव सादर केल्याबाबत व केंद्र शासनाकडून प्राप्त मंजूरी बाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

वर्ष	केंद्र शासनाकडे सादर केलेले तोडीचे प्रस्ताव	केंद्र शासनाकडून तोडीस प्रस्तावाची मंजूरी
२००८-०९	FDM/CR-66/F-2, Dt.09/06/2008	F.No.9-11/20 (I-RO)(HQ), Dt.10/11/2008
२००९-१०	FDM/2009/CR-36/F-2, Dt.20/07/2009	F.No.9-11/2001 ROHP (Pt). Dt. 02/12/2009
२०१०-११	FDM/2010/CR-52/F-2, Dt.06/08/2010	F.No.9-11/20 ROHQ, Dt. 02/12/2010
२०११-१२	FDM/2011/CR-/F-2, Dt. 28/09/2011	F.No.9-10/2010- ROHQ, Dt. 30/11/2011

माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी सप्टेंबर २००० मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याकरीता शासनाकडून पुर्ननिर्मिती करीता जास्तीत जास्त रकमांचे प्रावधान करण्यात येत आहे. वेगवेगळ्या कुपाचे कुप कंट्रोल फार्म विभागीय स्तरावर पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. कारण ती माहिती कार्य आयोजनेच्या पुर्ननिरिक्षणाकरीता गरजेचे असते.

बांबूचे समुपयोजन

कार्ययोजनेमध्ये बांबूचे खंड-३ पातन मालिकामध्ये विभागलेले असतात आणि प्रत्येक पातन मालिका दर तीन वर्षांनी कापणीकरीता परिपक्व होते. जर एका पातन मालिकेतील बांबू ठरलेल्या वर्षात कापले नाहीत तर ती पातन मालिका फक्त तीन वर्षानंतरच कापता येते. ज्याचा परिणाम महसूलाची हानी होण्यात होतो. बांबू खंडाचे समुपयोजन न झाल्यास जे तीन वर्षानंतर समुपयोजनास योग्य होतात अशा नवीन कोंबाचे पुर्ननिर्माण खुंटते लेखापरीक्षा चाचणीमध्ये बांबूच्या समुपयोजनामध्ये खंबीर उणीवा उघडकीस आल्यास ज्या विभागाने वेळेवर कार्यवाही केली असती तर टाळल्या जाऊ शकत होत्या.

ज्ञापन :

कार्यआयोजनेमध्ये बांबू ओव्हरलॅपिंग कार्यवृत्त म्हणून एक कार्यवृत्त असते त्याची व्याप्ती वन विभागाच्या पूर्ण क्षेत्रास जिथे बांबू विपुल प्रमाणात नैसर्गिक व पुर्ननिर्मित रोपवनानुसार असते. अशा बांबुची सुयोग्य (सस्टेनेबेल) व्यवस्थापनाकरीता समुपयोजनाची पध्दत व कटाई क्रमकार्य आयोजनामध्ये ठरविण्यात येतो व त्यानुसार बांबु रांजण्याची कटाईची कामे करण्यात येतात जेणेकरुन त्या रांजण्यामध्ये नवीन बांबुची निर्मिती होऊन तो नवीन बांबु तीन वर्षानंतर समुपयोजनाकरीता उपलब्ध होतो. सदर परिच्छेदामध्ये केलेले निरीक्षण कार्य आयोजनेमध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे आहेत.

बांबूचे समुपयोजन न झाल्याने महसूलाची हानी

चार विभागांच्या कार्य योजनांमध्ये, ४३,०११.७२ हेक्टर क्षेत्रातील बांबू २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत समुपयोजनाकरीता योग्य होता. तथापि असे दिसून आले की बांबुखालील क्षेत्र पुर्णतः समुपयोजन न झाल्याने त्याचा परिणाम रु. ११.७२ कोटी महसूलाची हानी होण्यात झाला. समुपयोजन न होण्याची विभागांनी दिलेली कारणे खाली तपशिलवार दिली आहेत.

विभाग	समुपयोजनाकरिता क्षेत्र	प्रत्यक्ष समुपयोजनेचे क्षेत्र	समुपयोजन न झालेले क्षेत्र	विभागाने नमूद केल्याप्रमाणे समुपयोजन न झाल्याची कारणे
भामरागढ	३३,७८०.८५	१०,९३४.६३	२२,८४६.२२०	स्थानिक लोकांकडून निस्तार बांबुची कमी मागणी
भंडारा	४,८०७.७४८	२,७७४.८७४	२,०३२.२७४	निधिची कमतरता
नाशिक (पश्चिम)	८२४.००	निरंक	८२४.००	निषिध्द कटाई / चराई/आग यामुळे निकृष्ट दर्जा
जळगांव येथे यावल	३,५९९.७२	निरंक	३,५९९.७२	मंजूर कार्ययोजनेचा अभाव
एकूण	**४३,०११.७१८**	**१३,७०९.५०४**	**२९,३०२.२१४**	

विभागाने दिलेली कारणे समर्थनीय नाहीत, कारण भामरागढ विभागात, ७५ खंडापैकी ५१ खंड बल्लारपूर इंडस्ट्रीज यांना नेमून दिले होते ज्यांनी त्यांचे समुपयोजन केले आणि निस्तार बांबूंची प्रत्यक्ष गरज जाणून न घेता २४ खंड विभागीय समुपयोजनासाठी विभागाने राखीव ठेवले होते.

ही कारणे निदर्शनास आणून दिल्यावर, शासनाने वस्तुस्थिती स्वीकारतांना सप्टेंबर २००७ मध्ये नमूद केले की, भविष्यात समुपयोजन योग्य बांबूचा योग्य अंदाज घेण्याची निश्चिती करण्याकरिता कार्यवाही केली जाईल.

ज्ञापन :

दक्षिण चंद्रपूर वनवृत्त भामरागड वनविभाग

भामरागड वन विभागातील ७५ बांबू कुपे निष्कासनासाठी ठेवण्यात आली आहे. यापैकी ५१ कुपे मे. बिल्ट यांना करारनाम्यानुसार बांबूचे समुपयोजनासाठी देण्यासाठी आली आहे व उर्वरीत २४ कुपे विभागीय निष्कासनासाठी ठेवण्यात आली. तथापि कुपामध्ये बांबूची पुरेशी उपलब्धता नसणे नक्षलवादी कारवायामुळे कुपाची कामे करता न येणे या कारणामुळे विभागीय निष्कासनासाठी ठेवण्यात आलेल्या २४ बांबू पातनश्रेणी मधील काही पातनश्रेणीत निष्कासनाची

कामे झालेली नाहीत सन २००१-०२ ते २००६-०७ या वर्षात प्राप्त झालेल्या उत्पादनाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	कार्य आयोजनाप्रमाणे तोडीस उपलब्ध बांबू कुपाची संख्या	विभागीयरित्या निष्कासनासाठी राखीव कुपाची संख्या	अपेक्षीत उत्पादन (नग)		प्राप्त उत्पादन -०७		प्राप्त महसूल
			लांब बांबू	बांबू बंडल्स	लांब बांबू	बांबू बंडल्स	
१	२	३	४	५	६	७	८
२००१-०२	७५	२४	११०००००	११००००	३३६४९७	२६८४९	२५७०००
२००२-०३	७५	२४	५०००००	१९०००	२९६६९५	३०९३४	२५५१०००
२००३-०४	७५	२४	२१५०००	१८९०००	१८००२१	१३४८०	२५०५०००
२००४-०५	७५	२४	२५००००	६१०००	१९००४८	१४७९१	३१७०००००
२००५-०६	७५	२४	१९२०००	११५००	१०५०००	४७००	२०४६०००
२००६-०७	७५	२४	२०००००	५०००	५५०८०	२४३६	१२१५०००

विभागीय निष्कासन करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी लक्षात घेता २००७-०८ मध्ये २८ बांबू पातनश्रेणीपैकी ५ पातनश्रेणी विभागीयरित्या निष्कासनाकरीता ठेवण्यात येऊन बांबूचे जास्तीत जास्त उत्पादन घेता यावे या दृष्टीने उर्वरीत १९ पातनश्रेणीचे २ बांबू घटक तयार करुन निविदापध्दतीने विकण्याकरीता ठेवण्यात आले तसेच २००८-०९ मध्ये ५ पातनश्रेण्यांचे दोन बांबू घटक तयार करुन निविदा पध्दतीने विक्री करण्यास ठेवण्यात आले तथापि वरील दोन्ही वर्षात या बांबू घटकांना एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे सन २००७-०८ व २००८-०९ या दोन वर्षात विभागीयरित्या निष्कासन करुन खालीलप्रमाणे उत्पादन प्राप्त झाले.

वर्ष	कार्य आयोजनेप्रमाणे तोडीस उपलब्ध बांबू कुपाची संख्या	विभागीयरित्या निष्कासन करावयाच्या कुपाची संख्या	अपेक्षीत उत्पादन (नग)		प्राप्त उत्पादन		प्राप्त महसूल
			लांब बांबू	बांबू बंडल्स	लांब बांबू	बांबू बंडल्स	
१	२	३	४	५	६	७	८
२००७-०८	७५	२४	१०००००	८०००	१५६३६२	८३७४	९४९०००
२००८-०९	७५	२४	४५००००	९२५६२	१०१२३२	३०००	२२४९६९४

भामरागड वन विभागात बुरड नसल्याने निस्तार बांबूची मागणी नसली तरी इतर वन विभागाकरीता त्यांच्या मागणीप्रमाणे निष्कासीत बांबू पुरवठा करता येऊ शकतो. सर्व बाबींचा विचार करता भामरागड वन विभागातील सात पातनश्रेणीत दरवर्षी विभागीयरीत्या बांबू

निष्कासनाची कामे करणे शक्य आहे. उर्वरित २७ बांबू पातनश्रेणी मे.बिल्ट यांना वाटप करावी अशी शिफारस केली आहे.

नागपूर वनवृत्त भंडारा वनविभाग

भंडारा वन विभागामध्ये निरनिराळ्या बांबू पातनश्रेणीचे ३९०१.५७४ हे. क्षेत्रामध्ये बांबू उपलब्ध आहे. तीन वर्षीय तोड चक्र लक्षात घेतले असता सन २००१-०२ मध्ये निष्कासनासाठी उपलब्ध क्षेत्र पुन्हा २००४-०५ मध्ये उपलब्ध होते. तसेच २००२-०३ चे बांबू क्षेत्र २००५-०६ मध्ये निष्कासनासाठी उपलब्ध होते. यात सर्वाचा एकत्रित विचार केला असता सन २००१-०२ ते २००५-०६ या वर्षी ६२६८.६४८ हे. बांबू क्षेत्र निष्कासनासाठी उपलब्ध होते. त्यापैकी ३५२०.१७४ हे. क्षेत्रामध्ये निष्कासन करण्यात आले आहे. या निष्कासनामध्ये खालीलप्रमाणे बांबूचे उत्पादन झालेले आहे.

अ.क्र	वर्ष	उप्तादीत लांब बांबू	उत्पादीत बांबु बंडल्स	बांबू बंडल्समधील लांब बांबूची संख्या (रुपांतरीत करुन)	एकूण उत्पादीत लांब बांबू
१	२	३	४	५	६
१.	२००१-०२	४३२६९५	२०५००	१६४०००	५९६६९५
२.	२००२-०३	३८०४४४	१२७६९	१०२१५२	४८२५९६
३.	२००३-०४	१२७७००	५०४७२	४०३७७६	५३१४७६
४.	२००४-०५	२१८३९०	१०६४०	८५१२०	३०३५१०
५.	२००५-०६	८४८२०	२१४६	१७१६८	१०१९८८
	एकूण	**१२४४०४९**	**९६५२७**	**७७२२१६**	**२०१६२६५**

भंडारा वनविभागाच्या कार्य आयोजनाप्रमाणे भंडारा वन विभागात दरवर्षी ३.५० लक्ष बांबूचे उत्पादन अपेक्षित आहे. वर नमूद केल्याप्रमाणे फक्त सन २००५-०६ या वर्षात अपेक्षेपेक्षा फारच कमी उत्पादन झाले आहे. इतर वर्षात अपेक्षित किंवा अपेक्षापेक्षा जास्त उत्पादन झाले असल्याचे दिसून येते.

भंडारा वन विभागात नैसर्गिक बांबू क्षेत्र अत्यंत कमी असून उत्पादन सुध्दा कमी आहे. अशा क्षेत्रातील बांबू कमी दर्जाचे व बारीक असल्याने ते विक्री योग्य नाही. शिवाय अशा बारीक बांबूचे बुरड खरेदी करत नाही. त्यामुळे काही क्षेत्रातील बांबू कुपाचे काम करण्यात आले नाही. काम न झालेल्या क्षेत्रात विक्री योग्य बांबू नव्हता हेच प्रमुख कारण आहे.

वरील ५ वर्षात वर नमूद तक्त्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बांबूचे एकूण उत्पादन लाखाच्यावर झालेले असून ते पाच वर्षाच्या एकूण अपेक्षित उत्पादनापेक्षा नक्कीच जास्त आहे. यामुळे शासनाचे महसूलीवर कोणताही विपरीत परिणाम झालेला दिसून येत आहे.

नाशिक वनवृत्त पश्चिम नाशिक विभाग

सदर परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे पश्चिम विभाग नाशिक वनविभागात८२४.०० हे. क्षेत्रात बांबू रोपवनात बेटांची वाढ समाधानकारक नसल्यामुळे सदर क्षेत्रात बांबू निष्कासन करण्यात आलेले नाही. स्थानिक ग्रामस्थांच्या दैनंदिन गरजासाठी फार प्रमाणात होत असलेल्या अवैध तोडीमुळे बांबू बेटांची वाढ चांगल्याप्रकारे होऊ शकते.

बांबू रोपवनात लागवड केलेल्या बांबूपासून मिळणारे उत्पादन विविध बाबींवर अवलंबून असते. म्हणजेच बांबू कंदाची वाढ (रायझोमची वाढ), स्थानिक ग्रामस्थाचा सहभाग, चराई, वणवणवा व चोरटी तोड यामुळे बांबू बेटाची वाढ खुरट्या प्रमाणात होते. त्यामुळे बांबू रोपवनातील जीवंत रोपांच्या टक्के वाढीवर परिणाम होतो.

धुळे वृत्त, यावल वन विभाग

यावल वन विभागाचे मंजूर कार्य आयोजनाचा कार्यकाल संपलेला होता त्यामुळे लेखापरीक्षण केलेले कालावधीत म्हणजेच सन २००१-०२ ते २००५-०६ दरम्यान बांबूचे समुपयोजन होऊ शकले नाही.

बांबूचे समुपयोजन करण्यासाठी कार्यआयोजन मंजूर असणे आवश्यक असते. कार्यआयोजन मंजूर नसताना बांबूचे समुपयोजन करणे ही कृती वनसंवर्धन अधिनियमाचा भंग होत असल्याने त्या कालावधीत समुपयोजन होऊ शकले नाही. पर्यायाने महसूलाची हानी झालेली आहे.

कार्यआयोजना तयार करणेकामी वन विभागात स्वतंत्र शाखा असून या शाखेमार्फत कार्यआयोजन तयार करण्याचे काम क्षेत्रीय अभ्यास करुन केले जाते व त्यास दोन ते तीन वर्षाचा कालावधी लागतो. अपवादात्मक परिस्थितीत हा कालावधी लांबू शकतो व अशी बाब वन विभागाचे कार्यआयोजन तयार करतांना झालेली आढळून येते. समुपयोजन न झाल्यामुळे महसूलाची हानी झाली असे दिसून येत असले तरी बांबू वनक्षेत्र समृध्द झालेले आहे.

कंत्राटदारांकडून बांबूचे समुपयोजन न झाल्याने महसूलाची हानी

वडसा विभागात, डिसेंबर २००१ मध्ये २००१-०२ ते २००३-०४ या कालावधीत तीन बांबू खंड समुपयोजित करण्याकरीता दोन कंत्राटे निष्पादित केली गेली. निविदेच्या एका शर्तीप्रमाणे

प्रत्येक पुरवठा वर्षाच्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी, कामाच्या हंगामाप्रमाणे बांबूची कापणी करण्याकरीता प्रत्येक वर्षाकरीता प्रतिभूती ठेव वेगळी द्यावयाची होती आणि स्वामित्वधन हे तीन हप्त्यात, त्या त्या पुरवठा वर्षाच्या ऑक्टोबर, डिसेंबर व फेब्रुवारी मध्ये आगाऊ द्यावयाचे होते. याप्रमाणे विभागाने समुपयोजनाकरीता भारत सरकारची परवानगी पुरवठा वर्ष प्रारंभ होण्यापूर्वी प्राप्त करणे आवश्यक होते.

कंत्राटदारांनी फक्त २००१-२००२ मध्ये बांबूचे समुपयोजन केले आणि स्वामित्वधन आणि अन्य कर याकरता २००२-०३ वर्षाकरीता प्रतिभूती ठेव रु. ४.६३ कोटी करीता दिली नाही. कारण विभागाने २००२-०३ चे पुरवठा वर्ष सुरु होण्याअगोदरच समुपयोजनाकरीता परवानगी दिली नाही. अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले की, राज्य शासनाने पुननिर्माण कार्याकरीता आवश्यक अंदाज पत्रकीय तरतूद वेळेवर न केल्याने, भारत सरकारने २००२-०३ मध्ये (समुपयोजनाकरीता) परवानगी दिली नाही असे दिसून आले की, भारतसरकारची मान्यता मिळाल्यानंतरही विभागाला अस्तित्वातील कंत्राटे समाप्त करण्यात आणि ३१ मे, २००३ पर्यंत उर्वरित असलेल्या कामाच्या हंगामापर्यंत नवीन निविदा बोलावण्यात अपयश आले. कंत्राटे ८ महिन्याच्या विलंबानंतर सप्टेंबर २००३ मध्ये समाप्त करण्यात आली.

पुढे असे दिसून आले की, हे २००३-०४ मध्ये समुपयोजनाकरीता योग्य असलेले तीन खंड, ज्याकरीता भारत सरकारची परवानगी ऑक्टोबर २००३ मध्ये मिळाली, मार्च २००४ मध्ये बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेडला मूळ कंत्राटदारांनी देऊ केलेल्या दरापेक्षा कमी दराने विकले, ज्यामुळे महसूलाची रु. ६.३१ कोटी इतकी हानी झाली.

याप्रमाणे, पुननिर्माण कार्याकरीता पर्याप्त निधीची तरतूद करण्यातील विभागाच्या अपयशाचा परिणाम २००२-०३ मध्ये बांबू खंडाचे समुपयोजन न होण्यात आणि २००३-०४ मध्ये खंडाची विक्री कमी दराने होण्यात झाल्याने महसूलाची रु. १०.९४ कोटी हानी होण्यात झाला.

हे निदर्शनाला आणून दिल्यावर शासनाने सप्टेंबर २००७ मध्ये वस्तुस्थिती स्वीकारली.

ज्ञापन :

मे.बिल्ट यांनी शासनाशी सन १९९१-९२ ते २०००-०१ या दहा वर्षासाठी बांबू पुरवठा करण्यासाठी केलेला करारनामा संपुष्टात आल्यानंतर शासनाने पुढील तीन वर्षासाठी (पुरवठा

वर्ष २००१-०२ ते २००३-०४) निविदा द्वारा बांबू विक्री करण्याचे आदेश दिलेत. या आदेशान्वये आलापल्ली, सिरोंचा, गडचिरोली, वडसा, चंद्रपूर, मध्य चांदा व पूर्व मेळघाट या सात वन विभागातील बांबू क्षेत्राचे २१ बांबू घटकात रुपांतर करुन निविदाद्वारा विक्रीसाठी निविदा काढण्यात आल्यात. वडसा वन विभागातील बांबू क्षेत्राचे ६ मालेवाडा, ७ बेडगाव, ८ कुरखेडा या तीन घटकात (एक घटक व एक समुह घटक असे दोन) विभागणी करुन निविदा काढण्यात आलीत. ६ मालेवाडा हा बांबू घटक मे.ओम ट्रेडींग कंपनी, नागपूर व ७ बेडगाव, ८ कुरखेडा हा एकत्रित तयार केलेला बांबू समुह घटक मे.जगदीश ट्रेडींग कंपनी, नागपूर यांनी क्रमशः रु. १२२२/- प्रति नोशनल टन व रु. ९२१/- प्रति नोशनल टन दराने दिलेली निविदा शासनाने मंजूर केली. दोन्ही कंपनीने निविदा कराराच्या प्रथम वर्षी (सन २००१-०२) बांबू निष्कासनाचे काम पूर्ण केलेले आहे.

सन २००२-०३ मध्ये कार्य आयोजनासाठी अर्थसंकल्पीय मागणी रु. ८३३९५० हजार अनुषंगाने शासनाने रु. २३८२९४ हजार इतके अनुदान वाटप करण्यात आले होते. एकूण रु. ७०४५३ हजार ची अतिरिक्त मागणी आकस्मिक निधी मधून मंजूर करण्यात आली होती नंतर केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. ९-११/२००१ RO(HQ) दिनांक २७ जानेवारी, २००३ अन्वये बांबू समुपयोजनाची परवानगी दिली.

दिनांक २७/०१/२००३ ला केंद्र शासनाच्या कोअर ग्रुपची परवानगी प्राप्त झाल्यानंतर उपवनसंरक्षक, वडसा यांनी तसेच वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर यांनी दिनांक ०७/०२/२००३ ला कंपनीला (ओम ट्रेडींग कंपनी, नागपूर व जगदीश ट्रेडींग कंपनी, नागपूर) करारनाम्याप्रमाणे सुरक्षा ठेव व अतिरिक्त सुरक्षा ठेव तसेच इतर रकमा भरुन कुपाचा ताबा घेऊन काम सुरु करण्यासाठी कळविण्यात आले. त्यानंतर दिनांक १५/०२/२००३ व दिनांक १७/०२/२००३ चे पत्रान्वये उपवनसंरक्षक, वडसा यांनी परत रकमा भरुन काम सुरु करण्यास कंपनीला कळविले. दिनांक १८/०२/२००३ चे पत्रान्वये दोन्ही कंपनीने सन २००२-०३ हंगामाचा work season सुरु होण्यापूर्वी केंद्र शासनाची परवानगी प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून कुपाची रक्कम भरण्यास नकार दिला. सदर पत्र दिनांक २४/०२/२००३ ला प्राप्त झाले.

करारनामा रद्द करण्यासाठी दहा दिवसाची नोटीस देणे आवश्यक आहे. करारनामा रद्द करण्यात आल्यानंतर कुपाचे पुर्ननिविदा मागवून निविदाद्वारे काम करण्याचे निश्चित करण्याचे ठरविले असते. तर वर्तमानपत्रात जाहीरात देणे, १५ दिवस निविदा उघडून शासनाकडून

मंजूरी घेणे, १५ ते ३० दिवस मंजूर निविदा धारकाकडून करारनामा करण्यास कळविणे व करारनामा करणे, ८ ते १५ दिवस असा एकूण ४५ ते ६० दिवसाचा कालावधी लागला असता म्हणजेच एप्रिल २००३ संपला असता किंवा कदाचित १५ मे पर्यंत सदर कार्यवाही लांबली असती व उर्वरीत १५ दिवस ते एक महिन्यामध्ये कोणताही निविदाधारक काम करण्यास तयार झाला नसता. त्यामुळे दिनांक २६/०१/२००३ पासून नविन करारनामा करण्यास लागणारा कालावधी हा प्रशासकीय कारणास्तव लागणारा कालावधी आहे व तो टाळणे अशक्य होते. करीता यात कोणताही उशिर झालेला नाही.

सन २००३-०४ मध्ये बांबू निष्कासन करण्यासाठी केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. F No. ९/११/२००१- RO(HQ) दिनांक २७/१०/२००३ अन्वये परवानगी दिली. सन २००३-०४ मध्ये निविदा देऊनही बरेचसे बांबू घटक अविक्रीत राहिल्याने व करारनामे रद्द करण्यात आलेले बांबू क्षेत्र अनिष्कासित राहू नये यादृष्टीने शेवटच्या निविदा तारखेनंतर (म्हणजे दिनांक ०५/०१/२००४ नंतर) शासन निर्णय क्र.एफएन्डी-१५०३/प्र.क्र.१६५/फ-१, दिनांक २६/०२/२००४ अन्वये मे.बिल्ट यांना निष्कासनासाठी वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. या शासन निर्णयामध्ये बांबू पुरवठ्याचे दर निश्चित करण्यात आले होते.

शासनाला झालेल्या नुकसानीचे संबंधात उपवनसंरक्षक, वडसा यांनी संबंधीत कंत्राटदार मे.ओम ट्रेडींग कंपनी आणि मे.जगदीश ट्रेडींग कंपनी यांना नोटीसा दिलेल्या होत्या. सदर प्रकरणात मे.ओम ट्रेडींग कंपनी यांचेवर सन २००२-०३ वर्षातील झालेले नुकसानीची रक्कम रु. २.५२ कोटी रुपयेचा भरणा करण्याकरीता उपवनसंरक्षक, वडसा यांचे पत्र क्र.कक्ष-४(२)/बांबू/६३५, दिनांक १४/०५/२००६ अन्वये आणि सन २००३-०४ वर्षातील झालेली नुकसानीची रक्कम रु. ३.०३ कोटीचा भरणा करण्याकरीता उपवनसंरक्षक, वडसा यांचे पत्र क्र.क्रक्ष-४(२)/बांबू/६३७, दिनांक १४/०५/२००६ अन्वये नोटीस दिले असता कंत्राटदाराने उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका क्रमांक २८६४/२००६ दाखल केली.

मे.जगदीश ट्रेडींग कंपनी यांचेवर सन २००२-०३ या वर्षामध्ये झालेल्या नुकसानीची रक्कम रु. २.१८ कोटीचा भरणा करण्याकरीता उपवनसंरक्षक, वडसा यांचे पत्र क्र.कक्ष-४(२)/बांबू/६३८, दिनांक १४/०५/२००६ आणि सन २००३-०४ वर्षातील झालेली नुकसानीची रक्कम रु. ३.२७ कोटीचा भरणा करण्याकरीता उपवनसंरक्षक, वडसा यांचे पत्र क्र.कक्ष-

४(२)/बांबू/६३६, दिनांक १४/०५/२००६ अन्वये नोटीस दिली. कंत्राटदाराकडून अनुकूल प्रतिसाद न मिळाल्यामुळे शासनाच्या नुकसानीची रक्कम जमिन महसूलाची थकबाकी म्हणून वसूलीकरीता तहसिलदार, नागपूर यांचेकडे प्रकरण उपवनसंरक्षक, वडसा यांनी पाठविले असता कंत्राटदाराने उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ६०६९/२००६ दाखल केली. दोनही रिट याचिका संबंधी दिनांक २२/०२/२००८ ला मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधीत कंत्राटदारांना प्रत्यक्ष सुनावणीची पुरेशी संधी दिली नसल्याचे कारण नमूद करुन सुनावणीची संधी उपलब्ध करुन देण्याचे वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर यांना निर्देश दिलेले आहेत.

शासनाच्या निष्क्रियतेमुळे महसूलाची हानी

शासनाने ऑक्टोबर, २००१ मध्ये अमरावती व चंद्रपूर वन मंडलांतील २१ बांबू खंडाचे २००१-०२ ते २००३-०४ या कालावधीत समुपयोजन करण्यासाठी निविदा बोलविल्या. तथापि गडचिरोली व सिरोंचा विभागाच्या अंदाजित परिमाण ४४,९१४.८७ एअरड्राय मेट्रिक टन बांबू असलेले आठ खंड विनाविक्री राहिले कारण देऊ केलेले दर अंदाजित दरापेक्षा कमी होते. डिसेंबर २००१ आणि एप्रिल २००२ या दरम्यान पुन्हा चारदा निविदा बोलावण्यात आल्या पण केलेले दर अंदाजित दराच्या खाली होते. असे दिसून आले की बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी सप्टेंबर २००२ मध्ये या आठ विनाविक्री राहिलेल्या खंडातील बांबू २००२-०३ मध्ये रु. १,१४१.२५ प्रति एअर ड्राय मेट्रिक टन व २००३-०४ मधील बांबू रु. १,२५५.३८ प्रति एअर ड्राय मेट्रिक टन या दराने विकत घेण्याचा देकार दिला आणि शासन व बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यात डिसेंबर २००१ मध्ये झालेल्या विद्यमान भामरागड कराराच्या परिमाणात हे विना विक्री राहिलेले घटक समाविष्ट करण्याची शासनाला विनंती केली. शासनाने हा देकार तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंबाने जानेवारी, २००३ मध्ये स्वीकारला आणि शिवाय शासनाला वेळेवर पुननिर्माण कार्यासाठी निधी नियम न केल्याने भारत सरकारकडून परवानगी प्राप्त करण्यात अपयश आले. जरी बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेडनी जानेवारी, २००३ नंतर भामरागड विभागातील खंडाचे समुपयोजन केले. त्यांनी शासनाचा या आठ विनाविक्री राहिलेल्या ४४,९१४.८७ एअर ड्राय मेट्रिक टन बांबूचे समुपयोजन करण्याचा देकार स्वीकारण्यात असमर्थता दर्शविली. याप्रमाणे शासनाच्या बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेडचा देकार

स्वीकारातील विलंब तसेच पुननिर्माण कार्यासाठी निधी नियत न केल्याने भारत सरकारची परवानगी मिळविण्यातील अपयशाचा परिणाम महसूलाची रु. ५.१३कोटी हानी होण्यात झाला.

हे प्रकरण निदर्शनाला दिल्यावर, शासनाने वस्तुस्थिती स्वीकारतांना सप्टेंबर २००७ मध्ये नमूद केले की, बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेड दरांची वाटाघाट करण्याचा प्रयत्न करत होते आणि या विभागातील खंडाचे समुपयोजन करणे टाळत होते. तथापि, शासनाचे उत्तर बल्लारपूर इंडस्ट्रीज लिमिटेडचा देकार स्वीकारण्यातील तीन महिन्यापेक्षा जास्त विलंब आणि पुननिर्माण कार्यासाठी निधीची तरतूद न करणे ज्यामुळे परिणामतः महसूलाची हानी झाली, याबद्दल मौन होते.

ज्ञापन :

शासनाने अमरावती, उत्तर चंद्रपूर व दक्षिण चंद्रपूर वनवृत्तातील सन २००१-०२ ते २००३-०४ या कालावधीसाठी २१ बांबू घटकाचे विक्रीसाठी ऑक्टोबर २००१ मध्ये एकदा व जानेवारी २००२ मध्ये दोनदा अशा तीनदा निविदा मागविल्या होत्या त्या खालीलप्रमाणे.

घटक क्र.	घटकाचे नाव	घटक समुह	परिमाण (नो.ट)	प्राप्त निविदा संख्या	फेरी क्र.१ (२४/१०/०१)	फेरी क्र.२ (०३/०१/०२)		फेरीक्र.३(२३/०१/०२)	
					प्राप्त निविदा दर	प्राप्त निविदा संख्या	प्राप्त निविदा दर	प्राप्त निविदा संख्या	प्राप्त निविदा दर
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१.	गडचिरोली	१	११५००	१	३००	१	३००	१	३००
२.	पेंढरी		१५४००						
३.	चातगाव		१३९०५	१	१००	१	६४७	१	६४७
४.	धानोरा		१३९०५	१	६५१	१	६४७	१	६४७
५.	मुरुमगांव		१६०००	१	७४१	२	७०२.९०	-	-
६.	मालेवाडा		९८००	४	६७१, १२२२, ८७६,८१६, ११६१	-	-	-	-
७.	बेडगाव	२	४९००	३	६७१, ९२१, ६८६	-	३	-	-
८.	कूरखेडा		५००						
९.	आडेगाव	३	३०००	१	३५४	३	४०१, ३७५, ३४५.०९	-	-
१०.	पिंपळखुटा		४९००						
११.	मुल		३६००						
१२.	आलापल्ली	४	४६००	२	७०१, ७३८	१	९१९, ७२४	-	-
१३.	पेडीगुंडम		४८००						
१४.	ककमलापुर	५	४३००	१	६३६	१	६०३	२	५०१, ५५३
१५.	देचली		७०००						

१६.	जिमलग		९००						
१७.	सिरोंचा		८००						
१८.	बल्लारशहा	६	८००	२	३८२.७०, ३३०	-	-	-	-
१९.	जुनोणा		२००						
२०.	झरण		७००						
२१.	जरीदा		२५००	६	५२३, १०६४, ५००, ३९०.४९, ६३१, ७०१				
		११	**१,१६,६०५**						

वरील बांबू घटकांपैकी आठ घटक खालीलप्रमाणे अविक्रीत राहिले.

		२००१-०२	**२००२-०३**
१	गडचिरोली	६५००	६१००
२	पेंढरी	१५४००	१४७००
३	चातगांव	११५००	८८००
४	धानोरा	१३९०५	१४७००
१४	ककमलापुर	४३००	४०००
१५	देचली	७०००	२७००
१६	जिमलगट्टा	९००	१४००
१७	सिरोंचा	८००	१५००
		६०३०५ (N.T)	५३९०० (N.T)

दिनांक २३.१.२००२ मध्ये तिसऱ्यांदा बोलविण्यात आलेल्या निविदा नंतर शासनाने अविक्रीत राहिलेल्या घटक समुहासाठी ज्या निविदाधारकांनी सर्वात जास्त किंमतीची निविदा दिली आहे. त्यास अपेक्षित किंमतीवर व त्यांनी नकार दिल्यास इतर निविदा धारकांनां Offer देण्यात यावा. त्यांनी Offer नाकारल्यास त्यांचे लहान घटकात रुपांतर करुन विक्री करण्याचे दि. ११.३.२००२ अन्वये आदेश दिलेत. त्यानुसार मे.बिल्ट यांना तसेच निविदा धारकांना Offer देण्यात आला. परंतु मे.बिल्ट यांनी नकार कळविला तर निविदाधारकांपैकी कोणीही होकार किंवा नकार कळविला नाही. त्यामुळे उर्वरित शिल्लक आठ बांबू घटकाचे लहान १२ घटक /घटक समुहात रुपांतर करुन दि. १५.४.२००२ ला निविदा मागविण्यात आल्या. परंतु फक्त २ निविदा ९ घटकांसाठी प्राप्त झाल्या. या निविदा मे.बिल्ट यांच्या हाती होत्या. या तिन्ही निविद निर्धारीत किंमतीपेक्षा कमी होत्या.

अ.क्र.	**घटकांचे नाव**	**परिमाण**	**निविदा किंमत**	**कोणाकडून प्राप्त झाली**

१	२	३	४	५
१.	गडचिरोली	६५००	७०३	मे.बिल्ट
२.	ककचकल	२२००	६९९	मे.बिल्ट
३.	हिपानेर	५७००	६६५	मे.बिल्ट
४.	हरांडा	७५००	७०३	मे.बिल्ट
५.	कोंडावाही	६४००	२००	मे.बिल्ट
६.	येडसगोंडी	५१००	२००	मे.बिल्ट
७.	बोरीया	४९०५	५२५	मे.बिल्ट
८.	तोडे	५०००	५२५	मे.बिल्ट
९.	अर्जुनी	४०००	५२५	मे.बिल्ट
१०.	ककमलापूर	४३००	अप्राप्त	अप्राप्त
११.	देवली	७०००	अप्राप्त	अप्राप्त
१२.	जिमलगट्टा	९००		
	सिरोंचा	८००	अप्राप्त	अप्राप्त

गडचिरोली व सिरोंचा वन विभागतील निविदेद्वारे अविक्रीत राहिलेला बांबू विकत घेण्यासाठी मे.बिल्ट यांच्याकडून जर शासनाची तयारी असेल तर मे.बिल्ट अविक्रीत राहिलेले बांबू घटकही भामरागडसाठी ठरविण्यात आलेल्या दरावर व त्याच अटी व शर्तीवर घेण्यास तयार आहे असे मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि. ९.९.२००२ रोजीच्या बैठकीत मे.बिल्टने सांगितले.

सन २००२-०३ व सन २००३-०४ या पुरवठा वर्षासाठी मे.बिल्ट यांना देण्यासाठी शासन निर्णय दि. १७.१२.२००२ रोजी निर्गमित केला व याबाबत मे.बिल्ट यांना कळविण्यात आले. परंतु मे.बिल्ट यांनी बांबू कटाईची परवानगी वेळेत न मिळाल्याने काम करण्यास असमर्थता दर्शविली.

सदर बांबू घटकातील बांबूचे निष्कासन न केल्याने सदर बांबू वनामध्ये जसाचा तसा उभा असतो व हा बांबू पुढील (Rotation) मध्ये काढण्यात येऊन त्यावर्षी त्यापासून महसूल प्राप्त होतो. त्यामुळे निष्कासन न केल्यामुळे महसूलाचे नुकसान झाले असे नमूद करणे संयुक्तिक होत नाही.

"तेंदू विक्री विलंबामुळे झालेली महसूलाची हानी"

तेंदू पानाची विक्री निविदा मागवून करण्यात येते. एप्रिल-मे महिन्यात (तेंदू हंगाम), उत्पन्न मिळविण्याकरीता तेंदू पान संकलन व निष्कासनाचे करार हे आधीच्या वर्षाचे डिसेंबर

महिन्यापर्यंत अंतिमरित्या पूर्ण करणे आवश्यक असते, जेणेकरुन कंत्राटदारांना योग्य उत्पन्न देण्याचे दृष्टीने तेंदूपत्ता झाडांची छटाई इत्यादि कार्य करता यावे. या प्रक्रियेत होणाऱ्या विलंबाचा परिणाम कमी उत्पादन व कमी रकमेच्या निविदा प्राप्त होण्यात होतो.

मुख्य वनसंरक्षक (मूल्यमापन व राष्ट्रीयकरण), नागपूर यांचे कडील अभिलेख्यावरुन असे दिसून आले की, वर्ष २००५ च्या तेंदू हंगामात ४३७ तेंदू घटकांच्या निविदा मागविण्यात फेब्रुवारी २००५ पर्यंत विलंब करण्यात आला होता. परिणामस्वरुप, मात्र २३४ घटक विकले गेले आणि २०३ घटक ज्यात रु. १३.८२ कोटीचा महसूल गुंतलेला होता, अविक्रीत राहिले व तद्नंतर अनुत्पादित घोषित करण्यात आले. पुढे रु. २०.७८ कोटी इतक्या अपेक्षित महसूलाच्या तुलनेत मात्र रु. १४.८६ कोटी महसूल प्राप्त झाला. निविदा मागविण्यात झालेल्या विलंबाचा परिणाम रु. १९.७४ कोटींचा महसूल कमी प्राप्त होण्यात झाला.

ही प्रकरणे निदर्शनात आणली असता शासनाद्वारा आक्षेप स्वीकारतांना विधानसभा निवडणूकींमुळे विलंब झाल्याचे कळविण्यात आले. पुढे, तेंदू पानांची कमी मागणीचेही कारण सांगण्यात आले. तथापि, शासनाने मान्य केले की, निविदा प्रक्रियेचा निपटारा केला असता तर महसूलात लक्षणीय वाढ झाली असती.

निविदा मागविणे हा वार्षिक कार्यप्रणालीचाच एक भाग असल्यामुळे आणि निविदा प्रक्रियेतील विलंबाचा तेंदूपान विक्रीवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामाची शासनाला कल्पना असल्यामुळे शासनाद्वारा देण्यात आलेले स्पष्टीकरण समर्थनीय दिसून येत नाही. याकरीता निविदा प्रक्रिया वेळेत सुरु करावयास पाहिजे होती.

ज्ञापन :

नवीन तेंदूपाने येण्याकरीता कॉपीसिंगची प्रक्रिया हि सामान्यतः मार्च अखेर दरम्यान केली जाते सदर प्रक्रिया केल्यानंतर बिडी बनविण्यायोग्य तेंदूपाने प्राप्त होण्यासाठी सुमारे ४५ दिवसाचा कालावधी लागतो. कॉपीसिंगमुळे येणारी नवीन तेंदूपाने एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात किंवा मे सुरवातीपर्यंत उपलब्ध होतात. संकलनाचा कालावधी हा एप्रिल महिन्याचे शेवटच्या आठवड्यापासून जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत असतो त्यामुळे विक्रीची प्रक्रिया डिसेंबर किंवा जानेवारी मध्ये केली तरी बिडी तयार करणे योग्य तेंदूपानाची उपलब्धता माहे एप्रिल ते मे महिन्यात प्राप्त होते. ही बाब लक्षात घेता विक्रीच्या एकूण ३ फेऱ्या अनुक्रमे दि. २३.२.२००५, १.३.२००५, २२.३.२००५ रोजी आयोजित केल्यामुळे तेंदू घटक/घटक समुह २३४

अविक्रीत राहिले त्यामुळे एप्रिल / मे महिन्यात तेंदू हंगाम उत्पन्न मिळविण्याकरीता तेंदू पाने संकलन व निष्कासनाचे करार हे आधीच्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यापर्यंत अंतिमरित्या पूर्ण करणे आवश्यक असते ही बाब वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

शासन निर्णय क्र. एमएफपी-२१०४/प्रक्र.२१८/फ-१ दि. २.२.२००५ अन्वये तेंदूपानाचे संकलन व विल्हेवाटी बाबत सध्या चालू असलेली प्रचलित सुधारीत एकमुस्त पध्दत चालू ठेवण्याकरीता मंजूरी तसेच निविदा सूचनेतील अटी व शर्तीस मान्यता देण्यात आली. त्यानंतर विक्रीच्या एकूण ३ फेऱ्या अनुक्रमे दि. २३.२.२००५, १०.३.२००५ व २२.३.२००५ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या विक्रीच्या फेऱ्यामध्ये ४३७ घटक / घटक समुह (७७३००० प्रमाण गोणी) विक्रीसाठी ठेवण्यात आलेले होते. त्यापैकी २३४ घटक / घटक समुह (४२१६०० प्रमाण गोणी) विक्री झालेली होती, तर २०३ घटक / घटक समुह (५१४०० प्रमाण गोणी) अविक्रीत म्हणून शिल्लक राहिलेले होते. या विक्री झालेल्या घटकापासून शासनाला १५.०२ कोटी एवढा महसूल प्राप्त झाला. फेब्रुवारी महिन्यात विक्रीची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

निविदा प्रक्रियेचा निपटारा योग्य वेळेतच करण्यात आलेला आहे. तसेच लगतच्या राज्यामध्ये तेंदूपाने २००५ वर्षी संकलनाची खालीलप्रमाणे नमूद केलेली टक्केवारीचे अवलोकन केले असता तेंदूपानाची बाजारात मुळातच मागणी कमी होती. त्यामुळे राज्यात तसेच खालील लगतचे राज्यात तेंदूपानाचे संग्रहनाची सरासरी जवळपास सारखीच दिसून येते.

अ.क्र.	राज्य	टक्केवारी
१	छत्तीसगढ	६०.६३
२	मध्यप्रदेश	५२.७४
३	आंध्रप्रदेश	४८.२८
४	महाराष्ट्र	५४.५४

निविदा विक्रीची प्रक्रिया वेळेतच पूर्ण करण्यात आलेली आहे.

साक्ष :

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसुली जमा अहवालासंदर्भात वन विभागाच्या सचिवांची साक्ष दिनांक १० ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने "सर्वोच्च न्यायालय" तसेच केंद्र शासनाच्या मागर्दर्शक तत्वानुसार वन विकासासाठी कमीत कमी एवढयाच रकमेची तरतूद केली पाहिजे असे निदेश दिलेले आहेत. तुलनात्मकदृष्टया बघितले तर वन विभागाने ५० कोटी रुपयांच्या

निधीची मागणी नोंदविली तर त्यांना फक्त वित्त विभागाकडून १० लाख रुपये एवढाच निधी उपलब्ध करुन दिला जातो. याबाबतीत सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र शासन यांची मार्गदर्शक तत्वे पाळली जात नाहीत" असे अभिप्राय व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी माहिती देताना खुलासा केला की, केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाच्या निदेशानुसार एकूण बजेटच्या २ टक्के रक्कम वन विकासासाठी बजेटमध्ये दिली पाहिजे अशी शिफारस करण्यात आलेली आहे. आपल्याला वनक्षेत्राच्या विकासासाठी एकूण बजेटच्या फक्त ०.१ टक्के एवढीच तरतूद केली जाते. केंद्र शासनाची सूचना अशी आहे की, प्रत्येक वनक्षेत्रात फायर लाईन्स, वन संरक्षण आणि रिजनरेशनचे कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. यासाठी टी.सी.एम.खोदणे, सॉईल कन्झर्वेशनची कामे घ्यावी लागतात. २०१०-११ या वर्षी ३०२ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली होती, परंतु अर्थसंकल्पात मात्र ११० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ४९३ कोटी रुपये मागितले होते, परंतु प्रत्यक्षात ९४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. वनक्षेत्रांमध्ये आग लागू नये अथवा ती पसरु नये म्हणून जंगलाच्या ठिकाणी फायर लाईन्स असणे आवश्यक आहे. फायरलाईन्स उभारण्यासाठी जवळपास ९२ कोटी रुपयांची आज आवश्यकता आहे. परंतु फायर लाईन्सच्या कामासाठी फक्त १२.८५ कोटी रुपये एवढाच निधी मिळाला आहे. काही ठिकाणी फायर लाईन्स उपलब्ध नाहीत, त्यामुळे जंगले जळण्याचे प्रमाण वाढले आहे अशी माहिती दिली. त्यानुषंगाने समितीने वनक्षेत्रांना आगी लागल्यामुळे आतापर्यंत किती प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे अशी विचारणा केली असता प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी कितीही प्रयत्न केले तरी सरासरी ३५ ते ४० हजार हेक्टर क्षेत्रावरील जंगल जळते. मागील वर्षात ७० हजार हेक्टर वनक्षेत्र जळाले.

समितीने वनक्षेत्र जळाल्यामुळे गेल्या पाच वर्षात प्रत्यक्षात किती आर्थिक नुकसान झालेले आहे अशी विचारणा केली असता प्रधान वन संरक्षक यांनी वनक्षेत्रे जळण्याची संकटे अचानकपणे येतात. प्रत्यक्षात किती आर्थिक नुकसान झाले याची माहिती लागलीच सांगू शकत नाही. परंतु या जंगलांमधून जास्तीत जास्त महसूल मिळविण्याचा विभागाचा प्रयत्न असतो. १५ से.मी. कमी उंचीची वृक्ष असेल, ती ग्राऊंड फायरमध्ये जळतात. अशा कमी उंचीच्या झाडांमधून आपल्याला फारसे उत्पन्न मिळत नाही. ती बाब नुकसानात धरली जात नाही. जेवढया वृक्षांची तोड करण्यात येते, तेवढया प्रमाणात वृक्षांचे रिजनरेशन होत नाही अशी माहिती दिली.

समितीने दरवर्षी ७० हजार हेक्टर क्षेत्रावरील जंगल जळाल्याने नुकसान होत असते. परंतु अनेक जंगलांमध्ये नवीन झाडांची लागवड केलेली असते, ती झाडे देखील अवैध रित्या तोडली जातात ही गोष्ट खरी आहे काय अशी विचारणा केली असता प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी जंगलास आग लागल्यामुळे नुकसान होत असते. अवैध तोडीमुळे नुकसान होते तसेच फायर लाईन्स नसल्यामुळे जंगलास आगी मोठया प्रमाणात पसरत नुकसान होत असते अशी माहिती दिली.

समितीने वनक्षेत्रात फायर लाईन्स उभारण्यासाठी आपल्याला पुरेसा निधी मिळाला नाही म्हणून इतक्या मोठया प्रमाणात नुकसान झाले अशी विभागाची धारणा आहे काय अशी पृच्छा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पुरेसा निधी प्राप्त न होणे व आग लागणे याचे डायरेक्ट को-रिलेशन आहे. ज्या जंगलातून फायर लाईन गेलेली नाही त्या ठिकाणी जंगलांना आगी लागण्याचे प्रकार होत असतात. पश्चिम घाट एरिया व सह्याद्री मधील काही वन क्षेत्र युनेस्कोने प्रोटेक्टेड वनक्षेत्र म्हणून जाहीर केलेले आहे. नियमाप्रमाणे त्या वनक्षेत्रातील वृक्षांची तोड करता येत नाही, तसेच इतर जे फॉरेस्ट प्रॉडक्ट आहेत, त्या प्रॉडक्टची देखील विक्री करता येत नाही. पर्यायाने त्या ठिकाणाहून उत्पन्न खूपच कमी प्रमाणात मिळते. महाराष्ट्रातील वेगवेगळया ठिकाणातील जंगलातून मिळणारे उत्पन्न हे विदर्भातील जंगल विकासासाठी वापरले जाते. मागील काळात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फायर लाईनचे काम करणे शक्य होते. परंतु आता एमआरईजीएस योजना अस्तित्वात आलेली आहे, त्या योजनेतून वनक्षेत्रामध्ये फायर लाईन्सची कामे करता येत नाहीत. मेळघाट, गडचिरोली या विभागात वनक्षेत्र मोठया प्रमाणात आहे. त्या ठिकाणी फायर लाईन्सची आवश्यकता आहे. ज्या वनक्षेत्रामध्ये फायर लाईन्सची कामे झाली आहेत, त्या ठिकाणी वनक्षेत्र जळण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. नॉन प्लॅनमधून फायर लाईन्सच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा विषय वित्त विभागाच्या अखत्यारित असून याबाबत वन विभागाकडून गेल्या एका वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत आहे. जंगलाचे संरक्षण व्हावे, आग लागून जंगलांचे नुकसान होऊ नये म्हणून काही स्वयंसेवी संस्था यांनी चांगल्या प्रकारचे प्रकल्प तयार केलेले आहेत. गडचिरोली, चंद्रपूर वनक्षेत्रांमध्ये फायर लाईन्स पाहिजेत अशी मागणी आहे.

वन विभागाकडून निधीची मागणी केली जाते, परंतु वित्त विभागाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही. याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, वित्त विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, नॉन प्लॅन निधीची मागणी होते ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यात कोणकोणती कामे हाती घेतली जाणार आहेत, ती कामे केल्यानंतर किती महसूल अपेक्षित आहे, या गोष्टींचा स्पष्टपणे उल्लेख करुन तसा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला तर तशा प्रस्तावास निश्चितपणे मान्यता (Approvel) मिळू शकते.

वन विभागास निधी प्राप्त झाल्यानंतर त्या निधीतून पूर्ण झालेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले वित्त विभागास दिले जातात काय अशी विचारणा समितीने केली असता प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी माहिती देतांना सांगितले की, याबाबतची आकडेवारी उपलब्ध असून गेल्या पाच वर्षात केंद्र शासन आणि सुप्रीम कोर्टाने कडक निर्बंध घालून दिलेले आहेत. पूर्वी केंद्र शासन आणि सुप्रीम कोर्टाचे निर्बंध सौम्य स्वरुपाचे होते. पूर्वी झाडे तोडण्याची परवानगी राज्य शासनाच्या स्तरावर दिली जात होती. परंतु आता झाडे तोडण्यासाठी केंद्र शासनाच्या वन विभागाची परवानगी घ्यावी लागते.

राज्यातील ११ वनवृत्तामधील तीन विभागांनी २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीत कार्ययोजना तयार केले नाही तर आठ विभागात या कालावधीत १ ते ३ वर्षातील अखंड कार्य योजना नव्हत्या या महालेखाकारांच्या आक्षेपासंदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी माहिती देतांना सांगितले की, ८ कार्य योजना मंजूर करुन घेतल्या आहेत. उर्वरित कार्य योजना मंजुरीच्या स्टेजवर आहेत. या ८ कार्य योजनेसाठी पर्यायी कर्मचारीवर्ग नव्हता. सदरहू कार्य योजना २० वर्षासाठी तयार करावयाची होती व त्यास मंजुरी देखील मिळाली होती. परंतु आता ती कार्य योजना १० वर्षासाठी करावयाची आहे. त्यासाठी वन विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी, अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीवर नियुक्त्या करुन एक युनिट निर्माण केलेले आहे व ते युनिट निर्माण करण्यासाठी वित्त विभागाने परवानगी दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरहू युनिट कार्यरत रहावे म्हणून फंडींग सुध्दा उपलब्ध झालेले आहे. वन विभागाचे सेवानिवृत्त डी.सी.ओ.एफ.,डी.एफ.ओ., ए.एफ.ओ.व मजूर यांना कंत्राट पध्दतीने नेमून युनिट निर्माण केलेले आहे. सदर युनिट निर्माण करण्यासाठी वित्त विभागाने विशेष बाब म्हणून परवानगी दिलेली आहे.

महाराष्ट्रातील अनेक जंगलांमध्ये साग, खैर या झाडांपासून तसेच तेंदू पानांपासून मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते. या झाडांची मोठया प्रमाणात अवैध तोड होत आहे. ज्या ठिकाणची साग, खैर इत्यादी प्रकारची झाडे तोडली जातात, त्या जागेवर पुन्हा तशाच झाडांची लागवड केली जात नाही. त्यामुळे देखील उत्पन्न कमी होते. पश्चिम घाट, उत्तर महाराष्ट्र येथील वनापासून उत्पन्न फार कमी प्रमाणात मिळते अशा प्रकारची माहिती या ठिकाणी दिलेली आहे. ज्या जंगलातील झाडे तोडली जातात, त्या जागेवर पुन्हा त्याच वृक्षांची लागवड केली तर उत्पन्नात सातत्य राहू शकेल. आज महाराष्ट्रात जंगलांमध्ये अवैध वृक्ष तोड करुन बाहेरचे लोक मोठया प्रमाणात पैसा कमवित आहेत. शासनाला जंगलापासून जेवढा महसूल मिळाला पाहिजे तेवढा मिळत नाही. जंगलांपासून शासनास महसूल मिळावा म्हणून कोणत्या उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत वा येणार आहेत याबाबतची माहिती देतांना प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी सांगितले की, वन क्षेत्राचे संवर्धन, समृध्दी व अनैसर्गिक कारणांमुळे होणारा ऱ्हास यातून मधला सुवर्णमार्ग साधण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन पुढे वाटचाल करावी लागणार आहे. वन संवर्धनाकरिता आवश्यक असणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करुन राज्यातील वनक्षेत्रात ते राबविण्याकरिता विभागीय पातळीवर कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. वन क्षेत्राचा ऱ्हास आग लागणे, अवैध वृक्ष तोड, पुरासारखी नैसर्गिक आपत्ती यामुळे होतो. अवैधरित्या होणाऱ्या वृक्षतोडीचे प्रमाण ३० ते ४० टक्के एवढे आहे. अवैध वृक्षतोड करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्या बाबतीत पब्लिक ऑफेन्स रिपोर्ट तयार करण्यात येतो व त्यानुसार सदर व्यक्तींविरुध्द पुढील कारवाई होत असते. अशा ऑफेन्सच्या अनुषंगाने साधारणत: ७ ते ९ कोटी रुपयांचे नुकसान वन विभागास होते. अशा प्रकारचे ऑफेन्सचे प्रमाण गडचिरोली विभागात ७० टक्क्यांपर्यंत आहे. गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुका आंध्र प्रदेशच्या जवळ येतो. त्यामुळे आंध्र प्रदेशातील तस्कर सिरोंचा तालुक्यातील वन क्षेत्रात येऊन अवैध वृक्षतोड करीत असतात. गेल्या चार ते पाच वर्षामध्ये अवैध वृक्षतोडीच्या २५-२६ घटना घडलेल्या आहेत. या तस्करांकडून वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर १०० टक्के खुनी हल्ला केला जातो. अशा अवैध वृक्षतोडीमुळे दरवर्षी ५ ते ७ कोटी रुपयांचे नुकसान होते. या विभागातील वन क्षेत्रात अवैध वृक्षतोड होऊ नये म्हणून ६० ते ७० कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले आहे. या विशेष पथकामार्फत त्या ठिकाणी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. गडचिरोली जिल्हयात नक्षलवादी एरिया मोठया

प्रमाणात आहे. नक्षलवाद्यांकडून त्या जिल्हयात वेगवेगळया घटना नेहमी घडतात. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्याने अथवा वन विभागाच्या अधिकाऱ्याने एकटे जाऊ नये अशा प्रकारचे आदेश शासनाने दिलेले आहेत. गडचिरोली जिल्हयात डी.एफ.ओ.म्हणून श्रीमती श्रीलक्ष्मी यांची नियुक्ती झालेली आहे. त्या आध्र प्रदेशातून आलेल्या आहेत. त्यांना आंध्र प्रदेशातील भाषा अवगत आहे. गावातील पुढाऱ्यांना तसेच ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्या गावोगावी जाऊन स्थानिक लोकांच्या मतप्रवाहात बदल घडवून आणण्याचे अभूतपूर्व असे काम करीत आहेत. नागपूर, धुळे, जळगाव आणि नाशिक हे अवैध वृक्षतोडीचे महत्वपूर्ण जिल्हे असून या जिल्हयांसाठी वन हक्क कायदा लागू आहे. वन विभागाकडून जंगल जमिनीचे वाटप केले जात आहे अशा प्रकारचा आदिवासी विभागात गैरसमज निर्माण झालेला आहे. नागपूर, धुळे, जळगाव आणि नाशिक जिल्हयातील वन क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींकडून वन अधिकाऱ्यांना मारपीट करण्याच्या तसेच आदिवासींना प्रोव्हिकेटीव्ह घटना घडलेल्या आहेत. जिल्हाधिकारी यांच्या छातीवर पाय ठेवून ते ज्या वनक्षेत्रात राहतात, तेथील वनक्षेत्रातीलच जमिनी घेणार अशा प्रकारचे निवेदन त्या विभागातील आदिवासींनी माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेले आहे. त्या विभागातील कायदा व सुव्यवस्था चांगली रहावी म्हणून जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, गृह विभागाचे सचिव, यांना विनंती करुन त्या ठिकाणी एस.आर.पी.एफ.चे तसेच माजी सैनिकांचे कॅम्प उभारले आहेत. या संपूर्ण वनक्षेत्राचे सॅटेलाईट मॉनेटरींग करण्यात येते. या विभागात विशेष पथके निर्माण केलेली आहेत. धुळे, नाशिक, नागपूर आणि जळगाव आणि नाशिक या जिल्हयांना लागून मध्यप्रदेशाची बॉर्डर लागते. एका बाजूला आदिवासी बांधवांना वनक्षेत्रातच जमीन हवी आहे अशी अडचण आहे आणि दुसऱ्या बाजूला गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांची अडचण आहे. त्यामुळे उत्पन्नाचा रेश्यो भरुन निघत नाही.

नक्षललाईट एरियामध्ये जंगली हत्ती, डुक्कर वनक्षेत्रात घुसतात आणि वृक्षांचे मोठया प्रमाणात नुकसान करतात तसेच शेती पूर्णपणे उद्ध्वस्त करतात. ते प्राणी माणसांना मृत्युमुखी पाडतात. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये तसेच कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यात मोठया प्रमाणात हत्ती घुसतात आणि तेथील वन आणि शेतीचे फार मोठे नुकसान करतात. भविष्यात या प्राण्यापासून वनाचे तसेच शेतीचे नुकसान होऊ नये म्हणून वन विभागामार्फत काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी सांगितले की, सिंधुदुर्ग जिल्हयातील वनक्षेत्रात २००२ पूर्वी हत्ती घुसण्याचे प्रकार

होत नव्हते. गोवा, कर्नाटक या ठिकाणच्या वनक्षेत्रातून ते हत्ती महाराष्ट्राच्या वन हद्दीमध्ये येतात. २००५ पासून हत्तीच्या उपद्रवामुळे १० कोटी रुपयांची पीक नुकसान भरपाई दिलेली आहे. आग लागणे, नैसर्गिक आपत्ती आणि मानवी अवैध वृक्षतोड या कारणांमुळे वनक्षेत्राचे नुकसान होत असते. परंतु सद्या हत्तीचा उपद्रव कमी झाल्याने बागायतदारांच्या पिकांचे तसेच वक्षक्षेत्राचे नुकसान काही प्रमाणात कमी झालेले आहे. कर्नाटक राज्यामधून महाराष्ट्र राज्यामध्ये हत्ती शिरकाव करणा-या मार्गांवर मुख्यत्वेकरुन कॉंक्रीटचे बॅरियर्स, सोलार फेन्सिंग, ईपीटी (Elephant Proof Trench) खड्डा खणून या जंगली हत्तींचा सामना करण्याची तयारी वन विभागाच्या माध्यमातून करण्यात आली होती. परंतु मागील चार ते पाच वर्षांमध्ये काही नैसर्गिक कारणांमुळेही कर्नाटक या राज्यामधून महाराष्ट्र राज्यामध्ये हत्ती येण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

सन २००३ मध्ये महाराष्ट्र राज्याने प्रसिध्द व लागू केलेले वन्य जीव हल्ले व वन्य जीव संरक्षक नुकसान भरपाई संबंधीचा शासन निर्णय अतिशय उदार आहे. सदरहू शासन निर्णयान्वये सन २०१० मध्ये सुधारणा करण्यात आली होती. वन्य जीव हल्ल्यामुळे मृत झालेल्या व्यक्तिच्या कुटुंबियांना २ लाख रुपये नुकसान भरपाई जाहीर करण्यात आलेली आहे. सदरहू नुकसान भरपाईची रक्कम ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा वन विभागाचा मानस असून वन्य जीव हल्ल्यामध्ये जर एखाद्या स्थानिक आदिवासी शेतक-याला "मेजर इन्ज्यूरी" झालेली असेल तर संदर्भित शासन निर्ण्यान्वये जखमी इसमाला ५०,००० रुपये कॉम्पेन्सेशन शासनामार्फत देण्यात येईल. बीड, लातूर, उस्मानाबाद व नाशिक या भागामध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्हयांइतका जंगली परिसर नाही. नीलगाय, ब्लॅक बर्ग, रानडुक्कर या प्राण्यांचा शेतक-यांच्या शेती पिकामध्ये होत असलेला सुळसुळाट वाढल्याने या प्राण्यांमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीची भरपाईची रक्कम शासनाच्या वन विभागाकडून अदा करण्यात येईल. प्रती वर्षी नुकसान भरपाईच्या रकमेपोटी ८-९ कोटी रुपये देण्यात येतात.

वन्य जीव हल्ल्यांमध्ये गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये एकूण ३५ माणसे मृत झालेली आहेत. शेतांमध्ये जंगली जनावरे शिरकाव करतात म्हणून अनेक शेतकरी चाऱ्यामध्ये विश (Poison) देऊन त्यांना मारण्याचा प्रयत्न करतात. हे मृत्यू, शिकारी मृत्यूमध्ये गणावयाचे का ? या संदर्भातील प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन आहे. काही शेतकरी दुस-या शेतक-यांच्या

गुराढोरांना ट्रॅप करुन लाठयांनीही मारतात. शेतजमिनी भोवताली इलेक्ट्रीकल वायर कंपाऊंड केल्यामुळेही इतर शेतक-यांची पाळीव जनावरे मृत पावतात.

राज्यामध्ये गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये एकूण १३ वाघ व ६० बिबटे मेलेले आहेत. वाघ व बिबटे हे जंगलाच्या काठावर राहणारे प्राणी म्हणून प्रसिध्द आहेत. अशा प्रकारे वनक्षेत्राच्या काठापासून मानवी वस्तीपर्यंत या बिबटे व वाघ या हिंस्त्र प्राण्यांचा सहज शिरकाव असतो. वन्य जीव संवर्धन कायद्याप्रमाणे जंगलातील दुर्मिळ प्राण्यांच्या जीवांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. या कायद्याचे पालन वन विभागाकडून व त्यांनी नियुक्त केलेल्या संरक्षक पथकांकडून काटेकोरपणे केले जात आहे. परंतु काही वेळा असे दुर्मिळ प्राणी त्यांच्या अधिवासाच्या क्षेत्रातून मानवी वस्तीमध्ये शिरकाव करतात. संबंधीत वस्तीतील लोक हे बिबटया व वाघ यांना आपला प्राणशत्रू समजून स्व-बचावाकरिता मारुन टाकतात. हा मृत्यू अपघाती मृत्यूमध्ये गणला जातो. कारण मानवी वस्तीत नागरिक, वाघ किंवा बिबटयाला मारण्याच्या उद्देशाने वावर करीत नाहीत. राज्यामध्ये सन २००७ मध्ये ०१ वाघ व ४० बिबटे मारले गेले होते. त्यापैकी वाघ हा शिकारीमध्ये मारला गेला होता. ४० बिबटयांपैकी ०८ बिबटे शिकारीमध्ये मारले गेले होते. वन्य जीव मृत्यू गणनेमध्ये शिकारी मृत्यू, अपघाती मृत्यू व नैसर्गिक मृत्यू अशा तीन प्रकारे मृत्यू गणले जातात. तसेच, गाव पातळीवरील पाळीव जनावरांचा विषामुळे व इलेक्ट्रीकल फेन्सिंगमुळेही मृत्यू होतो. हे अपघातही शिकारी मृत्यूमध्ये गणण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन आहे. कधी तरी तर एकाच वेळी तीन ते पाच जनावरे एकाच वेळी मरण पावतात. सन २००८ मध्ये ०३ वाघ ६० बिबटे, सन २००९ मध्ये १० वाघ४८ बिबटे, सन २०१०मध्ये ०४ वाघ व ५७ बिबटे, सन २०११ मध्ये ०५ वाघ व ७० बिबटे, सन २०१२ च्या जून महिन्यापर्यंत १३ वाघ व २० बिबटे मरण पावले.

कधी-कधी जंगलाच्या आसपास असलेल्या वस्तीमध्ये राहणा-या जीव संरक्षक व आदिवासी शेतक-यांना जंगलातील पाणवठे व पाणवठयावर येणा-या बिबटयांची वेळ व संख्या माहिती असते. शिका-यांना हे लोक जाळे टाकण्याकरिता मदत करीत असतील. कारण वाघाच्या शिकारीमधून करोडो रुपयांचा फायदा होतो यासंदर्भातील अधिक माहिती समितीने विचारली असता प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी समितीला विदीत केले की, गावकऱ्यांनी शिकारीपोटी केलेल्या जॉईंट हल्ल्यामुळे कधी कधी वाघाचा पाय तुटतो. कधी कधी हा जंगली हिंस्त्र प्राणी जखमी होऊन पळून जातो. गेल्या चार वर्षांमध्ये शिकारीमुळे एकूण ४ वाघांचा

मृत्यू झालेला आहे. सन २०११ मध्ये मृत पावलेल्या एकूण ५ वाघांपैकी २ वाघ नैसर्गिकरित्या मृत पावलेले आहेत. तसेच, २ वाघांचा अपघाती मृत्यू झालेला आहे. तसेच, फक्त एकच वाघ शिकारीने मृत्यू पावलेला आहे. सन २०१० मध्ये चारही वाघ नैसर्गिक पध्दतीने मृत पावलेले आहेत. या संदर्भात विभागीय सचिवांनी अधिक माहिती देताना सांगितले की, हा वाघांच्या शिकारीचा व मृत्यूचा विषय अतिशय महत्वाचा असून मागील वर्षांपर्यंत कर्नाटक या राज्यामध्ये सर्वात जास्त वाघ होते. पूर्वी वाघांची आकडेवारी त्यांच्या पावलांच्या ठशांच्या आधारावर केली जात होती. एखाद्या ठराविक प्रकारच्या वाघाचा ठसा व्यक्तिगत पातळीवर ओळखून त्याची नोंद घेऊन मग दुस-या प्रकारच्या वाघाच्या पावलाच्या ठशाचे मोजमाप व ओळखणीच्या आधारावर मोजणी केली जात होती. मागील वर्षी ही वाघांची आकडेवारी महाराष्ट्रामध्ये १६९ एवढी होती. या वर्षी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाघांची संख्या मोजण्यात आलेली आहे. वाघांची संख्या आता २०० पर्यंत पोहोचलेली आहे. डॉ.उल्हास व डॉ.जॉर्ज यांनी जंगलांमध्ये पाणवठयावरील झाडांना ट्रॅप कॅमेराज बांधून त्यामध्ये कॅच होणा-या विविध वाघांच्या अंगावरील पट्टयांच्या इमेजेसच्या व्हरायटीजमधील व्हेरीएशन्स आधुनिक सॉफ्टवेअरच्या सहाय्याने मोजले व ओळखले जात होते. सॉफ्टवेअरच्या सहाय्याने मोजलेले वाघ हे ठशांच्या आधाराने मोजलेल्या वाघांच्या संख्येपेक्षा अधिक विश्वासार्ह आहे. या वर्षी वन विभागाला वाघांची संख्या अचूक काढण्यामध्ये यश आलेले आहे. परंतु या यशामध्ये एक धोका असा संभवतो की, वाघ व बिबटयांचा अधिवास जंगलाच्या काठावर राहणे समाविष्ट आहे. राज्यातील वाघ असलेल्या अभयारण्याचे सर्व कॉरिडोअर्स संरक्षित असले पाहिजे. राज्यातील वाघ स्थित असणा-या अभयारण्यातून वाघांना व बिबटे सहजपणे या अभयारण्यातून त्या अभयाण्यामध्ये फिरता आले पाहिजे. या वाघ व बिबटयांचा शिरकाव ज्यावेळी मानवी वस्तीमध्ये होतो, त्यावेळी ते मानवी जीवांना धोकादायक संभवतात. तसेच, त्यांचा मानवी वस्तीतील शिरकाव हा त्यांच्या जीवाकरिताही भयंकर असू शकतो.

वन विभाग वाघ व बिबटयांचे ब्रिडींग घडवून आणतात. ब्रिडींग घडवून आणल्यानंतर वाघिणीची पिल्ले दोन वर्ष त्यांच्या आईसमवेत राहतात. त्यानंतर जो मेल डॉमिनेटिंग वाघ असतो, तो कमजोर वाघाला जंगलाच्या बाहेर जाण्याकरिता भाग पाडतो. याकरिता अभयारण्यांचे कॉरिडोअर सुरक्षित व मोकळे करणे आवश्यक आहे. जेणेकरुन जे वाघ जंगलाबाहेर जातील ते दुस-या अभयारण्यामध्ये प्रवेश करु शकतील. जंगलाबाहेर जाणा-या

वाघांमुळे मानवी वस्तीला कोणत्याही प्रकारचे नुकसान होता कामा नये. जंगलाचे कॉरिडॉअर निश्चित व सुरक्षित करणे हा विभागाचा एक मुख्य हेतु आहे.

ताडोबा व नागझिरा या दोन राष्ट्रीय पातळीवरील अभयारण्यामध्ये पुरेसा स्टाफ असला तरीही उर्वरित स्टाफ टेरिटोरियल कामामध्ये विखुरला गेलेला आहे. या अभयारण्यांच्या आधारे राज्यामध्ये विदेशी वन पर्यटकांना आकर्षून घेण्याकरिता निरनिराळया योजना इंटरनेटवरील छायाचित्रांच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. यामुळे गावातील सशक्त तरुणांची "वन्य जीव संरक्षक" म्हणून पाणवठा वगैरे इतर संभाव्य ठिकाणी नेमणूक केलेली आहे. गावातील काही तरुण व आदिवासी शेतकरी यांना वाघांच्या वाटाडया व विसाव्याची ठिकाणे माहिती असतात, अशा सशक्त तरुणांना वन्य जीव संरक्षक म्हणून नेमून त्यांना योग्य तो मोबदला दिला जातो. स्थानिक पातळीवरील हे सशक्त आदिवासी तरुण शेतकरी या वाघांचे पॅट्रोलिंग व्यवस्थितपणे करीत असतात व त्याची माहिती वन अधिका-यांना देत असतात. तरीदेखील शिकारी "स्टील ट्रॅप" टाकून वाघांना मारुन त्यांच्या कातडीचा व्यापार करीत असतात. या शिका-यांपासून वाघांचा बचाव करण्याचा शासनाचा हा प्रयत्न आहे. तसेच, स्थानिक पातळीवरील वन्य जीव संरक्षकांच्या पॅट्रोलींगच्या माहितीच्या आधारे वन्य जीव संवर्धन व संरक्षण कार्यक्रम ठरविण्यात येतो.

अभयारण्याच्या आसपासच्या गावांमध्ये रिसॉर्ट व इको टुरिझमची परवानगी देण्यात आली आहे. तसेच, यामुळे जागोजागी प्लॉट पाडून गेट लावण्यात आलेले आहेत. यामुळे अभयारण्यांचे कॉरिडोअर्स डिस्टर्ब होत नाहीत का अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी माहिती देताना सांगितले की, उच्च न्यायालयाच्या व केंद्र सरकारच्या जजमेंट व आदेशाप्रमाणे वन्य जीव संवर्धन व संरक्षण करण्यात येते. वन पर्यटनाची देशभरातील उलाढाल १,००० कोटी रुपयांची आहे. भारतातील व महाराष्ट्र राज्यातील वन पर्यटनाकडे विदेशी पर्यटकांना होम स्टे टुरिझमव्दारे आकर्षित करण्याची भूमिका राज्य शासनाची आहे. यामुळे वन विभागाने वन्य जीव संरक्षणाची जबाबदारी अप्रत्यक्षरित्या होम स्टे टुरिझम करणाऱ्या आदिवासी शेतक-यांवर सोपविलेली आहे. ज्यावेळी स्थानिक आदिवासी शेतक-याला कळेल की, आपण स्वीकारलेले "होम स्टे टुरिझम" हे आपल्या उत्पन्नाचे साधन आहे. तसेच, हे "होम स्टे टुरिझम" वन्य जीवांवर अवलंबून आहे. तर तो आदिवासी शेतकरी वन्य जीवांचे संरक्षण करण्याकरिता जीवाचे रान करेल. कारण स्थानिक आदिवासी

शेतक-याला त्या परिसराविषयी, वन्य जीवांविषयी तेथे त्याचा अधिवास असल्याने वेगळी आपुलकी असते. आदिवासी शेतकरी स्वत:च्या घरामध्ये वन पर्यटकांच्या राहण्याची व खाण्याची सोय करीत असतो. तसेच, स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांनाच गाईडही बनविले जाते. देशी व विदेशी पर्यटकांना जंगलाच्या आतमध्ये नेऊन माहिती देण्याकरिता या स्थानिक गाईड्सना गावाच्या मालकीच्या जिप्सी गाडया वन विभागाने दिलेल्या आहेत. तसेच, अभयारण्याच्या हद्दीतील पर्यटक प्रवेश फी देखील गावकरी आकारतात. या प्रवेश फीचे उत्पन्न देखील गावक-यांनाच डायरेक्ट मिळत असते. मागील वर्षी एका सीजनचे एका सरहद्दीवरील प्रवेश फीचे एकूण ४ लाख रुपये जमा झाले होते. इको टुरिझम या संकल्पनेमध्ये आदिवासी शेतकरी आपल्या घरामध्ये पर्यटकांना होम स्टे करावयास मुभा देतो. तसेच, त्यांच्या राहण्याचा व खाण्यापिण्याचे पैसे त्यांच्याकडून आकारित असतो. या पर्यटकांना जंगलातील सैर घडवून आणण्याकरिता स्थानिक तरुणच गाईड बनून वन विभागाने पुरविलेल्या जिप्सी गाडयांमधून त्यांना फिरवून आणतात. याचाही चार्ज पर्यटकांकडून आकारला जातो.

वन्य संरक्षण प्रकल्पाकरिता फक्त केंद्र शासनाकडूनच वन विभागाला निधीची मदत देण्यात येते. दुर्दैवाने वन विभागाच्या योजना राबविण्याकरिता व इतर काही महत्वाकांक्षी पावले उचलण्याकरिता केंद्र शासनाच्याच निधीचा वन विभागाला आधार आहे. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळांपैकी २० टक्के क्षेत्रफळ हे जंगलांमध्ये व्यापलेले आहे. या जंगलांतील आसपासच्या गावातील स्थानिकांच्या उत्पन्नाचा स्त्रोत हे जंगलव्यापी क्षेत्रफळच असते. वन विभागाकरिता राज्याच्या एकूण अर्थसंकल्पापैकी फक्त ०.८ टक्के अर्थसंकल्पच राखून ठेवलेला आहे. राज्यातील एकूण आदिवासींपैकी सात ते आठ टक्के आदिवासी हे वन पर्यटन व इतर जोड व्यवसायावर अवलंबून आहेत. या स्थानिक आदिवासी शेतक-यांना पर्यटनाच्या धंद्याची जोड दिल्यास वन्य जीवांचे संरक्षण व संवर्धन केले जाईल. राज्यातील वन पर्यटनाची उलाढाल वाढेल. महाराष्ट्रातील एकूण ४९ अभयारण्यांमधील वन्य जीवांकडे विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्याचा राज्य शासनाच्या वन विभागाचा मानस आहे. तसेच, स्थानिक गावक-यांकडे इको टुरिझम सोपवून वन्य जीव संवर्धन व संरक्षण तसेच, पर्यायाने वातावरणावर होणारे प्रदुषणाचे दुष्परिणामही राज्य शासनाच्या पर्यावरण व वन विभागाला टाळता येणे शक्य आहे.

वन पर्यटकांकडून प्रवेश फी गावक-यांनीच जमा केली होती. यापैकी एकही पैसा शासनाच्या तिजोरीमध्ये जमा झालेला नाही. तसेच, चार लाख रुपये एका सिजनमधील एकाच सरहद्दीवरील प्रवेश फीच्या स्वरुपामध्ये जमा केलेला आहे.

अभयारण्याच्या आसपासची गावे स्वयंअर्थसहाय्यित करण्याचा शासनाचा प्रयत्न वाखाणण्याजोगा असल्याचे तसेच इको टुरिझमच्या माध्यमातून गावक-यांना स्वयंअर्थसहाय्यित करुन त्यांना उत्पन्नाचे चांगले साधन निर्माण करुन देणे, ही अतिशय चांगली योजना असल्याचे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

उप महालेखापाल, नागपूर यांनी समितीस असे विदित केले की, वर्किंग प्लॅन फायनल न झाल्याबद्दल लेखापरिक्षणामध्ये मुद्दा उपस्थित केला गेला. वन उपजाची कटाई वेळेत न झाल्यामुळे महसुलाची हानी होते. वर्किंग प्लॅन तातडीने हाती घेतला पाहिजे. कंट्रोल बुक्स अपूर्ण आहेत. वन मजूर सहकारी संस्थांबाबत ९.५७ कोटी रुपयांचा मुद्दा आहे. वन मजूर सहकारी संस्थांचे लेखे अपूर्ण असल्यामुळे ही रक्कम फॉरेस्ट डिपॉझिटमध्ये ठेवली गेली. ही रक्कम फॉरेस्ट रेव्हेन्यूमध्ये ॲड केली गेली नाही. वन मजूर सहकारी संस्थांच्या माध्यमातून किती महसूल मिळू शकतो हे लेखे पूर्ण न झाल्यामुळे स्पष्ट होऊ शकत नाही. टिंबर अकौंट बऱ्याच ठिकाणी अपूर्ण आहेत. रेंज फॉरेस्ट ऑफिस पातळीवर हे अकौंट मेन्टेन केले जातात. अवैध तोडीमुळे महसुलाची हानी होते. याचे स्टॅण्डर्ड डेपो रेट म्हणजे एसडीआर आणि एसओआर हे दोन प्रकार आहेत. जी वैध तोड होते तिची गणना वेगळ्या पध्दतीने केली जाते आणि जी अवैध तोड होते तिची वेगळ्या पध्दतीने गणना केली जाते. या संदर्भातील महसूल अत्यंत कमी दाखविला जातो. जे लाकूड पकडले जाते ते अवैध तोड सांगितली जाते त्यापेक्षा जास्त किंमतीचे असते. त्यामुळे यातील नेमका फरक किती आहे हे दाखविता येत नाही.

यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, हा वन मजूर सहकारी संस्थांशी संबंधित ९.५७ कोटी रुपयांचा मुद्दा असून जे मटेरियल सेल केले जाते त्याची काही टक्केवारी गोळा करुन आलेली रक्कम फॉरेस्ट डिपॉझिटमध्ये ठेवली जाते. ही रक्कम गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्याशी संबंधित असून महालेखापालांशी चर्चा करुन रिकन्सिलिएशन करुन घेण्यात येईल. विभागाने या मुद्यांबाबत कार्यवाही करुन शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, २०१२ रोजी मंजूरी दिलेली असल्याने त्यातील तफावत दूर झालेली आहे. सदर आदेशाची प्रत समितीला सादर करण्यात येत आहे.

उप महालेखापाल यांनी उल्लेख केलेल्या वर्किंग प्लॅनबाबत न्यायालयाच्या आदेशाची प्रत समितीला देण्याबाबत समितीने विभागीय सचिवांना सूचित केले.

बांबु तोडण्याकरीता बल्ट आणि बिल्ट या दोन कंपनीकडूनच किती वर्षापासून निविदा येत आहेत? त्या भागात नक्षलवादाचे प्राबल्य असल्यामुळे रस्त्याच्या कामाकरिता वापरण्यात येणारे ट्रक जाळण्याचे प्रकार घडतात. बांबू वाहून नेणारे ट्रक जाळल्याच्या किती घटना घडल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, किती बांबू ट्रक जाळले गेले याची माहिती घेण्यात येईल. बहुतांश बांबूचे उत्पादन भामरागड वन विभागात होते. गडचिरोली जिल्हयातील आतील भागात १०० टक्के नक्षलवाद आहे. तेथे पेपर मिल वर्किंग १९४८ पासून सुरु आहे. त्याची सिस्टिम आणि लॉंग टर्म इंटरेस्ट आहे. त्यांची नक्षलवाद्यांना हॅण्डल करण्याची पध्दत आहे, त्या पध्दतीने ते त्यांना हॅण्डल करतात. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे आयोजित केलेल्या बैठकीत बल्लारपूर पेपर कंपनीच्या प्रतिनिधींकडून असे सांगण्यात आले की, भामरागडसाठी ठरविण्यात आलेल्या आधारावर आणि अटींवर ते बांबू घ्यायला तयार आहेत. यानुषंगाने समितीने शासन त्यांच्या अटीनुसार त्यांना बांबू देते हे कितपत योग्य आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी बांबू विकण्याचे अधिकार बिल्ट किंवा मोठ्या कॉन्ट्रॅक्टरला असतात. तेथे नक्षलवाद असल्यामुळे तेथे काम करताना त्यांना नक्षलवाद्यांसोबत काही तडजोड करावी लागते. हे टाळण्यासाठी सामुहिक वन अधिकार तेथील गावांना देऊन त्या गावाकडूनच तेथील बांबू कॉन्ट्रॅक्टरला दिला जातो आणि त्याचा मोबदला त्या गावाला मिळतो. वन विभागाने मेंढालेखा गावाच्या ग्रामसभेला सामुहिक वत अधिकार दिले. गडचिरोली जिल्हयामध्ये ८०० आणि गोंदिया जिल्हयामध्ये सुध्दा अनेक गावांकडून शेजारचे जंगल राखणे आणि त्यामधून मिळणारे उत्पन्न गावाला मिळाले तर तेथे त्यांची मालकी निर्माण होईल आणि त्यांचा इंटरेस्ट निर्माण होईल.

महाराष्ट्रामध्ये किती ठिकाणी अभयारण्ये घोषित केली जात आहेत? त्यांची सद्य:स्थिती काय आहे? तसेच सोलापूर आणि नगर जिल्हयामधील काही भाग माळढोक अभयारण्य म्हणून घोषित केला आहे. याविषयी माहिती देतांना विभागीय सचिवांनी समितीला सांगितले की, पूर्वी प्रोटेक्टेड एरिया म्हणजे राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या ४ टक्के वन्यप्राणी अभयारण्य जैविक विविधता संरक्षण करण्यासाठी असावे असा निकष ठरविला होता. त्या काळात संपूर्ण सोलापूर जिल्हा, नगर जिल्हयातील कर्जत तालुक्याचा भाग माळढोक अभयारण्यासाठी घोषित करण्यात

आला. त्यासाठी सोलापूर शहर, मोहोळ, माढा तालुक्यासह ८००० चौ.कि.मी.क्षेत्र निश्चित करण्यासाठी नोटिफिकेशन काढण्यात आले होते. सी.ई.सी.ही अधिकाऱ्यांची समिती आहे. त्या समितीसोबत चर्चा करुन मार्ग काढता येऊ शकतो. परंतु सुप्रीम कोर्टाचे आदेश हे ज्युडिशियरी आहेत. कोणतेही अभयारण्य घोषित झाल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने खूप किचकट प्रक्रिया कायद्यामध्ये अंतर्भूत केली आहे. अभयारण्याचे क्षेत्र कमी करावयाचे असेल तर राज्य वन्यजीव मंडळाची शिफारस घेऊन केंद्रीय वन्यजीव मंडळाची शिफारस घेतल्यानंतर त्या शिफारशींसह सुप्रीम कोर्टाकडे जाऊन त्यांची मान्यता घेतल्यानंतरच अभयारण्याचे क्षेत्र कमी करता येते. माळढोक अभयारण्य विकासाच्या दृष्टीने घातक होते. माळढोक पक्षी बचावाचे उद्दिष्ट त्यातून साध्य होत नव्हते. ८००० चौ.कि.मी. क्षेत्रामुळे रस्ते, सिंचनाच्या विकासामध्ये देखील अडचण येत होती. गेली २१ वर्षे या अभयारण्याचे क्षेत्र कमी व्हावे अशी मागणी केली जात होती.

मागील वर्षी वन विभागाने स्वत: जातीने लक्ष देऊन ॲडव्होकेट जनरल यांच्या माध्यमातून अभयारण्याचे क्षेत्र कमी करुन घेतले. आज ते क्षेत्र १२०० चौ.कि.मी.क्षेत्रावर आणले आहे. त्यापैकी ४०० ते ४२५ चौ.कि.मी.क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारितील असून उर्वरित क्षेत्र म्हणजे खाजगी शेतकऱ्यांच्या माळरानावरील जमिनी आहेत. आता काढलेले नोटिफिकेशन हे अंतिम नाही. भूसंपादन कायद्यातील कलम ४ ची नोटीस म्हणजे शासनाचा इरादा असतो की, संबंधित जमीन पब्लिक पर्पजसाठी घ्यायची आहे. यासाठी एस.डी.ओ. श्रीगोंदा-कर्जत, सोलापूर आणि करमाळ या तिघांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. या चौकशी अधिकाऱ्यांनी लोकांचे व वन विभागाचे म्हणणे ऐकून त्या आधारे त्यांचा अहवाल द्यायचा आहे. तो अहवाल शासनाने स्वीकारल्यानंतर पुढील प्रक्रिया दिर्घकालीन आहे. राज्य वन्यजीव मंडळाचा निर्णय घेण्यास विलंब लागणार नाही. कारण त्या मंडळाचे अध्यक्ष हे माननीय मुख्यमंत्री आहेत. परंतु केंद्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेतल्यानंतर सुप्रीम कोर्टाकडे जावे लागेल. तांत्रिक मुद्दा म्हणजे वन क्षेत्र हे पूर्णपणे वन विभागाच्या ताब्यात आहे. तेवढ्यापुरते अभयारण्य मर्यादित ठेवले पाहिजे.

समितीने आज किती माळढोक पक्षी अस्तित्वात आहेत अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी माळढोक पक्षाची ११ ते १४ इतकी संख्या आहे. परंतु सोलापूर जिल्हयात लांडगे आणि ब्लॅक बग धोक्यात आले असल्याची माहिती समितीला दिली.

समितीच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या बैठकीत ताडोबा उद्यान, चंद्रपूर, येथे भेट व बैठक घेण्यासंदर्भात समितीने घेतलेल्या निर्णयानुसार समितीने नागपूर येथील अधिवेशनादरम्यान दिनांक १४ डिसेंबर, २०१२ रोजी ताडोबा उद्यान, चंद्रपूर येथील उद्यानाची पाहणी केली व दिनांक १५ डिसेंबर, २०१२ रोजी चंद्रपूर येथील गिराई विश्रांतीगृह येथे समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

सदरहू बैठकीस श्री.ए.के. सक्सेना, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर, श्री.बी.एस.के. रेड्डी, मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर, श्री.विरेंद्र तिवारी, मुख्य वनसंरक्षक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प वनविकास महामंडळ, उत्तर चंद्रपूर प्रदेश आणि श्री.आर.डी. मासीरकर, विभागीय व्यवस्थापक, मार्खंडा व प्र.वि. बल्हारशा (अतिरिक्त कार्यभार) हे उपस्थित होते.

सदरहू बैठकीला सचिव स्तरावरील अधिकारी उपस्थित नसल्याने महालेखाकार कार्यालयाच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीने विचारलेल्या प्रश्नांची लेखी माहिती पंधरा दिवसात समितीला देण्याचे निदेश समितीने दिले. या अनुषंगाने विभागीय सचिवांकडून लेखी माहिती प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहे.

वनक्षेत्र जळाल्यामुळे गेल्या पाच वर्षात प्रत्यक्ष आर्थिक नुकसान किती झाले यासंबंधीची माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

वर्ष	आगीच्या घटना	जळालेले वनक्षेत्र (हेक्टर)	जळालेली वनक्षेत्राची टक्केवारी	नुकसान (रु. लाख)
२००६-२००७	२८३१	४५१२३.९३	०.७३ टक्के	३५.४७४
२००७-२००८	३१०३	४८४४८.३०७	०.७८ टक्के	५९.८९७
२००८-२००९	३८७०	५३९९३.२४२	०.८७ टक्के	२७.९९२
२००९-२०१०	२३६२	३१५१३.९२४	०.५१ टक्के	१३.३३६
२०१०-२०११	२९३०	३५९६६.२२८	०.५८ टक्के	१७.२२१
२०११-२०१२	४७७६	७२९२६.८३०	१.१८ टक्के	३१.२०४

दरवर्षी बांबूतोड करण्याकरीता त्या पुरवठा वर्षाकरीता निविदाद्वारे विक्री करण्यात येणाऱ्या बांबू घटकांच्या घटकनिहाय निविदा कंत्राटदारामार्फत मागविण्याकरीता वर्गीकृत जाहिरात वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करुन विविध व्यक्ती, फर्म, कंपनी यांच्याकडून निविदा मागविण्यात येतात. जर पहिल्या फेरीत पुरेश्या निविदा प्राप्त झाल्या नाहीत तर दुसऱ्या व तिसऱ्या फेरीत पुन्हा निविदा मागविण्यात येतात. मागील ५ वर्षात प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पुरवठा वर्ष	प्राप्त झालेल्या निविदांची संख्या
१.	२००७-२००८	१३
२.	२००८-२००९	१६
३.	२००९-२०१०	१५
४.	२०१०-२०११	६
५.	२०११-२०१२	२

प्राप्त झालेल्या निविदांमधून उच्चतम दर असलेल्या निविदा धारकांचे दर मान्य करण्याकरीता शासनास शिफारस सादर करण्यात येते व शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर यशस्वी निविदाधारकांकडून निविदेच्या अटी व शर्तीनुसार बांबू कुपाचे निष्कासन करवून घेण्यात येते. दरवर्षीच्या बांबू हंगामाकरीता दरवर्षी स्वतंत्ररित्या निविदा जाहिरातीद्वारे मागविण्यात येत असल्यामुळे बांबू निष्कासनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, फर्म व कंपनी यांची नावे दरवेळेस पुन्हा येणे शक्य असते.

अभिप्राय व शिफारशी

समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाच्या निदेशानुसार एकूण अर्थसंकल्पाच्या २ टक्के निधी वन विभागासाठी अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध करण्यात येतो ही बाब समितीच्या निदर्शनास आणली. राज्यामध्ये सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ४९३ कोटी इतकी वन विभागाने मागणी करुनही केवळ ९४ कोटी इतकाच निधी उपलब्ध करुन दिला गेला. फायरलाईन्स उभारण्यासाठी जवळपास ९२ कोटी निधी आवश्यक असताना केवळ १२.८५ कोटी निधी मिळाल्याचे समितीच्या निदर्शनास आणले गेले. **वनक्षेत्रास आगीच्या भक्षस्थानी जाण्यापासून रोखायचे असल्यास फायर लाईन्सची उभारणी फार मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. त्याकरीता निधी अपूरा पडत आहे असे समितीचे मत आहे. वन विभागाकरीता अर्थसंकल्पामध्ये भरीव निधीची तरतूद करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

वनसंवर्धनाच्या कार्याच्या व्यवस्थापनाकरीता सविस्तर योजना म्हणजे कार्ययोजना आखली जाते. कार्ययोजना न आखल्यामुळे वनांची वाढ आणि पुर्ननिर्मिती यावर मोठा आघात होतो. समितीसमोरील साक्षीदरम्यान प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी कार्ययोजना मंजूर करुन घेतल्याचा तसेच कार्ययोजना मंजूरीच्या प्रतिक्षेत असल्याची माहिती समितीस दिली. **निश्चित**

कालमर्यादेत कार्ययोजना तयार करणे व कार्ययोजना तयार करण्यासाठी व तिचे कार्यन्वयन करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होणे गरजेचे असल्याचे समितीचे मत आहे. वनसंवर्धनाच्या कार्याच्या व्यवस्थापनाकरीता उर्वरीत ८ कार्ययोजनांना त्वरीत मंजूरी प्रदान करण्यासंदर्भात शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी व कार्ययोजनेचे कार्यन्वयन करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

वनउपजांचे समुपयोजन एकतर विभागाकडून किंवा वन मजुरांच्या सहकारी संस्था आणि कंत्राटदार यांचे द्वारा केले जाते. वन उपजांची विल्हेवाट लिलावाद्वारे निविदा मागवून आणि खाजगी व्यक्तीबरोबर दिर्घ मुदतीच्या कराराद्वारे केली जाते. कार्य योजनेमध्ये बांबूचे खंड तीन पातन मालिकेमध्ये विभागलेले असतात आणि प्रत्येक पातन मालिका दर तीन वर्षानी कापणीकरीता परीपक्व होते. जर एका पातन मालिकेतील बांबू ठरलेल्या वर्षात कापले नाहीत तर ती पातन मालिका फक्त तीन वर्षानंतरच कापता येते. ज्याचा परीणाम महसूलाची हानी होण्यात होतो. बांबू खंडाचे समुपयोजन न झाल्यास जे तीन वर्षानंतर समुपयोजनास योग्य होतात अशा नवीन कोंबाचे पुननिर्माण खुंटते.

वन उपजांची विल्हेवाट योग्य रीतीने व्हावी व वन उपजापासून शासनास जास्तीत जास्त महसूल मिळावा याकरीता विशेष उपाययोजना आखून त्या योजनांची यशस्वी कार्यन्वयन करण्याकरीता संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

भामरागढ, भंडारा, नाशिक (प), जळगांव या जिल्ह्यातील ४३,०११.७२ हेक्टर क्षेत्रातील २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत समुपयोजनाकरीता योग्य असलेल्या बांबूचे समुपयोजन न केल्याने ११.७२ कोटी महसूलाची हानी झाल्याचे महालेखापालांनी त्यांच्या अभिप्रायात नमुद केले आहे.

विभागाने बांबूचे समुपयोजन न होण्यासंदर्भात स्थानिक लोकांकडून बांबूची कमी मागणी, निधीची कमतरता, निषिध्द कटाई, चराई, आग यामुळे निकृष्ट दर्जा, मंजूर कार्ययोजनेचा अभाव अशी विविध कारणे नमुद केली असली तरीही ती असमर्थनीय असून उत्पादीत बांबूची योग्यरीत्या विल्हेवाट लावण्याचा अभाव हे समुपयोजनाकरीता असलेले क्षेत्र, प्रत्यक्ष समुपयोजन झालेले क्षेत्र व समुपयोजन न झालेले क्षेत्र याची आकडेवारी विचारात घेता,

समितीच्या निदर्शनास येते. यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन उचित कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.

महालेखापालांनी परीच्छेद क्र. ६.२.१२ मध्ये तेंदू विक्रीकरता निविदा मागविण्यात विलंब झाल्यामुळे १९.७४ कोटीचा महसूल कमी प्राप्त झाल्याबाबत शासनाच्या निदर्शनास आणले असता शासनाने निविदा प्रक्रियेचा निपटारा तत्परतेने केला असता तर महसूलात लक्षणिय वाढ **झाली असती हे मान्य केले. निविदा प्रक्रिया वेळेत न करण्यामागे कोण जबाबदार आहेत यासंदर्भात चौकशी करण्यात येऊन संबंधितांवर उचित कारवाई करण्यात यावी व त्याची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००६-०७ च्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील **परिच्छेद क्र. ६.३ "मुद्दल आणि व्याजाच्या वसूलीसाठी कर्जाची नोंद न करणे"** यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

"मुद्दल आणि व्याजाच्या वसूलीसाठी कर्जाची नोंद न करणे"

शासनाने मंजूर केलेल्या कर्जावर बहुधा मंजूरी अधिकाऱ्यांनी ठरवून दिलेल्या दराने व्याज देय असते. कर्जाचा कालावधी आणि परतफेडीची पध्दत तसेच व्याजाचा दर आणि प्रदानाची पध्दती हे साधारणतः कर्जमंजूरीपूर्वी निर्देशीत केले जाते आणि मंजूरी आदेशात दर्शविले जाते. कर्ज देणाऱ्या संस्थांना आवाहित हमीवर शासनाने दिलेल्या रकमासुध्दा संबंधित ऋणकोचे कर्ज समजण्यात येते. मंजूरीतील अटींप्रमाणे मुद्दल आणि व्याजांच्या न दिलेल्या हप्त्यांवर दंडनीय व्याज आकारणीय आहे.

संचालक, वस्त्रोद्योग यांनी ठेवलेल्या सहकारी सूतगिरण्यांच्या कर्जलेख्यांच्या अभिलेख्यांची माहे जुलै २००७ मध्ये चाचणी तपासणी केली असता पुढील गोष्टी आढळून आल्या.

हमी उठविल्यानंतर शासनाने डिसेंबर २००२ ते मे २००५ मध्ये प्रदान केलेल्या रु. ३६.०३ कोटी कर्जाच्या रकमेची आणि रु. २४.५२ कोटी व्याजाच्या रकमेची सात गिरण्यांच्या (१) बारामती सहकारी सूतगिरणी मर्यादित, पुणे (२) जवाहर शेतकरी सहकारी रोहो सूतगिरणी मर्यादित, धुळे (३) महाराष्ट्र सूतगिरणी मर्यादित, इचलकरंजी कोल्हापूर (४) रेणूका आदिवासी सहकारी सूतगिरणी मर्यादित, जलधारा ता.किनवट नांदेड (५) संजय गांधी सहकारी कापूस उत्पादक गिरणी मर्यादित, जामोद, बुलढाणा, (६) वसंतदादा सहकारी सूतगिरणी मर्यादित, कढेपूर सांगली (७) वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्यादित, मलकापूर, बुलढाणा संबंधित कर्ज खात्यात नोंद केलेली नव्हती. याचा परिणाम ३१ मार्च २००६ पर्यंत एकूण रु. ६०.५५ कोटी रकमेवरील रु. १३.३० कोटी व्याजाचा दावा न करण्यात झाला.

पैनगंगा सहकारी सूतगिरणी मर्यादित साखरखेडा, बुलढाणा आणि महाराष्ट्र सहकारी सूतगिरणी मर्यादित, भुसावळ, जळगाव या दोन गिरण्यांच्या बाबतीत अनुक्रमे रु. १८.१४ कोटी थकीत कर्जाच्या आणि रु. ५.१६ कोटी व्याजाच्या वसुलीसाठी मार्च २००३ ते सप्टेंबर २००५

मध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना महसूली वसुली प्रमाणपत्रे जारी करण्यांत आली. तथापि, हमी आवाहनित झाल्यानंतर शासनाने केलेल्या रु. १९.६२ कोटी रकमेचे प्रदान २००२ ते २००५ या वर्षात दिसून आले नाही आणि परिणामी, रु. १९.६२ कोटी कमी वसुलींचा दावा करण्यात आला. ज्यामध्ये उपार्जित व्याजापोटी (accured interest) देय असणाऱ्या रु. ३.५४ कोटी रकमेचा समावेश होता.

अवसायानात गेलेल्या (१) प्रभावती सहकारी सूतगिरणी मर्यादित, परभणी, (२) सोलापूर, विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित, सोलापूर, आणि (३) यवतमाळ जिल्हा सहकारी सूतगिरणी मर्यादित, पुसद, यवतमाळ या तीन गिरण्यांबाबत हमी आवाहीत झाल्यानंतर माहे डिसेंबर २००२ ते माहे मे २००५ दरम्यान शासनाने प्रदान केलेल्या कर्जाच्या रु. २.८२ कोटी व्याजासहीत रु. १४.८६ कोटी इतक्या कमी वसुलीचा दावा अवसायकाकडे केला.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, संचालक, वस्त्रोद्योग यांनी सहकारी सुतगिरण्यांचे कर्जलेखे अद्ययावत करण्याचे आणि संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सुधारित दावे सादर करण्याव्यतिरिक्त अवसायकाकडे केलेले दावे सुधारित करण्याचे मान्य केले. (सप्टेंबर २००७)

ही बाब शासनाला ऑगस्ट २००७ मध्ये कळविण्यात आली, त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही. (ऑक्टोबर २००७)

ज्ञापन :-

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वस्त्रोद्योग विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

सदर परिच्छेद वस्तुनिष्ठ आहे. हमी आवाहित शासनाने प्रदान केलेल्या कर्जाच्या व्याजाच्या रकमेपोटी आक्षेपात नमूद केलेल्या ७ सहकारी सूतगिरण्यांच्या संबंधित लेख्यामध्ये दिनांक ३१ मार्च २००६ पर्यंतच्या मुद्दल रु. ६०५४.६७ लाख व व्याज रु. १३.३० कोटी ऐवजी रु. १४७९.१० लाख याची नोंद करण्यात आलेली आहे व त्यानुसार आक्षेपाची पूर्तता करण्यात आली आहे. त्यानुसार या ७ गिरण्यांपैकी ३ गिरण्या चालू आहेत व १ बंद आहे. त्यांना वसूलपात्र रकमेची मागणी पाठविण्यात आली असून, ज्या ३ गिरण्या अवसायनात आहेत

त्यांच्या अवसायनाकडे वसुलपात्र रकमेची मागणी निश्चित करुन पाठविण्यात आली आहे. चालू असलेल्या सहकारी सूतगिरण्यांच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५५ अंतर्गत सुनावणीची प्रक्रिया सुरु असून गिरणीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर यथाशिघ्र वैधनिक कारवाईची प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

कार्यालयाच्या लेख्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २००६ पर्यंत सदर परिच्छेदात नमूद सुतगिरण्यांचे कर्जाच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या आहेत. जुलै २०१० मध्ये निर्गमित केलेल्या नोटीसीच्या आधारे एक चालु सहकारी सुतगिरणीला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे १५५ अंतर्गत कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली असून नैसर्गिक न्यायांच्या दृष्टीने सुनावणी प्रक्रिया सुरु असून नोटीसप्रमाणे सुतगिरण्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर वैधानिक कारवाई यथाशिघ्र पार पाडण्यात येईल. तसेच उर्वरित ४ सहकारी सुतगिरण्या ज्या अवसायनात आहेत, त्यांच्या अवसायकांकडे अद्ययावत क्लेम नोंदविण्यात आले आहेत. प्रमाणित केलेले कार्यालयातील लेखे, गिरण्यांना पाठविलेल्या नोटीसींच्या प्रती व अवसायकांना क्लेम नोंदविलेल्या पत्राच्या प्रती तसेच ज्या गिरण्या सुरु आहेत, त्यांना सुनावणीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत.

साक्ष :-

समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १० ऑक्टोबर, २०१२ रोजी प्रधान सचिव, वस्त्रोद्योग विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मुद्दल आणि व्याजाच्या वसुलीसाठी कर्जाची नोंद न करणे या परिच्छेदा संदर्भात विभागीय सचिवांनी माहिती देतांना सांगितले की, १२ सूत गिरण्यांनी ICICI, IDBI अशा एकूण ४ बँकाकडून मुदती कर्ज घेतले होते. या कर्जासाठी शासनाची बँक गॅरंटी होती. त्यामुळे सदर कर्जाची परतफेड शासनाने केली आहे. शासनाने परतफेड केलेल्या कर्जाचा बोजा संबंधित सूत गिरण्यांवर राहणार आहे. सदर कर्जाची नोंद डायरेक्टर ऑफिसने रजिस्टरमध्ये घेतली नाही असा मुद्दा ए.जी.यांनी उपस्थित केला होता. कर्जासंबंधीचे शासन निर्णय डिसेंबर २००२, ऑक्टोबर २००३, मे २००५, नोव्हेंबर २००५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच, मार्च २००३ पासून प्रभावती सहकारी सूतगिरणी मर्यादित परभणी यांच्या रिकव्हरीची कार्यवाही देखील डायरेक्टर ऑफिसने सुरू केली होती. रजिस्टरमध्ये लोनची नोंद झाली नाही हा मुद्दा बरोबर आहे. पण डायरेक्टर ऑफिसने रिकव्हरीची देखील कार्यवाही सुरू केली होती.

सूत गिरण्यांच्या कर्जासाठी शासनाची हमी होती. या कर्जाची परतफेड शासनाने केलेली आहे. त्यामुळे ते लोन ट्रान्सफर झाले आहे ते ऑन रेकॉर्ड न येण्याची कारणमीमांसा समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्यावेळी कर्जावरील व्याजदर किती होता हे माहीत नसल्यामुळे कर्जाची नोंद झाली नव्हती. दोन केसेससंदर्भात रिकव्हरीची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. एकूण १२ केसेस पैकी एक सूतगिरणीची १०० टक्के तर दुसऱ्या सूतगिरणीची काही अंशी वसुली बाकी होती. एकूण १२ सूतगिरण्यांपैकी ८ गिरण्या अवसायानात गेल्या असून ४ सूत गिरण्या सुरू आहेत.

यासंदर्भात १२ सूत गिरण्यांचा तक्ता बनवून त्यात प्रत्येक सूत गिरणीने किती कर्ज घेतले आहे, शासनाने कर्जाची परतफेड कधी केली आहे, आपण आतापर्यंत किती सूत गिरण्यांची वसूली केली आहे, कोणत्या सूत गिरण्या अवसायानात गेल्या आहेत, या सूत गिरण्यांचे संचालक कोण आहेत इत्यादी संबंधातील तपशीलवार माहिती देण्याचे निदेश समितीने दिले.

सदर १२ सूतगिरण्यांची तपशिलवार माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून ती विवरणपत्र 'क' मध्ये समाविष्ट आहे. **(विवरण पत्र क्र.३, ४ व ५)**

नवीन सूत गिरण्यासंबंधातील शासनाचे धोरण काय आहे आणि नवीन सूत गिरण्या महाराष्ट्रातील कोणत्याही भागात काढता येतात काय याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने नुकतीच सन २०१२ मध्ये नवीन धोरण जाहीर केले आहे. ज्या भागात म्हणजे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र कापूस जास्त पिकतो तेथे सहकारी सूत गिरण्यांना मान्यता देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच, ज्या तालुक्यात सहकारी तत्त्वावर सूत गिरणी दिली असेल तेथे पुन्हा सूत गिरणी द्यायची नाही असा निर्णय घेतला आहे. सन १९९४-९५ मध्ये संपूर्ण राज्यात कुठेही सूत गिरणी उभारण्यास परवानगी दिली होती.

राज्यातील टेक्सटाईल पार्कविषयी सांगताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, टेक्सटाईल पार्क मंजूर करण्याचा अधिकार राज्य शासनाला नसून केंद्र शासनाला आहे. ज्या राज्यामध्ये टेक्सटाईल पार्क मंजूर होते तेथील राज्य सरकारने ९ टक्के कॅपिटल सपोर्ट दिला पाहिजे. तसेच ४० टक्के किंवा ४० कोटी रूपयांपेक्षा कमी असेल एवढी मदत केंद्राकडून देण्यात येते. आपल्या राज्यात १५ टेक्सटाईल पार्क मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी

८ टेक्सटाईल पार्कसाठी केंद्र शासनाने ३ हप्त्यांमध्ये पैसे रिलिज केले आहेत. सन २००७-२००८ मध्ये टेक्सटाईल पार्क मंजूर झाले आहे. इचलकरंजी येथे २, धुळे, ठाणे, लातूर, बारामती येथे टेक्सटाईल पार्क मंजूर झाले आहे. MIDC प्रमाणेच टेक्सटाईल पार्क असेल.

सदर बैठकीत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने विभागीय सचिवांना प्रश्नावली देऊन त्याबाबतची माहिती समितीला देण्याबाबतचे निदेश दिले. त्यानुसार विभागाकडून प्रश्नावलीबाबतची माहिती प्राप्त झाली असून ती खालील प्रमाणे आहे:-

शासनाने सूत गिरण्यांना दिलेल्या कर्जाच्या वसुली संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी कसूर केली आहे त्या अधिकाऱ्यांवर नागरी सेवा नियमानुसार कारवाई केली आहे काय ? यासंबंधीची माहिती समितीला सादर करण्यात यावी.

विभागाने याबाबत नाही असे उत्तर दिले.

व्याजदर किती आकारावा याचे स्पष्टीकरण देण्यासाठी ५ ते १० वर्षाचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ? यासंबंधिची माहिती समितीला सादर करण्यात यावी.

व्याजदर किती आकारावा याबाबत संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर, यांना दि. २८/८/२००३ व दि. १०/५/२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. या अनुषंगाने व्याजदर किती आकारावा याबाबत ५ ते १० वर्षाचा कालावधी लागलेला नाही.

लोन संबंधातील नोंद विभागाकडे नसल्यामुळे सूत गिरणीने स्टे आणल्यास आपण काय कारवाई केली असती ? तसेच आपल्या खात्याच्या अधिकाऱ्यांनी प्रोसिजर फॉलो न करण्याचे कारण काय आहे ? यासंबंधीची माहिती समितीला सादर करण्यात यावी.

लोन संबंधातील नोंद विभागाकडे नसल्यामुळे कोणत्याही सूत गिरणीने स्टे आणलेला नाही. परंतु याबाबत एखाद्या गिरणीने स्टे आणला असता तर विधी व न्याय विभाग तसेच वित्त विभागाच्या सहमतीने आवश्यक ती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असते. याबाबत खात्याच्या अधिकाऱ्यांनी विहित कार्यपध्दती अवलंबिली नाही याचे कारण कर्जावरील व्याजदर किती आकारावा याबाबत त्यांना संदिग्धता होती. परंतु त्यांनी गिरण्यांकडून वसुलीची कार्यवाही सुरु केली होती.

माहे डिसेंबर, २००२ ते मे २००५ मध्ये शासनाने प्रदान केलेल्या रु. ३६.०३ कोटी कर्जाची रक्कम व त्यावरील रुपये २४.५२ कोटी व्याजाच्या रकमेची मिळून रु. ६०.५५ कोटी

एवढ्या रकमेची ७ सहकारी सूतगिरण्यांच्या संबंधित लेख्यांमध्ये कर्जखात्यात नोंद न घेण्याची कारणे काय आहेत.

शासनाचे हमी आवाहीत संबंधीत शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतर मुद्दलाची नोंद घेण्याची कार्यवाही सुरु झालेली होती. सुतगिरण्यांकडे कर्जाच्या संदर्भात मागणी नोंदविण्यात आली, परंतु व्याजाच्या दराबद्दल स्पष्टता नसल्यामुळे दि. २८.४.२००३ पत्राद्वारे मार्गदर्शन मागविण्यात आले याची माहिती सिनिअर ऑडीट ऑफीसर यांनी महालेखापाल यांना दिनांक २१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविली.

७ सुत गिरण्यांना दिलेल्या कर्जावर शासनाने किती टक्के व्याज आकारले याचा तपशिल द्यावा.

दिनांक २६ मार्च १९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये १३ टक्के व्याज आकारणी करण्यात आली आहे.

सदरहू व्याजाची आकारणी चक्रवाढव्याज दराने करण्यात येते की, सरळव्याज दराने करण्यात येते ?

व्याजाची आकारणी सरळ व्याज दराने करण्यात आलेली आहे.

सहकारी सुतगिरण्यांच्या लेख्यामध्ये दिनांक ३१ मार्च, २००६ पर्यंतच्या मुद्दल रु. ६०.५५ कोटी व व्याज रु. १४.७९ कोटी याची नोंद केव्हा घेण्यात आली.

दिनांक २१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे वरिष्ठ लेखाधिकारी यांनी दि. ३१ मार्च, २००६ पर्यंतचे मुद्दल रु. ६०.५५ कोटी ७ सुतगिरण्यांबाबत लेखे अद्यावत करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे.

३ चालु असलेल्या सुतगिरण्यांच्या सुनावणीच्या प्रक्रियेबद्दल माहिती द्यावी. सदरहू प्रक्रिया केव्हा पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. दोषी आढळलेल्या सुतगिरण्यांवर कोणती वैधानिक कारवाई करण्यात येते ?

३ चालु सुतगिरण्यांबाबत दि. २२.३.२०११ रोजी महसूल वसुली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असून संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे वसुली संदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे.

बंद असलेल्या १ सुतगिरणीकडून रक्कम वसुली कशाप्रकारे करण्यात येणार आहे.

जवाहर रोटो ही बंद असलेली सुत गिरणी दि. १२.९.२०११ च्या आदेशाद्वारे

अवसायनात असल्याचे घोषित करण्यात आले. त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले. त्यापूर्वी गिरणीचे उत्पादन बंद असताना सुध्दा थकित रकमांची वसुली करण्याबाबत दिनांक २२.७.२००५, ७.१.२००६, ३१.१.०७, ६.१०.०८, ८.७.१० अन्वये गिरणीच्या संचालक मंडळाकडे मागणी केलेली आहे. तसेच गिरणी दिनांक १२.९.२०११ रोजी अवसायनात घेण्यात आल्यानंतर गिरणीचे अवसायकाकडे दिनांक २१.९.२०१२ रोजीच्या पत्रान्वये क्लेम नोंदवून गिरणीची अवसायन कार्यवाही पूर्ण करतांना शासनाच्या कर्जाची प्राथम्याने परतफेड करण्याबाबत कळविले आहे.

अवसायनात असलेल्या ३ गिरण्यांची अवसायकाकडे किती रकमेची वसुलपात्र मागणी केव्हा केली आहे. वसुलीबाबत सद्य:स्थिती काय आहे.

खाली नमूद केल्याप्रमाणे पत्राद्वारे मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

गिरणीचे प्रकार	मागणी रक्कम	मागणीचा दिनांक
प्रभावती परभणी	रु. ४७०.०६	३.१.०८
सोलापूर विणकर, सोलापूर	रु. २१०.५२	३.१.०८
यवतमाळ जिल्हा, यवतमाळ	रु. ५६१.१७	३०.१.०८
प्रभावती परभणी	रु. ११४१.०८	८.७.०८
सोलापूर विणकर, सोलापूर	रु. ३६९.४२	८.७.१०
यवतमाळ जिल्हा, यवतमाळ	रु. ५७०.९०	८.७.१०

पैनगंगा सहकारी सुतगिरणी मर्यादित साखरखेड, बुलढाणा आणि महाराष्ट्र सहकारी सुतगिरणी मर्यादित, भुसावळ, जळगांव या दोन सहकारी सुतगिरण्यांच्या कर्जाची नोंद उशिराने अद्ययावत करण्याची कारणे काय आहेत.

शासनाचे हमी आवाहीत संबंधीत शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतर मुद्दलाची नोंद घेण्याची कार्यवाही सुरु झालेली होती. सुत गिरण्यांकडे मागणी नोंदविण्यात आली परंतु व्याजाच्या दराबद्दल स्पष्टता नसल्यामुळे दिनांक २८.४.२००३ च्या पत्राद्वारे मार्गदर्शन मागविण्यात आले. तथापि, गिरणीला संचालनालयाने दिनांक २६.५.२००५ रोजीच्या पत्रान्वये रक्कम भरण्यास कळविण्यात आले. गिरणीने सदर रकमेचा भरणा न केल्याने गिरणीविरुध्द कलम १५५ अंतर्गत आर.आर.सी. निर्गमित करण्यात आली. याची माहिती सिनिअर ऑडीट ऑफीसर यांनी महालेखापाल यांना दि. २१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविली.

उक्त सुत गिरण्यांच्या कर्जाच्या नोंदी दिनांक ३१ मार्च २००६ पर्यंत अद्ययावत करण्यात आल्या आहेत. तथापि सदर सुत गिरण्यांवर नोटीसीची कारवाई जुलै, २०१० मध्ये केली आहे. ४ वर्ष विलंबाने कारवाई सुरु करण्याची कारणे काय आहेत.

संचालनालयाने दिनांक ३१.३.२०१२ पर्यंत कर्जाच्या नोंदी अद्ययावत केलेल्या आहेत. तसेच खाली नमूद केलेल्या तक्त्यानुसार संचालनालयातर्फे वेळोवेळी वसूली संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

अ.क्र.	गिरणीचे नाव	संचालनालयाने केलेली कार्यवाही	कर्ज मंजूरीच्या वेळी गिरणीची स्थिती
१.	प्रभावती सहकारी सुतगिरणी मर्यादित, परभणी	१९/३/२००३, २२/७/२००५, ११/८/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ८/१/२००८, ८/७/२०१०.	गिरणी अवसायनात होती. अवसायन दि. १६/३/९३
२.	यवतमाळ जिल्हा कापूस उत्पादक सहकारी सुतगिरणी मर्यादित, पुसद	१९/३/२००३, २२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ३०/१/२००८, ८/७/२०१०, २१/९/२०१२	गिरणी अवसायनात होती. अवसायन दि. १६/३/९३
३.	पैनगंगा सहकारी सुतगिरणी मर्यादित, साखरखेडा	१४/९/२००४, १९/१/२००५, २२/७/२००५, २६/४/२००५, २२/९/२००५ आरआरसी, अ.शा.पत्र दि. ३०/९/२००५, जिल्हाधिकारी यांना, ७/१/२००६, अ.शा.पत्र दि.१५.२.२००६ जिल्हाधिकारी ९.५.२००६ अ.शा.पत्र २०/७/२००६ जिल्हाधिकारी, १४/८/२००६, अ.शा. पत्र दि. १६/११/२००६, जिल्हाधिकारी ३१/१/२००७, ०६/१०/२००८, ८/७/२०१० कलम १५५ ची नोटीस २८/१०/१० रोजीचे पत्र, ९/१२/२०१०, २२/३/२०११ ची आरआरसी, २५/१०/२०११ रोजी जिल्हाधिकारी, ८/१२/२०११, २८/१२/२०११, अशा पत्र जिल्हाधिकारी १९/५/२०१२.	गिरणी उत्पादनाखाली होती. सद्यस्थितीत गिरणीचे उत्पादन कार्य बंद आहे.
४.	महाराष्ट्र सहकारी सुतगिरणी मर्यादित खडका	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ८/७/२०१०, २१/९/२०१२.	गिरणीचे उत्पादन बंद होते. गिरणी दि. ९/५/२००८ रोजी अवसायनात घेण्यात आली.
५.	वसंतदादा सहकारी सुतगिरणी मर्यादित सांगली	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ३/१/२००८, ८/७/२०१०, २१/९/२०१२.	गिरणीचे उत्पादन बंद होते. गिरणी दि. ३/९/२००७ रोजी अवसायनात घेण्यात आली.
६.	रेणुका आदिवासी सहकारी सुतगिरणी मर्यादित किनवट	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ३/१/२००८, ८/७/२०१०, २१/९/२०१२.	गिरणीचे उत्पादन सुरु झाले नव्हते. गिरणी दि. २१/२/२००६ रोजी अवसायनात घेण्यात आली.
७.	सोलापूर सहकारी	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ३/१/२००८,	गिरणीचे उत्पादन बंद होते.

	सुतगिरणी मर्यादित सोलापूर	८/७/२०१०, २१/९/२०१२.	गिरणी दि. १९/१/२००५ रोजी अवसायनात घेण्यात आली.
८.	संजय गांधी कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्यादित, जळगांव (आ)	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ८/७/२०१०, (सुनावणी नोटीस), २८/१०/२०१०,३/१/२०११, आरआरसी २२/३/२०११, १/११/२०११, जिल्हाधिकारी, अ.शा.पत्र दि. ८/१२/२०११ जिल्हाधिकारी, १९/५/२०१२ जिल्हाधिकारी.	कर्ज वितरणाच्या वेळी गिरणीचे उत्पादन बंद होते. सद्यस्थितीत गिरणीचे उत्पादन सुरु आहे.
९.	विर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्यादित, मलकापूर	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ८/७/२०१०, (सुनावणी नोटीस), २८/१०/२०१०, ९/१२/२०१०, आरआरसी, २२/३/२०११, २०/१०/२०११ जिल्हाधिकारी, २९/११/२०११ जिल्हाधिकारी यांचे पत्र त्यांत मशिनरी मुल्यांकनाबाबत कार्यकारी संचालक, वस्त्रोद्योग महासंघ यांच्याकडून अभिप्राय मागितले आहे. ते प्राप्त होताच वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात येईल, अ.शा. पत्र दि. ५/१२/२०११ जिल्हाधिकारी, १९/५/२०१२ जिल्हाधिकारी.	कर्ज वितरणाच्या वेळी गिरणीचे उत्पादन सुरु होते. सद्यस्थितीत गिरणी उत्पादनाखाली आहे.
१०.	बारामती सहकारी सूतगिरणी मर्यादित, बारामती	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ८/७/२०१०, २१/९/२०१२.	गिरणीचे उत्पादन बंद होते. गिरणी ४/६/२००९ रोजी अवसायनात घेण्यात आली.
११.	जवाहर रोटो सहकारी सूतगिरणी मर्यादित, धुळे	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ६/१०/२००८, ८/७/२०१०, २१/९/२०१२.	गिरणीचे उत्पादन बंद होते. गिरणी दि. १२/९/२०११
१२.	नवमहाराष्ट्र सहकारी सूतगिरणी इचलकरंजी	२२/७/२००५, ७/१/२००६, ३१/१/२००७, ६/१०/२००८, (कलम ७९), २७/११/२००८, ८/७/२०१०, कलम ७९ नोटीस, २८/१०/२०११, ३/१/२०११, २२/३/२०११ आरआरसी, १४/१२/२०११ जिल्हाधिकारी, १९/५/२०१२ जिल्हाधिकारी २१/८/२०१२ जिल्हाधिकारी	गिरणीचे उत्पादन सुरु होते. सद्यस्थितीत गिरणी उत्पादनाखाली आहे.

शासनाने दिनांक ७/५/२००५ अन्वये संस्थेच्या थकीत कर्जाची परतफेड शासनाने भरणा केली असल्याने सूतगिरणीची मालमत्ता शासनाचे नावे गहाण करुन घेण्याबाबत निर्देश दिले आहे. त्यानुसार खालील सहकारी सूतगिरण्यांनी आपली मालमत्ता गहाणखत करुन दिले आहे.

१. संजय गांधी कापूस उत्पादक सूतगिरणी मर्यादित, जळगांव जामोद.

२. यवतमाळ जिल्हा कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्यादित, पुसद.

३. पैनगंगा सहकारी सूतगिरणी मर्यादित, साखरखेर्डा.

४. विर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्यादित, मलकापूर.

अवसायनातील सहकारी सुत गिरण्यांच्याबाबतीत अवसायकाकडे क्लेम नोंदविण्यात आले असून चालु सहकारी सुतगिरण्यांवर महसूली वसुली प्रमाणपत्र महालेखाकार कार्यालयाने लेखापरिक्षण घेण्यापूर्वीच कार्यवाही सुरु केलेली असल्याने चार वर्ष विलंबाने कारवाई सुरु केली असे म्हणणे योग्य होणार नाही.

सदर सुत गिरण्यांवर केलेल्या कारवाईची सद्यस्थिती काय आहे.

संचालनालयाने सुतगिरण्यांकडून वसुली वर नमूद केलेल्या तक्त्यानुसार असल्याचे सांगितले.

उपरोक्त प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर संचालक (वस्त्रोद्योग) यांनी सहकारी सुतगिरण्यांचे कर्जलेखे अद्ययावत करण्याचे आणि संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सुधारित दावे सादर करण्याव्यतिरिक्त अवसायकाकडे केलेले दावे सुधारित करण्याचे मान्य केले असल्याने संचालकांनी जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे समितीचे मत असून याप्रकरणी संचालकावर काय कारवाई केली याची माहिती समितीला देण्यात यावी.

संचालनालयाने सुतगिरण्यांकडून वसुली संदर्भात वेळोवेळी कार्यवाही केली असून कर्ज लेखे अद्ययावत करण्यात आले आहेत. तसेच संबंधित अवसायकाकडे वेळोवेळी पत्राद्वारे वसुलीबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यामुळे संचालकांनी वसुलीबाबत दुर्लक्ष केले आहे असे म्हणता येत नाही.

अभिप्राय शिफारशी

विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या आधारे वरीलप्रमाणे शिफारशी करण्यात आल्या आहेत.

नवीन सूत गिरण्यासंबंधातील शासनाने नुकतीच सन २०१२ मध्ये नवीन धोरण जाहीर केले आहे. ज्या भागात म्हणजे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र कापूस जास्त पिकतो तेथे सहकारी सूत गिरण्यांना मान्यता देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच, ज्या तालुक्यात सहकारी तत्त्वावर सूत गिरणी दिली असेल तेथे पुन्हा सूत गिरणी द्यायची नाही असा निर्णय घेतला आहे. **तसेच यापूर्वी अवसायानता काढलेल्या सूत गिरणीतील कोणत्या संचालकास व पूर्वी संचालक म्हणून राहिलेल्या व्यक्तीला किंवा कार्यकारिणीतील सभासदास नवीन सुरु केलेल्या सूत गिरणीमध्ये कोणतेही संचालक पद किंवा कार्यकारीणीचे सदस्यत्व मिळाल्यास अशा सूत गिरण्या सुरु करण्यास परवानगी देण्यात येवू नये अशी समितीची शिफारस आहे.**

सूत गिरण्या उभारण्यास भांडवलाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता लागते. हे भांडवल वित्तीय संस्थांकडून उभे करण्यात येते. परंतु या कर्जासाठी हमी आवश्यक असल्याने शासनाकडून कर्जासाठी बँक गॅरंटी देण्यात येते. परंतु या सूत गिरण्या तोट्यात गेल्यामुळे या गिरण्यांनी वित्तीय संस्थांकडून घेतलेले कर्ज परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे शासनाने बँक गॅरंटी दिली असल्याने शासनास कर्ज फेड करणे भाग पडते. शासनाच्या हमीमुळे सूत गिरण्यांचे मालक देखिल सदर सूत गिरणी कार्यक्षमरित्या चालविली जाते का याबाबत दुर्लक्ष करतात. अशा प्रकारे शासनच सूत गिरण्या तोट्यात नेण्यास हातभार लावते. शासनाने हमीपाटी दिलेल्या रकमेची वसुली सूत गिरण्यांकडून करण्यास शासकीय अधिकारी देखिल टाळाटाळ करतात व योग्य प्रकारे पाठपुरावा करीत नाहीत. यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. **त्यामुळे शासनाने सूत गिरण्यांना हमी पोटी दिलेल्या कर्जाच्या वसुली संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी कसूर केली आहे त्या अधिकाऱ्यांवर नागरी सेवा नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीच्या साक्षीमध्ये समितीच्या निदर्शनास केलेल्या आठ सूतगिरण्या अवसायनात निघाल्यानंतर शासनाने कर्ज वसूलीसाठी वेळोवळी केवळ पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केलेला आहे. परंतु कोणतीही कायदेशीर कारवाई प्रस्तावित केली नाही. अवसायानात निघालेल्या सूत गिरण्यांच्या संचालक मंडळाने शासनाच्या पत्रव्यवहाराची कोणतीही दखल घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे **सूतगिरण्यांच्या संचालक मंडळाने शासनाचे कर्ज थकविले, सूतगिरण्यांच्या कामात दखल अंदाजी करुन उत्पादनात अनियमितता आणली, तसेच उत्पादन अचानक बंद करुन सूतगिरण्या तोट्यात असल्याचे दर्शविण्यात आल्या आहेत. अशा सूत गिरणीतील संचालक मंडळावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्याची तरतूद कायद्यात करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट - अ

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(४) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(५) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(८) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(९) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१०) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(११) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१२) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१३) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. बी.एन.कांबळे, सह सचिव
(३) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव, (लेखा व कोषागरे)

साक्षीदार :

महसूल व वन (महसूल) विभाग, मंत्रालय

(१) श्री. स्वाधीन क्षत्रिय, प्रधान सचिव
(२) श्री. मिलिंद म्हैसकर, सचिव
(३) श्री. एस.चोकलिंगम, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४, ५.५ संदर्भात अप्पर मुख्य सचिव व सचिव महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(२) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(३) श्री. मधु चव्हाण, वि.स.स.
(१४) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(१५) श्री. ए.टी. पवार, वि.स.स.
(१६) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(१७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(१८) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(१९) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(२०) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(२१) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(२२) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(२३) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
(२४) श्री. दिवाकर रावते. वि.प.स.
(२५) श्री. मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. अनंतराम आर. उपमहालेखापाल (लेखा व व्हीएलसी)
श्री. सुरेश एस.जगताप, उप महालेखापाल (महसूल विभाग)

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय

(१) श्री. आनंद कुलकर्णी, अप्पर मुख्य सचिव
(२) श्री.करवंदे, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक एस.टी. महामंडळ

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.४ संदर्भात प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(७) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(८) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(९) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१०) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(११) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. सुरेश जगताप, उप महालेखापाल, प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा) कार्यालय, मुंबई.
श्री. उदय शिंदे, उप महालेखापाल, महालेखापाल (लेखा परिक्षा) कार्यालय, नागपूर.

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

वस्त्रोद्योग विभाग विभाग, मंत्रालय

श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव

महसूल व वन (वन) विभाग, मंत्रालय

(१) श्री. प्रविण परदेशी, प्रधान सचिव (वने)
(२) श्री. ए.के.जोशी, प्रधान मुख्य व संरक्षक
(३) श्री. देवेंद्र कुमार, अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (संसाधन)
(४) श्री. भगवान, अप्पर मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२ व ६.३ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (वन) आणि सहकार व वस्त्रोद्योग (वस्त्रोद्योग) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
(६) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(७) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
(८) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(९) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(१०) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(११) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१२) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१३) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१४) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(१५) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१६) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१७) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(३) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

वित्त विभाग, मंत्रालय

(१) श्री.सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव
(२) श्री.संजय भाटीया, विक्रीकर आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ५.३, ५.४ संदर्भात सचिव, वित्त विभाग यांची साक्ष घेतली.

दिनांक १४ व १५ डिसेंबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक दिनांक १४ व १५ डिसेंबर, २०१२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील मिराई विश्रांतीगृह येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१. श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती सदस्य

२. श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
३. श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
४. श्री.संजय सावकारे, वि.स.स.
५. श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
६. प्रा. राम शिंदे, वि.स.स.
७. श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
८. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
९. श्री. विनायक मेटे, वि.प.स.

निमंत्रित

१०. श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी

साक्षीदार :

महसुल व वन (वन) विभाग
श्री.ए.के.सक्सेना, अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२ संदर्भात सचिव, महसूल व वन (वन) विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील मिराई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(६) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(८) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.
(९) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(१०) श्री.बदामराव पंडीत, वि.स.स.
(११) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(१२) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१३) श्री.आर.एम. वाणी, वि.स.स.
(१४) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१५) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१६) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(१७) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१८) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१९) श्री.विनायक राऊत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के. चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी

समितीने पंधरावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.